म. ग्रं. सं. ठाणे.
विषय प्रवास
न. क्र. ६६०



# साबरमतीचे साबरमती

शांतिलाल भंडारी

REFBK-0024427

संदर्भ भूप्रवास
९१०
28820
9192108

# साबरमती से साबरमती

REFBK 0024427
REFBK-0024427

शांतिलाल भंडारी

साबरमती ते साबरमती
शांतिलाल भंडारी

प्रकाशक
चिरायू प्रकाशन
'स्वामी कृपा'
पारिजात सोसायटी
पुणे ४११ ०३७

प्रथमावृत्ती
३१ ऑगस्ट १९८४


एकमेव विक्रेते
वैभव प्रकाशन
७५५ सदाशिव
पुणे ४११ ०३०

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव
पुणे ४११ ०३०

चित्रकार
अनंत सालकर


©
शांतिलाल भंडारी

मूल्य
शंभर रुपये



# साबरमती ते साबरमती


शांतिलाल
भंडारी



उंच भरारणाऱ्या पाखराला
घरट्याकडे परतायची
एवढी तेवढी जाण सोडल्यास
दिशा, वाटा, वळणे यापैकी
कशाचच भान नसत .
त्याच भरारण स्वैर असत
मन:पूत आणि मनसोक्त !

विलक्षण तद्रीत, विलक्षण मस्तीत .
कधी भासावा गिरी मोहरी .
कधी वाटावी वरी गिरी .
अशा काहीशा धुदीत
तरीही मुक्त मुक्त आणि मुक्त ! .


‘ मन पाखरू पाखरू
त्याचा सागू काय मात ?
आता व्हतं भुईवर
गेल गेल आभायात ! . ’



सर्वच


मार्गदर्शक

**पूर्वसूरींना**



माणूस असायला पाहिजे
तसा असत नाही।
हे जगातल मोठ दु ख !
आणि
असतो तसाही
तो असत नाही !
हे तर, त्याहून मोठ दु ख !
म्हणूनच तर .
काही थोडेच अपवाद वगळल्यास
माणसाचा प्रवास
जेथून सुरु होतो...
तेथूनच तो
पुन पुन्हा चालू राहातो।
वारवार !

# साबरमती ते साबरमती



SABARMATI TE SABARMATI

A Chirayu Prakashan

( in Marathi )

by

Shantilal Bhandari

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# एक

धन्यवाद !

तुम्ही सहप्रवासास सिद्ध झालात याबद्दल तुम्हास धन्यवाद !...

तसे हे दिवस थंडीचे. पौष मासात पहाटेचा गारवा खूपच बोचरा असतो पण आज मात्र हवेत म्हणावा तसा गारठा नाही तुम्हालाही तो विशेष जाणवला नसावा दिवस थंडीचे म्हणून तुम्ही अगदी जय्यत तयारीने आलात तुम्ही अंथरूण पांघरूण मोजकेच बरोबर घेतले असते तर थंडी तुम्हाला खिजवायला हमखास आली असती आणि मग हुडहुडी भरून तुम्ही काकडून गेला असता ! आता तुम्ही ब्लँकेटस, सॉक्स, स्वेटर, मफलर वगैरे लोकरी चीजवस्तू भरपूर घेतल्या असूनही, आज थंडी कुठे तरी दडी मारून बसली असावी उगाच अवाजवी सामानाचे ओझे बरोबर वागवले याची तुम्हास हळहळ वाटते निसर्गाची ही लहर तुम्हास चमत्कारिक वाटावी यात नवल नाही पावसाळ्यात तर हा छदिष्ट निसर्ग सर्वांची हमखास परीक्षाच पाहात असतो आभाळ कसे निरभ्र स्वच्छ असावे, पावसाचे कुठेही थोडे-देखील चिन्ह दिसू नये सोबत उगाच छत्री वागवायला नको असा निर्णय घेऊन तुम्ही मारे ऐटीत बाहेर पडता आणि निम्म्या-शिम्म्या वाटेतच हा पाऊस तुम्हास अवचित गाठतो तो तुम्हास पुरेपूर झोडपून काढतो आणि बोलबोल म्हणता म्हणता तुम्हाला तो नखशिखांत ओलाचिंब करतो ! अगदी या उलट, आभाळ गच्च भरून काळवंडलेले असावे, पाऊस केव्हा धो धो कोसळेल याचा नेम नसावा महत्त्वाच्या कामासाठी बाहेर पडण्याखेरीज गत्यंतर नसते म्हणून छत्री अथवा रेनकोट यापैकी एखादी किंवा प्रसंगी दोन्हीही वस्तू घेऊन तुम्ही बाहेर पडता पण तास न् तास एक वा दोन वस्तू बरोबर वागवूनही, कोणतीही वस्तू एकदाही व कुठेही उघडण्याची तुमच्यावर पाळी येत नसते ! हुलकावण्या देण्यात निसर्गाइतके वाकबगार कोणीच नसावे !

साबरमतीच्या परिसरात येऊनही गारठ्याने तुम्हाला सतावले नाही, हे एकपरी ठीकच म्हणायचे शत्रुपक्षाच सामर्थ्य अजमावून व कनिष्ठ शत्रूही बलिष्ठ असतो याची जाण ठेवून निकराच्या प्रतिकारासाठी सिद्धता ठेवावी, तेव्हा कुठे विजयश्री सहजासहजी सपादन करता येते, ही युद्धनीती तुम्ही यावेळी अनुभवली ! हवेत कडाक्याचा गारठा असता तर मात्र तुम्हाला सर्व साहित्यानिशी तोंड द्यावे लागले असते आणि अहमदाबाद जवळ आले म्हणून अंथरूण-पांघरूण आवरण्यासाठी तुमची थोडी का होईना धादल उडाली असती आता आपापले बेडिंग बिनधास्तपणे बांधायला कसलीच हरकत नाही दहा-पधरा मिनिटात अहमदाबादच रेल्वेस्टेशन येईल पहाटे सहाच्या पूर्वीच सौराष्ट्र मेलमधून तुम्ही अहमदाबाद स्टेशनवर उतराल, त्यावेळी तुम्हाला साबरमतीपार घेऊन जाणारी बस स्टेशनच्या बाहेरच उभी राहिलेली दिसेल !

पाहा ..सुस्वागतम् !

अहमदाबादच्या 'कर्नावट ट्रॅव्हल्स'ची लक्झरी बस स्टेशनाबाहेर उभी आहे या आराम गाडीचे 'मधुमीलन' हे नावही कसे गाडीप्रमाणेच गोड वाटते तुम्हाला ! तुमचे आणि तिचे प्रथमच मीलन होत आहे ! साबर-मतीच्या ऐलथडी ! . साबरमती पार करून साबरमतीच्या पैलथडी दूर जाण्यासाठी !

" हे शखेश्वर स्वामी, प्रभु तुम अतर्यामी । तमने वदन करिये, शिवसुखना स्वामी ।।.. हे शखेश्वर स्वामी !"

अरे वा ! हे सुरेल स्वर कोठून तरी येत आहेत पहाटेच्या प्रशांत समयी धुद करून टाकणारी ही रसीली धून कानी पडत आहे ही प्रार्थना 'मधू-मीलन' मधून प्रक्षेपित होत आहे लक्झरी बसमधील मधुर कॅसेटचे हे सुरेख तालबद्ध स्पंदन आहे हवेतले दिवसभरातले प्रदूषण रात्रीच्या मद झुळुकानी आधीच दूर केलेले आहे या मगल सुरेल प्रक्षेपणाने तर स्वच्छ निर्मळ वातावरणावर पावित्र्याचा साज चढविला आहे सर्वांचीच मने प्रफुल्लित व्हावीत अशी सुरेख किमया या वातावरणात व या वातावरणावर अलगद तरगणाऱ्या सगीत लहरीत आहे तुमच्या येथील प्रस्थानाचा प्रारंभ तर छान होत आहे साबरमतीच्या सताच्या भूप्रदेशावर पडलेले तुमचे पहिले पाऊल खरोखरच भाग्यवान आहे !

महाराष्ट्र भूमी सतांची ! तर गुर्जर भूमी तीर्थांची ! महाराष्ट्रात पढरपूर, देहू, आळदी, नाशिक, तुळजापूर, यासारखी तीर्थक्षेत्रे काही कमी

नाहीत पण तीर्थापेक्षा मुकुंदराज, चक्रधरस्वामी, निवृत्तिनाथ, सोपानदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव, सेना महाराज, सावता माळी, विसोबा, कान्होबा, सोहिरोबा, गोरा कुंभार, चांगदेव, निळोबाराय, चोखोबा, भानुदास, रामदास, नरहरी सोनार, परशा भागवत, काशीबा गुरव, बंका महार जगमित्र नागा, जोगा तेली, दादबा पिंजारी, गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, गुलाबराव महाराज, गजानन महाराज, साईबाबा, जनाबाई, सखू, कान्होपात्रा, मुक्ताबाई बहिणाबाई, सोयराई, आदी संतांनी महाराष्ट्र भूमीला अधिक पावन केले आहे ! नरसी मेहता, जलाराम बापा, स्वामी नारायण, भक्तकवी दयाराम आदी गुजरातचे संत, परंतु असंख्य तीर्थक्षेत्रांनी गुजरात भूमीला अतिशय उन्नत केले आहे ! हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे हे सत्य दोन्ही राज्यांनी तसे सार्थ ठरविले आहे !

साबरमतीचे आधुनिक संत महात्मा गांधी आणि एकोणीसशे तीस सालचा त्यांचा ' दांडी मार्च ' सत्याग्रह यासारख्या अनंत चिरंतन स्मृती जागवणारा त्यांचा साबरमती आश्रम याची तुम्हाला आता आवर्जून आठवण झाली असेल ! त्या निर्मल, उदात्त आणि अक्षय स्मृतींनी तुमच्या झंकृत अंतःकरणातील श्रद्धेचा प्राजक्त आदरभावाने व भक्तिभावाने मोहरला असेल ! ही पहिली वहिली मानवंदना शुभदायी ठरावी असेच कोणालाही वाटावे ! साबरमतीचा शांत धीरोदात्त प्रवाह व त्याभोवतालचा परिसर बापूंचे प्यारे भजन अहोरात्र आळवीत असून त्याचे शब्द तुमच्या कानात घुमत आहेत ! ' रघुपती राघव राजाराम पतितपावन सीताराम । सीताराम सीताराम भज प्यारे तू सीताराम ।। ईश्वर अल्ला तेरे नाम सबको सन्मती दे भगवान । मंदिर मस्जिद तेरे धाम सबको जन्म दिये भगवान ।। रघुपती राघव राजाराम पतितपावन सीताराम । सीताराम सीताराम भज प्यारे तू सीताराम ।। भज मन भज मन राम रहीम । भज मन भज मन कृष्ण करीम ।। रघुपती राघव राजाराम पतितपावन सीताराम । राम राम राम राम भज प्यारे तू सीताराम ।। ' या भजनाच्या सुरांतून जणू राम, रहीम, कृष्ण, करीम एवढेच नव्हे तर ' राम कहो, रहेमान कहो, कान्हा कहो, महादेव रे, पारसनाथ कहो, कहो ब्रह्मा, सकल ब्रह्म स्वयमेव रे ' या गांधीजींच्या भजनातले सर्व महामानव तुम्हाला भावपूर्ण आशीर्वाद देत आहेत, ' शुभास्ते पंथान सन्तु '

आता तुम्ही समाधानाने ' मधुमीलन ' मध्ये पाऊल टाकायला कसलीच अडचण नाही ! हो.. दोनच मिनिट थांबा हा पहा तुमच्यासाठी गरम गरम चहा आला चहा नको असेल तर कॉफीही तयार आहे हवे असेल तर दूध मागा संकोच करू नका ! ' मधुमीलन 'ची ही सर्वप्रथमची सलामी

झकास वाटेल तुम्हाला ! कडाक्याची थंडी नसली तरी प्रातःकालच्या शीतल वातावरणात हे गरमागरम घुटके तुम्हास उबारा देतील आणि कुजबुजतीलही हेही तुम्हाला सांगतील, 'शुभास्ते पथान सन्तु !'

बसमधील पुढील बाकावरच्या सद्गृहस्थाकडे आपली नजर काही क्षण वळत आहे ही व्यक्ती फारशी बोलत नसल्याचे तुमच्या लक्षात आल्यामुळे कदाचित तुमची दृष्टी त्यांच्यावर खिळली असावी त्यांची देहप्रकृती कृश नाही आणि स्थूलही नाही निमगोरी मुद्रा शांत आणि धीरोदात्त . डोळे मात्र टपोरे आणि टिपून घेणारे, म्हणूनच भावदर्शी आणि भावस्पर्शी ! अशा व्यक्तिमत्त्वाचा परिचय व्हावा असे तुम्हास वाटणे साहजिकच आहे कारण-परत्वे हळूहळू ओघाने एकेकांचा परिचय होईलच ज्यांच्याकडे तुम्ही आता उत्सुकतेने पाहात आहात ते पुण्याचे श्री अशोकभाई शहा आहेत ते या यात्रेचे प्रवर्तक आहेत असे कुणी सांगूनही आपला यावर विश्वास बसणार नाही तुमची खात्री पटावी म्हणून ते स्वतःही तुम्हास सांगणार नाहीत कारण ते मितभाषी आहेत त्यांच्या शेजारी अर्थातच त्यांच्या धर्मपत्नी सौ प्रमिलाबेन शहा आहेत एकमेकास अनुरूप अशी ही जोडी आहे मन-मोकळेपणाने बोलून या पतीच्या अबोल्याची उणीव भरून काढतील

या यात्रेचे नियोजन मुंबईचे तडफदार तरुण श्री गिरीश मर्चंट यांनी केले असून ते सहकुटुंब सहपरिवार अगदी शेवटच्या बाकावर स्थानापन्न झालेले आहेत काही मंडळी पडद्यामागे राहून कामगिरी उत्साहाने बजाव-तात पण प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहतात अशा प्रसिद्धीपराङ्मुख व्यक्तींपैकी ही एक व्यक्ती आहे यात्रेचे संचालन मात्र अहमदाबादचे श्री जयंतीभाई शहा व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ हसूबेन शहा या उभयता-कडे आहे हसूबेन हे हसाबेनच लघुरूप असावे ! त्या आपल्या पतिदेवांना 'साहेब' किंवा 'पपाजी' या नावाने हाक मारतात ! 'साहेब' हे संबो-धन ठीक पण 'पपाजी' थोडं विशेषच नाही का ! मुलं 'पपाजी' म्हणतात म्हणून पत्नीही 'पपाजी' म्हणत असावी हा शेवटी एकेकाच्या वैयक्तिक जीवनातील जिव्हाळ्याचा प्रश्न आहे शिवाय व्यक्तिस्वातंत्र्य आहेच आहे हसूबेन जयंतीभाईंना या बिरुदांनी आदराने संबोधित असूनही संचलनातील मुखत्यारी हसूबेनकडे आहे हे आपल्या लक्षात येईल सुकाणू एकाद दुसऱ्या व्यक्तीच्या हाती असते, म्हणूनच नाव पाणी कापीत योग्य दिशेने इष्ट स्थळी सुखरूप पोहोचू शकते साऱ्याच प्रवाशांच्या हाती वल्ही असतील तर नाव जागच्या जागीच घुटमळेल किंवा कुठेतरी भरकटत जाईल प्रवास

दिशाहीन कधीच होऊ नये ! जुन्या नाटकाप्रमाणे प्रवासालाही यासाठीच सूत्रधार असेल तर बरेच म्हणावयाचे सूत्रधार मुरब्बी असायला हवा इतकेच !

आता आपण भद्रेश्वर कच्छचे उद्दिष्ट नजरेपुढे ठेवून निघाला आहात हे स्थान अहमदाबादच्या वायव्येला सुमारे चारशे किलोमीटर अंतरावर गुजरात अंतर्गत कच्छमध्ये आहे आपल्या प्रवासाचा हा पहिला किंवा शेवटचा टप्पा नाही हे उद्दिष्ट गाठण्यासाठी आपण काही टप्पे घेणार आहात कुठे कुठे मागे-पुढेही सरकणार आहात प्रवास सुखाचा व्हावा हीच अर्थात सर्वांची आंतरिक इच्छा आहे त्यासाठी तर सूत्रधार सौ हसूबेन शहा प्रयत्नशील आहेत

हसूबेनच्या हातात ' ककावटी ' कशासाठी म्हणून तुम्ही उत्कंठेने त्यांच्या-कडे पाहात आहात त्यांनी कुणाला तरी कुकुमतिलक केला प्रवासास निघाल्यावर, विशेषत: यात्रेला निघाल्यावर कुकुमतिलक करण्याची गुजराती लोकात पूर्वापार रूढी आहे रीतिरिवाजाप्रमाणे हे सोपस्कार ज्यांनी त्यांनी यापूर्वीच घरी उरकले असावेत येथे बसमध्ये कुकुमतिलक करण्याचे प्रयोजन काय असावे याचे तुम्हास कोडे पडलेले दिसते बहुधा त्याना तशी या आधी फुरसत मिळाली नसावी म्हणून हा तिलकविधी येथे पार पडत असावा ! ज्याना कुकुमतिलक केला जातो त्याच्या हातावर काही रक्कम ठेवली जाते या पद्धतीला ' चांदला ' करणे म्हणतात यात्रेच्या प्रस्थान प्रसंगीच नव्हे, तर वास्तुशात, लग्नकार्य अशा शुभ सोहळ्याप्रसंगी, तपोसाधनेसारख्या धार्मिक प्रसंगी व ' देवगत ' झाल्यावर सुतकी घरी अशुभ ' पगडी ' उतरवून ' होवाळे ' म्हणजे ' सुतक ' काढले जाते तेव्हा, अशा दु:खाच्या प्रसंगीही यजमानाना नातेवाईकाकडून आणि इष्टमित्राकडून चांदले केले जातात ! यजमानांवर पडणारा कार्यातील आर्थिक बोजा विभागून हलका व्हावा व यजमानांना कार्य सुकर वाटावे हा चांदल्यामागचा उद्देश पूर्वसूरींना अभिप्रेत होता ! नव्या युगातल्या ' सहकार चळवळी 'चा प्रादुर्भाव अशाच विचार-धारेतून झाला असावा ! आजकालची ' भिशी ' योजनाही याच पायाभूत कल्पनेवर आधारलेली असावी ! सहकाराचे परिवर्तन जसे स्वाहाकारात झाले तसेच चांदल्याचे म्हणजेच देणग्या आणि आहेर याचे अवलक्षण झाले असून त्याचे स्तोम अलीकडे अवास्तव माजले आहे हे तुम्ही चागले ओळखून आहात !

हसूबेन यांनी ज्याना ' कुकुमतिलक ' केला त्यांच्या हातावर दहाची नोट ठेवली व ' बोलो बोलो भद्रेश्वर—' असे उद्गार काढताच बसमधील इतर

प्रवाशांनी त्याना साथ देऊन 'भगवानकी जय' ही घोषणा पूर्ण केली आळंदी अथवा पंढरपूर येथील यात्रेला जाणारे भाविक 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल ज्ञानेश्वर माउली की जय तुकोबाराया की जय...' असा जयजयकार करतात, त्या धर्तीचाच हा जल्लोष आहे।

ज्यांना 'चांदला' केला त्या सद्गृहस्थांचे नाव श्री भद्रेश शहा असून ते अहमदाबादचे रहिवासी आहेत 'भद्रेश शहा'ना चांदला करून 'भद्रेश्वर भगवाना'चा जयघोष करण्यात आला हा विस्मयजनक योगायोगच म्हणावा लागेल। यात्रेचे उद्दिष्ट सफल होणार याचच हे सुचिन्ह मानावयाला कसलाच प्रत्यवाय नसावा।

बस सुटली प्रवासातील पहिला टप्पा शंखेश्वर असल्याने अर्थातच सर्व प्रवाशांनी आणखी एकदा घोष केला— 'बोलो बोलो श्री शंखेश्वर पार्श्वनाथकी जय।' 'मधुमीलन' साबरमतीचा पूल पार करून विरमगामच्या रोखाने शंखेश्वरकडे निघाली श्रीकृष्ण आणि जरासंध यांचे निर्णायक तुंबळ युद्ध ज्या पुरातन स्थानावर झाले ते स्थान म्हणजे शंखेश्वर। या ठिकाणी महत्प्रयासाने श्रीकृष्णाने जरासंधाचा पराभव केला होता व दुर्लभ विजयप्राप्तीनंतर झालेला अवर्णनीय आनंद व्यक्त करण्यासाठी त्याने येथे प्रचंड उत्साहाने शंख फुंकला होता, म्हणून हा भूभाग 'शंखेश्वर'।...

बस विरमगामहून थेट शंखेश्वरकडे न जाता पूर्व नियोजनाप्रमाणे नाश्तापाण्यासाठी उपरियाळाकडे वळली उपरियाळा गाव विरमगाम खाराघोडा या ग्रामीण रस्त्यावर व लोहमार्गावरही विरमगामच्या पूर्वेला सुमारे तीस किलोमीटर अंतरावर आहे रेल्वे स्टेशनपासून अवघ्या दीड किलोमीटर अंतरावरच्या उपरियाळा या छोट्या गावात रत्ना कुंभार नावाचा एक सामान्य शेतकरी राहत होता शेतीकामाबरोबर तो फावल्या वेळात कुंभारकीचा व्यवसायही करायचा एकशे एकवीस वर्षांपूर्वी म्हणजे विक्रम संवत एकोणीसशे एकोणीसमध्ये वैशाख पौर्णिमेच्या पहाटेस रत्ना कुंभारास एक अर्थवाही स्वप्न पडले होते त्याने स्वप्नात आपल्या शेतामध्ये एक दिव्य चंदनवर्णी पद्मासनस्थ प्रतिमा असल्याचे पाहिले होते उजाडल्यानंतर त्याने शेत खणण्यास प्रारंभ केला आणि स्वप्नातील दृष्टांताप्रमाणे त्याला त्याच्या शेतातच पद्मासनातली तेजस्वी जिनप्रतिमा सापडली। स्वप्नात पाहिल्याप्रमाणेच त्या प्रतिमेचा रंग चंदनी होता व ती जैनांचे प्रथम तीर्थंकर श्री ऋषभदेव भगवान यांची होती शास्त्रीय मीमांसा करणाऱ्या नवमतवाद्यांना ही अद्भुत घटना केवळ विस्मयजनकच नव्हे, तर अविश्वसनीयही वाटेल

मात्र मडक्यासाठी लागणारी माती आणण्याकरिता रत्ना कुभार शेतात गेला असता माती खणता खणता त्याला मूर्ती सापडली होती या घटनेची शक्यता मात्र ते नाकारणार नाहीत समज वेगळे असले तरी फलित एकच आहे।

गुजरातवर व अन्य ठिकाणीही गझनीच्या महमूदाने आणि इतर म्लेंच्छांनी सपत्तीच्या अभिलाषेने अनेकदा स्वाऱ्या केल्या होत्या त्या मूर्ति-द्वेष्टयांनी केवळ लुटालूट केली नव्हती तर मूर्तिभजनाची अघोरी कृत्येही निर्दयपणे व निडरपणे केली होती अशा झझावातात व काळझडपेत श्रद्धेय मूर्तींची वासलात लागू नये म्हणून भाविकांनी, मूर्ती सुरक्षित राहाव्यात यासाठी, त्या कुठे ना कुठे तरी दडवून ठेवल्या होत्या किंवा जमिनीच्या गर्भात पुरून ठेवल्या होत्या उपरियाळाजी हे तीर्थस्थान पधराव्या शतका-पूर्वीचे असून तेथील श्रद्धावान श्रावकांनी जमिनीच्या पोटात लपवून ठेवलेली अती पुरातन प्रतिमा रत्ना कुभारास स्वप्नसकेताने अशी सापडली होती।... त्यापूर्वी येथील 'वाघरी' आदिवासी या गावात हिंसाचार मोठ्या प्रमाणा-वर करीत होते त्यामुळे ते अतिशय दुःखी कष्टी होते या मूर्तीच्या प्राप्ती-नतर त्यांचे क्लेश सपुष्टात आल्याचे त्यांच्या प्रत्ययास आल्यावर येथील पावित्र्यासाठी त्यानी हे गाव सोडले होते। या मूर्तीचे माहात्म्य जाणून उपरियाळा येथील श्रावकांनी या मूर्तीची विक्रम सवत एकोणीसशे वीसच्या कार्तिक शुद्ध पौर्णिमेला मोठ्या भक्तिभावाने विधिपूर्वक प्रतिष्ठा केली होती

श्री आदिनाथ भगवानाच्या अशा या धार्मिक स्थानी केवळ न्याहारी व चहापाणी यासाठी तुम्हास थाबायचे नसून तासाभराच्या अवधीत तुम्ही हे तीर्थ' पाहूनही घ्यावे अशी सयोजकांची इच्छा आहे. अर्थातच सर्वप्रथम श्री आदिश्वर या प्रथम तीर्थंकराच्या तीर्थस्थानी पहिले वहिले वदन करण्याचा तुम्हास लाभ मिळत आहे हीही या प्रातःकालची शुभघटनाच आहे। सूर्याचा पिवळाधमक केशरी प्रभाव आभाळात चौफेर सर्वत्र पसरला असतानाच मधुमीलन बस गावात शिरत आहे मदिराच्या पुढे ती थाबताच तुमच्या कठातून धमक खणखणीत स्वरात जयजयकार होत आहे– 'बोलो बोलो श्री आदिनाथ भगवान की जय।' श्रद्धावानांची अतःकरणे निष्ठेने आणि भक्तिभावाने उचबळून येत आहेत

दर वर्षी फाल्गुन शुद्ध अष्टमीला येथे यात्रा भरत असते. त्या उत्सवाचा लाभ मिळत नसला तरी तुमच्या यात्रेचा श्रीगणेशा श्री आदिनाथांच्या 'उपरियाळा' या तीर्थक्षेत्रापासून होत आहे, हीही काही गौण गोष्ट खचितच नव्हे।.. मराठीतील 'उपरा शब्दाचा अर्थ ध्यानीमनी धरून उपरियाळा गावाचा सदर्भ शोधण्याच्या भानगडीत तुम्ही मुळीच पडू नये!

उलटपक्षी 'उपरी' या गुजराती शब्दाचा 'वरिष्ठ' असा जो अर्थ आहे त्या अर्थाशी या गुजराती गावाचा मेळ बसतो का हे मात्र अवश्य पहावे। गुर्जरभूमीत गुजराती निकष लावणेच योग्य।

वैदिकानी ज्या काळाला 'कलियुग' म्हणून संबोधिले त्या काळाला जैन सिद्धांत 'अवसर्पिणी काल' मानतो। या अवसर्पिणी कालातले पहिले तीर्थंकर म्हणून श्री आदिनाथाचा जैन दर्शनाने सन्मान केला। वेदांनी, पुराणानी व भागवतांनीही ज्याना वंद्य मानले व गुरुदेव दत्तात्रयाचे गुरुदेव म्हणून ज्याचा गौरवपूर्ण उल्लेख झाला, तसेच या सर्वांनी ज्यांना 'चोवीस अवतारां'त मानाचे स्थान दिले त्या मानवजातीच्या उपकारकर्त्याचे व उद्धारकाचे दिव्य दर्शन 'उपरियाळाजी' च्या रूपाने घडून त्याला मनोभावे वंदन करण्याची सुसंधी या आल्हाददायक सकाळच्या प्रशांत प्रहरी उपरियाळा येथे तुम्हास प्रथम लाभत आहे हे केवढे अहोभाग्य आहे असेच तुम्ही समजत असाल।

ऋषभदेवाना सिद्धी प्राप्त होऊन अनेक वर्षे लोटली काळाने अनेक स्थित्यंतरे घडवून आणली होत्याचे नव्हते करून टाकले। पृथ्वीची निर्मिती होऊन चार अब्ज वर्षे झाली असे प्राचीन शास्त्रज्ञाचे व पुराणादी ग्रंथांचे मत आहे। अर्वाचीन शास्त्रज्ञ हा कालावधी तीन कोटी वर्षांचा मानू लागले आहेत या तीन कोटी वर्षांपैकी किमान एक कोटी वर्षे तरी मानवाच्या सध्याच्या उत्क्रांत अवस्थेसाठी लागली असावीत असे त्यांचे प्रतिपादन आहे। जैन आगमाची अशीच धारणा आहे अलिकडे संशोधकानीही हे आता मान्य केले आहे तेव्हा मानवजातीच्या पूर्वावस्थेतील ऋषभदेवांच्या काळाचे अचूक गणित कुणालाच जिथे मांडता आले नाही तिथे त्याच्या जीवनातील संदर्भ अचूकपणे मांडणेही तितकेच कठीण काम आहे। पुरातन लोकवाङ्मय हाच मग यासाठी पाया ठरतो। 'अवसर्पिणी' काळातील या प्रथम राजाला, प्रथम साधूला आणि प्रथम तीर्थंकराला या दृष्टीने जनमानसात आणि जैन सिद्धातात मानाचे स्थान आहे। म्हणूनच सौराष्ट्रातील पालिताना शहराजवळच्या शत्रुंजय पहाडावरील श्री आदिनाथाची मन्दिर नगरी व त्या मंदिर नगरीतील 'दादाचा दरबार' बघण्याची ओढ तुम्हास 'उपरियाळाजी' चे दर्शन होताच प्रकर्षाने खचित् लागेल।..

तारून नेते ते तीर्थ आणि तारून नेतात ते तीर्थंकर। तुमच्या या प्रवासातील हे पहिले वहिले तीर्थ। आणि या पहिल्या वहिल्या तीर्थस्थानी विराजमान आहेत तेही अवसर्पिणी कालातले पहिले वहिले तीर्थंकर। श्री ऋषभदेव। श्री आदिनाथ।...

ज्या तीर्थक्षेत्री तीर्थंकर भगवताचे च्यवन, जन्म, दीक्षा, केवलज्ञान व निर्वाण या पच कल्याणापैकी एक अथवा एकाहून अधिक 'कल्याण' झालेले असते किंवा ज्या तीर्थक्षेत्रांना एक अथवा अनेक तीर्थंकरांचा चरणस्पर्श झालेला असतो अशा तीर्थक्षेत्रांना 'शाश्वत' किंवा 'स्थावर' तीर्थ म्हणून मान्यता मिळते 'शाश्वत' तीर्थाप्रमाणे काही विशिष्ट तीर्थे 'महातीर्थ' म्हणून ओळखली जातात 'शाश्वत' तीर्थ व 'महातीर्थ याप्रमाणे काही तीर्थे 'अतिशय तीर्थ' म्हणून ओळखली जातात, जेथून मुनिपुगवांचे निर्वाण होते अशा सर्व तीर्थांच्या परिसरातील इतर तीर्थांची गणना 'पचतीर्थी'त होते श्री शखेश्वर पार्श्वनाथ हे, जरी येथे कोणा तीर्थंकराचे कसलेच 'कल्याणक' झाले नसले तरीही, एक महान् श्रद्धेय 'महातीर्थ' असून श्री उपरियाळाजी तीर्थ हे श्री शखेश्वर पार्श्वनाथ या महातीर्थाच्या पचतीर्थींपैकी एक अग्रेसर तीर्थ आहे उपरियाळा, समा, राधनपूर, मुजपूर, वडगाम, पाटडी, पचासर, माडण ही तीर्थे श्री शखेश्वर पार्श्वनाथ या महातीर्थाच्या पचतीर्थींतील आहेत

आता तुम्ही बसमधून ज्या ठिकाणी उतरला आहात तेथून श्री उपरियाळाजी तीर्थाचे खरेखुरे दर्शन तुम्हास घडत नाही. एका जुनाट भिंतीच्या दरवाजातून आत प्रवेशल्यानतरच या तीर्थाची भव्यता नजरेत भरते अहमदाबाद येथील 'श्री आनदजी कल्याणजी' पेढी या तीर्थाचा जीर्णोद्धार करीत असून हे काम जवळजवळ पुरे होत आले आहे काही दिवसानी जुन्या भिंतीच्या जागी भक्कम कोट उभा राहिलेला पहावयास मिळेल श्रद्धावान आपापल्या कुवतीप्रमाणे व आतरिक इच्छेप्रमाणे 'देवद्रव्य' म्हणून दान देतात आणि या देवद्रव्याचा सतत ओघ चालू राहात असल्याने श्री आनदजी कल्याणजी पेढी या विश्वस्त सस्थेकडे अमाप पैसा झाला आहे अर्थातच या देवद्रव्याचा विनियोग नवीन मदिरे उभारण्यासाठी व पुरातन मदिरांचा जीर्णोद्धार करण्यासाठी सातत्याने केला जातो देवद्रव्याची गगाजळी साठली नाही तर श्री उपरियाळाजीसारखी मदिरे कालांतराने जुनी होऊन, नादुरुस्त कमकुवत मदिरे काळाच्या पोटात पुन्हा गडप होतील आणि श्री आदिनाथ भगवानाना पुन्हा भूमिगत व्हावे लागेल ! त्यांना भूगर्भातून पुनश्च बाहेर काढण्यासाठी आणखी एका स्वप्नाळू रत्ना कुंभाराला जन्म घ्यावा लागेल ! हे असे घडेलच याची तरी कुठे शाश्वती आहे ! तीर्थक्षेत्रे शाश्वत राहाण्यासाठी जीर्णोद्धारासारख्या धार्मिक कार्यांत सदारत असलेल्या अशा कार्यप्रवण विश्वस्त सस्थाची आजच्या काळात नितांत आवश्यकता आहे ! प्रभास पाटण येथील श्री सोरठी सोमनाथाच्या मदिराचा जीर्णोद्धार तेथील विश्वस्त

मडळींनी भारत सरकारच्या व गुजरात शासनाच्या सहकार्याने केला नसता तर या महान देशाला आपल्या उज्वल इतिहासातील काही सोनेरी पाने हरवून बसावे लागले असते । येणाऱ्या अनेक पिढ्यांना स्फूर्तिदायक ठरतील व वर्षानुवर्षे दिव्यत्वाचा साक्षात्कार घडवीत राहातील अशी पुरातन स्मारके प्राणापलीकडे जपली गेली पाहिजेत या दृष्टीने श्री आनदजी कल्याणजी पेढीचे कार्य प्रशसनीय वाटावे असेच आहे, याबद्दल हे मंदिर व या मदिरा-जवळील विश्रामशाळा, भोजनशाला वगैरे सुखसोयी पाहून तुमचीही खात्री पटेल पाचशे वर्षांहून अधिक काळाची पार्श्वभूमी लाभलेल्या उपरियाळा गावाचे व या गावच्या दैवताचे नाव श्रेष्ठत्वाच्या म्हणजेच वरिष्ठपणाच्या सदर्भात या दृष्टीने सार्थ ठरते असेच तुम्हांस वाटावे !

भव्य मदिराच्या पायऱ्या चढून तुम्ही वर गेलात की एका प्रशस्त आरस-पानी मडपात तुमचा प्रवेश होतो व तेथूनच मदिराच्या गाभाऱ्यातील मूळ-नायकाची चदनवर्णीय प्रतिमा तुमच्या दृष्टीस पडते या मदिरातील ' मूळ नायक अर्थातच श्री आदिनाथ म्हणजेच श्री ऋषभदेव आहेत श्री ऋषभ-देव हे अवसर्पिणी काळातील प्रथम तीर्थंकर म्हणून ते आदिनाथ आदि-श्वर आदेश्वर । याच्या आसनपीठावर ' वृषभा 'चे लांच्छन आहे ' लाञ्छन ' म्हणजेच प्रतिकात्मक चिन्ह । प्रत्येक तीर्थंकराचे वेगवेगळे लाञ्छन असते या चिन्हावरून प्रतिमा कोणत्या तीर्थंकराची हे सहजगत्या ओळखता येते अर्थातच कोणत्या तीर्थंकराचे कोणते लाञ्छन हे माहीत असावयास हवे ! कुठलीही गोष्ट सरावाने अथवा सपर्काने साध्य होत असते !

मन्दिरातील ' मूळ नायक ' मन्दिर ज्या स्थानावर आहे त्या स्थानाच्या माहात्म्याप्रमाणे असतात रत्ना कुभाराला उपरियाळा गावाच्या परिसरात श्री ऋषभदेवाची प्रतिमा सापडली म्हणून येथील ' मूळ नायक ' श्री ऋषभ-देव । ज्या ठिकाणी अशी काहीही ऐतिहासिक घटना घडलेली नसते त्या ठिकाणी गावातील श्रेष्ठीच्या किंवा गावाच्या ' ग्रहमानास अनुकूल ' अस-णाऱ्या तीर्थंकराची तेथील मन्दिरात मूळनायक म्हणून प्रतिष्ठा होते । मूळ नायकाव्यतिरिक्त इतरही प्रतिमा मन्दिराच्या गाभाऱ्यात, प्रदक्षिणेत अथवा मंडपातील ' देहऱ्या 'त किंवा गोखल्या 'त म्हणजे दिवळ्यात असू शकतात

येथील मुख्य मंदिरात मूळनायक श्रीऋषभदेव यांच्या आजूबाजूला श्री शातिनाथ व श्री पार्श्वनाथ यांच्या, मूळनायकाप्रमाणेच सगमरवरी मूर्ती आहेत मुख्य मदिराच्या दोन्ही अगास श्री अजितनाथ व श्री महावीर-स्वामी या तीर्थंकराची छोटी मदिरे आहेत या सर्व मदिराच्या परिक्रमेत

श्री नेमिनाथ, श्री शखेश्वर पार्श्वनाथ, श्री मल्लीनाथ व श्री मनमोहन पार्श्वनाथ यांच्या 'देहऱ्या' आहेत प्रदक्षिणा पुरी करून तुम्ही पुन्हा मुख्य मदिरात येता तेव्हा मंदिरातील आरसपानी काम पाहून तुम्ही थक्क होता, मडपाच्या स्तभावरील व गोलाकार घुमटातील आरसपानी काम तुमचे लक्ष विशेष वेधून घेते या काचेरी महालात तुमचे मन काही क्षण साहजिकच गुतून राहते पण असे एकाच जागी खिळून राहून कसे चालेल ? अत्यत महत्त्वाची एक विलक्षण गोष्ट तुम्हास बारकाईने पहावयाची आहे ती श्री आदिनाथाच्या गाभाऱ्यात मघाशी प्रतिमाचे दर्शन घेण्याच्या घाईत तुमचे इकडे लक्ष गेले नसावे हा पहा अखडदीप ।

गाभाऱ्यातील कोनाड्यात ठेवलेल्या या 'अखडदीपा'च्या ज्योतीवर चांदीची तबकडी लटकावलेली आहे हा दीप गेली नव्याण्णव वर्षे अहोरात्र अखड तेवत आहे पण वैशिष्ट्य हे की, चांदीची ताटली कधीही दीपज्योतीने काजळत नाही ! ताटलीवर काजळीऐवजी केशराचा थर तयार होतो । या केशराचा तिलक भाविक आपल्या कपाळी मोठ्या श्रद्धेने आणि दिमाखाने वागवतात । याचि देही याचि डोळा प्रत्यक्ष पाहिल्यानतर प्रस्तुत विस्मयजनक प्रक्रियेतील अद्‌भुततेची सत्यता पटते । शास्त्रीय मीमासा करण्यात चिकित्सक मन गुरफटले जाऊनही हे चमत्कारिक कोडे सुटत नाही । कधी कधी दिवाळी पाडव्याला तर कधी कधी इतर सणासुदीच्या दिवशी येथे अदृश्य नगाऱ्यांचे ध्वनी घुमलेले ऐकू येतात असे समजल्यावर तर कोड्यात गुतून पडलेले मन वैचारिक गुतावळीत आणखी अडकून राहते ।

'खाकरा' आणि 'मग' हा गुजराती मडळीचा आवडता नास्ता । मग म्हणजे मुगाची उसळ खाकऱ्याच्या जोडीला 'तिखट' पुरी असेल तर 'सारू !' दुधात साखर पडली समजायचे । उपरियाळात न्याहारीसाठी गरमागरम मग आणि खाकरा पुरी अशी तजवीज झालेली आहे चहा-कॉफीच्या घोटाबरोबर चारदोन घास घेण्यात वेगळीच लज्जत असते तुम्ही बेहद्द खूष झालेले दिसता आहात ठीक । हे सर्व उरकल्यावर बसकडे जाऊन तुम्ही आपापली 'सीट' धरायला हरकत नाही

अरे पण या गावातील मुलांचा घोळका कुणाच्या तरी मागे लागलेला दिसतो त्या गृहस्थाच नाव आहे महेंद्रभाई. तुमच्या न्याहारीची आणि चहापाण्याची व्यवस्था यांनीच केली होती भोजनाचा प्रबधही हेच गृहस्थ करणार आहेत ह्या व्यक्तीशी तुमचा जागजागी सबध येणार आहे हसऱ्या चेहऱ्याची ही व्यक्ती कुणालाही हवीहवीशी वाटावी अशीच आहे यांच्या

हातात कसले तरी ' बॉक्स ' दिसते ते मिठाईचे किंवा कसल्यातरी खाऊचे असावे मुलाना वाटण्यासाठीच महेंद्रभाई ते बॉक्स घेऊन आले असावेत काहीतरी खायला मिळावे म्हणून मुलांचे मोहळ उठले आहे मुलांनी महेंद्र-भाईंना केवळ घेरलेच नाही तर आता ती त्यांच्या अगाशी झोंबू लागली आहेत भुकेपायी माणसे किती लाचार होतात त्याचे हे दारुण प्रदर्शन आहे त्या झोंबाझोंबीत महेंद्रभाईंच्या हातातील बॉक्स निसटून खाली पडले बॉक्समधला ' खमग ढोकळा ' धुळीला मिळाला धुळीत पडलेल्या ढोकळचा-वर मुले तुटून पडली ते दृश्य पाहून कुणालाही करुणा वाटावी दारिद्र्य माणसाचीही गिधाडाप्रमाणे हीनदीन दशा करते हे बघून तुम्हालाही कणव वाटली मदिराच्या उभारणीसाठी अफाट द्रव्य खर्च करणाऱ्या श्री आनदजी कल्याणजीसारख्या पुजीपती पेढीने अशा गरजू गोरगरिबांसाठी मुक्तद्वार अन्नछत्रे, जागजागी शक्य नसतील तर निदान तीर्थस्थानी, उभारल्यास देवाच्या मदिराबरोबर मानवतेचीही मदिरे उभारल्याचे श्रेय लाभेल भोजनशाला जशा यात्रार्थी श्रावक श्राविकासाठी गरजेच्या आहेत तशाच त्या याही दीन-दुबळ्यासाठी निकडीच्या आहेत ! नव्या पिढीच्या अतर्यामी उफाळत असलेल्या या वैचारिक क्रातीची दखल जुन्या पिढीने व समाजाला वदनीय असणाऱ्या साधुवर्गाने घेणे अगत्याचे आहे ! कल्याणजी आनदजी पेढीनेही !

उपरियाळा मदिराच्या आवारातील सब्जाची पाने खुडून त्याचे भरगच्च गुच्छ अनेकानी बरोबर घेतले आहेत त्याचा सुगधित दर्प बरोबर घेऊन तुम्ही उपरियाळा गाव सोडत आहात !

# दोन

या भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य असावे ही गोष्ट कोणीही न सांगता तुमच्या लक्षात येण्यासारखी आहे समाधानाची गोष्ट ही की, तुम्ही ज्या रस्त्याने निघाला आहात त्या रस्त्यावरच तुम्ही काही ठिकाणी पाणपोया पाहिल्या आहेत 'पाणी ना परब' हे गुजरातचे वैशिष्टच असून धनवान दात्यांची ती प्रशंसनीय 'देन' आहे बसमध्ये पिण्याच्या पाण्याची तरतूद केली असल्याने पाण्याच्या परबाजवळ थाबण्याची तुम्हाला आवश्यकता भासली नाही रस्त्याकडेची कपाशीची शेती, तुरीची शेती बघत बघत तुम्ही निघाला आहात अनेक ठिकाणी बाजरीची रानेही दिसतात. पण ही सर्व शेतीभाती मन रिझवणारी नाही तुमची विशेष करमणूक होते ती या शेतांत विहरणाऱ्या मोर आणि लांडोरीमुळे रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या उटाच्या गाड्याही तुम्ही कौतुकाने पाहात आहात ही नवलाई तुम्ही वारवार तुमच्या सहप्रवाशाना व मुलाबाळानाही हर्षातिरेकाने दाखवीत आहात मुले आनंदाने टाळ्या पिटू लागली की, तुम्हीही त्याच्या निखळ आनदात सामील होत आहात त्यामुळे उपरियाळापासून शखेश्वर पर्यंतचा दीड दोन तासांचा प्रवास कसा चटकन सपला असे तुम्हास वाटले.

इकडे रस्त्याकडेला किंवा इतर ठिकाणी झाडी विशेष करून नाहीच म्हटली तरी चालेल डोक्यावर सूर्य येण्यापूर्वीच, थडीच्या दिवसातही, उन्हाचा ताव थोडासा जाणवू लागतो शखेश्वर येथे पोचायला दुपारचे बारा वाजून गेलेले आहेत यथेच्छ न्याहरी झाली असल्यामुळे जेवणाला थोडा उशीर होणार आहे यास तुमची हरकत नसावी महेंद्रभाईंनी बरोबर आणलेली टोळी शिधासामान, भांडीकुंडी वगैरे सामान तत्परतेने उतरून घेईल शिवाय तुमचे सर्वांचे सामानही बसवरून खाली उतरवून घ्यावे लागेल एवढे सगळे झाल्यावर चाळीस माणसाचा स्वयंपाक व्हायला सहज

दोन-तीन तास अवधी लागेल तुमच्यासाठी भोजनात 'फ्रुट सॅलॅड 'चा बेत आखलेला आहे तेवढ्या वेळात आपण स्नान उरकावे ज्यांना पूजाअर्चा करावयाची असेल त्यानी पूजेचा पोषाख चढवून श्रीशखेश्वर पार्श्वनाथाची यथायोग्य 'सेवा' करावी ज्याना पूजा करावयाची नसेल त्यानी निवांत दर्शन घ्यावे आणि सगळा परिसर शातपणे पाहून घ्यावा ! . .

तुमच्या समवेत काही वैष्णव मडळी आहेत त्यातील एक-दोन अपवाद वगळल्यास बाकीचे पूजा करणार नाहीत एक स्थानकवासी राजस्तानी जोडपे आहे जैनांत श्वेताबर, दिगबर, स्थानकवासी आणि तेरापथी असे वेगवेगळे पथ आहेत श्वेताबर, दिगबर मंदिरमार्गी असतात स्थानकवासी, तेरापथी मूर्तिपूजक नसतात हे मदिराऐवजी 'स्थानका'त उपासना करतात. जैन समाजात असख्य पथ, उपपथ, जाती, उपजाती आहेत आचार भिन्नतेमुळे स्थानपरत्वे निर्माण झालेली ही जाती उपजातींची भेदक कीड सर्वच धर्मांना लागलेली आहे ! तुमच्या बरोबरचे राजस्तानी स्थानकवासी जोडपे मदिर-मार्गी नसल्याने अर्थातच सेवापूजा करणार नाही ! विशेष म्हणजे तुमच्या सहप्रवाशात एक मद्रासी हिंदूब्राह्मण जोडपे आणि या जोडप्याची दोन मुले आहेत रुक्मिणी कातन हा पस्तीस वर्षांचा तरुण मोठा तडफदार असून नि:संकोच वृत्तीचा आहे त्याची पत्नी गौरी हीही त्याच्यासारखीच उल्हसित असून ही तरुणी सतत हसतमुख असते याची मुलगी विजया दहा वर्षांची असून इग्रजी अस्खलित बोलते त्यांचा मुलगा श्रीकात अवघ्या चार वर्षांचा आहे कुणाच्या ना कुणाच्या तरी परिचयाने ही मडळी तुमच्या प्रवासात सहभागी झालेली आहेत जैन तीर्थक्षेत्रांची भव्यता व पवित्रता मद्रासी पती-पत्नींच्या ऐकीवात अनेक दिवसापासून होती, म्हणून यात्रेचे प्रयोजक अशोकभाई शहा यांचे चिरजीव श्री किरण शहा याच्या आग्रहावरून ही जोडी नाताळच्या सुट्टीचा फायदा घेऊन मुलांसमवेत बाहेर पडली आहे या जोडप्याचे वैशिष्ट्य हे की याची मातृभाषा तामीळ असूनही गौरीला मराठी उत्तम बोलता येते, कारण कल्याणमध्ये तिचे शिक्षण मराठी माध्यमातून झालेले आहे रुक्मिणी कातनला गुजराती समजते कल्याणमधील वास्तव्या-मुळे मुलाना मराठी समजू शकते राजस्तानी जोडप्याला मराठी चांगले येते, गुजराती बोलता येत नसले तरी समजू शकते तुमच्या सोबतच्या चार-पाच मराठी भाषिकाचीही हीच कथा दोन-चार गुजराती भाषिक तुमच्या 'कपनी'त असे आहेत की, त्यांना मराठी बोलायला अजिबात येत नाही समजतेही जेमतेमच त्यामुळे एका 'कपनी'त तीन-चार 'कपन्या'! एर्कंदरीत तुमची 'कपनी' 'कॉस्मॉपोलिटन' आहे ! बहुसख्य मुबईकराचा

व त्या खालोखाल थोड्या पुणेकराचा भरणा असल्याने हे असे असणे स्वाभाविक आहे !

तुम्ही रुक्मिणी कातनला त्याचे नाव विचारले तर तो 'आर् कांतन' असे सांगतो तसे त्याचे पूर्ण नाव रुक्मिणी कातन श्रीनिवास अय्यर असे आहे पण प्रौढत्व प्राप्त झाल्यानतर किंवा काही विशिष्ट कर्तबगारी करून प्रतिष्ठा मिळाल्यानतरच मग मद्रासी लोक आडनावाचा वापर करतात त्यामुळे रुक्मिणी कातन, अय्यर या आडनावाचा वापर करीत नाही वडिलाचे नाव स्वत च्या नावाआधी लावण्याची पद्धत असल्याने रुक्मिणी कातनचे नाव एस् आर् कातन असे लिहिले जाते, पण तो वडिलाच्या नावाचा उपयोग विशेष प्रसगीच्या कामकाजात करतो एरव्ही त्याला आर् कांतन किंवा फक्त कांतन या नावानेच सबोधले जाते गौरीचे पूर्ण नाव सौ गौरी रुक्मिणी कातन अय्यर असे असले तरी व्यवहारात तिचे नाव आर् गौरी असे लिहिले जाते म्हणजे पतीचे नाव आधी व तिचे नाव नतर त्यांची कन्या विजया हिचे नाव आर् विजया असे शाळेत नोंदलेले आहे, वडिलाचे नाव आधी नतर तिचे श्रीकातच्या नावातही हाच प्रकार त्याचे नाव आर्. श्रीकात महाराष्ट्रात एखाद्या मुलाचे नाव श्रीकात असेल तर लाडाने त्याला श्री किंवा काता या लघुरूपाने पुकारले जाते बगाली लोक श्रीकातु म्हणतात मद्रासी मात्र श्रीकांत या नावानेच हाक मारतात टी टी कृष्णम्माचारी, सर विश्वेश्वर अय्यर, सी राज गोपालाचारी या नावात आडनावे आहेत ती त्याच्या कर्तृत्वामुळे त्यांच्या नावांना बिरुदासारखी चिकटलेली आहेत !

कातन परिवार पूजाअर्चा करणार नाही कारण जैन प्रतिमांची पूजा कशी करावयाची हे त्यांना ज्ञात नाही तसे त्यांना पूजेचे तंत्र अवगत असते तर पूजा करण्यात त्यांनी कसलाच सकोच बाळगला नसता ! याची दृष्टी तशी व्यापक असून त्यांच्याजवळ सामजस्य आहे कांतनला फोटो घेण्याचा फार शौक आहे अद्याप तो सभ्रमात असावा मदिरांचे व मदिरातील मूर्तींचे फोटो घेण्यास परवानगी लागते का याचा तो तपास करीत आहे अर्थात तशी परवानगी मिळाली तर तो त्याच्या व्यासगात गढून जाईल तुम्ही काय करावयाचे ते तुमचे तुम्ही खुशाल ठरवावे तुम्हास पूर्ण स्वातंत्र्य आहे मात्र डोळ्यानी पाहण्यास, कानांनी ऐकण्यास आणि तुम्हास आवश्यकता वाटल्यास मनोमन विचार करण्यास कसलाही व कुणाचाही अटकाव नाही ! ..

शूरसेन राज्यावर उग्रसेन राजा राज्य करीत होता पण उग्रसेन राजाचा पुत्र कस फाजील महत्त्वाकांक्षी व परमावधीचा सत्ताभिलाषी असल्याने त्याने

पित्याच्या निवृत्तीची प्रतीक्षा न करता पित्याला बंदिवासात टाकून त्याचे राज्य अधमपणे बळकावले होते कंसाचा भाचा देवकीनंदन श्रीकृष्ण याने मदांध मामाच्या या व यासारख्या असंख्य दुष्कृत्यांचे निर्मूलन करण्यासाठी पूर्वसंकेतानुसार देववाणीप्रमाणे कंसाचा वध केला होता व मथुरेच्या सिंहासनावर उग्रसेन महाराजाची पुनश्च प्रतिष्ठा केली होती

श्रीकृष्णाने कंसाचा वध केला म्हणून कंसाचा श्वशूर आणि मगध देशाचा अधिपती जरासंध श्रीकृष्णाचा सूड घेण्यास उद्युक्त झाला होता श्रीकृष्णाचे वास्तव्य असलेल्या मथुरेवर जरासंधाने अनेकदा स्वाऱ्या करूनही जरासंधाचा त्वेषाग्नी शांत होऊ शकला नव्हता श्रीकृष्णाचा पाडाव होत नव्हता म्हणून जरासंध अधिकच भडकत होता श्रीकृष्णाचा बचपा काढल्याखेरीज मनाची शांती होणार नव्हती म्हणून तो संधीची वाट पाहत होता अखेरीस जिवाच्या कराराने जरासंधाने श्रीकृष्णावर अठराव्या वेळी स्वारी केली होती

यापूर्वी मथुरेवर जरासंधाचे सैन्य अनेकदा चालून आल्याने उग्रसेन राजाचेही अपरिमित नुकसान झाले होते त्याच्या सैन्याची खूपच दाणादाण झाली होती जरासंधाने श्रीकृष्णाचा सूड घेण्याच्या मिषाने मथुरेवर केलेल्या स्वाऱ्यात श्रीकृष्णाच्या कुळातील यादवांचे व शूरसेन राज्यातील प्रजाजनांचे असंख्य बळी पडले होते यायोगे श्रीकृष्ण आणि त्याचे पाठीराखे अत्यंत अस्वस्थ झाले होते जरासंधाचे वैर व्यक्तिगत श्रीकृष्णाशी असल्याने जरासंधाच्या हल्ल्यात होत असलेली मनुष्यहानी अकारण होत आहे, तेव्हा श्रीकृष्णाने काही काळ का होईना मथुरा सोडून दूर कुठेतरी जावे असा सल्ला अनेक जाणकार हितसंबंधीयांनी व उग्रसेन राजाच्या पाठीराख्यांनी श्रीकृष्णास दिला होता मित्रमंडळींनी दिलेला हा सल्ला शिरोधार्य मानून श्रीकृष्ण बलरामासह मथुरेपासून दूर, काही दिवसांसाठी दक्षिणयात्रेस गेला होता

तेथून परतल्यावर श्रीकृष्णाने पश्चिमेकडील द्वारकाद्वीपात आपले राज्य स्थापन केले होते जरासंधासारख्या बलाढ्य मगधपतीचा उपद्रव कमी व्हावा हाही हेतू सागरातील द्वारकाद्वीपावर राजधानी करण्यामागे असावा द्वारकाधीशाच्या अधिराज्याची सीमा ईशान्येकडील सरस्वती नदीच्या लांबलचक किनाऱ्यावरील वढीयार देशापर्यंत होती मथुरेवरून स्थलांतर होऊनही श्रीकृष्णाच्या मागचा जरासंधाचा ससेमिरा संपलेला नव्हता अनेकदा पदरी अपयश आल्याने चिडलेला जरासंध निर्णायक लढाईच्या तयारीला लागला होता त्याने आपले अठरा अक्षौहिणी सैन्य पुनश्च सुसज्ज केले मद्रराज, सोविरराज, त्रिगर्तराज, काश्मीरपती, चेदीपती वगैरे मित्र

राजाना आवाहन करून त्याची सहानुभूती व पाठबळही प्राप्त करून घेतले. निकराचा हल्ला करण्याची तयारी परिपूर्ण होताच जरासधाने आपला दूत सोमक यास श्रीकृष्णाकडे पाठवून त्याला आव्हान दिले, "कृष्णा, तीन खडाचा स्वामी जरासध जोवर जिवंत आहे तोवर तू कसाचा सहार केला अशी पोकळ बढाई मारू नकोस । . तुझ्याशी आणि तुझ्या सैन्याशी लढत देण्यास महापराक्रमी जरासध व त्याचे अठरा अक्षौहिणी सैन्य आतुर आहे, तेव्हा तू तुझे सैन्य घेऊन माझ्याशी सामना देण्यासाठी सेनपल्ली गावाजवळ ये मी माझ्या सैन्यासह तुझ्या राज्याच्या सीमेवर चाल करून येत आहे। . तेथे आपला निर्णायक सग्राम होईल आणि यास सरस्वती नदीचे पात्र साक्षी राहील । "

श्रीकृष्णानेही जरासंधाच्या दूताकरवीच सडेतोड उत्तर पाठवले, "तुझ्या स्वामीला साग, आम्ही सेनपल्ली गावाजवळ त्याची प्रतीक्षा करीत आहोत तुझ्या स्वामीचा आणि त्याच्या अठरा अक्षौहिणी सैन्याचा समाचार घ्यायला आमचेही बाहू अत्याधीर झालेले आहेत। .. "

जरासधाने श्रीकृष्णास निर्णायक युद्धाचे आव्हान दिल्याचे पाडवांना यथाकाल समजताच युधिष्ठिराने त्याचा मित्र सात्यकी यास पाडुराजाकडे पाठवून कळवले की आमचे जीवन पित्याच्या प्रभावाने आणि पुण्याईने सार्थ झाले असले तरी जोवर श्रीकृष्णाचा शत्रू जरासध जिवत आहे तोवर पाडवाना हस्तिनापूरला परतता येणार नाही जरासंधाचा शेवट करूनच पांडव हस्तिनापूरला परततील तोवर पाडुराजाने हस्तिनापूरच्या प्रजा-जनाचे रक्षण करावे पित्याला आपला मनोदय कळवून पांडव थांबले नाहीत तर वारवार ज्याने त्याना बहुमोल सहाय्य केले त्या श्रीकृष्णाला मदत करण्यासाठी त्यानी सैन्याची जमवाजमव सुरू केली शौरीपूरचा राजा समुद्रविजय याला त्यानी यासाठीच पाचारण केले

शौरीपूरचा राजा समुद्रविजय हा यदुवशातील शौरीसेनचा नातू, अधक वृष्णीचा पुत्र, वसुदेवाचा जेष्ठ बधू व श्रीकृष्णाचा चुलता होता समुद्र-विजयला अरिष्टनेमी, रथनेमी, सत्यनेमी आणि दृढनेमी असे चार पुत्र होते अरिष्टनेमी याप्रमाणे 'यदुकुलात' म्हणजेच हरिवशात जन्मास आला होता तो श्रीकृष्णाचा केवळ चुलत बधूच नव्हता तर तो त्याचा जिवा-भावाचा सखाही होता, सकटकाळातील सजीवक मार्गदर्शकही होता. पांडवानी आवाहन केले नसते तरी समुद्रविजयने आपल्या सर्व पुत्रांनिशी पुतण्या श्रीकृष्ण याच्या मदतीला रणागणावर धावून जाण्याचा आधीच

सा २

निर्णय घेतलेला होता युद्धजन्य हिंसा अरिष्टनेमीच्या अहिंसक विचारसरणीच्या चौकटीत बसत नव्हती तरी जरासंधाशी होणाऱ्या युद्धात धर्मात्मा श्रीकृष्णाला विजयश्री मिळावी अशी अरिष्टनेमीची इच्छा होती ।

ठरल्याप्रमाणे सेनपल्ली गावाजवळ दोन्ही सैन्ये घनघोर युद्धासाठी समोरासमोर उभी ठाकली जरासध सर्व शक्तिनिशी चाल करून आला होता त्याचे सैन्य अवाढव्य होते आणि त्याला पाठबळही अनेक नृपतींचे होते या उलट श्रीकृष्णाच्या पाठीशी असलेले पांडवांचे सैन्य आणि यादव सैन्य यापूर्वी अनेकदा झालेल्या लढाईने निर्बल झाले होते जरासधाच्या फळीने मारलेली मुसंडी तशी खूपच प्रभावी होती तरीही श्रीकृष्णाच्या बाजूच्या सैनिकांनी मनोधैर्याने दिलेली धडकही सामान्य नव्हती जरासध इरेस पेटल्याने येनकेन प्रकारेण विजय मिळवायचाच अशी त्याची जिद्द होती जिवाच्या करारानें जरासधाने श्रीकृष्णाच्या सैन्यावर मात केली आणि त्याने श्रीकृष्णाच्या बाजूचे सैन्य निष्प्रभ करून टाकले शक्तिपात झाल्याने आपले सैनिक गलितगात्र होऊन पडल्याचे श्रीकृष्णाच्या लक्षात येताच त्याला युद्धाचे पारडे फिरत चालल्याची कल्पना आली करुष देशाधिपति दतवक्र, चेदिराज शिशुपाल, महासमर्थ पौंड्र, केशिराज साकृति, राजा भीष्मक, धनुर्धर श्रेष्ठ रुक्मि, श्रुतर्वा, ऋथ, अशुमान, अगराज, वग, कोशल काशी येथील अधिपती, मद्रराज, त्रिगर्तेश्वर, समर्थ शाल्वपती, वीर्यशाली भगदत्त, शैब्य, पांड्य, गांधारराज, नग्नजित, काश्मीरेश्वर गोनर्द अशा अनेक राजांची जरासधाला कुमक मिळाल्याने, सैनिकाप्रमाणे आयुधांचीही जरासधाच्या बाजूला विपुलता होती वारवार युद्ध खेळून श्रीकृष्णाचे सैन्य आधीच जराजर्जर व हतबल झाले होते त्यात जरासधाच्या अशा धडक प्रभावी आक्रमणामुळे ते जास्तच हतवीर्य झाले होते यापूर्वी श्रीकृष्णावर अनेकदा चाल करून आलेला जरासंध अनेकदा विफल होऊन परतला होता यावेळी मात्र चिन्ह वेगळे दिसत होते 'जेथे कृष्ण तेथे जय हे अबाधित सत्य खोटे ठरून पराभवाची चाहूल लागत होती श्रीकृष्ण अस्वस्थ झाला होता यापूर्वीही प्रचड सैन्यानिशी कालयवनने मथुरेवर चाल केली होती त्याच्या जबरदस्त मुसडीचा परिणाम म्हणून निर्मनुष्य झालेल्या मथुरेतून श्रीकृष्णाला इतर यादवासह अगतिकतेने पळ काढावा लागला होता व 'कुशस्थळी' द्वारका गाठावी लागली होती त्यावेळची अगतिकता वेगळी होती तरी देखील यावेळची अस्वस्थता अधिक तीव्र होती पराक्रमी माणसे देखील सकटप्रसगी अवसानघाताने गांगरून जातात । अशा वैफल्यपूर्ण अगतिक अवस्थेत त्यांची मनोदशा विचित्र होते। कधी न्याच्या मनात येणार नाहीत असे विचार त्यांच्या मनात डोकावू लाग-

तात आणि अस्वस्थता शिगेला जाऊन पोचते

अशा विचित्र मन:स्थितीत आपली मनोव्यथा जिवाभावाच्या अरिष्टनेमी-जवळ व्यक्त करावी असे त्याला वाटले त्याने अरिष्टनेमीस बोलावून घेऊन जिव्हाळ्याने सांगितले, " नेमी, तुला अवधिज्ञान आहे भूत, वर्तमान व भविष्य या तिन्ही कालांतील घटनांचे तुला दर्शन घडू शकते तेव्हा सर्व शक्तिनिशी चालून आलेल्या शत्रूला परतवून लावण्यासाठी तू मला योग्य ती दिशा दाखव यशप्राप्तीसाठी मला मार्गदर्शन कर "

त्यावर अरिष्टनेमीने श्रीकृष्णास सांगितले, " तुझे सैन्य केवळ शत्रूशी लढत देऊन गलितगात्र झालेले नाही, तर जरासंधाने त्यास अवगत असलेल्या जरा विद्येचा तुझ्या सैनिकांवर प्रभाव टाकल्याने त्यांचा शक्तिपात होऊन ते वृद्धाप्रमाणे निष्प्रभ, निरुत्साही आणि निर्बल झालेले आहेत "

" यावर काही उपाय नाही का, नेमी ?" श्रीकृष्णाने अधीर होऊन विचारले

" नाही कसा ? प्रत्येक अपायावर काही ना काही उपाय असतो—" असे प्रतिपादून अरिष्टनेमी पुढे म्हणाला, " ज्यावेळी शक्ती आणि युक्ती दोन्हीही निरुपयोगी ठरतात त्यावेळी भक्तीचा आसरा घ्यावा लागतो "

हे ऐकून चिंताग्रस्त श्रीकृष्ण अधिकच भाबावला सभ्रमावस्थेत त्याची मन:स्थिती अधिक विस्कळीत होऊ नये यासाठी अरिष्टनेमीने सांगितले, " जरासधाने जरा विद्येच्या सामर्थ्यावर तुझ्या सैनिकांची जी दयनीय दुर्दशा केली आहे त्यावर तोड एकच आहे आणि ती म्हणजे धर्माचरण ! देवी पद्मावतीची प्रार्थना ! देवी पद्मावती तुला या सकटप्रसगी सहाय्यभूत ठरेल !"

श्रीकृष्णाच्या मनावरचा तणाव कमी करण्यासाठी अरिष्टनेमीने अधिक विवरण केले, " तू तीन दिवसांचे उपोषण करून देवी पद्मावतीची आराधना कर तुझ्या या तपाने प्रभावित होऊन देवी प्रकट होईल आणि तुझी मनो-कामना काय आहे अशी विचारणा करील त्यावेळी तू तिच्याकडे असलेली पार्श्वनाथ भगवानाची मूर्ती मागून घे. "

" पार्श्वनाथाची मूर्ती मागून घेण्यासाठी तू मला सुचवितोस खरे " श्रीकृष्ण व्याकुळतेने मध्येच म्हणाला, " पण तुझ्या सूचनेचा अद्यापी नीटसा बोध होत नाही माझ्या मनातला गोंधळही कमी होत नाही तेव्हा असे गूढ न बोलता स्पष्ट शब्दात सर्व काही विनाविलंब सांगून टाक माझी अधीरता अधिक ताणू नकोस "

" पार्श्वनाथाचा सदर्भ प्रथम, कृष्णा, तू समजावून घे " अरिष्टनेमी सथ-

पणे सांगू लागला– " मागील उत्सर्पिणी काळात जे चोवीस तीर्थंकर होऊन गेले त्यातील नववे तीर्थंकर श्री दामोदर स्वामी । आषाढी नामक श्रावकाची त्याच्यावर अपार श्रद्धा होती त्याने मन शांतीसाठी स्वतःची मुक्ती केव्हा होईल असे मोठ्या नम्रतेने श्री दामोदर स्वामींना विचारले होते त्यावर त्याच्या श्रद्धेय महात्म्याने आषाढीस सांगितले होते की, अवसर्पिणीकाळात आदि तीर्थंकर भगवान ऋषभदेवपासून चरम तीर्थंकर भगवान महावीर स्वामीपर्यंत जे चोवीस तीर्थंकर होतील त्यातील तेवीसावे तीर्थंकर श्री पार्श्वनाथ असतील । आषाढी त्यावेळी त्याचा आर्यघोष नावाचा शिष्यवर असेल आणि पार्श्वनाथाच्या प्रेरणेने आषाढीला मुक्ती मिळेल अर्थातच केवल ज्ञानी दामोदर स्वामींच्या तोंडून बाहेर पडलेली ही भविष्यवाणी ऐकून आषाढी श्रावकाच्या मनात भावी तीर्थंकर पार्श्वनाथाबद्दल अपार श्रद्धा निर्माण झाली त्याच्या शरीरातील कण न् कण भक्तिभावाने पुलकित झाला त्याने अतूट श्रद्धेने व ओजस्वी कल्पनेने भगवान पार्श्वनाथाची तेजस्वी प्रतिमा तयार केली आषाढी श्रावकाने आयुष्याच्या अखेरपर्यंत त्या प्रभावी प्रतिमेचे मनोभावे पूजन अर्चन केले हीच ती दिव्य प्रतिमा, जी सध्या देवलोकी, देवी पद्मावतीजवळ आहे । अती प्रभावशाली अशी ही प्रतिमा तू देवीकडून मागून घे आणि त्या प्रतिमेला श्रद्धाळू अंतःकरणाने अभिषेक घाल । त्यानंतर भगवान पार्श्वनाथांच्या प्रतिमेचे हे पवित्र स्नान-जल तू तुझ्या सैन्यावर शिंपडलेस की जरा विद्येने घायाळ झालेल्या तुझ्या सैन्याला नवचैतन्य प्राप्त होईल आणि उल्हसित झालेल्या तुझ्या सैनिकाकडून जरासंधाचा पराभव होईल । ." अरिष्टनेमीने सविस्तर आराखडा मांडला

"तीन दिवस एकांतवासात राहून एकाग्र चित्ताने देवीची आराधना करावी लागेल असे तू सांगतोस ठीक तुझ्या सांगण्याप्रमाणे करता येईल पण तीन दिवसांच्या या कालावधीत मी माझ्या सैन्यापासून दूर गेलो तर "

श्रीकृष्णाने व्यग्र व्याकूळ मनातील शंका पुरती बोलून दाखवण्यापूर्वीच अरिष्टनेमीने आश्वासक स्वरात सांगितले, " कृष्णा, तुझ्या सैन्याचे नेतृत्व कुणी करायचे असे भय तुझ्या मनात उत्पन्न झाले ते अवास्तव नाही पण कृष्णा, तू निश्चित रहा माझ्या सामर्थ्यावर तुझा विश्वास आहेच तेव्हा तू ही कामगिरी निर्भयपणे माझ्यावर सोपव. कसलीही हानी होऊ न देता तुझी आघाडी मी तीन दिवस चोखपणे सांभाळीन तू बिनघोर रहा । तू केवळ माझा बंधू आणि सखा म्हणून नव्हे, तर तुझा पक्ष न्यायाचा आहे म्हणून तुला मदत करण्याचा मला ताताचा आदेशही आहे '

अरिष्टनेमीने जेव्हा विश्वासपूर्वक असे अभय दिले त्यावेळी श्रीकृष्णाला पूर्वीचा एक प्रसंग आठवला.. श्रीकृष्णास भेटण्यासाठी अरिष्टनेमी शौरीपूर-हून द्वारकेस आला होता त्यावेळी त्याचे लक्ष श्रीकृष्णाच्या शस्त्रागारातील महाप्रचंड शंखाने वेधून घेतले होते त्याने औत्सुक्याने शंखाविषयी पृच्छा केली असता आयुधशाला रक्षकाने सांगितले होते की, तो श्रीकृष्ण महा-राजांचा पांचजन्य शंख असून अतिशय वजनदार आहे तो महा अवजड शंख श्रीकृष्ण महाराज एकटे उचलू शकतात एवढेच नव्हे तर तो शंख फुकण्याचे सामर्थ्यही एकट्या श्रीकृष्ण महाराजांकडे आहे ! रक्षकाने दर्पोक्तीने कथन केलेले वर्तमान ऐकून अरिष्टनेमीला सहर्ष अचंबा वाटला होता स्वतःची शक्तिपरीक्षा करावी या उद्देशाने श्रीकृष्णाचा पांचजन्य शंख उचलण्याची अरिष्टनेमीला विशेष उत्कंठा लागली होती त्याने तो अवाढव्य शंख क्षणा-र्धात लीलेने उचलला होता तेवढ्यावरच न थांबता त्याने तो अगदी सहज-पणे फुकला होता शंखाचा प्रचंड ध्वनी आसमंतात पसरताच द्वारकेतील नागरिक भयभीत होऊन सैरावैरा पळत सुटले होते श्रीकृष्णही क्षणभर भयचकित झाला होता परकीय आक्रमणाच्या धोक्याची सूचना देण्यासाठी असा शंखनाद केला जात असे पण थोड्याच वेळात वस्तुस्थिती समजल्या-वर श्रीकृष्णाला अरिष्टनेमीच्या सामर्थ्याचा प्रत्यय घडला होता आणि श्रीकृष्ण स्वसामर्थ्याविषयी मनोमन खजील झाला होता अरिष्टनेमीच्या आत्मिक सामर्थ्याची श्रीकृष्णाला पूर्वकल्पना होती या प्रसंगाने त्याला अरिष्टनेमीच्या शारीरिक सामर्थ्याचेही दर्शन घडले होते ! भगवान श्रीकृष्ण व भगवान नेमिनाथ या दोघांचेही 'बोधचिन्ह', 'शंख' आहे ते यामुळेच असावे ! यदुकुलाचे हे मानचिन्हच असावे !

असा बलशाली अरिष्टनेमी श्रीकृष्णाच्या सैन्याचे धुरिणत्व करायला स्वेच्छेने उद्युक्त झाल्याचे ऐकून श्रीकृष्णास समाधान वाटले "कुठलेही शस्त्र न वापरता तुझ्या पांचजन्य शंखाच्या घणाघातांनी मी शत्रुसैन्य थोपवून धरीन–" असा अरिष्टनेमीने भरवसा व्यक्त करताच श्रीकृष्ण अधिक उत्तेजित झाला अरिष्टनेमीच्या मार्गदर्शनाप्रमाणे श्रीकृष्णाने तीन दिवसांचे उपोषण व तप श्रद्धेने आरंभले हे 'अठ्ठम तप' पूर्ण झाल्यावर तिसऱ्या दिवशी मध्यरात्री देवी पद्मावतीचे त्यास दर्शन घडले त्याने देवीजवळ आपली विवंचना विशद केली व तिच्याजवळ असलेल्या भगवान पार्श्व-नाथाच्या मूर्तीची मोठ्या निष्ठेने याचना केली देवीने थोडे आढेवेढे घेतले, पण मूर्तीसाठी श्रीकृष्णाने धरलेल्या आग्रहापुढे देवीला नमते घ्यावे लागले पार्श्वनाथाची मूर्ती मिळताच श्रीकृष्णाने त्या प्रतिमेला यथासांग यथाविधी

अभिषेक घातला त्याने आपल्या हृतवीर्य सैनिकांवर पवित्र स्नात्रजलाचे सिंचन करताच श्रीकृष्णाचे सैन्य नव्या उत्साहाने, नव्या हुरूपाने आणि नव्या धैर्याने पुनश्च उभे ठाकले ! या उत्थापनामागे अरिष्टनेमीच्या प्रोत्साहनाची शक्ती देखील असू शकेल !

राम-रावण युद्धात हतबुद्ध झालेल्या रामाला भगवान अगस्त्य मुनींनी ' आदित्य हृदय स्तोत्र ' म्हणण्याचे प्रबोधन करून जसे उल्हसित केले होते, तसेच हतवीर्य झालेल्या सैन्याला श्री पार्श्वनाथाच्या स्नात्रजलाने उत्तेजित कर असे सुचवून अरिष्टनेमीने दिङ्मूढ झालेल्या श्रीकृष्णास प्रोत्साहित केले होते माणसाचे सारे उपाय थकले किंवा कुंठित झाले की तो अतर्क्य शक्तीपुढे गुडघे टेकून शरणागती पत्करतो ! यामागे कधी त्याची स्वतःची प्रेरणा असते तर कधी दुसऱ्याची इतकाच काय तो फरक असू शकतो ! .. भावीकाळातील तेवीसावे तीर्थंकर पार्श्वनाथ यांच्या प्रतिमेला अभिषेक घालण्याचा बोध बावीसावे तीर्थंकर नेमिनाथ यानी बंधू श्रीकृष्णास केला यावरून पूर्वाश्रमीसुद्धा, सर्वज्ञानी होण्याआधी अरिष्टनेमीच्या दूरदर्शीपणाची झेप किती लांब पल्ल्याची होती याचीच साक्ष पटते ! अतीत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही कालाचे दर्शन घेण्याचे सामर्थ्य श्रीकृष्णालाही साध्य झाले होते यामागे अरिष्टनेमीचे द्रष्टेपणच असावे ! म्हणूनच की काय, अरिष्टनेमीला ऋग्वेदातील मंत्रांत मानाचे स्थान लाभले असावे !

अर्थातच महापराक्रमी अरिष्टनेमीच्या साहाय्याचा म्हणा किंवा मनाने आणि शरीराने खचलेल्या श्रीकृष्णाला अरिष्टनेमीने दिलेल्या प्रोत्साहनाचा म्हणा अथवा महाप्रभावक स्नात्रजलाच्या संजीवकतेचा म्हणा, परिणाम व्हावयास हवा होता तोच झाला श्रीकृष्णाच्या नवचैतन्य प्राप्त झालेल्या सैन्याशी तुंबळ युद्ध खेळून जरासंधाच्या सैन्याचा धुव्वा उडाला एवढेच नव्हे तर, जरासंधाचे बरेच पाठीराखे राजे आणि बहुसंख्य पुत्र धारातीर्थी पडले ' जेथे कृष्ण तेथे जय या जनवचनाची अशा रीतीने बूज राखली गेली. जरासंधाचे कुमुद, सहदेव हे पुत्र या युद्धाच्या तडाख्यातून वाचले होते पुढे सहदेवाला श्रीकृष्णाने मगधाच्या सिंहासनावर बसवले जरासंधाच्या पश्चात् त्याना मगधपती करण्याचा श्रीकृष्णाचा हा निर्णय त्याच्या राजनीतीस अनुसरूनच होता

श्रीकृष्णास ज्या ठिकाणी ही विजयश्री मिळाली त्या ठिकाणी श्रीकृष्णाने हर्षभराने शंखनाद केला पार्श्वनाथाच्या महाप्रभावामुळे या महादुर्धर युद्धात यशस्वी होता आले म्हणून श्रीकृष्णाने अरिष्टनेमीच्या सूचनेवरून सेनपल्ली गावाजवळ नवे गाव वसवले, जे पुढे शंखपूर या नावाने प्रसिद्धी पावले ज्या

स्थानी श्रीकृष्णास हा दिग्विजय प्राप्त करता आला त्या स्थानी अरिष्ट-नेमीच्या प्रेरणेने नवीन मंदिरही उभारण्यात येऊन त्या मंदिरात महाप्रभावी पार्श्वनाथ प्रभूच्या महातेजस्वी मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. एवढ्या-वरच न थांबता, नव्याने उभे केलेले शंखपूर गाव या मंदिराच्या खर्चासाठी पार्श्वनाथाला अर्पण करण्यात आले. हे शंखपूर अर्थातच येथील स्थान-माहात्म्यावरून 'शंखेश्वर' या नावाने ओळखले जाऊ लागले. श्री शंखेश्वर पार्श्वनाथाचा असा हा प्राचीन इतिहास आहे। जो काळाने व स्थानानेही आजही जतन करून ठेवलेला आहे। द्वारकेला परतल्यावर तेथेही श्रीकृष्णाने पार्श्वनाथाचे मंदिर बांधले होते, जे श्रीकृष्णाच्या द्वारकेबरोबर बुडून जल-प्रलयाने नष्ट केले होते।

श्री शंखेश्वर पार्श्वनाथ हे जैनांचे श्रद्धेय तीर्थस्थान सध्या ज्या ठिकाणी आहे त्या स्थानी पुरातन सेनपल्ली गाव होते व या सेनपल्ली गावाजवळ श्रीकृष्ण आणि जरासंध यांच्या सैन्यात घनचक्कर युद्ध होऊन श्रीकृष्णास महत्प्रयासाने जय मिळवता आला होता. याचे श्रेय अरिष्टनेमीच्या सह-कार्यास व मार्गदर्शनास द्यावे लागते असा जैन आख्यायिका निर्वाळा देते। या आख्यायिकेचे सार 'दैवी चमत्कार' नसून श्रांत भ्रांत झालेल्या सेनानीचे व त्याच्या सैन्याचे उत्तेजक वाणीने झालेले पुनरुत्थान आहे। पराजयाच्या ग्लानीने म्लान झालेल्या मनाचे प्रेरक स्फुल्लिंगाने झालेले पुनरुद्दीपन आहे।

'ओम् स्वस्तिन इंद्रो वृद्धश्रवा । स्वस्तिन पूषा विश्ववेदा ॥
स्वस्तिनस्तार्क्ष्यो अरिष्टनेमि । स्वस्तिनो बृहस्पतिर्दधातु ॥'

वैदिकांच्या या यजुर्वेदातील शांतिपाठात अरिष्टनेमीला यासाठीच मानाचे स्थान असावे। जैनांच्या सूत्रांग आगम ग्रंथातील सकलार्हत स्तोत्रात 'यदु-वंश समुद्रेन्दु कर्मकक्ष हुताशन । अरिष्टनेमिर्भगवान्, भूयाद्वोऽरिष्टनाशन' असा जो अरिष्टनेमीचा संदर्भ आहे तो वैदिकांच्या शांतिपाठात असलेल्या अरिष्टनेमीच्या उल्लेखाशी मिळता जुळता आणि भावार्थाने समांतर असाच आहे।

हे प्रतिपादन काहींना अवास्तव वाटणे साहजिक आहे. पण श्रीकृष्ण व जरासंध यांच्यात सतरा वेळा घनघोर युद्ध झाले होते व दरवेळी श्रीकृष्ण हतबुद्ध झाला होता। एवढेच नव्हे तर या युद्धाने त्रस्त झालेल्या मथुरेच्या प्रजेने श्रीकृष्णास मथुरा सोडून जाण्यास सांगितले होते। श्रीकृष्णास युद्धा-तून पळ काढावा लागल्याने त्यास 'रणछोडदास' असे नाव पडले होते। जरासंधावर, कठीण आणि दुर्धर परिस्थितीत, अठराव्या वेळी जय मिळवल्यानंतर श्रीकृष्णाने शस्त्रसंन्यास घेतला होता। 'उद्धरेत् आत्मना-

त्मानम् ' असे प्रतिपादणाऱ्या श्रीकृष्णावर परिस्थितीच अशी उलटली होती. तेव्हा या व अशा सर्व घटना विचारात घेतल्यावर जैन कथेत तथ्य असले पाहिजे असे कोणाही विचारवंतास वाटले तर त्यात नवल कसले। शेष-शाही विष्णूच्या अवतारी श्रीकृष्णाला अरिष्टनेमीच्या बोधाने फणाधारी पार्श्वनाथाचे आकर्षण वाटले असेल यातही नवल कसले। इतिहासकार व संशोधक यांच्या अस्मितेला थक्क करून सोडणारे हे एक नवे प्रमेय आहे, जे त्यांनी रस घेऊन अवश्य सोडवावे।

# तीन

गुजरात शासनाने प्रेक्षणीय स्थळाची माहिती पुरविणारी जी मार्गदर्शक पुस्तिका प्रकाशित केली आहे, तिच्यात शखेश्वर तीर्थाचा आवर्जून उल्लेख आहे हे तीर्थस्थान मेहसाणा जिल्ह्यात असून ते मेहसाणा शहरापासून ऐंशी किलोमीटर दूर आहे नजीकचे रेल्वे स्टेशन हारीज आठ किलोमीटर अतरा-वर असून विरमगाम शहर येथून बहात्तर किलोमीटर लाब आहे येथून पचासरचे अतर आठ किलोमीटर असून वडगामचे अतर सतरा किलोमीटर आहे अशा या वर्दळीच्या तीर्थस्थानी गुजरात स्टेट रोड ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशनच्या बसेसची रीघ लागून वाहतूक दिवसभर चालते

इकडील एस टी बसचे एक वैशिष्ट्य तुमच्या नजरेत खचितच भरेल. प्रत्येक बसवर नशाबदी व कुटुब कल्याण या चळवळीविषयीचे एकादे घोष-वाक्य तुम्हास हमखास वाचावयास मिळेल 'दारू दावानळ छे', 'अनाथनो तु था नाथ', 'जन कल्याण माटे कुटुब कल्याण', 'ओछा बाळ जयगोपाळ', 'ओछी सतति वधु सपत्ति', 'शराब ए बधा पापोना मुळ छे', 'बाळकने प्रेम अने हुफ आपो', 'समृद्धीनी सीडी एटली नशाबदी', 'लाल बालक लाल गुलाब', 'समृद्धी अने सुख माटे नशाबंदी', 'सघळा धर्म कहे छे दारू छोडो', 'नानु कुटुब सुखी कुटुब', 'अमे बे अमारा बे', 'बालक नबळो देश नबळो', 'शराब सर्वनाश सर्जे छे', 'नशो नाशनु मुळ छे', 'बालक राष्ट्रनी थापण छे', 'पहला माटे उतावळ नथी हमणा पण जरूरत नथी'; 'वधु सतान वधु सताप', 'सुखी गृहजीवन माटे नशाबदी', 'भुख्यो बालक समाजनी कलक' ही अशी चटकदार वाक्ये वाचणे हा तुमचा काही काळ का होईना एक आवडता छदच होईल! नव्हे, थाबलेल्या अथवा धावणाऱ्या बसेसवरची असली म्हणीवजा वाक्ये नजरेने टिपून घेणे हा तुमचा मजेदार चाळाच ठरेल!

महाराष्ट्रातील एस. टी बसेसवर, विदर्भातील काही ठिकाणच्या बसेसचे व इतरत्रच्या काही थोडचा तुरळक ठिकाणच्या बसेसचे अपवाद वगळल्यास ही जनजागरणाची शिकवण भिन्नभिन्न घोषवाक्यात फारशी आढळत नाही विदर्भात मात्र एस टी बसेसवरच नव्हे तर गावांच्या नामफलकावर आणि रस्त्याकडेच्या किलोमीटरच्या दगडावर अशी बोधवचने मराठी व हिंदी भाषेतून वाचावयास मिळतात 'आणीबाणी'च्या काळात मात्र 'भरपूर परिश्रम' करण्याविषयीची 'चेतावणी' महाराष्ट्रातील एस टी बसेसवरील 'सुभाषिते' सर्रास देत होती आणीबाणीबरोबर तीही गेली! अलीकडे मात्र महाराष्ट्रातील बसेसवर 'अस्पृश्यता ईश्वर और मानवता के प्रति अपराध है' अशा हिंदीतून व 'अनटचेबिलीटी इज ए क्राइम अगेन्स्ट गॉड अँड मॅन' अशा इंग्रजीतून घोषपट्ट्या कुठेकुठे आढळतात गुजराथ शासनाच्या बसेसवरची ही मनोरंजक 'काव्यमय गुजराती करामत' वाचण्यासाठी तुम्ही काही वेळ 'बालक' बनून मंदिराजवळील बसस्थानकावर रेंगाळाल यात मुळीच संदेह नाही! कारण ही जादुगिरी वाचनीय व मननीय वाटावी अशीच असते! 'अधिकाधिक प्रजोत्पत्ती म्हणजेच आर्यावर्ताची प्रगती' हे प्राचीन ऋषिजनाचे बोधवचन कालबाह्य ठरल्याची जाणीव तुम्हास या मधुर कुटुंबकल्याण करामतीतून होत असते व या योगे ज्याचे प्रबोधन व्हावयास हवे त्याचे अवश्य व्हावे असे वाटूनही या व याचप्रमाणे नशाबंदीसारख्या रुचकर व स्वादिष्ट संबोधनांतून काही क्षण तुमची करमणूकही होत राहते!

अशातच विनोदाची ऊर्मी न उफाळेल तरच नवल! कुटुंब कल्याणाची करामत वाचून तुमच्यातील तरुण मंडळींपैकी एकजण म्हणतो, "सुखी परिवार के लिये दो या तीन! लेकीन यह घोष भूतकाल का!"

"तर मग वर्तमानकाळाचा पुकारा. हम दो हमारे दो!" दुसरा एक-जण त्यानंतर सांगतो

मग तिसऱ्यालाही स्फुरण चढते तो म्हणतो, "भविष्यात म्हणावे लागेल, एकही बच्चा, उसीमे सुख सच्चा!"

तर चौथा यावर कळस चढवतो, "भविष्य के बाद याने आखरी म्हणावे लागेल.. न हम तुम्हारे, न तुम हमारे!"

अशी ही रंगत आणखी वाढली असती!..

पण थोड्याच वेळात कुणीतरी तुम्हाला तुम्ही 'मोटा शेठ' असल्याची जाणीव करून देईल आणि स्वप्निल भावविश्वात तरंगणारे तुम्ही अवचित खाली उतराल तुमचे पाय जमिनीला लागून प्रखर वास्तवतेचे तुम्हास भान येईल!

अहमदाबाद विभागातील शखेश्वर स्टँडवर उभ्या असलेल्या शखेश्वर-महुडी, शखेश्वर-अहमदाबाद वगैरे बसेसभोवती घुटमळणारा दहा-पधरा मुला-मुलीचा थवा, मोहळ उठावे तसा तेथून हलून, आता तुम्हास घेरत आहे "ए शेठ ए मोटा शेठ " अशा तऱ्हेची लाघवी आळवणी करून ही मुले तुमच्यावर गांधीलमाशाप्रमाणे तुटून पडत आहेत त्यांना तुमच्याकडून काही ना काहीतरी भीक हवी आहे या घोळक्यामधील परकर-पोलक्यातल्या गज्जी आणि काता या नावाच्या दोन मुली तुम्हास अगदी चिकट भोकरा-सारख्या वाटतील तुम्ही जोवर त्यांच्या हातावर काहीतरी ठेवीत नाही तोवर ह्या तुमचा पाठलाग करीत राहतील. अगदी मदिरापर्यंतसुद्धा ! तेव्हा या 'गोचडया' झिडकारून टाकण्यासाठी त्यांच्या हातावर पाच पाच पैशांचे नाणे ठेवून मोकळे व्हावे असा विचार तुम्ही साहजिकच करता ! अशा प्रकारच्या वरातीतून खळखळ करीत मदिरापर्यंत जाणे तुम्हाला प्रशस्त वाटत नाही म्हणून तुम्ही हा निर्णय तडकाफडकी घेता ! पण प्रत्येकाच्या हातावर पाच पाच पैशांचे नाणे टिकवूनही यांचा पिच्छा सुटत नाही तुमच्यापासून अधिक मिळावे अशी त्यांना हाव सुटलेली दिसते हा गुजराती देहस्वभाव भीक मागणाऱ्याच्या हाडीमासीही भिनलेला दिसतो कुणालाही घृणा वाटावी असा हा लघळपणा असतो ! त्यापेक्षा रस्त्याकडेला भीक मागत बसलेले भिकारी परवडले असा विचार क्षणभर तुमच्या मनात चमकून जातो

साप्रदायिक तीर्थस्थानी भिकाऱ्यांची परवड काही कमी नसते पंढरपूर असो, तुळजापूर असो, शिर्डीचा साईबाबा असो नाहीतर मुबईचा हाजीअली असो थेट मदिराच्या नाहीतर मशिदींच्या पायऱ्यापर्यंत भिकाऱ्याची अथवा फकिरांची राग वाडगे किंवा कटोरे घेऊन दुतर्फा बसलेली असते हे सगळेच पैशाने दरिद्री असतात अशातला प्रकार नसतो पैशाने मात्र हे भिकारी किंवा फकीर खास असतात तुमच्या ऐकिवात आहे की नाही कोण जाणे, पण रेल्वेमध्ये भीक मागणारा एक आधळा लक्षाधीश आहे म्हणतात ! त्याची दृष्टी अक्षत नसली तरी त्याला लाभणारी दात्यांची सहानुभूती मात्र अक्षत असते ! एकेकाचे नशीब म्हणावयाचे ! आयुष्यभर यांना भिकारी म्हणून जगू देण्यात तुमच्यासह अनेकांचा तसा फार मोठा वाटा आहे !

'इन्हे भीक नही, काम और सन्मान दीजिये' ही 'चेतवणी' हे भिकारीही ठार खोटी पाडतात ! आजकाल झाडलोट, भांडी, धुणी अशा घरकामासाठी माणसे सहजासहजी मिळतात कुठ ! अशा माणसांना असली काम करण्या-पेक्षा भीक मागणच सोप आणि सन्मानाच वाटत त्याला कोण तरी काय करणार ! ज्यांना काम दिल जात ते तरी कुठ, अग मोडून राहू द्या, पण

मन लावून, प्रामाणिकपणे काम करतात ।

तुमच्या पाठीशी लागलेल्या मुली मात्र दळभद्री असाव्यात. त्यांच्या चेहऱ्यावरची लाचारीच त्यांच्या दारिद्र्याची साक्ष पटवते आठ-दहा वर्षांच्या या कोवळ्या वयात त्यांच्या जीवनाची दिशा आणि दशा अशी भरकटली जावी हे तुम्हास रास्त वाटत नाही तुम्ही उद्विग्न होता विचारांचा कल्लोळ तुमच्या मनात उठतो जीवनातल्या या विसंगतीत सुसंगती शोधण्याचा तुम्ही प्रयत्न करीत असतानाच गज्जी, काता आणि इतर दुसरी काही मुले यांच्या हातावर आणखी एकेक पाच, नाही तर दहा पैशांचे नाणे टाकून तुम्ही सुटकेचा सुस्कारा टाकता पण हे छोटेसेच ठिगळ त्यांचा चिंधडलेला संसार झाकायला अपुरे असते याची तीव्र जाणीव तुमच्या मनात खोलवर घर करून राहिलेलीच असते ! मानवतेची ही अशी विटंबना पाहून महामानवाची आराधना करण्यासाठी तुम्ही पाऊल उचलता ! प्रवाहपतिताप्रमाणे ! जगरहाटीप्रमाणे ! आत्मवंचनेसारखी सुसह्य गोष्ट जगात दुसरी कोणतीच नसावी ! परवंचनेबरोबर आत्मवंचनाही जो करतो तो माणूस, ही बहुधा माणसाची व्याख्या असावी ! जे दोन्हीही करीत नाहीत ते त्या पलीकडले असावेत ! यालाच कोणी ईश्वर तर कोणी अल्ला, कोणी तीर्थंकर तर कोणी बुद्ध, कोणी परमात्मा तर कोणी महात्मा म्हणत असावेत !

शंखेश्वर येथील श्री पार्श्वनाथाचे मंदिर 'आगम मंदिर' म्हणून ओळखले जाते यासाठी या गावात दुसऱ्या एका नव्या 'आगममंदिरा'चे काम वेगाने चालू आहे ! . गर्भ, जन्म, दीक्षा, केवलज्ञान व निर्वाण अशा तीर्थंकरांच्या जीवनातील पाच अवस्था 'पंच कल्याणक' म्हणून मानल्या जातात प्रथम तीर्थंकर ऋषभदेव यांना शत्रुंजयवर केवलज्ञान प्राप्त झाले व त्यांचे निर्वाणही तेथेच झाले त्यांच्या या 'कल्याणकां'नी शत्रुंजय गिरी पुनीत झाला इतरही काही तीर्थंकरांची कल्याणके येथे झाल्याने व अनेक तीर्थंकरांच्या पदस्पर्शामुळे शत्रुंजयला महातीर्थ म्हणून सन्मान मिळाला बाविसावे तीर्थंकर नेमिनाथ यांच्या कल्याणकांनी गिरनारला महातीर्थाचे महत्त्व लाभले चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर यांचे निर्वाण पावापुरी येथे झाल्याने पावापुरीलाही महातीर्थाची संज्ञा प्राप्त झाली श्री शंखेश्वर येथे असे कोणतेही कल्याणक घडले नसले तरी शत्रुंजय खालोखाल हे तीर्थ गणले जाते ते या तीर्थाच्या अती प्राचीन उज्ज्वल इतिहासामुळे व येथील स्थानमाहात्म्यामुळे ! म्हणूनच प्रतिवर्षी चैत्र पौर्णिमा, कार्तिक पौर्णिमा व पौष मासाच्या कृष्णपक्षातील दशमी या तीन महत्त्वाच्या तिथींना या ठिकाणी मोठी यात्रा

भरत असते ।

एस टी स्टँडपासूनच्या दुकानांच्या दुतर्फा रांगांतून मार्गक्रमण करीत उत्तरेच्या रोखाने थोडे पायी चालत गेल्यावर डाव्या बाजूला पालनपूर निवासी श्री मयकुमार मधुकांत भोजीलाल झवेरी धर्मशाला व उजवीकडे श्री धूलचंदजी बेचरजी भवन या नावाने संबोधली जाणारी श्री शंखेश्वर श्वेतांबर मूर्तिपूजक जैन धर्मशाला अशा दोन्ही धर्मशाला मागे टाकून चढाच्या रस्त्याने थोडे पुढे गेल्यावर किल्ल्याच्या तटासारखा एक उंच कोट नजरेस पडतो हाच आगम मंदिराच्या प्राकाराची तटबंदी आहे या प्राकारात प्रवेश करूनही मंदिराचे चटकन दर्शन घडत नाही आवारातील शेठ सोमचंद मगळदास जैन आराधना भवन, श्री शंखेश्वर जैन आगम मंदिर संस्थेचे कार्यालय, शेठ चंदुलाल कचराभाई रबचंदभाई जैन धर्मशाला, मंदिराचे व्यवस्थापन पाहणारी शेठ जीवनदास गोडीदास कारखाना पेढी अशा छोट्या मोठ्या इमारती मागे टाकून पुढे गेल्यावर श्री पार्श्वनाथाचे संगमरवरी भव्य मंदिर दृष्टीस पडते शिंपल्यात अती मौल्यवान मोती काळजी-पूर्वक झाकून माकून ठेवावा त्याप्रमाणे बाहेरील कोटाने व त्याच्या अंतर्गत वास्तूंनी या मंदिराला लपवून ठेवलेले आहे जणू कुणाची दृष्ट लागू नये असा यामागील संयोजकाचा संकेत असावा ।

कुणाचीही नजर लागावी इतके आगममंदिर सुंदर आहे मंदिराचा मूळ गाभारा, गूढमंडप, तीन चौक्या, जुना सभामंडप, नवा सभामंडप, पुन्हा तीन चौक्या, मुख्य प्रवेशद्वार आणि प्रवेशद्वाराबाहेरील देखणी शृंगारचौकी असा हा मंदिराचा अवाढव्य प्रपंच पाहताक्षणी नजर खेचून घेतो मंदिराच्या गाभाऱ्यावरील सर्वांत भव्य व उंच शिखर, गूढ मंडपावरील दोन्ही बाजूंची दोन शिखरे, अवती भवतीच्या प्रदक्षिणेतल्या बावन्न जिनालयांची व इतरही 'देहऱ्या'ची एकाच मापाची व आकाराची छपन्न शिखरे असा हा एकोणसाठ छोट्या मोठ्या शिखरांचा समुदाय व सभामंडपावरील शिखरांचा जलतरंगासारखा भासणारा समूह अनिमिष नेत्रांनी पाहत राहण्याचा मोह अनावर होतो मंदिरापुढील नव्या भव्य सभामंडपात तासन् तास बसून नजरेसमोरील गाभाऱ्यातील प्रभुप्रतिमेचे तेजस्वी बिंब मन पटलावर जसेच्या तसे उमटवून घेण्याची इच्छाही तशीच अमर्याद असते श्री शंखेश्वर पार्श्वनाथाची संगमरवरी महिरपीमधील धीरगंभीर तरीही सस्मित मन-भावन मूर्ती भक्तगणांना व प्रेक्षकांना केवळ मनस्वी भुरळच घालीत नसते तर ती मनाला विलक्षण पिसेही लावते ।

भगवान पार्श्वनाथाचा अधिष्ठायक रक्षक देव नागराज श्री धरणेंद्र व

अधिष्ठायिका रक्षकदेवता श्री पद्मावती याच्या देखण्या प्रतिमा मूळ नायक श्री शखेश्वर पार्श्वनाथ याच्या गाभाऱ्याबाहेर असून या प्रतिमा मूळ नायकाच्या प्रतिमेची शोभा वृद्धिगत करतात भीडभजन पार्श्वनाथाच्या मदिरातील तिन्ही मूर्ती, शिवाय श्री शखेश्वर पार्श्वनाथ मदिराच्या आवारामधील सभवनाथ, नेमिनाथ, वासूपूज्य, महावीरस्वामी, आदिनाथ, श्री सीमधर-स्वामी, श्री केशरियाजी, अनतनाथ, श्रेयासनाथ, अभिनदन, मुनीसुव्रत, अजितनाथ, शांतिनाथ, विमलनाथ आदीच्या मूर्ती, यक्षेंद्र श्री मणीभद्र वीर याची मदिराच्या आवारातील स्वतत्र स्थानकातील हस्तारूढ मूर्ती या सर्वच मूर्ती देखण्या असून मदिराचे तेज वाढवतात एकेका मूरतची सूरत न्याहाळी-तच राहावे असे कोणालाही वाटावे ।

असे हे मदिर अगदी नव्याने बाधल्यासारखे वाटते प्रचलित उपलब्ध पुराव्यावरून हे मदिर कोणी, केव्हा बाधले याचा बोध होत नाही अशावेळी ऐकीव घटनाच आधारभूत ठरतात परिसरातील अवशेष अशा वेळी मार्ग-दर्शक बनतात ।

शखेश्वर येथे श्रीकृष्णाने श्री शखेश्वर पार्श्वनाथाची मूर्ती आणल्यानतर दीर्घकाळपर्यंत या मूर्तीची पूजाअर्चा झाली असावी पुढे कालांतराने परकी-यांच्या अनेक हल्ल्यामुळे या मूर्तीवर वारवार भूमिगत होण्याची पाळी आली असावी प्रसंगविशेषी वरचेवर झालेल्या उत्खननात या मूर्तीचा अनेकदा शोध लागला असावा अशी रीतीने कैक वेळी तिची प्रतिष्ठा झाली असावी असे हे घटनाचक्र प्रदीर्घ फिरत राहिले असावे ।

विक्रम संवत एक हजारच्या सुमारास भोज राजाने या मदिराचा उद्धार केल्याचा उल्लेख काही स्तोत्रवजा जुन्या भक्तीगीतात आढळतो बाराव्या शतकात गुजरातमध्ये चालुक्य राजाची अधिसत्ता होती एवढेच नव्हे तर, या सोळकी राजघराण्याचा डका केवळ भोवतालीच नव्हता तर फार दूरवर सर्वत्र पसरला होता या राजघराण्यातील सिद्धराज जयसिह या राजाची राजधानी अणहिलपूर पाटण येथे होती व सिद्धराज जयसिहच्या प्रभावी शासनाचा बोलबाला खूपच झालेला होता त्याच्या मत्रिगणात सज्जन नावाच्या मत्र्यास मानाचे स्थान होते महापराक्रमी, बुद्धिवान आणि न्याय-प्रिय अशा मत्रिवरास राजाधिराज सिद्धराज जयसिह याने सौरठ देशाचा दडनायक नेमून सज्जनचा बहुमान केला होता नावाप्रमाणेच सज्जन अस-लेल्या या मत्रीश्रेष्ठास शखेश्वर येथे श्री शंखेश्वर पार्श्वनाथाची मूर्ती पुरातन असून चमत्कृतीपूर्ण असल्याचे समजताच त्याने श्री शखेश्वर तीर्थाची यात्रा केली होती व विक्रम सवत ११५८ मध्ये तेथील मदिराचा जीर्णोद्धार करून

देवविमानास लाजवील असे सुंदर मंदिर तेथे उभे केले होते पुढे याच सज्जन मंत्र्याने वि स ११८५ मध्ये गिरनारवर भगवान नेमिनाथाच्या मंदिराचा जीर्णोद्धार करून प्रतिष्ठापना केली होती

ऋतुचक्राच्या फेऱ्यात नव्याचे जुने आणि जुन्याचे नवे होत राहते गुजरातचा राजा दुसरा राणा भीमदेव याचे महामात्य वस्तुपाल तेजपाल यानी वि. स १२८६ च्या सुमारास या मंदिराचा पुन्हा जीर्णोद्धार केला झझूपूरचा राजा दुर्जनशल्य यास महारोगाची व्याधी होती श्री शंखेश्वर पार्श्वनाथाची भक्ती केल्याने त्याची ही असाध्य व्याधी दूर तर झालीच पण त्याचे शरीर पूर्ववत तेजस्वी आणि मुलायम झाले हा शंखेश्वर पार्श्वनाथाच्या स्नात्र-जलाचा अथवा तेथील विशुद्ध हवापाण्याचा प्रभाव असू शकेल पण या अद्‌भुत करणीने दुर्जनशल्य मनोमन तुष्ट झाला व त्यानेही मोठ्या भक्ति-भावाने या मंदिराचा आणखी जीर्णोद्धार केला

असे वारंवार संस्करण होऊनही या मंदिराच्या वाट्याला विनाश यावा असा जणू विधिसंकेत असावा मंदिराच्या सचेतन निर्मात्याला जिथे कालाचे भक्ष्य व्हावे लागले तिथे अचेतन वास्तूची काय कथा! तेराव्या शतकात अल्लाउद्दीन खिलजी व आणखी काही मुसलमान राजानी गुजरातवर जोर-दार हल्ले चढविले त्या अनेक धाडीत सोरठी सोमनाथासारख्या असंख्य मंदिरांची नासधूस झाली शंखेश्वर पार्श्वनाथाचे मंदिरही या आपत्तीतून बचावले नाही श्री शंखेश्वर पार्श्वनाथाचे श्रद्धावान भक्तगण मात्र अशा कठीण संकटकाळी आपल्या आराध्यदेवाची मूर्ती निष्ठेने आणि चतुराईने भूमिगत करायला विसरले नाहीत देवाच्या वाट्यालाही विजनवास असा येत असतो! अशा सावटातही एखादा कवडसा झळाळत असतो विक्रम संवत १६५६ मध्ये शहाजहान बादशहाने अहमदाबादचे श्रेष्ठीवर शांतिदासजी जव्हेरी याना शंखेश्वर गाव आंदण दिले होते राजसत्ता, मग ती कुठल्याही धर्मी-यांची असली तरी, अशा सत्कार्यात सहाय्यभूत ठरत होती! समर्थ राम-दासाचे एक शिष्य उद्धवस्वामी यांनी समर्थांच्या पश्चात इ स १७८० मध्ये आंध्रमधील निझामाबाद गावी म्हणजेच त्याकाळच्या इंदूर बोधन ग्रामी समर्थांच्या मठाची स्थापना केली होती तेव्हा खफीखान व अमानतखान या दक्षिणच्या सुभ्यातील दिवाणांकडून व अर्शदखान याचेकडून अनुदाने घेत-ल्याची नोंद त्या वेळच्या सनदेद्वारा प्रकाशात आली आहे शहाजहानकडून शांतिदासजी याचे नावे शाही फतवा मिळूनही उजेडात येण्याचे भाग्य तत्कालिक ठरून प्रभूच्या वाट्याला पुनश्च भूमिगत 'अंधारकोठडी' तला वनवास आला होता

परमेश्वराचा अज्ञातवास सपायलाही इष्टकाल यावा लागत असावा।
सेनपल्ली या गावाच्या उत्तर दिशेला खारखोत्र तलावाच्या किनाऱ्यावर श्रीकृष्णाची जुनीपुराणी मूर्ती कालांतराने सापडली होती. त्याच्या दगडातून बनवलेली ही मूर्ती शेषशाही श्रीकृष्णाची होती. फणाधारी शेषावर श्रीकृष्ण निद्राधीन असून त्याच्या पायाशी लक्ष्मी बसलेली आहे अशा पवित्र्यातली मूर्ती व त्याच बरोबर आजूबाजूस इतरही काही अस्ताव्यस्त विखुरलेल्या मूर्ती पाहून त्या स्थानी जुने मदिर असावे असे बघणारानी अनुमान काढले व त्या अनुरोधाने मागोवा घेत असता जमिनीच्या पोटात श्री शखेश्वर पार्श्वनाथाच्या मूर्तीचा शोध लागला।

या सदर्भात अशी एक दंतकथा सागितली जाते

येथील एका गवळ्याची एक गाय या ठिकाणाजवळून जात असता नेहमी दुग्धस्राव करीत राहायची हा अदभुत प्रकार पाहून त्या स्थानी काय आहे हे पाहाण्याची लोकामध्ये अर्थातच जिज्ञासा उत्पन्न झाली. जमीन खणून पाहता त्या स्थानी लोकाना शखेश्वर पार्श्वनाथाची पुरातन मूर्ती सापडली. सौराष्ट्रात उदेपूरपासून पासष्ट किलोमीटर दूर असलेल्या धुलेवा या गावाजवळही प्रथम तीर्थंकर आदिनाथ याची मूर्तीही अशीच धुळा भिल्लाला सापडल्याची दतकथा ऐकायला मिळते धुळा भिल्लाची गायही त्याच्या शेतात एका ठराविक ठिकाणी उभी असताना अशीच पान्हा द्यायची व त्या जागी दुधाचा अभिषेक घालायची. धुळाने त्या जागी खणून पाहिले तेव्हा त्याला आदिनाथाची पुरातन मूर्ती सापडली ही ती केशरियाजीची मूर्ती। दोन्ही दतकथेतील घटनांचे साम्य विचारवतानाही कोडयात टाकते।

ज्या ठिकाणी शखेश्वर पार्श्वनाथाची भूमिगत मूर्ती सापडली त्या ठिकाणी श्री विजयसेन सूरीश्वरजी गुरुवर्यांच्या उपदेशाने पुन्हा नवे मदिर उभे राहिले पण याही मदिराच्या वाट्याला तोडफोड होतीच मोगल बादशहा औरंगजेब याची दिल्लीच्या तख्तावर हुकुमत होती शखेश्वर पार्श्वनाथ हे तीर्थस्थान ज्या सुभ्यात होते त्या मुझपूर सुभ्यावर हमीरसिंह ठाकूर या सरदाराची सत्ता होती. त्याची सत्ता सपुष्टात आणण्याच्या इराद्याने औरगजेबाची फौज मुझपूरवर चाल करून आली होती. त्या फौजेने ठाकूर हमीरसिंहचा केवळ पाडाव केला नाही, तर शखेश्वर पार्श्वनाथाच्या मदिराची खूपच नासधूस केली. पुन्हा देवावर भूमिगत होण्याची पाळी आली

पुढे आणखी एक उत्खनन झाल्यावर जुन्या मदिराचे अवशेष दृष्टोत्पत्तीस पडले व भुयारात सुरक्षित दडवून ठेवलेली मूर्ती प्रकट झाली. मुझपूरच्या ठाकूराचे वशज या मूर्तीचे धनी झाल्याने स्वामित्वाचा हक्क गाजवून ते

अर्थातच दर्शनासाठी भाविकांकडून दाम वसूल करू लागले धर्मगुरूच्या प्रेरक प्रोत्साहनामुळे व भाविकाच्या अगाध श्रद्धेने ठाकूराच्या भोगवटचातून या मूर्तीची सुटका करण्यात आली व विक्रम संवत १७५० मध्ये नव्या जागेवर नव्या मंदिरात तिची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली त्यानंतरच्या अडीचशे ते तीनशे वर्षांच्या अवधीत या मंदिरावर वारंवार छोटे मोठे अनेक संस्कार होऊन आजचे भव्य आणि दैदिप्यमान स्वरूप त्यास प्राप्त झाले आहे! आजचे मंदिर अलीकडेच नव्याने बांधले असावे असा प्रथम पाहणाराचा समज होतो तो यासाठीच

अशा या शखेश्वर पार्श्वनाथाच्या मंदिराची अशी ही गूढगम्य कहाणी संशोधकांनी तपासून पाहणे अगत्याचे आहे अर्थातच अशा संशोधनाला पत्रकारितेचे साहाय्य मिळावयास हवे नाव घेण्यासारखे जैन पत्रकार आहेत तरी कुठे ? सर्वत्रच अशा पत्रांचे दुर्भिक्ष प्रकर्षाने जाणवते जी काही थोडी नियतकालिके निघतात त्यांचे संपादक महोदय स्वत च्या पत्राला ' भारतातील सर्वांत जास्त खपाचे जैन पत्र ' मानतात व या घमेंडीत ते आपल्या नियतकालिकात ते न् तेच लेख आणि त्या न् त्याच वार्ता आलटून पालटून वारंवार छापतात त्यातही नवे नवे प्रयोग, नव्या नव्या शैली न वापरता पारंपरिक थाटाने असे साहित्य सादर केले जाते संशोधनाचे त्यांना एक तर वावडे असावे किंवा तेवढी त्यांच्यात कुवत तरी नसावी ! ज्ञानाजंनाची आस्था नसणारे असे काही तथाकथित पत्रकार पंडीत अधिकारवाणीच्या फसव्या अविर्भावाने जैन सिद्धांतावर लांबलचक भाषणे झोडतात व जैन धर्माबद्दल अनभिज्ञ असणाऱ्याकडून त्यांची ही व्याख्यानबाजी निमूटपणे खपवून घेतली जाते अर्थातच अशाने हे पत्रकार पंडीत अधिकच फुशारून जातात व अशा खोटया प्रोत्साहनाने ते आपल्या पत्राची पातळी उंचावण्याच्या संदर्भात औदासीन्य दाखवतात ज्यांच्यात धमक व चमक आहे अशा जाणकारांना मुशाहिरा द्यावा लागत असल्याने संपादक महाशयांच्या खिशाला चाट लागते म्हणूनच हे अशा तडफदार व्यक्तींना चार हात दूर ठेवतात नव्हे, अशी व्यासंगी माणसे समोर आली की हे महाभाग तोंड चुकवतात ! तेव्हा अशांना संपादक तरी कसे म्हणावे ? अशा पत्रकारितेचा असा हा उजेड ! तर मग इतरत्र अंधारच की !

तरीही या संदर्भात संशोधनाची नितांत गरज आहे श्रीकृष्णाने पार्श्वनाथाच्या मूर्तीची स्थापना करून श्रद्धाळू जैनधर्मीयांना ऋणी करून ठेवले

सा . ३

आहे तेव्हा श्री शखेश्वर पार्श्वनाथाची 'नव अगी' पूजा सातत्याने करून जेवढे पुण्य पदरात पडत असेल त्याहून कितीतरी पटीने अधिक पुण्य अशा सशोधनाने पदरी पडणार आहे श्री शखेश्वर पार्श्वनाथाच्या पूजेबरोबरच भावी 'अमम' तीर्थंकराची पूजाही अशा सशोधनाच्या मार्गे आतापासूनच बांधावयास हवी। श्रीकृष्णाचा ऋणभार या दृष्टीने असा अमोल आणि अमाप आहे सिद्ध ही अरिहताची पुढची अखेरची सर्वोच्च पूर्णावस्था आहे व या पूर्णावस्थेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग अरिहतानी दाखविला म्हणून नवकार मत्राने पचपरमेष्ठीमध्ये मानाचे पहिले वहिले स्थान अरिहत भगवतांना कृतज्ञतेने दिलेले आहे। आपापल्या दैवताच श्रेष्ठत्व प्रतिपादनाच्या भरीस न पडता अजैनीयानी अरिष्टनेमीबद्दल व जैनीयांनी श्रीकृष्णाबद्दल कृतज्ञता व्यक्त करावयास हवी।

बहुसख्य हिंदूचे श्रीकृष्ण हे केवळ श्रद्धास्थानच नाही तर तो त्यांच्या जिवाभावाचा सखा आहे। इतर धर्मीयातील देवादिकांना लाभले तसले दिव्य भव्य जनन मरण श्रीकृष्णास लाभलेले नाही बहुतेक परमेष्ठी पुरुष राजघराण्यातील अथवा उच्च कुळातील होते राजघराण्यातील अथवा श्रेष्ठ कुळातील व्यक्तीच अशा देवरूपास कशा जाऊन पोचल्या याचे अनेकांना आश्चर्य वाटणे स्वाभाविक आहे। पण उच्चकुळात जन्म घेऊनही हीनदीन आणि दरिद्री दुबळ्या जनसामान्यासाठी त्या झगडल्या म्हणून अशा व्यक्ती विभूती झाल्या। महात्मा गांधी अथवा पंडीत नेहरू याना लाभलेल्या लोकप्रियतेचे व अलौकिकत्वाचे गमक जन्माबरोबरच त्यांच्या तोंडी सोन्याचे गोकर्ण मिळूनही त्यांनी तुरुगाच्या हालअपेष्टाची सवय व्हावी याकरिता गादद्यागिदर्यांचा अव्हेर करून गोणपाटावर झोपण्याचा सराव केला होता या व अशा अनेक घटनांत आहे। अशा असख्य घटनांनी त्यांना जनतेच्या हृदयसिंहासनावर विराजमान केले होते। वर्धमान किंवा सिद्धार्थ राजकुमार होते त्यानी ते ऐश्वर्य लाथाडून जनजागरणाचे कंकण हाती बाधले व अनत यमयातना सहन करून स्वत चा व त्याबरोबरच जगाचा उद्धार केला म्हणून ते भगवान महावीर किंवा महात्मा बुद्ध झाले। बहुसख्य नरश्रेष्ठांचे जडण घडण असे झाल्याचे इतिहास सांगतो डॉ आबेडकरांसारखे काही अपवाद वगळले तर एखाद्या सामान्य पददलित व्यक्तीला एवढी अत्युच्च मजल गाठता आली असती का हा एक प्रश्नच आहे। श्रीकृष्ण असाच राजघराण्यातील पुरुष होता पण तो सामान्य माणसासारखा नव्हेच पण खडतर सकटात जन्मला होता त्यावेळी स्वर्गातून देवदेवतानी पुष्पवृष्टी केली नव्हती। तो गवळ्याच्या घरी लहानाचा मोठा झाला. गोपगोपींच्या घरी

बागडला हुदडला असंख्य सख्याबरोबर तो रासक्रीडा खेळला अनेक बऱ्या-वाईट प्रसंगी त्याने बुद्धिभ्रम करणारी कुटिल कारस्थाने केली आणि अखेरी सामान्य माणसासारखे केविलवाणे मरण त्याच्या वाट्याला आले। त्याला न्यायला देवविमान आले नाही। असा सामान्य माणसाचे जीवन जगलेला श्रीकृष्ण बहुजनांची अस्मिता न ठरेल तरच नवल। असा देव आपल्या-सारखा होता म्हणून माणसाला जवळचा वाटणे सहाजिकच आहे। अशा देवासंबंधी बोलण्याची अरेतुरेची एकेरी भाषाही याच जवळीकीची द्योतक आहे। तेव्हा श्रीकृष्णाचा असा हा जीवनालेख दृष्टीपुढे ठेवून श्रीकृष्ण आणि अरिष्टनेमी याच्यातील सुहृद सहयोग सर्वांनीच विचारात घ्यावयास हवा व सहृदयतेने उभयतापुढे विनम्र व्हावयास हवे।

तुम्ही मंदिरातून बाहेर पडून वाटेला लागता तेव्हा मुलांमुलींचा घोळका पुन्हा पाठीशी लागतो मुले मघाचीच असतात त्याचा चिवटपणा तुम्हास अस्वस्थ करतो म्हणून आणखी एकेक पाच नाहीतर दहा पैशांचे नाणे त्याच्या हातावर ठेवून तुम्ही सुटकेचा सुस्कारा टाकता पण हे छोटेसेच ठिगळ त्यांच्या चिंधडलेला संसार झाकायला अपुरे आणि असमर्थ असते याची तीच मघाची बोचरी जाणीव तुमच्या मनात खोलवर घर करून राहिलेली असते।

तुम्ही गज्जी नावाच्या मुलीच्या हातावर दहा पैशाचे आणखी एक नाणे ठेवून देखील तिचा तुमच्या मागचा ससेमिरा सुटत नसतो आता सहानुभूतीच्या जागी किंचित चीड येते थोडचा रागाने तुम्ही तिच्याकडे पाहू लागता, तोच ती हातातील पाच पैशाचं नाण तुमच्या पुढ्यात धरते तुम्हाला दीनवाण्या मुद्रेने व दबलेल्या स्वराने ती काही तरी सांगू पाहते, की जे तुम्हाला नीटसे समजत नाही तिची गुजराती, पण पुस्तकातल्यापेक्षा खूपच वेगळी असलेली, बोलीभाषा तुम्हाला कळत नसते मोठ्या मुष्किलीने तुमच्या लक्षात येते की, तिला तुम्ही दिलेले पाच पैशाचे नाणे घासून झिजून गुळगुळीत झालेले आहे बाजारात ते चालणारे नसते म्हणून ती तुम्हास बदलून मागीत आहे। तिच्या परकराच्या दशा, पोलक्याच्या जागजागी झालेल्या चिंध्या, तेलाअभावी चरबट झालेले व अस्ताव्यस्त विस्कटलेले केस, निर्माल्याप्रमाणे सुकून निस्तेज झालेला रडकुंडी चेहरा हे काही काही पहावस वाटत नाही तुम्हाला। झिजलेले नाणे तिच्याकडून परत घेणे अव्यवहार्य असते या सुसंस्कृत जाणिवेने तुम्ही ते परत न घेता दुसरे चांगले नाणे तिच्या हातावर टाकून तुम्ही दूर सरकता। मानवतेची अशी विटंबना पाहूनही 'फ्रूट सलाड'-च्या भोजनावर ताव मारण्यासाठी तुम्ही घाईघाईने पाऊल उचलता। प्रवाह

पतिताप्रमाणे ! जगरहाटीप्रमाणे ! कडकडून लागलेली भूकच तुम्हाला एका वास्तवतेपासून दुसऱ्या वास्तवतेकडे खेचत नेते !

भोजनाचा आस्वाद घेत असतानाच तुम्हाला श्रीशखेश्वर पार्श्वनाथाच्या प्रभावाविषयी काही चमत्कृतीपूर्ण घटना कोणा कोणाकडून ऐकायला मिळतील त्यातील अद्‌भुतता तुम्हाला चकित करून टाकील आणि जेवणातील एका पाठोपाठचा एक घास तुम्हास अधिकाधिक गोड वाटेल ! ...

गुजरातमधील खेडा गावाहून उदयरत्न नावाचा भक्तकवी जातीबाधवांचा सघ घेऊन श्री शखेश्वर पार्श्वनाथाच्या यात्रेस आला असता त्याला पार्श्वनाथाचे दर्शन मिळाले नाही त्यावेळेस श्री शखेश्वर पार्श्वनाथाची मूर्ती भुझपूरच्या ठाकराकडे होती व एकेकाकडून [illegible]

म्हणून घतल्याखेरीज तो कोणासच त्या मूर्तीचे दर्शन घडू देत नव्हता उदयरत्नाने पुजाऱ्याची खूपच मनधरणी केली, पण ठाकूराच्या धास्तीने पुजारी दार उघडायला तयार होत नव्हता शखेश्वर पार्श्वनाथाचे दर्शन घेतल्याखेरीज अन्न व पाणी ग्रहण करणार नाही असा उदयरत्नने निर्धार केला बरोबर आलेल्या सघातील सर्वांनीच त्याच्याप्रमाणेच निश्चय केला असा हा समुदाय रात्रंदिवस प्रभूची स्तुतीकवने गात उभा राहिला असतानाच अचानक मदिराचे दार उघडले गेले व भुकेल्या भाविकाना पार्श्वनाथाचे दर्शन घडले या आश्चर्यजनक घटनेने ठाकूराच्या सद्‌सद्‌विवेक बुद्धीलाच धक्का दिला व त्याने सद्‌भावनेने पार्श्वनाथाची मूर्ती सघाच्या स्वाधीन केली

नागपूरचा एक श्रावक ज्याचे नाव सुभट शहा होते, त्याची भक्ती श्री शखेश्वर पार्श्वनाथावर होती तो अभिग्रहपूर्तीसाठी कुटुबियासमवेत शखेश्वरला जात असता वाटेतच चोरांनी त्याच्या प्रवासी ताडग्यावर धाड घातली व त्याच्याजवळ असलेले सर्व धनधान्य चोरानी लुटून नेले अशा [illegible] पार्श्वनाथापुढ लोटागण घातल व त्याची करुणा भाकली, "तू विघ्नहर्ता व हितकर्ता म्हणून तुझ्या दर्शनासाठी आलो, तर वाटेतच माझ्या वाट्याला दुर्दशा आली परमेश्वराकडे धाव घेणाऱ्या भक्ताच्या वाट्याला तुझ्या परिसरातच असे दैन्य यावे याचेच खरोखर दुःख होते" सुभट शहा अशी आळवणी करीत असतानाच त्याची मुले येऊन सागतात की त्याच्या गाड्यातून चोरीला गेलेल्या सर्व चीजवस्तू पुन्हा जशाच्या तशा आणि जेथल्या तेथे गाड्यामध्ये येऊन पडल्या आहेत !

झझूपूरचा रजपूत राजा दुर्जनशल्य यास महारोगाची बाधा झाली होती

श्री शखेश्वराच्या स्नात्रजलाने त्याची व्याधी दूर झाल्याचे अनेकाच्या ऐकीवात होते एगलपूर नगरीचा राजा एलगदेव याची शारीरिक व्याधीही अशीच पार्श्वनाथाच्या स्नात्रजलाने दूर होऊन त्याचे शरीर पूर्ण निरोगी झाले अचेतनाला चैतन्य देण्याची जादू याच स्नात्रजलाने करून श्रीकृष्णाला विजयश्री मिळवून दिली होती

गधार नगरचे श्रेष्ठी मोनाजी शेठ समुद्रमार्गे परदेशाशी व्यापार करीत होते मालाने भरलेले त्याचे एक जहाज परदेशाच्या वाटेवर असताना समुद्रात भयंकर तुफान झाले मालाबरोबर अनेक जीव धोक्यात आले मोनाजी शेठ स्वत: जहाजावर होतेच त्या सकटातून बचावण्याची आशा दुरावली असताना त्यानी मनोभावे श्री शखेश्वर पार्श्वनाथाचे स्मरण केले व या वादळातून सहकाऱ्यासह जगलो वाचलो तर जहाजावर जेवढ्या किमतीचा माल होता त्यातील चौथ्या हिश्शाची रक्कम श्री शंखेश्वर येथे खर्च करीन अशी त्यांनी प्रतिज्ञा केली खवळलेला सागर हळूहळू शात झाला आणि त्या भयाण सकटातून सर्वांचीच मुक्तता झाली प्रतिज्ञेप्रमाणे त्यानी शखेश्वर तीर्थाची यात्रा केली व नऊ लाख रुपये खर्चून नवे अप्रतिम मदिर उभे केले।

शखेश्वरच्या परिसरातच पचासर नावाचे एक गाव असून तेथे एक जोडपे आनंदाने ससार करीत होते त्याच्या ससारवेलीवर एक फूल उमलताच त्याच्या ससाराला दृष्ट लागली आणि पती आकस्मिक मरण पावला. आता पत्नीला एकच आधार उरला होता मुलाचा। त्या मुलाचे चागल्या रीतीने भरण, पोषण आणि सरक्षण व्हावे म्हणून बिचाऱ्या आईने मुलाच्या भारोभार रुपये श्री शखेश्वर पार्श्वनाथला अर्पण करण्याचा सकल्प केला. आपल्या संकल्पपूर्तीसाठी मुलाला घेऊन माता शंखेश्वरला निघाली असतानाच तिच्या जवळच्या धनाची लुटारूना कुणकुण लागली त्यांनी बाईजवळची सर्वच रक्कम लुटून नेली महत्प्रयासाने मिळवलेली ही धनराशी लुटली गेल्यामुळे हताश झालेल्या आईने वाटेतच आकांत केला, "आता एवढे धन मला पुन्हा केव्हा मिळेल आणि माझी वचनपूर्ती कशी होईल, तूच साग पार्श्वनाथा...माझ्या बाळाला उदड आयुष्य लाभावे म्हणून मी सकल्प केला होता ..पण मी तर आता निर्धन झाले तेव्हा माझ्या बाळाचे रक्षण करणे आता तुझ्याच हाती आहे, देवा माझ्या मनाला आता शाती लाभणे कठीण।" ती असा शोक करीत असतानाच कुठून तरी एक घोडेस्वार अचानक आला व लुटारूनी नेलेले धनाचे गाठोडे त्याने बाईच्या पुढ्यात ठेवले बाईचा स्वत:च्या डोळ्यावर विश्वास बसेना. काही क्षणानी तिने नजर वर उचलून पाहिले तर गाठोडे घेऊन येणारा घोडेस्वार कुठल्या कुठे

पसार झाला होता।

अगदी अलीकडील काळात राधनपूरचा एक भक्त हरगोविंद आपल्या काही सोबत्यासह बैलगाडीतून शखेश्वरला येत असताना काळोख्या रात्री वाट चुकला कुठलीशी नदी आडवी आल्यावर बैल चालेनासे झाले तेव्हा त्याला वाट चुकल्याचे समजले तेवढ्यात काळ्या घोड्यावरून एक स्वार तेथे दौडत आला त्याने हरगोविंद व त्याचे सोबती यांना सुचविले की त्यानी त्याच्या मागोमाग यावे अशा तऱ्हेने ही यात्रा शखेश्वर येथे पोचली नाही तोच वाटाड्या घोडेस्वार कुठल्या कुठे अदृश्य झाला।

गुजरातमधील चाणस्मा गावचा एक वृद्ध श्रावक डोळ्यांतील मोतीबिंदूने अतिशय हैराण झाला होता त्याने मोतीबिंदूवर शस्त्रक्रिया करून घेतल्यास त्यास दगा होईल अशी डॉक्टरांनी धोक्याची सूचना दिली होती. तसा तो जास्तच बेचैन झाला श्री शखेश्वर पार्श्वनाथाच्या स्नात्रजलाने तुझे डोळे बरे होतील असे कुणीतरी भाविकाने त्याला सुचविले प्रयत्नांची शिकस्त झाल्यावर व सगळे उपचार खुटल्यावर डॉक्टरदेखील देव आणि दैव यावर भार टाकण्यास सांगतात। भाविकाच्या कथनावर विश्वास ठेवून त्याने डोळ्यावर शखेश्वर पार्श्वनाथाच्या स्नात्रजलाचा प्रयोग केला व त्यायोगे त्याचा मोतीबिंदू नाहीसा झाला जरासंधाच्या जरा विद्येने गलितगात्र झालेले श्रीकृष्णाचे सैन्य पार्श्वनाथाच्या स्नात्रजलाने उत्साहित झाल्याची घटना हजारो वर्षांपूर्वी घडली होती, तर स्नात्रजलाने मोतीबिंदू बरा झाल्याची घटना विक्रम सवत १९९६ मध्ये म्हणजे चाळीस-बेचाळीस वर्षांपूर्वीच घडली होती।

असले काही तरी अद्‌भुत पुनश्च घडावे व ते याच देही याच डोळा पहावयास मिळावे असे भरल्यापोटी तुम्हास वाटणे साहजिकच आहे। रस्ताभुलीचा, लूटमारीचा किंवा असला कसला तरी दुर्धर प्रसग प्रत्यक्ष ओढवल्यावर काय घडेल याचा तुम्हास अदाज आहे काय? अशाच प्रभावाने म्लेच्छाच्या झडपेतून मूर्ती सुरक्षित राहिली नाही का? . तुम्ही कल्पनेने अनुमान करण्यास कसलीच हरकत असू नये यासाठी सकटात श्री शखेश्वर पार्श्वनाथाचा धावा करण्यात तुम्हास अडचण भासू नये। माणसाने प्रयोगशील का नसावे?

पण अशा प्रयोगासाठी वाट पाहण्याची पाळी तुमच्यावर येऊ नये अशीच श्रीशखेश्वर पार्श्वनाथाची 'इच्छा' दिसते।

भोजन उरकून तुम्ही पुढील प्रवासाला सिद्ध होता मधुमीलनवर सामान चढवून होईपर्यंत फेरफटका मारण्यासाठी तुम्ही नव्या 'आगम मदिरा'ची

वाट धरली अर्ध्या तासाने मधुमीलनकडे तुम्ही परतता तेव्हा तुम्हास कळते की, महेंद्रभाईंनी बरोबर आणलेला गोपी नावाचा नोकर एका अपघातातून वाचला ! मधुमीलनच्या छतावर सामान चढवताना इदर नावाच्या नोकराच्या हातातून स्टोव्ह निसटला तो खाली उभ्या असलेल्या गोपीच्या डोक्यावर पडून त्याचा कपाळमोक्ष होणार होता पण कालिया नावाच्या आणखी एका नोकराच्या सावधगिरीने हा अनर्थ टळला ! त्याने गोपीला बाजूला ढकलून स्टोव्ह वरच्यावर अलगद झेलला ! कालियाच्या रूपाने श्रीशखेश्वर पार्श्वनाथच 'पावला' म्हणायचे ! तुमच्या प्रवासाच्या पहिल्याच दिवशी अपशकुन झाला नाही ही श्री शखेश्वर पार्श्वनाथाचीच 'कृपा' म्हणायची ! ... 'योगायोग' म्हणायचे की काय ! ..

# चार

हळदीकुंकवान भरगच्च भरलेल्या थाळयाला कुणाचा तरी न कळत धक्का लागला आणि मावळत अंगाला लालकेशरी रंग शिंतडला! जणू लालकेशरी रंगाचा सडाच घातला गेला! अवचित धक्क्याने उधळलेला आणि अर्धामुर्धा रिता झालेला लाल थाळा निळ्या-काळ्या आभाळाच्या गोलाकार उतरणीवरून पश्चिमेकडच्या क्षितिजाकडे घरंगळू लागला!..

परतीच्या ओढीन उधळलेल्या सूर्याच्या रथाच्या सात घोड्यांनी क्षितिजा-लगतचे सात रंगांचे साती रांजण ठेचाळल्याने मावळत अंगाला सात रंगांची शिंपणी तर झाली नसेल ना?..

अरे वा! या सात रंगांत लाल-पिवळ्या आणि निळ्या-पारव्या रंगाचे झिरमिळी शेलेच जास्त उठून दिसतात! वर्चस्वासाठी याच्यात आपापसात झोंबाझोंबी सुरू झाली की काय! हातघाईवर येऊन घनचक्कर झुंज दिल्यास उगाचच काळेठिक्कर पडावे लागेल! कुणा रसिकाचं त्याच्याकडे लक्ष असणारच की! मग उगाचच अपकीर्ती होईल आणि काळोखात तोंड लपवून घेण्याची पाळी येईल! .अंधार तर त्याच्याच मागावर आहे!..

तेव्हा धिंगाणा किंवा दगाधोपा न करता त्यानी शांततेन आणि सबुरीन निपटून घ्यायला हवं! नाहीतर, दोघांचं भांडण आणि लाभ मात्र तिसऱ्याचा व्हायचा! खव्यासाठी लठ्ठालठ्ठी करणाऱ्या दोन मांजरांच्या तंट्यांत माकडाने डल्ला मारला तसं काही घडायचं! लालपिवळ्या आणि निळ्या पारव्या झाकींना काळोखच गट्ट करायचा! होणारे न चुके, तरीही सावधान!

चकाकीचं कोडकौतुक करणारी संध्या आणि तिच्या पाठीशी धूर्तपणे छपलेली निशा अशा दोघीही त्याच्याकडे बघत आहेत! त्याच्याकडून नावे ठेवून घ्यायची पाळी यायची! तेव्हा रंगीबेरंगी शेल्यानी आपापसातील

घुसळण थांबवायला हवी !

हे रोजचंच असलं म्हणून काय झालं ? कामातुर स्त्री रोज सायंकाळी भूलभुलावणीसाठी प्रसाधन करतेच ना ! रंगीबेरंगी शेल्यांनी आपसात न झगडता असेच झोकदार प्रकटीकरण करायला हवे की वेड्या कवीला नाहीतर कवयित्रीला त्याच्या कडे अनिमिष नेत्रानी आणि उफाळत्या भावनानी पाहतच रहावेसे वाटावे ! बहुधा याचेच नाव साक्षात्कार असावे ! उघड्या आभाळाखाली रात्रीच्या रात्री व्यतित केल्याशिवाय साक्षात्कार होत नाही असे महंमद पैगंबराने म्हटलेले आहे, ते उगाच नव्हे ! महामानव रानोमाळी हिंडले फिरले ते देखील उगाच कसे !

काठियावाडी गायींचे कळप शेतात चरत आहेत वाकड्या शिंगाच्या काठियावाडी बैलाचा ताडाही कुठंकुठं चारा ओरबडत आहे बाजारहाट करून परतणाऱ्या थकल्या भागलेल्या मालकांचे गाडे उंट धीम्या पावलानी रस्त्यावरून ओढत आहेत. या सगळ्याचंच लक्ष मावळतीकडे आहे ! मावळतीकडील इथाऱ्यान आणि अनुरोधानं ही जनावरं गोठ्याकडे परतत आहेत

कच्छमधले गवळी 'मालधारी' म्हणून ओळखले जातात यांच्यात अहिर आणि रेबारी अशा जाती आहेत शेळ्या, मेंढ्या, गायी, म्हशी, उंट पाळून हे उदरनिर्वाह करतात हे गवळी गुराख्याकडे गुरे राखायला देतात तर काही काही 'मालधारी' स्वत:च गुरे राखतात ! या कच्छी मालधाऱ्याचा पेहेराव 'काठेवाडी' धर्तीचाच विशेष करून असतो ! अगदा काळा रंग झाकण्यासाठी पोषाख पांढरा ! तसे हे 'मालधारी' मूळचे आफ्रिकेतले रहिवासी यांच्या रंगावरून त्यांच्या मूलस्थानाची कल्पना यावी ब्रिटिशांनी यांना येथे आणून सोडले या लोकानी येथील स्थानिक लोकाचाच धंदा उचलला याच्या स्त्रियांनी गोपीकडून वारसा घेतला गाई, म्हशी, शेळ्या, उंटिणी याच्या धारा काढाव्यात, रतीब घालावेत, उरेल त्या दुधाचे दही लावावे, दह्या ताकापासून लोणी काढावे, लोणी कढवून तूप करावे व हे तूप, लोणी यांनी विकावे ! पुरुषांनी गुराढोरांची उठाठेव करावी, राखण करावी या मालधारी गोपी इस्लाम धर्म पाळत असूनही स्थानिक गोपीप्रमाणे जन्माष्टमीला 'रासक्रीडा' खेळतात 'धमाल' हे तर मालधारी स्त्री पुरुषांचे आवडते नृत्य !

हे मालधारी तसे परकेच पण या देशात आलेले आर्यही परकेच की आर्यांचे मूलस्थान नेमके कोणते यावरून एकमत नसले तरी हिंदुकुश पर्वतापलीकडील कास्पियन समुद्रालगत पामीर पर्वत आहे तेथून मूळच्या आर्यांच्या वाटा अलग अलग झाल्या म्हणतात कुणी इराणकडे व तेथून पुढे यूरोपकडे

वळले, तर कुणी हिंदुकुश पर्वत ओलांडून सिंधूच्या खोऱ्यात आले त्यांच्यापैकी काही आणखी पुढे सरकून गंगा-यमुनेच्या आसऱ्याला गेले सिंधूच्या खोऱ्यात थाबले ते स्वतःला सूर्यवंशी मानू लागले बरोबर आहे यांची दृष्टी पूर्वेकडे पुढे सरकत गेलेल्या त्यांच्या बांधवांकडे होती व त्यांच्या सुरक्षिततेसाठी हे पूर्वेच्या अधिपतीकडे करुणा भाकीत होते म्हणून हे सूर्यवंशी। गंगा-यमुना यांच्या तटावर गेले ते स्वतःला चंद्रवंशी मानू लागले याची दृष्टी पाठीमागे राहिलेल्या बांधवांकडे पश्चिमाभिमुखी होती चंद्र त्यांचे श्रद्धास्थान होता।

दीड दोनशे वर्षांपूर्वी ब्रिटिशांच्या इच्छेने आफ्रिकेतून येथे आलेल्या लोकांनी 'गोधन' पाळायला सुरुवात केली व हे 'मालधारी' झाले तसे हे परके आणि उपरेच। यांनी येथील लोकांची गुजराती भाषा आत्मसात केली, आपला इस्लाम धर्म मात्र सोडला नाही तसा आचार धर्म मात्र यांनी इथलाच पत्करला। यांनी येथील काठेवाडी माणसाची छबी स्वतःत सही सही उतरून घेतली। ते इस्लामी असून मास, मदिरा यापासून दूर असतात ते यामुळेच। मासाशन, मदिराप्राशन न करणारे काश्मिरमधले 'गुजर बकरवाल' यांचेच वंशज असावेत। महाराष्ट्रातल्या गायधनी, गायकँवारी गायकवाड, म्हसकर, म्हसे, शेळके या हिंदू गोपवंशीय लोकांशी यांचा कसलाच लागाबांधा नाही सर्वच बाबतीत हे यांच्यापासून फार फार दूर। तुमचेकडील 'मालदार' किंवा 'मालगुजार' म्हणजे साव सावकार. जुन्या काळी सधनतेचे मोजमाप पदरी असलेल्या पशुधनावर केले जात होते। म्हणून अशांना मालदार किंवा मालगुजार म्हणण्याचा प्रघात होता आजकाल याचा अर्थ साव-सावकार एवढाच मर्यादित आहे। 'खांद्यावरी कांबळी हातामधी काठी, चारितसे धेनु, सावळा जगजेठी' हे जरी सर्वसाधारण गोपालाचं चित्र असलं तरी कच्छ-काठेवाडातले 'मालधारी' गवळी यापेक्षा थोडे वेगळेच।

काठियावाडी गोल पगडी घातलेली, काठियावाडी आखूड धोतर नेसलेली आणि बारा बंदाची बंडी अथवा अंगरखा यावर काहींनी कोट 'पेहेनलेली', उंच छळकाटी अशी ही माणसं गुराच्या पाठीशी असली तरी मावळतीच्या झळाळीच लक्ष मुक्या बिचाऱ्याकडं असायला हवं असं तुम्हाला वाटतं, कारण पिळदार मिशीवाले हे काठेवाडी गुराखी विडचा फुकण्याच्या नादात आहेत ही माणसं जनावरांच्या पाठीशी असली तरी त्यांच्या पाठी हात धुऊन लागण्याचं यांना जणू माहीतच नसतं। एखाद्या गाईनं अथवा म्हशीनं दूध कमी दिलं तर ही माणसं कधी त्या जनावरावर तुटून पडणार नाहीत व

तिला 'गत्काळी. सुक्काळी ' अशा शेलक्या शिव्या हसडून ' तुला कसायाच्याच घरी धाडतो थांब ' असे कधी म्हणणार नाहीत ! एखादा बैल काम करून थकला तर ही काठेवाडी माणस त्याला म्हणतील, ' केम तू हवे थाकी गयी छो ! हवे तने वधारी तकलिफ नही आपीश ! हवे अपने घेरे जईश ! ' काठेवाडी माणस आसूड शोभेसाठी किंवा केवळ वागवायचा म्हणून जवळ बाळगतील पण जनावराच्या पाठीवर तो सहसा उगारणार नाहीत जनावरांना अर्थातच माराच भय नसत ! त्यामुळ ती भरल्या पोटानी रेंगाळत रेंगाळत गोठ्याकडे परतत आहेत तेव्हा अशा या जनावराना लाल-पिवळे, निळेपारवे, झिरमिळी शेले फडकत असलेले पाहात गोठ्याची वाट दिसायला हवी ! अंधाराचा पगडा बसण्यापूर्वीच !

सूर्यास्ताची ही मावळत अगाची क्षितिजाभोवतालची नित्य नियमाची तरीही अनोखी शोभा पाहून तुमच्या मनात असेच विचारतरग उमटले असतील ना ? आकाशात पश्चिमेकडे फडकणारे लाल-पिवळे, निळे-पारवे झिरझिरित शेले पाहून तुम्हाला त्याच्याबद्दल असेच काहीतरी मनोमन वाटले असेल ना ! असा हा सूर्यास्ताचा देखावा बघून कुणाचही कविमन आवर्जून रुजी घालणार ! इकड सहा सव्वासहा वाजताच सूर्य अस्ताचलाला जातो याचही तुम्हाला नवल वाटत असणार ! सायकाळच्या या रगसगतीन प्रवासाची रंगतच वाढते ना ! अर्थातच अशा सायतेजाच कुणालाही अप्रूपच वाटणार !

तुमच्यापैकी काही जणाना ' चोहीहार ' करायचा असतो याची महेन्द्रभाईना कल्पना असते यामुळे त्यांच्या इशाऱ्यासरशी कालिया उठतो कालियाचे दुसरे दोन साथीदार त्याच्या मदतीला धावतात तीस पस्तीस प्रवाशाच्या या जथ्यात अवघ्या दोघांचाच ' चोहीहार ' असतो सूर्यास्तापूर्वी जेवण उरकावे असा जैनशास्त्राचा दडक आहे ! पुरातनकाली सूर्यास्तानतर पुरेशा प्रखर प्रकाशाची सुविधा उपलब्ध नव्हती पण त्या काळी, समयांच्या अधुऱ्या प्रकाशात भोजन करताना ताटात मच्छर वगैरे कीटक पडण्याची शक्यता असल्याने हा, सूर्यास्तापूर्वी जेवण उरकण्याचा, ' चोहीहार 'चा प्रघात रूढ झाला असावा त्या काळात अधार पडला की, माणस लवकर झोपी जायची भोजन आणि निद्रा यामध्ये आरोग्याच्या दृष्टीने किमान चारपाच घटका अतर असावे असे वैद्यकीय क्षेत्रातील जाणकार प्रतिपादतात रक्तदाबाच्या विकारवाल्यांनी यासाठी ' जैन व्हावे म्हणतात त्यात तथ्य व आरोग्यार्थही आहे ! पाडवाच्या वनवासकाळात सूर्याने पाडवांना दिलेली ' सूर्य स्थाली ' सूर्य असेतोच त्यांना अन्न देत होती पाडवाच्या आरोग्य



ग्रंथालय

रक्षणासाठी सूर्यास्तानंतर अन्न न देण्याचा दंडक सूर्यानेच त्याच्यावर घातला होता ही पुराणकथाही या दृष्टीने लक्षणीय व मननीय आहे। सूर्यास्तापूर्वी जेवण उरकण्याचा प्रघात सध्याच्या बदलत्या परिस्थितीत काटेकोरपणे पाळला जावा असे काहींना वाटत नाही हा भाग वेगळा। तीस पस्तीस प्रवाशाच्या 'धार्मिक' संघात 'चोहीहार'वाले दोघेच असावेत हे प्रमाण थोडे व्यस्तच। पण धार्मिक यात्रेला निघालेले सगळेच 'कर्मठ' असावेत व सनातन धर्माने आखून दिलेली आचारसंहिता त्यांनी प्रयत्नपूर्वक कटाक्षाने पाळावी असे थोडेच आहे। त्यांच्या मते धार्मिक यात्राही आनंदयात्रा किंवा स्वैरयात्रा असू शकते। तशी ती व्हावी अशी त्यांची अपेक्षा असते।.. रक्तदाबवाल्यानी 'जैन' व्हावे ही वैद्यकशास्त्राची अपेक्षा तर जैनांनी 'अजैन' व्हावे ही परिस्थितीची इच्छा! आहे की नाही गमत। ती जैनांनीच पाहाण्यासारखी आहे।

जैन धर्म हा सिद्धांत धर्म आहे। पूर्वसूरींनी त्यातील आचारविचाराना शास्त्रशुद्ध ज्ञानाची विचारपूर्वक जोड दिली असल्याने या धार्मिक संकल्पनाना शास्त्रीय बैठक आहे। जैन धर्म वैज्ञानिक सिद्धांताशी व बुद्धिवाद्याच्या संकल्पनाशी जुळणारा धर्म असून पंचवीसशे वर्षांपूर्वी भगवान महावीरानी आत्मज्ञानाच्या बळावर वायू, पाणी, अग्नी, वनस्पती यांच्यात जीव असल्याचे ठामपणे प्रतिपादले होते। पाणी नेहमी उकळून प्यावे, केवळ पाणीच नव्हे तर कच्चे दूधही उकळूनच प्यावे असा जैन धर्मात आदेश आहे अशाने जीवजंतूंची वाढ थोपवली जाते व हिंसेचे प्रमाण रोखले जाते अशी यामागची 'अहिंसक' विचारधारा असली तरी आरोग्याच्या दृष्टीनेही ते उपकारकच ठरते या व अशा अनेक सिद्धांताना अशी जी धार्मिक बैठक आहे ती शास्त्रशुद्ध म्हणूनच सैद्धांतिक अशीच आहे म्हणून जैन धर्म हा सिद्धांत धर्म आहे। जैनांचे उपवास हे 'एकादशी दुप्पट खाशी' अशा उपवासासारखे विरोधाभासी नसतात मुसलमानांच्या 'रोजा'हूनही जैनांचे उपवास खडतर असतात उपवासाने आत्मसंयम वाढतो, एवढेच नव्हे तर निग्रही आत्मसंयमाने आत्मिक बलही वाढते व प्रतिकूल परिस्थितीशी प्रखरपणे झगडण्याचे कणखर मनोधैर्य सुद्धा लाभते उपवासाची ही एवढीच फलनिष्पत्ती नसून आरोग्यदृष्ट्याही हे उपवास उपकारक व लाभदायक असतात या शास्त्रीय बैठकीवरही उपवास हा जैनांचा एक आचारधर्म बनला आहे

अशाच सैद्धांतिक मीमांसेतून 'चोहीहार'चा पूर्वापार परिपाठ आचरणाचा स्थायीभाव बनून राहिला असावा।.. काहीजण चातुर्मासात तेवढे 'चोहीहार'चे बंधन पाळतात, पण काही काही जण तर आणभाक घेऊन

या व्रताचे पालन बाराही महिने करतात बारा महिने 'चोहीहार' करणाऱ्या या व्रतींपैकी काही श्रद्धावान सूर्यास्तानंतर तोंडात पाण्याचा घोटदेखील घेत नाहीत। पुन्हा सूर्योदय होईपर्यंत तोंडसुद्धा धुवायचे नाही इतक्या कठोरपणाने हे 'पच्चखाण' म्हणजे 'व्रतपालनाची प्रतिज्ञा' घेऊन सकल्पित व्रत प्रतिज्ञापूर्वक पाळतात। एक अथवा अनेक 'निरकारी' म्हणजे अन्नपाणी सपूर्ण वर्ज्य करून किंवा केवळ पाणी पिऊन उपवास करावयाचे झाले तर, तसेच 'एकासन' आहारासाठी देखील असे 'पच्चखाण' घेतले जाते 'पच्चखाण' घेतले तरच व्रतपालनाचे पुण्य लाभते अशी समजूत आहे साधुसाध्वींच्या साक्षीने घेतलेले 'पच्चखाण' पक्की आण मानली जाऊन असे 'पच्चखाण' अधिक फलदायी व पुण्यदायी ठरते असाही समज आहे 'पच्चखाण' न घेता मनोनिग्रहाने केलेले व्रतपालन कमी फलदायी एवढेच नव्हे तर निष्फळ ठरते! 'अतिरेकी' केवळ राजकारणातच असतात असे नव्हे। तर हे धर्मकारणातही असतात।

चारचौघात उभे राहून 'पच्चखाण' घेण्यात जाहीर प्रकटनाचाच अधिक भाग असतो इतराहून काही वेगळे केल्याचा त्यामागे गर्वभावही असतो समाजाकडून मानवंदना मिळावी, मकरात बसायला मिळावे आणि घोड्यावरून अथवा हत्तीवरून वाजत्रीच्या ताफ्यात मिरवायला मिळावे हा हव्यासही असतो अशा हव्यासापायी महिना दोन महिन्यांची प्रदीर्घ उपोषणे केली जातात एक दिवस उपवास, एक दिवस एकासन असे वर्षतपही केले जाते अशा तऱ्हेच्या व्रतपालनात आचरणापेक्षा प्रदर्शनालाच अधिक महत्त्व दिले जाते ही तर शोकांतिका आहे। तरीही व्रतपालनाची उर्मी अशाही झाकळलेल्या अवस्थेत ओसरू नये असे टीकाकारांनाही वाटावे। 'समथिंग इज बेटर दॅन नथिंग' ही त्यामागची भूमिका असावी। यासाठी 'पच्चखाण' घेणारांनी अवश्य घ्यावे।

जैन आचार-विचाराचा प्रभाव असलेल्या पोरबंदर शहरात पुतलीबाच्या प्रेरणेने मोहनदास करमचंद गांधी यानी विलायतेला प्रयाण करण्यापूर्वी 'परदेशात मांसाशन, मदिरा प्राशन व परस्त्रीगमन करणार नाही' अशी जैनाचार्य बेचरजी महाराज याचेजवळ प्रतिज्ञा घेतली होती। ही प्रतिज्ञा एक 'पच्चखाण'च होते।

सूर्योदय झाल्यावर 'नवकार मत्र' म्हणून तोंड धुतात व 'नवकारशी' करतात म्हणजेच अन्न आणि पाणी ग्रहण करून 'पारणे' करतात। सूर्यशक्तीचा अन्नावर आरोग्यदायक प्रभाव पडतो या सिद्धांतास अतिप्राचीन जैन शासनाने हजारो वर्षांपूर्वी अशी मान्यता दिलेली आहे। असे हे 'शुद्धा-

चरण ' सकाळी जाग येताच, चूळ न भरता, 'बेड टी ' घेणाराना कितपत साधेल हे त्यांचे त्यानी प्रयोग करून पाहण्यास कसलीच हरकत नाही। हे तर त्यांना महान सकटच वाटणे सभवनीय! सूर्योदय ते सूर्यास्त या कालावधीतील अन्नग्रहण आरोग्यदायक हे सांगायला धन्वतरी कशाला! 'चोहीहार ' करण केव्हाही सुखकर आणि श्रेयस्कर हे समजून उमजूनही आजकालच्या धकाधकीच्या आणि भौतिक सुधारणाच्या काळात, विशेषत अणुयुगात कित्येक जैनसुद्धा या अतिप्राचीन धर्माचरणाचे पालन करीत नाहीत ही वस्तुस्थिती आहे! दिनचर्या आणि ऋतुचर्या याना मूठमाती देणाऱ्या युगात हे असेच घडत राहणार! पूर्वापार अनुभवावर आधारलेले पूर्वाचिरांचे मौलिक निकष बेपर्वाईने धाब्यावर बसवण्याने काय अनर्थ घडतो हे ढासळलेली प्रकृतीच सांगू शकते। ही सुस्थिती की दुःस्थिती हे ज्याचे त्याने ठरवावे अशी परिस्थिती मात्र आहे!

कालियाने दोन 'महाभागा 'ना खोलगट ताटल्यातून 'फरसाण 'चा कोरडा आहार पोटभर दिला ज्याचा 'चोहीहार ' नव्हता त्या सर्व लहान-थोरांना त्याने प्रत्येकी चार चार बिस्किटे दिली 'फ्रूट सलाड 'च भोजन उशिरा झालं होत, तरीही रात्री मुक्कामाच्या ठिकाणी भूक असेल तेवढा फराळ करण्याची इतरांना मुभा होतीच! .. 'रात्री भोजन वर्ज्य ' अशी ज्यांनी 'बाधा ' म्हणजे प्रतिज्ञा घेतली होती त्याची अशांना 'बाधा ' नव्हती 'बांधा ' नाहीच नाही। नाहीतरी, दुसऱ्याचे ऐकतो कोण!..

दिवेलागण होण्यापूर्वीच 'मधुमीलन ' राधनपूर शहरात महाराणीच्या दिमाखाने शिरत आहे गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यातील राधनपूर हे शहर जेसलमेर गांधीधाम या पधरा क्रमाकाच्या राष्ट्रीय हमरस्त्यावर असून गुजरात राज्यातील नव कांडला बदर येथून अवघ्या एकशे पचाणव किलोमीटर अतरावर, गांधीधामच्या निकट सानिध्यात आहे सस्थानी जमान्यात राधनपूरचा खूपच बोलबाला होता

या शहरात सस्थानी राजवटीत सोन्याचादीचे 'सट्टे ' मोठ्या प्रमाणावर चालत होते 'वायदे बाजार ' हे गुजराथ्यांच्या आर्थिक जगताचे प्रमुख अग समजले जाते 'सौदे ' घ्यायचे आणि द्यायचे अशा 'सटोडिया 'चे 'सटोडे म्हणजे नुसत्या आकड्यांचेच खेळ! जुगाराचाच हा एक प्रकार! शेवटी हा 'लिधा ' म्हणणाऱ्या 'बुल्स 'चा म्हणजे बैलांचा व 'आप्या ' म्हणणाऱ्या 'बेअर्स 'चा म्हणजे अस्वलांचा रानदाडगा खेळच! जो 'गब्बरसिंगां 'नीच खेळावा! येरा गबाळयांचा हा सुभा नव्हे! आर्थिक

आखाड्यातल्या या खेळीत लक्षाधीशाचा भिक्षाधीश व भिक्षाधीशाचा लक्षाधीश व्हायला वेळ लागत नाही! चुटकी वाजावी इतक्या अल्पावधीत द्रुतगतीने ही उलथापालथ व आलटापालट होत असते। मुंबईत आजकाल केवळ सोन्याचांदीच्या बाजारातच नव्हे, तर शेअर बाजारात, कॉटन एक्सचेंज-मध्ये, तेलबियांच्या मार्केटमध्ये अशा अनेक क्षेत्रामध्ये अशी 'दिली घेतली' तेजीमंदी दिवसाकाठी अनेकदा होत असते आणि या 'हरीफाई'त कुणाचे नशीब फळते तर कुणाचे फुटते! दैवाचे हे फुटणे म्हणजे कपाळमोक्षच ठरत असतो! तेजीवाल्यांचा 'सीधो गाळो' आणि मंदीवाल्याचा 'ऊधो-गाळो' कधी उखळ पांढरे करतो, तर कधी डोळे! 'सीधो' म्हणजे सुलटे तर ऊधो' म्हणजे उलटे! उलटेपालटे होण्याने डोळे पांढरेच होणार! हे असले 'पद्मरोगी' 'शीर्षासन' तसे महागडे आणि अंगी न लागणारे म्हणून अपायकारकही ठरते! अशा देवघेवीच्या व्यवहाराबरच उभ्या राहिलेल्या 'स्टॉक एक्सचेंज'ला तर शासकीय मान्यता असते अशाने आर्थिक प्रगती साधते की अधोगती होते हे अर्थतज्ज्ञच जाणोत! आर्थिक विषमतेला ही जन्म देते हे तिचे करटेपण मात्र कोणीच नाकारू शकणार नाही!

राधनपूर एका जमान्यात सट्टा व्यवहाराचे 'आधणपूर' होते! राधन-पूरची, एके काळी, या 'सटोड्या' मुळे, चलती असावी असे येथील पेठेच्या मांडणीवरून तुमच्या निदर्शनास येईल! . बाजारपेठेत मोठ्या गाळ्यांची आणि आधुनिक आकर्षक दुकाने फारच विरळी आहेत एकास एक चिकटून छोटेछोटे गाळे मात्र या शहरातल्या बाजारपेठेत दिसतात 'सटोडियां'ना बसायला एवढी जागा बस असते! माल थोडाच पदरी बाळगायचा असतो? केवळ तेजीवाल्याचा 'सीधा गाळा' व मंदीवाल्यांचा 'ऊंधा गाळा' घ्यायचा असतो व 'लिधा-आप्या ची भाषा बोलायची असते! त्यासाठी एखादी पेटी, एखादे कपाट अथवा तिजोरी एवढ्या वस्तू पुऱ्या असतात त्यासाठी एवढीशी जागा पुरते! 'लिधा 'आप्या' याच्या 'सीधा गाळा' व 'ऊधा गाळा' यासाठी एवढा 'गाळा' पुरे!

गाडीतून उतरताच तुमच्या भोवती याही शहरात भिकाऱ्यांचे कोंडाळे पडते यात मुलामुलींचाच भरणा अधिक असतो क्षणभर तुम्ही चक्रावून जाता! गुजरात राज्य आता काही मागासलेल्या राज्यांत जमा नाही. आनंद येथील जगविख्यात दुग्धव्यवसाय, वापीची अवाढव्य औद्योगिक वसाहत, गांधी नगरसारखी सर्व सुखसोयींनी सुसज्ज अशी अद्ययावत राजधानी, कांडलासारखे नवे बंदर, सुरत, बडोदा, विरमगाम, अहमदाबाद,

जुनागड, जामनगर, भडोच, भावनगर, हिंमतनगर, मेहसाणा, राजकोट, बलसाड, सुरेन्द्रनगर, गोध्रासारखी गजबजलेली व्यापारी शहरे असे गुजरातचे विविधांगी वैभव असताना या राज्यात गावोगावी भिकाऱ्याचा गराडा प्रकर्षाने पडावा याचेच कुणालाही आश्चर्यजन्य व उद्वेगजन्य कोडे पडावे। जेवढे राज्य आर्थिकदृष्ट्या प्रगत तेवढी विषमता व दरिद्रता अधिक असते का या व्यस्त विचाराने तुम्हीही काही क्षण व्यस्त व त्रस्त होता। भारताच्या फाळणीनतर स्वातत्र्योत्तर कालात सिंध व पजाब प्रांतातून तसेच बगालमधून निर्वासितांचा प्रचड लोंढा भारतात आला होता. गुजरातच्या शेजारील प्रदेशातील परिस्थितीने नागवले गेलेले हे लोक रस्त्यातून भीक मागत असल्याचे तुमच्या आढळात कधीच आलेले नसते त्यामुळे येथील भिकाऱ्याचे तुमच्या भोवती पडणारे कडे यासाठीच तुम्हास कोड्यात टाकते। गाधीच्या गुजरातेतील ही विसंगती तुम्हास काही वेळ विषण्ण करते। गुजरातच्या मानाने महाराष्ट्र आर्थिकदृष्ट्या कमकुवत असूनही महाराष्ट्रात भीक मागणाराचे प्रमाण गुजरातइतके आढळत नाही. याचे कारण मराठी माणूस तुलनेने अधिक स्वाभिमानी आहे हेच असावे ! त्यातले त्यात समाधान इतकेच की गुजराथी माणसात अशी लाचारी आढळत असली तरी परिस्थितीच्या चक्री झझावातात उद्ध्वस्त झालेल्या सिंधी अथवा पजाबी माणसातली व्यभिचारी प्रवृत्ती गुजराथ्यात तुलनेने कमी सापडते

सोन्या-चादीच्या वायदे व्यवहारात येथील सट्टेबाजाना भरपूर कमाई झाली असावी म्हणूनच या विशेष प्राप्तीतून या शहरात अनेक मंदिरे उभारली गेली असावीत। श्वेतांबर मूर्तिपूजक जैनाचीच येथे जवळजवळ पचवीस मदिरे आहेत मदिराबरोबर ज्ञानमदिरेही आहेत की ज्या ठिकाणी चित्रकला, गुरुवचने आदिद्वारा धार्मिक प्रबोधन होऊ शकते राधनपूर हे 'महातीर्थ' अथवा 'अतिशयतीर्थ' नसतानाही श्री शखेश्वर महातीर्थाच्या पचतीर्थातील एक सामान्य तीर्थग्रामी इतकी विपुल मंदिरे असावीत हे विशेषच म्हणावे लागेल

राधनपूरच्या चिंतामणीनी शेरी ' मधील चिंतामणी पार्श्वनाथाचे 'बावन्न जिनालये मदिर' या सर्व मदिरांतील मुकुटमणी आहे। गुजराती भाषेत गल्ली किंवा पेठ या अर्थी 'शेरी' हा शब्द वापरला जातो तेवीसावे तीर्थंकर पार्श्वनाथ याची एकशेआठ विशेष नावे आहेत त्यापैकी एक नाव 'चिंतामणी पार्श्वनाथ असे आहे।

राधनपूरच्या या मदिराची तुलना चौदाशे चव्वेचाळीस स्तभांच्या अद्वि-

तीय राणकपूर मंदिराशी होऊच शकत नाही, तरीही हे सुमारे तीसबत्तीस खांबाचे मंदिर राणकपूरच्या 'धरण विहार' मंदिराची क्षणभर आठवण करून देते राणकपूर व राधनपूर या नावातील अनुप्रासामुळे कदाचित ही स्मृती जागवली जात असेल! 'आबूची कोरणी आणि राणकपूरची मांडणी' या वाक्प्रचाराने राजस्तानातील आबू पहाडावरील 'विमल वसही' व राणकपूरचे 'नलिनी गुल्म देव विमाना सम असलेले 'धरण विहार' ही मंदिरे अजरामर ठरवली आहेत तरीसुद्धा आबू येथील विमल वसहीच्या कोरीव कामाची किंचितशी झलक राधनपूर येथील चिंतामणी पार्श्वनाथाच्या मंदिरात आढळते या मंदिरातील मध्यवर्ती स्तंभावरचे कोरीव सोनेरी वर्ख-काम रात्रीच्या विजेरी प्रकाशात झळाळत असलेले बघताना तुमचेही मन काही क्षण झगमगून निघेल!...कोरीव कातीव सुवर्ण स्तंभावरील परा-वर्तित प्रकाश किरण तुमच्या अंतःकरणाचे दर्पणही उजळून टाकतील!... श्री कल्याण पार्श्वनाथ या मंदिरातील स्तंभावरचे बिलोरीकाम देखील उठाव-दार व नक्षीदार असल्याने तेही तुमच्या काळजाला भिडून अधिक उजाळा देईल!

या भागातील बहुतेक मंदिरे एखाद्या बंदिस्त वाड्यात अगर कोटाच्या भिंतीआड लपलेली असल्याने तेथील भव्यतेचे व ह्या भव्यतेमधल्या दिव्य-तेचे खरेखुरे दर्शन अंतरंगात गेल्यानंतरच घडते आणि मग अंतर्मन हरकून जाते!

महाराष्ट्राच्या अकोला जिल्ह्यातील शिरपूर गावच्या श्री अंतरिक्ष पार्श्व-नाथ मंदिराच्या संदर्भातील कटकटी आणि अडथळे दूर करण्यासाठी अहर्निश झटणारे आचार्य श्री चंद्रशेखर महाराजसाहेब पूर्वाश्रमीचे या गावचे हे सम-जल्यावर या गावाबद्दल एक आगळी जवळीक काहींच्या मनात निर्माण होते काहींच्या मनातील या ओलाव्यासह तुम्ही राधनपूर सोडून पुढील प्रवासा-साठी निघता! .

या पूर्वीच दिवस मावळलेला असतो आणि आकाशगंगेच्या धूसर निळ्या लोढ्यांनी क्षितिजालगतच्या लाल ज्योताना क्षितिजापलीकडे हाकलून दिलेले असते! या झटापटीत श्रांतभ्रांत झालेल धूसर निळे लोंढे काळे पडून आकाशालाही काजळून टाकतात जणू, एक तर ज्वालामुखीचा लाल रस थंड होऊन खाली बसलेला असतो व थंडावलेल्या रसाचा काळा कुळकुळीत लोह होऊन काळा धूसर रंग आभाळात सर्वत्र पसरला जातो, किंवा हजार जिभल्याचा अग्नी विझून थंडावलेला असतो व काळीधूसर राख आकाशात

सा...४

सगळीकडेच विखुरली जाते। अशा वेळी इथला सभोवतालचा निर्जल निर्जन प्रदेश भकास वैराण भासू लागतो ना सुपीक ना नापीक असा हा भूभाग कच्छच्या रणाची चाहूल देतो।

रस्त्याच्या कडेने झाडेझुडपेही विरळ आणि तुरळक जी थोडी झाडी अधून मधून रस्त्याच्या दुतर्फा दृष्टोत्पत्तीस पडते ती ठेंगण्या बाभळीची असते इकडे पर्जन्याचे प्रमाणही जेमतेम म्हणजेच कमी। पण इतर राज्यां-तून पाण्याचा फुगवटा घऊन येणाऱ्या नद्या रोंरावत घोंगावत गुजरात राज्यात येतात व आपल्या बेताल पदन्यासाने त्या वारवार गुजरातला तडाखा देऊन मोर्वीसारखी शहरे धुऊन नेतात। गुजरातच्या उत्तर सीमेलग-तचे कच्छचे रणरणते रण या ओल्या आपत्तीपासून मुक्त असले तरी प्राणी-मात्राच्या जीवनाचा पालापाचोळा दिगतापर्यंत भिरकावून देणाऱ्या प्रक्षोभक चक्री वावटळी त्याच्या जणू पाचवीला पूजलेल्या असतात !

हवेतला गारवा किंचित तुम्हाला जाणवू लागतो झपाट्याने तापणारी जमीन तितक्याच वेगाने निवत असते त्यामुळे कच्छच्या रणातील थडीने तुम्हास चांगलीच हुडहुडी भरेल अशी आधीच तुमची समजूत झालेली असते पण आता थडीची शिरशिरी एवढी बोचरी नसल्याने तुम्हास हायसे वाटते आहे हवेतला हा माफक गारठा प्रवासात शिणवटा येऊ न देता उलट तो तुम्हास उल्हसित ठेवीत आहे हे प्रेयस आणि श्रेयस म्हणावयाचे।

रात्रीचे दहा वाजायला आलेले आहेत दूर क्षितिजाला भिडलेली विजेच्या दिव्याची लांबलचक अर्धवर्तुळाकार राग दिसायला लागली आहे। रुपेरी ठिपक्याची ही अर्धगोलाकार रेषा म्हणजे तुमच्या स्वागतासाठी क्षितिजालगत कोणी तरी रुपेरी तोरण बांधले असावे असा क्षणभर गोड भास होतो आहे। टपोऱ्या पाणीदार मोत्याचा कंठा घालून कुणी तरी तुम्हास सामोरे येत असावे असाही काही वेळ आभास होतो आहे।

हे काय! मघाशी दिसणारी ती दिव्यांची वाटोळी राग आता गेली कुठे? तोरणातल्या त्या रुपेरी हड्या आता एका रेषेत दिसत नाहीत! कंठ्यातील मोती गळून ते जागजागी विखुरल्यासारखे दिसताहेत। अरे वा! ही तर कुठल्याशा शहरातील दिव्याची रोषणाई आहे। गांधी-धामच आलं की! हे गांधीधाम शहरातले दिवे आहेत।

गांधीधामच्या पहिल्याच मोठ्या चौकाजवळच्या पटांगणावर मालट्रकचे ताफे उभे आहेत याच भव्य मैदानावर अतिथिगृहाच्या समोरच सरदार वल्लभभाई पटेलाचा पूर्णाकृती पुतळा भव्य चौथऱ्यावर निश्चल उभा आहे आपल्या ध्येयधोरणात असाच सदैव निश्चल राहाणारा हा गुजरातचा

'पोलादी पुरुष ' केवळ गुजरातचाच नव्हे तर संपूर्ण देशाचा मानबिंदू आहे! गुजराथी माणसाची अंतःकरणे जिंकलेला हा बार्डोली सत्याग्रहातला सरदार गुजरातचा मानदंड आहे! भारतीय काँग्रेसचा एकेकाळचा जबरदस्त आधारस्तंभ! स्वातंत्र्यपूर्व काळात पक्षांतर्गत लोकशाहीच्या प्रतिष्ठेसाठी पुरुषोत्तमदास टंडन यांना काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून बहुमताने निवडून आणून पंडित जवाहरलाल नेहरूंच्या व्यक्तिगत वर्चस्वाला आव्हान देणारा पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक प्रदेश काँग्रेस समित्या पाठीशी असूनही व पंतप्रधानकीची संधी सहजासहजी चालून आली असतानाही दूरदृष्टीने, स्वेच्छेने व निःस्वार्थपणाने पंडित नेहरूंच्या महामंत्री पदासाठी खंबीरपणाने पुरस्कार करणारा, ध्येयधोरणात वज्राहून कठोर पण सहकाऱ्याशी मेणाहून मऊ असा हा लाखातला एक नेता! दोनच महिन्यांपूर्वी एकतीस ऑक्टोबर रोजी यांची जयंती साजरी झाली हा 'जयंती महोत्सव' त्यांच्या जन्मभूमीत 'किती आत्मीयते'ने 'साजरा' होतो हे पाहण्याची संधी तुम्हास लाभली नाही तरी हेही दर्शन काही सामान्य नव्हे एका रात्रीत भारतातल्या बहुसंख्य संस्थानांचे भारतात विलिनीकरण करवून घेऊन या महापुरुषाने या देशावर अनंत उपकार करून ठेवले आहेत! अशा महापुरुषाची जन्मभूमी गुजरात, या गुर्जरभूमीने यांना जागजागी असे अजरामर करून ठेवलेले आहे! आनंदचा दुग्धव्यवसाय, आनंदचे गुजरात विद्यापीठ ही या पोलादी पुरुषाची जिवंत आणि ज्वलंत स्मारके आहेत! आनंद विद्यापीठाच्या परिसरात सरदारासाठी छोटीशी बंगली उभारली गेली होती जिचा उपभोग या, निःस्पृह पुरुषाने वैयक्तिक सुखासाठी कधीच करवून घेतला नव्हता! निरीच्छेतचा हा असा दुर्लभ आदर्श आज शोधूनही सापडू शकणार नाही! असे हे भारतीय उन्नत जीवन की ज्यापुढे पाहताक्षणी कुणीही सादर विनम्र व्हावे! 'जिसका संकल्प और समारंभ पुण्यगर्भी होता है, जो वीर है पर दयालू है, जो कृतबुद्धि और दृढव्रत है, जो गुणवान और अपरिग्रही होते हुये भी दुसरोंकी त्रुटियो की उपेक्षा करता है, जिसका रोष और तोष निष्फळ नही होता ऐसे जगवल्लभ वल्लभ!' असे भारताचे शिल्पकार वल्लभभाई पटेल यांचे असंख्य भारतीय नेत्यांनी केलेले गुणगान येथील कण न् कण अहोरात्र गात आहे असेच कोणालाही हे शिल्प पाहून वाटावे!

रातराणीचा गंध आसमंत व्यापून राहावा तद्वत सरदाराच्या स्फूर्तिदायक जीवनातील असंख्य आठवणींचा सुगंध दरवळत असतानाच गांधीधामच्या दुसऱ्या टोकावरचे उदयनगर मागे पडते नजीकच्या कांडला बंदरावरील दिव्यांचा चमचमाट बघत असतानाच तुमची दृष्टी विरुद्ध दिशेला वळून कच्छ भद्रेश्वरचा वेध घेऊ लागते!

# पाच

" मुनीमजी, दिल्लीच्या बादशहांनी आम्हांस खलिता पाठवून धान्याची मागणी केलेली आहे आमच्याकडून त्यांना किती धान्य मिळाव अशी त्यांची अपेक्षा आहे ? "

उच्चासनावर लोडाला रेलून बसलेल्या निमगोऱ्या व्यक्तीन विचारणा केली होती या व्यक्तीची मुद्रा भारदस्त आणि धीरगभीर दिसत होती वयाची पन्नाशी गाठलेली होती, तरीही मुद्रेवरची तकतकी ओसरली नव्हती शरीरयष्टी सुदृढ आणि बाधेसूद होती डोक्यावर सफेद रगाची पिळदार चक्री पगडी आणि अगात लाब बाह्यांचा पांढराशुभ्र लांबलचक घेरदार अगरखा होता घोळदार अगरख्याचा वरचा निमुळता भाग बदानी छातीला घट्ट बाधल्याने भरदार छाती उठून दिसत होती अगरख्याच्या खालच्या चुणीदार गोलाईतून पायघोळ धोतराच्या निऱ्या डोकावत होत्या ही व्यक्ती कोणी घरदाज असावी असे या व्यक्तीच्या ऐटबाज बैठकीवरून आणि रुबाबदार पोषाखावरून उघड होत होते

पुढचात उभ्या असलेल्या व्यक्तीला उद्देशून या व्यक्तीने विचारणा केली होती, त्यावरून उभी असलेली व्यक्ती मुनीमजी होती मुनीमजी थोडे वयस्क होते हे त्याच्या सुरकतलेल्या चेहऱ्यावरून स्पष्ट होत होते

" एक कोट मण धान्य मिळावं अशी बादशहांनी याचना केली आहे, श्रेष्ठीवर ! . ." मुनिमजीनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर अदबीने दिले होते

" तर मग त्यांचेकडे एक कोट मण धान्य ताबडतोब पाठवून द्या– " श्रेष्ठीवरानी आज्ञा केली होती मुनीमजीना या आदेशाचे आश्चर्य वाटले होते क्षणभर स्तिमित होऊन ते श्रेष्ठींकडे पाहत राहिले होते

" बादशहांच्या मागणीप्रमाणे एक कोट मण धान्य पाठवाच पण आणखी पाच लाख मण धान्य जादा पाठवा ! " श्रेष्ठीच्या या अधिक पुरस्काराने

मुनीमजीना आणखी जास्त धक्का बसला होता मनात थोडीशी खळबळ उडाली होती ती व्यक्त करावी की नको असा काही क्षण सभ्रम निर्माण झाला होता सेवकाने पायरी सांभाळून वागावे असे वाटत असतानाही मुनीमजी बिचकत बिचकत मर्यादारेषा ओलाडून नम्रतेने म्हणाले होते," श्रेष्ठीवर, दिल्लीचा बादशहा गुलाम नासिरुद्दीन याने थरकापरच्या राजास आपणाविरुद्ध चिथावले होते दिल्लीच्या बादशहाची फूस मिळताच पीठदेवाने आपल्या भद्रावतीवर हल्ला चढविला होता या गोष्टीला अद्याप फार दिवस झालेले नाहीत, श्रेष्ठीवर। साधर्मी राजाकडून भद्रावतीचा पाडाव करण्यामागे एक ना एक दिवस भद्रावती गिळकृत करण्याचा बादशहाचा मनसुबा असावा। भद्रावतीवर कोसळलेले हे सकट कोणासही सहजासहजी विसरता येणार नाही। असे असताना आपण बादशहाला मदत करायला उत्सुक असावे "

श्रेष्ठीवराच्या मुद्रेवरचे भाव न्याहाळीत असतानाच आपले निवेदन श्रेष्ठीना रुचले नसावे ही गोष्ट अनुभवी मुनीमजींच्या लक्षात आली होती. ते बोलता बोलताच ओशाळून एवढ्यावरच थांबले होते

मुनीमजींच्या बोलण्यातला आशय ओळखून श्रेष्ठीवर म्हणाले होते, " मुनीमजी, मुसलमान राजानीच हिंदू राजावर स्वाऱ्या केल्या असे नसून हिंदू राजेही एकमेकांत झगडले आहेत तसेच मुसलमान राजेही आपापसात लढले आहेत सत्तास्पर्धा किंवा सत्तातृष्णा धर्मातीत असते हेच इतिहास सागतो तेव्हा श्रेय किंवा प्रेय यांचा सघर्ष होऊ न देता आपण परहितदक्ष असावयास हवे। मुनीमजी, दिल्लीच्या बादशहाने पीठदेवाला आमच्यावर स्वारी करण्यासाठी प्रोत्साहन दिले होते म्हणून का आम्ही या गोष्टीचा सूड घेण्याकरिता त्याच्या प्रजेला भूकबळी होऊ द्यायचे ? आमचे दिल्लीच्या बादशहाशी भांडण थोडेच आहे. -आणि थरकापरच्या पीठदेवाचा पाठीराखा म्हणून जरी दिल्लीचा बादशहा आमचा शत्रू असला तरी दिल्लीची निष्पाप निरपराध जनता आमची शत्रू नाही। दुष्काळाने लागोपाठ तीन वर्षे सर्व भरतखडात थैमान घातले असताना आणि लाखो जीव अन्नावाचून तडफडत असताना आम्ही दिल्लीपतीवर आकस धरून तेथील प्रजेची ससेहोलपट करावयाची हा आमचा धर्म नाही, मुनीमजी "

त्यावर मुनीमजी विनयाने म्हणाले होते, "प्रमादाबद्दल क्षमा असावी, श्रेष्ठीवर " पण त्या आर्जवाकडे श्रेष्ठींचे लक्ष नव्हते ते सहिष्णुतेने सांगत होते, " ज्योतिष विशारद आचार्य परमदेवसूरीश्वरजींच्या अचूक भविष्यकथनाने आम्हाला या भयानक दुष्काळाचा पूर्वसकेत मिळाला होता त्यांनी

इशारा देऊन आम्हास वेळीच सावध केले नसते तर लाखो प्रजाजनाना बहुमोल प्राण मुकावे लागले असते आमच्यावर आचार्यश्रीची कृपा झाली म्हणूनच आम्ही मिळेल तिकडून कोट्यावधी मण धान्य गोळा करू शकलो होतो धान्याची शेकडो गुदामे आम्ही प्रसंगाचं गांभीर्य ओळखून भरली ती केवळ दुष्काळग्रस्तांचे प्राण वाचवण्यासाठी क्षमा हे वीराचं आणि दान हे धनवानाचं परम लक्षण आहे ही थोर शिकवण आमच्या पिताश्रींची होती आम्ही पुरते वीस वर्षांचे झालो नसताना पिताजींचे छत्र नाहीसे झाले होते त्या धर्मात्म्याच्या पुण्याईनेच आम्ही सपन्नता मिळवू शकलो ही सपन्नता अडल्या-नडलेल्यांच्या कारणी लागावी हीच त्या पुण्यशील आत्म्याची अतृप्त इच्छा होती दिल्लीचे प्रजाजन अन्नान्न करून तडफडत असताना आम्ही दिल्लीच्या बादशहाला धडा शिकवण्याचा अट्टाहास धरला तर आमच्या पिताजीच्या आत्म्याला शांती लाभणार नाही, मुनीमजी "

श्रेष्ठीच्या या विस्तृत समर्थनावर मुनीमजी अधिकच शरमिंदे झाले होते. ते जागच्या जागीच खिळून नि:स्तब्ध उभे राहिले होते

थोड्याच वेळापूर्वी मुनीमजींनी ज्या सकटाचा उल्लेख बोलण्याच्या ओघात केला होता तें सकट सहजासहजी विसरण्यासारखे नव्हते तो प्रसग अगदी नव्याने ताजेपणाने घडल्यासारखा यावेळी श्रेष्ठींना आठवला होता

थरकापरचा राजा पीठदेव याने द्वेषाग्नीने भडकून भद्रावतीवर अचानक चाल केली होती भद्रावतीच्या श्रेष्ठींचे वैभव त्याला बघवत नव्हते एकट्या सौराष्ट्रात नव्हे तर भरतखडात व परदेशातही भद्रावतीचा व तेथील श्रेष्ठीचा खूपच नावलौकिक होता भद्रावतीच्या श्रेष्ठींचा व्यापारच तेवढा अवाढव्य नव्हता तर स्वसरक्षणासाठी त्यांचं स्वत:च सुसज्ज सैनिक-दलही होत. थरकापरच्या पीठदेवाने हल्ला करताच या स्वामीनिष्ठ सैनिक-दलान प्रयत्नाची पराकाष्ठा करून पीठदेवाच्या सैन्याचा जोरदार प्रतिकार केला होता पीठदेवाच सैन्य जीव मुठीत घेऊन परतल्यानतर झालेल्या अप-मानाचे उट्टे काढण्यासाठी पीठदेवाने पुनश्च भद्रावतीवर प्रचड सेनेसह स्वारी करण्याचा निर्धार केला होता पीठदेव सर्व शक्तिनिशी पुन्हा चालून आला तर आपला निभाव लागणार नाही हे ओळखून दूरदर्शी श्रेष्ठींनी धोलकाधीश महाराजा वीरधवल याचेकडे मदतीचा प्रस्ताव मांडला होता महाराजा वीरधवल याचे मत्री वस्तुपाल आणि तेजपाल याच्या अत:करणात खोलवर भद्रावतीच्या श्रेष्ठीबद्दल आदरभाव होता म्हणूनच त्यानी भद्रा-वतीच्या श्रेष्ठीवराना मदत करण्याचे अभिवचन दिले होते पण केवळ या मदतीवर भिस्त न ठेवता श्रेष्ठींनी भद्रावतीभोवतालचा जागोजागी कोस-

ळलेला तट डागडुजी करून भक्कम बांधण्याचा निर्धार केला होता श्रेष्ठींनी ह्या कामास सुरुवात केल्याची वार्ता गुप्तचराद्वारा पीठदेवाच्या कानी जाताच पीठदेवाने श्रेष्ठींना एक तातडीचा सदेश पाठवला होता 'तुम्ही तट बांधता आहात असे समजते पण एवढा मोठा तट बांधणे तुमच्या-सारख्या वाणियाचे काम नव्हे! जर गाढवाच्या डोक्यावर शिंगे उगवण्याचा चमत्कार घडू शकत असेल तरच तुम्ही तट बांधू शकाल'

हा उर्मट सदेश पाठविण्याची हिम्मत पीठदेवास दिल्लीपती गुलाम नासिरुद्दीनच्या उत्तेजनानेच झाली होती व नासिरुद्दीनच्या सामर्थ्यावरच पीठदेव अरेरावी करून उड्या मारीत होता श्रेष्ठी हे ओळखून होते, पण पीठदेवाच्या या धमकीला भीक न घालता श्रेष्ठींनी भद्रावतीभोवती अभेद्य तट बांधला होता व त्या तटाच्या प्रवेशद्वारावर दगडाचेच गाढव घडवून त्याला पीठदेवाचा तोंडवळा दिला होता एवढेच नव्हे तर या गाढवाच्या डोक्यावर सोन्याची दोन शिंगेही बसवली होती ही धक्कादायक वार्ता कानी येताच पीठदेवाला मेल्याहून मेल्यासारखे झाले होते वस्तुपाल-तेजपालसारखे धुरधर मत्री व महाराजा वीरधवल याचे प्रचड सैन्य श्रेष्ठींच्या पाठीशी आहे हे समजून पीठदेवाने भद्रावतीवर हल्ला करण्याचा घातकी विचार धूर्तपणे सोडून दिला होता आपलाच डाव आपल्यावर उलटू नये या विचा-राने त्याने भद्रावतीच्या श्रेष्ठीवराकडे शातिदूत पाठवून सख्य घडवून आणले होते व भद्रावतीच्या तटातील प्रवेशद्वारावरचे गाढव काढून टाकण्यासाठी श्रेष्ठींना नम्रतेने आवाहनही केले होते शरणार्थीच्या इच्छेला मान देऊन श्रेष्ठींनी वेशीवरचे गाढव दूर केले होते

श्रेष्ठीवर काही भद्रावतीचे राजे नव्हते, पण राजेरजवाड्यांनीही त्यांच्या-पुढे नमते घ्यावे अशी त्यांची प्रतिष्ठा होती यामुळेच थरकापरचा राजा पीठदेव याचा थरकाप उडाला होता हा प्रसग आठवताच श्रेष्ठी मुनीमजींना म्हणाले होते, "ज्याने हेतूपुरस्सर आमची आगळीक केली त्या पीठदेवाची धान्यासाठी मागणी असेल तर थरकापरलाही धान्य पाठवा, मुनीमजी" एवढे सागून श्रेष्ठी थाबले नव्हते ते आणखी म्हणाले होते, "माळव्याचे राजे मदनवर्मा, गुजरातचे महाराजा वीसलदेव, सिंधचे राजे हमीरदेव, काशीपती प्रतापसिंह राजे, मेवाड कधार.. यांच्याकडेही धान्य पाठवा कोणालाही चुकवू नका मुनीमजी. . प्रसग मोठा बाका आहे! तेव्हा हा शत्रू, तो मित्र असा भेदभाव करून जनतेची कुचबणा करू नका! कोणा-कडूनही लाभांशाची अपेक्षा न करता शिघ्रतेने सगळ्या गरजवताकडे धान्य रवाना करा!'

'हात उसके भी हुए होंगे यकीनन अखमी   जिसने काटे मेरी राहो में बिछाये होंगे' असे काहीसे श्रेष्ठी सुचवीत आहेत असाच साक्षात्कार मुनीमजीना श्रेष्ठींच्या प्रतिपादनातून झाला होता !

श्रेष्ठीच्या उदार अंत:करणाचा हा उद्रेक पाहून मुनीमजी जास्तच खजील झाले होते. 'जशी आपली आज्ञा' असे विनम्रपणे आणि हर्षभराने सांगून ते श्रेष्ठीच्या आदेशाचे पालन करण्यासाठी निघून गेले होते

श्रेष्ठी मुनीमजींच्या पाठमोऱ्या आकृतीकडे काही वेळ बघत राहिले होते मुनीमजींची मूर्ती चर्मचक्षूआड कधीच झाली होती तरीही ती त्याच्या अंत-श्चक्षूपुढे बराच वेळ रेंगाळत राहिली होती   भूतकाळातल्या एका प्रसगाने ती मूर्ती काही वेळ जागच्या जागी खिळवून टाकली होती !

इराणातल्या होर्मेज बंदरात श्रेष्ठीची पेढी होती या पेढीच्या नव्या वास्तूसाठी मुनीमजींनी पायाचे खोदकाम चालू केले असता जमिनीतून एक देखणा दगड त्यांच्या दृष्टीस पडला होता श्रेष्ठीच्या जागेशेजारीच इराणी मुसलमानाचे गुदाम होते त्या व्यापाऱ्यास जमिनीतून निघालेल्या असामान्य दगडाची बातमी लागताच तो दगड आपल्याच मालकीचा आहे असा कांगावा करून त्या मुसलमान व्यापाऱ्याने श्रेष्ठींच्या मुनीमजीबरोबर तडायला सुरुवात केली होती हमरीतुमरीचे हे भाडण इराणच्या शहापर्यंत जाऊन पोचले होते इराणच्या शहाला मुसलमान व्यापाऱ्याची बाजू उचलून धरता आली असती पण शहाने तसे न करता त्या दगडाचे मोल जो देईल त्याला तो दगड मिळेल असा निर्वाळा दिला होता शहाच्या निवाड्याप्रमाणे दगडासाठी बोली सुरू झाली होती बोली वाढता वाढता खूपच वाढली होती मुनीमजींनी हा प्रश्न श्रेष्ठीच्या प्रतिष्ठेचा मानला होता व जास्तीत जास्त बोली बोलून तो वादग्रस्त दगड तीन लाख 'दिनार' देऊन हस्तगत केला होता

मुनीमजी हा विचित्र दगड घेऊन जेव्हा मायदेशी भद्रावतीला परतले होते तेव्हा ते श्रेष्ठीवराना सकोचाने व भीतीने म्हणाले होते, "आपली पूर्व-मान्यता न घेता मी आपल्या नावलौकिकासाठी तीन लाख दिनार देऊन हा दगड मिळविला आहे असे मी आततायीपणाने करण्याने जर काही चूक झाली असेल तर श्रेष्ठीवरानी मला अवश्य शिक्षा करावी.."

मुनीमजींच्या विनम्र निवेदनावर श्रेष्ठी शातपणे म्हणाले होते, "मुनीमजी, आमच्या प्रतिष्ठेचे तुम्हास मोल वाटले यातच आम्हास समाधान वाटते. तुम्ही माघार घेतली असती तर परदेशात आमची नाचक्की झाली असती तुम्ही इराणमध्ये आमची व भद्रावतीची मान उच केली आहे ! यासाठी आम्ही तुमचा गौरवच केला पाहिजे !" एवढे सांगून श्रेष्ठींनी मुनीमजींना

मोत्याचा कंठा व मानाची भरजरी पगडी दिली होती ।

मुनीमजींनी तीन लाख दिनार देऊन जो दगड इराणमधून आणला होता तो दगड सामान्य नव्हता. रत्नपारख्यांनी तो भव्य मौल्यवान हिरा असल्याचे सांगितले होते. श्रेष्ठींनी त्यातून अनेक हिरे काढून घेऊन त्यांची विक्री इराणातच केली होती व त्या विक्रीतून त्यांच्या हाती दहा लाख दिनार आले होते. अशी ही भाग्याने मिळालेली संपत्ती गोरगरिबांच्या कारणी लागावी अशी श्रेष्ठींची तळमळ होती. अशा भाग्यलक्ष्मीतून व व्यापारात मिळवलेल्या धनश्रीतून श्रेष्ठींनी जागजागी असंख्य अन्नछत्रे सुरू केली होती.

भूतकाळातला हा रोमहर्षक प्रसंग आठवताच त्याच मुनीमजींना भद्रावतीच्या प्रतिष्ठेचा विसर पडावा याचे श्रेष्ठींना सखेद आश्चर्य वाटले होते. मुनीमजींची चूक मुनीमजींच्या लक्षात वेळीच आली होती ही समाधानाची गोष्ट होती. म्हणूनच ते कर्तव्यबुद्धीने आणि आनंदी वृत्तीने श्रेष्ठींच्या आदेशाचे पालन करण्यासाठी निघून गेले होते. श्रेष्ठींच्या इच्छेप्रमाणे त्यांनी कर्तव्याचे पालनही चोखपणे तत्परतेने केले होते !

भद्रावतीच्या श्रेष्ठींकडून धान्याच्या गाड्या दिल्लीत येऊन पोचल्याची वर्दी मिळताच बादशहा नासिरुद्दीन बेहद्द खूष झाला होता. पूर्वकृत्याबद्दल पस्तावून नासिरुद्दीनने उतराई होण्यासाठी भद्रावतीच्या श्रेष्ठींकडे खलिता पाठविला होता व त्याने कृतज्ञतेने कळविले होते—

"आज आपकी बदौलत करोडो इन्सानकी जान बची है। जो काम बादशहा कर नहीं सका वह आपने शानसे कर दिखाया। वास्तवमें आप सचमुच शाह है। हमारे नाम में बाद लगा है। इसलिए पहले शाह, बादमें बादशहा। शेठश्रींना राज अमर तपो।"

नासिरुद्दीनचा हा खलिता मुनीमजींनीच श्रेष्ठीवरांना वाचून दाखवला होता. बादशहाला या खलित्यावाटे 'शाह किंवा शहा ही पदवी लौकिक अर्थाने धर्मनिरपेक्ष आणि धननिरपेक्ष असून अलौकिक अर्थाने ती गुणसापेक्ष असते।' असेच सुचवायचे होते, म्हणूनच मुनीमजींच्या तोंडून गौरवोद्‌गार निघाले होते, 'वाहवा शाह ! श्रेष्ठीवर जगडूशाह ! आश्रितांना अभयदान हाच समर्थांचा बहुमान ! त्रैलोक्यात आपले नाव अजरामर होईल शाहश्री !'

मुनीमजींच्या मुखातून बाहेर पडलेले हे धन्योद्‌गार भद्रावतीचे श्रेष्ठीवर 'जगडूशाह' यांना ऐकू आले नव्हते. त्यावेळी ते आचार्य परमदेव सूरीश्वरजींचे मनोमन चिंतन करीत होते ।

ज्या ठिकाणी भक्तिभावाने उभे राहून तुम्ही या श्रेष्ठीचे व या श्रेष्ठीवर्याच्या उन्नत जीवनातील प्रेरक प्रसंगांचे पुण्यस्मरण लवकरच कराल तो 'भद्रेश्वर' मधला 'जगडूशाना महेलना खंडेर' आहे। याच महालात हा राजपुरुष साडेसातशे वर्षांपूर्वी तेजस्वी जीवन जगत होता। त्याच्या दिगंत कीर्तीचे यशगान आजही या खंडित महालाचा एकेक पत्थर दिमाखाने आणि गर्वाने गात आहे। भद्रावतीचा तो तट आजही भद्रेश्वरमध्ये छाती काढून आपल्या धन्याची मान उंचावत आहे। येथील मातीचा कण न् कण आणि जलाचा बिंदू न् बिंदू अभिमानाने फुलून या भूमीच्या स्वामीचा यशोगंध भरभरून उधळत आहे। येथील तटबंदीत तेव्हापासून घुमणारा वारा आजही आपल्या यजमानासाठी रुंजी घालीत आहे। येथील भूभागावर पाखर घालणारे अथांग आकाश आजही या पालनहारावर चवरी ढाळीत आहे। आणि जगाला सांगत आहे, 'ऐसे जीयो यारो कि दुश्मन भी गले लग जाए।

गुजरात कच्छमधील भद्रेश्वरला, श्रेष्ठीवर जगडूशा यांच्या अनेक धान्य कोठारावरील शिलालेखावरून व ताम्रपटावरून उजेडात आलेला, केवळ साडेसातशे वर्षांचाच इतिहास नाही पुराणकालातील या भद्रावती नगरीचा महाभारतात उल्लेख असून या पुरातन नगरीला प्राचीन इतिहासही आहे त्या इतिहासाच्या असंख्य खाणाखुणा काळाच्या असंख्य तडाख्यांनी बऱ्याच अंशी बुजवून टाकल्या असल्या तरी जैन तीर्थक्षेत्र म्हणून 'भद्रेश्वर'च्या भद्रावतीला पंचवीसशे वर्षांपासूनचा जो इतिहास आहे तो येथील पुण्यभूच्या उदरात सापडलेल्या ताम्रपटाने व भद्रेश्वरच्या 'बावन्न जिनालया'ने अद्याप जतन करून ठेवलेला आहे।

चरम तीर्थंकर भगवान महावीर यांचे निर्वाण होऊन तेरा वर्षे लोटली होती त्यावेळी म्हणजे पंचवीसशे वर्षांपूर्वी भद्रावतीवर सिद्धसेन या नृपतीची अधिसत्ता होती या नरेशाच्या प्रेरणेने व प्रोत्साहनाने देवचंद्र नावाच्या भाविक श्रावकाने भद्रावती येथे सुयोग्य व पवित्र अशी भूमी शोधून त्या पुनीत स्थानी नव्या मंदिराचा शिलान्यास केला होता त्यानंतर बत्तीस वर्षांनी म्हणजे भगवान महावीर यांच्या निर्वाणानंतर पंचेचाळीस वर्षांनी या नव निर्माण मंदिरात परमभाग्यशाली मुनिवर कपिल केवली यांनी तेवीसावे तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ यांची नयनमनोहारी प्रतिमा स्थापन करून प्रतिष्ठा महोत्सव केला होता संसार बंधन हे समागमासाठी किंवा संतत्युत्पादनासाठी नसून सुकृत संपादनासाठी आहे या जाणिवेने अखंड ब्रह्मचारी

व्रताचे निष्ठेने पालन करणारे भद्रावती नगरीचे विजयशेठ व विजयाशेठाणी या श्रद्धाळू श्रावक जोडप्याने या प्रतिष्ठा महोत्सवाची शुभ घटिका साधून सन्यस्त सयमी जीवनाचे प्रथम चरण मानली गेलेली 'भगवती दीक्षा' घेतली होती त्याच्या या दीक्षेचा इतिहास ताम्रपटाने जिवत ठेवलेला आहे येथील मदिरावरही अनेक सस्कार होऊन हे मदिर श्रद्धाळू भाविकाना या इतिहासाची पारायणे घडवीत आहे !

साडेसातशे वर्षांपूर्वी थरकापरचा दुस्वासी राजा पीठदेव याच्या दुर्बुद्धीने व दुष्टाव्याने भद्रावतीवर परचक्र आले होते राज्यव्यवस्था हे आक्रमण थोपवण्यास असमर्थ होती ही मुसडी परतवून लावण्याची शक्ती येथील शासनदेवाने भद्रावतीचे श्रेष्ठीवर जगडूशाना दिली होती व या श्रद्धेय श्रेष्ठीने प्राणपणाने ही धाड परतवून लावली होती शासनदेवाच्या या कृपाऋणातून मुक्त होण्यासाठी श्रेष्ठीवर जगडूशानी श्री पार्श्वनाथ भगवानाच्या मदिराचा जीर्णोद्धार केला होता व भविष्यकाळाची तरतूद म्हणून त्यानी मोठ्या हिमतीने भद्रावतीभोवती तट बांधला होता

याच सुमारास भरतखडात दुष्काळाने भीषण तांडव घातले होते त्या वेळीही याच शासनदेवावरच्या असीम श्रद्धेच्या जोरावर व आचार्य गुरुदेवाच्या प्रेरक प्रोत्साहनावर या श्रेष्ठीवरानी दुष्काळग्रस्ताना जे पर्वतप्राय सहाय्य केले होते त्याला भारताच्याच नव्हे तर अखिल जगाच्या इतिहासातही तोड नाही विक्रम सवत तेराशे तेरा ते तेराशे पधरा या तीन वर्षांच्या दीर्घ बिकट नैसर्गिक आपत्तीत येथील शासनदेवाने या परमभक्ताला परिस्थितीवर यशस्वी व प्रभावी मात करण्याची प्रचड शक्ती दिली होती !

श्रेष्ठीवर जगडूशा यांच्यापूर्वी सुमारे पधराशे वर्षे सप्रति राजाने या शिल्पावर नवा साज चढवून या मदिराची चमकधमक वाढविली होती सम्राट अशोकाचा पौत्र व कुणालपुत्र सम्राट सप्रति राजा अनेक धर्मकृत्यांनी केवळ मार्गदर्शक ठरला नव्हता, तर तो येणाऱ्या कैक पिढ्याना उत्तेजकही ठरला होता म्हणूनच या राजाची अप्रतिम जिनभक्ती श्रेष्ठीवर जगडूशाना उत्साहवर्धक वाटली होती भद्रावतीवर कोसळलेल्या संकटातून भद्रावतीला यशस्वीपणे पार करण्याची शक्ती जगडूशाना याही उत्तेजनातून मिळाली होती ! भूकपाच्या तडाख्यातूनही हे मदिर अनेकदा सावरले होते ते अशा श्रेष्ठीच्या श्रद्धेवर व सामर्थ्यावरच !

अशा या महाप्रभावक जैन तीर्थाचा महिमा यामुळेच सर्वत्र पसरला होता स्थानांच्या नावावरून तेथील देवांना सबोधले जाते. भद्रावती नगरीच्या नावावरून येथील शासनदेव भद्रेश्वर ! भद्रावतीचे हे भद्रेश्वर तीर्थ 'वसही

जैन तीर्थ ' म्हणूनही ओळखले जाते आबू पहाडावरील दिलवाडाची ' विमल-वसही ', ' लूणवसही ' तशीच हीही एक ' वसही ' म्हणून हे ' वसही जैन तीर्थ '।

अशा ' वसही जैन तीर्था ' तील शासनदेवालाही कलिकालाच्या अवकृपेमुळे ' निर्वासित ' व्हावे लागले होते कोणा एका तपस्वी मुनीच्या प्रसगावधानाने ही प्रतिमा अज्ञात स्थळी गेली होती त्या मुनीचा व त्याच बरोबर अज्ञात स्थळी ठेवलेल्या प्रतिमेचा काही वर्षे ठावठिकाणा लागला नव्हता विक्रम सवत सोळाशे ब्याऐंशी ते सोळाशे अठ्ठ्याऐंशी दरम्यान म्हणजे साडेतीनशे वर्षांपूर्वी या तीर्थस्थानाचा पुनश्च अभ्युदय झाला होता एव्हाना पार्श्वनाथ भगवानाच्या जुन्या प्रतिमेचा शोध न लागल्याने या जीर्णोद्धारित मदिरात वर्धमान शाह यांच्या हस्ते चोवीसावे तीर्थंकर वीर प्रभु महावीर भगवान याच्या प्रतिमेची प्रतिष्ठा करण्यात आली होती ' शासनदेव ' गावाला, स्थानाला अथवा सघाला ' भाग्यदायी ' ठरावा अशी भाग्यकाक्षी भक्तांची भावना असते म्हणून त्या गावाचे, स्थानाचे अथवा सघाचे ' ग्रहयोग ' आजमावून त्या ग्रहांना ' लाभणारा ' तीर्थंकर त्या गावाचा, स्थानाचा अथवा सघाचा ' शासनदेव ' म्हणजे ' स्वामी ' किंवा ' मूळ नायक ' ठरतो भग चोवीस तीर्थं-करांपैकी अशा एका तीर्थंकराची तेथील मंदिरात प्रतिष्ठा होते सघाची कुडली सघपतीच्या नावाने मांडली जाते कधीकधी उद्धारकाची ' पत्रिका 'ही पड-ताळली जाते वर्धमान शहा यांच्या ग्रहमानांशी मिळते जुळते पूरक ग्रह महा-वीराच्या कुडलीत होते म्हणूनच भद्रेश्वराच्या मदिरात वर्धमान महावीर स्वामी यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठा झाली होती ! .

हा प्रतिष्ठा सोहळा पार पडल्यानतर, या समारभाची कुणकुण लागून की काय, अनामिक मुनिराजानी अज्ञातवासात ठेवलेली पार्श्वनाथाची प्रतिमा भद्रावतीच्या श्रावक सघाला परत केली होती ! ही मूळ प्रतिमा भद्रेश्व-रच्या मदिरात आज ' परिक्रमे ' त मध्यावर अग्रभागी विराजमान असून भाविकाच्या हृदय सिंहासनावर याही प्रतिमेला अक्षय अढळ स्थान आहे ! मात्र एकेकाळी येथील उच्च स्थानावर बसलेल्या या तीर्थंकराला आज मानव प्राण्यानी स्वत च्या कल्याणासाठी स्वत'च्या ग्रहमानानुसार दुय्यम स्थानावर बसवले आहे ! आणि हाही बिनतक्रार बसला आहे !

श्री शखेश्वर पार्श्वनाथाचे मदिर असे एके काळी तेथील ठाकूरांच्या कबजात होते तसेच हेही मदिर येथील ठाकूरांच्या ताब्यात काही काळ होते जेव्हा जेव्हा सघ, मदिराची रक्षा करायला असमर्थ किंवा देखभाल करायला हीनदीन ठरतो, तेव्हा कोणी तरी ' समर्थ ' मदिराच्या प्रभावाचा लाभ उठ-

वायला किंवा कर्तव्यभावनेने कार्यभार सांभाळायला, स्वार्थामुळे अथवा प्राप्त परिस्थितीमुळे, पुढे सरसावत असतो कालांतराने विक्रम संवत एकोणीसशे वीसमध्ये हे मंदिर पुनश्च श्रावक संघाला सुपूर्द करण्यात आले होते! .

या मंदिराचा अखेरचा जीर्णोद्धार विक्रम संवत एकोणीसशे एकूणचाळीस-मध्ये म्हणजे बरोबर शंभर वर्षांपूर्वी गुजरात मांडवीचे शेठ मोणसी तेजसी यांच्या धर्मपत्नी मीठाबाई यांच्या हस्ते झाला होता. भद्रेश्वर वसही तीर्थाचे आजचे 'मीठापन' सश्रद्ध श्राविका मीठाबेन यांच्या जिवभक्तीचा 'मिठास' परिपाक आहे! .. कच्छच्या आखातालगतच्या समुद्रकाठावरील खाऱ्या वालुकाप्रदेशात 'दैवयोगा'न 'योगीराजा' च्या परिश्रमान 'उगवलेल' हे गोडगोड फळांच झाड आहे! . भद्रेश्वर वसही तीर्थ हे 'अमृताचे शहाळे' आहे! ..

# सहा

दोन हजाराहून कमी लोकवस्ती असलेले भद्रेश्वर खेडेगाव कच्छ जिल्ह्यातील मुन्द्रा तहसीलमध्ये मुन्द्रापासून सत्तावीस किलोमीटर अंतरावर व गांधीधाम शहरापासून एकूणचाळीस किलोमीटर अंतरावर आहे या गावालगत 'श्री वसही जैन तीर्थ' नसते तर गुजरात राज्याच्या परिचय पुस्तिकेत व शासकीय नकाशावर या छोटयाशा खेडयाला मानाचे स्थान मिळाले नसते ! भूकंपानी अनेकवार उद्ध्वस्त केलेली विख्यात अद्वितीय प्राचीन 'भद्रावती आजही येथील 'भद्रेश्वरा'च्या भरवशावर व प्रभावावर प्रख्यात आहे ! .

तुमची 'मधु मीलन' बस अहमदाबादपासून सुमारे चारशे किलोमीटर अंतर कापून या तीर्थक्षेत्री रात्री अकराच्या सुमारास तुमच्यासह येऊन पोहचली आहे उंच तटाच्या शाही वेशीतून तुमचा येथील प्रशस्त प्रांगणात प्रवेश होतो तेव्हा आतील भव्यतेची चुणूक रात्रीच्या वेळीसुद्धा तुम्हाला हमखास जाणवते वेशीपासून थोडयाच अंतरावर मंदिराचे प्राकार आहे. प्राकाराबाहेर गुजरात स्टेट ट्रान्स्पोर्टच्या काही बसेस प्रांगणात उभ्या आहेत त्यावरील 'मेहसाणा–वसई' 'वडोदरा–वसई' अशा काही पाटया पाहून 'ही मुंबईजवळची वसई इकडे कुठे नि कशी' असा संभ्रम क्षणभर तुमच्या मनात निर्माण होतो मेहसाणा किंवा बडोदा येथून वसईसाठी सुटलेल्या बसेस रात्री येथे मुक्कामास असतात की काय असाही प्रश्न क्षणभर तुमच्या बुद्धीला चालना देतो , पण 'वसई' म्हणजेच 'वसही' असा जेव्हा उलगडा होतो तेव्हा तुम्हास कळते की मेहसाणा व बडोदा येथून या 'वसही तीर्था' कडे सायंकाळनंतर आलेल्या बसेस रात्री येथे मुक्कामाला असतात कुठे 'भद्रेश्वर' कुठे 'भद्रेसर', तर कुठे 'भद्रेवर' अशी गुजराती व देवनागरी लिप्यांतील विविध फलकावरील ग्रामनामाची अक्षरे तुमच्या दृष्टीस पडतात व ही नजरे-

खालून घालताच तुम्ही बसमधून खाली उतरता खाली उतरताच तुमची हीच नजर चौफेर भिरभिरून सभोवतालच्या तटातील बंदिस्त क्षेत्राचा अंदाज घेते पण ही नजर जागेभोवतीच्या चारी भिंती डोळ्याच्या दोन्हीही खोबण्यात बंदिस्त करू शकत नाही रात्रीची वेळ असल्याने कदाचित हे साध्य होत नसावे । .अडीच लाख चौरस फूट म्हणजे अडीचशे एकराच्या आवारात हे ' वसही क्षेत्र ' वसलेले आहे, असे तुम्ही ऐकले असल्याने हे भव्य तीर्थक्षेत्र दृष्टीत सामावून घेण्याची उत्कंठा तुम्हास लागलेली असते ।

ही रात्र, त्यानंतरचा संपूर्ण एक दिवस आणि पुन्हा एक रात्र तुम्ही या परिसरात राहणार आहात जे जे पाहायच असेल ते ते सर्व तुम्ही डोळे भरून पाहून घ्याव कारण या तीर्थक्षेत्राचं उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून तुम्ही या स्थानी आला आहात या तीर्थयात्रेच्या निमित्तान तुमची यानंतरही बरीच भ्रमती होणार आहे !

कच्छच आखात येथून दक्षिणेकडे अगदी जवळच आहे कच्छच रण मात्र येथून उत्तरेकडे शंभर किलोमीटर दूर आहे तरीही या ठिकाणाहून रणाची चाहूल लागू शकते एका बाजूला आखात म्हणून समुद्रपट्टी जवळ व दुसऱ्या बाजूला रणरणणार वाळवंट त्यामुळ इथली हवा काहीशी दमट, काहीशी विषम असावयास हवी पण वास्तवात ती तशी नसते आता रात्रीच्या वेळी हवा कशी गार वाटते । तशी अंगाला झोंबणारी थंडी या भागात असते असे ऐकून तुम्ही आला आहात पण अगदी गारठून टाकणारी थंडी नसली तरी तुमच्या शरीरात साधारण हुडहुडी भरवण्याची मर्दुमकी या गारठ्यात आहे अंगात हलकी फुलकी किंचितशी शिरशिरी आणणारी ही ' थंडक ' तुम्हाला आल्हाददायक वाटते

पोटात भूक असेल तर, महेंद्रभाई तुमच्या फराळाची तयारी लवकरच करतील थोडफार खाऊन घ्या भूक नसेल तर तुम्ही तुमचा ' बिछाना ' शोधण्याच्या तयारीला लागलेलच ठीक । हो, वेळप्रसंगी या प्रवासात तुमच सामान तुम्हाला चढवाव, उतरवाव लागेल स्वावलंबनाची तयारी या क्षेत्रा-पासूनच करण योग्य !

सकाळी लवकर उठायला हव येथील शासनदेवाच प्रातर्दर्शन घेण्यासाठी ! काही काही लोकाचा हा नियम असतो तशी प्रथाही असते जैन धर्मशासना-तील आचारधर्माचा हा एक भाग आहे प्रात समयी प्रभुदर्शन घेऊन मग दैनंदिन क्रियाकर्म करावेत असा संकेत आहे बहुतेक सर्व धर्मात प्रात-स्मरणाला महत्त्व आहे सर्व प्रातर्विधी उरकून, स्नान करून तुम्हाला दर्शन घ्यावयाचे असेल तर त्यासही प्रतिबंध नाही । मानली तर ही तीर्थयात्रा,

सकाळच्या कोवळ्या उन्हात, बाहेरून थोड्या अंतरावरून, भद्रेश्वर मंदिराचे निरीक्षण केल्यावर प्रदक्षिणेतल्या छोट्या छोट्या बावन्न मंदिरा-वरच्या छोट्या छोट्या बावन्न शिखरांचा नयनमनोहर मेळावा राणकपूरच्या ' नलिनी गुल्म देव विमाना 'ची आठवण करून देतो बाहेरून या मंदिराच्या भव्य अंतरंगाची चटकन कल्पना येत नाही पण मंदिराच्या प्रवेशद्वारातून आत पाऊल टाकल्यानंतर एकेक पायरी चढून जाताना स्वर्गारोहण होत आहे असा गोड भास होतो अगदी तळातल्या पहिल्याच पायरीवरून मूळ नायक तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांची मोहक प्रतिमा पटकन नजरेत भरते तेथून नजर हळूहळू चौफेर भिरभिरू लागली की जागजागी उभे असलेले भव्य संगमरवरी स्तंभ मंदिराची विशालता मनावर ठसवतात भालदार-चोपदार यांच्याप्रमाणे दोन्ही बाजूला दोन रांगेत स्वागतासाठी अविचल उभ्या असलेल्या या स्तंभावरील तोरणाखालून वर चढून गेल्यावर पहिल पाऊल रासमंडपात नाहीतर रंगमंडपात पडत हे दोन्ही प्रशस्त मंडप अमोरा समोर थोडे पुढे सरकले की पूजा मंडप

नेमिनाथ व राजमती यांच्या विवाहप्रसंगी नेमिनाथाचा जो ' वरघोडा ' निघाला होता त्या स्वागत यात्रेची दृश्ये पूजा मंडपावरील गोलाकार घुमटात रेखलेली आहेत अनेक मंदिरात या अमर ऐतिहासिक प्रसंगाचे दर्शन घडत असते व बघणाराला प्रत्येक वेळी ते नव्या नवलाईचे वाटत राहते अनेकदा पाहिलेली ही लग्नपूर्व वरात पुन:पुन्हा पाहण्याचा मोह होतो इतका त्या वरघोड्याचा कथाविषय व त्या कथाविषयातला भाव अक्षय असतो ।

मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यातील वीर प्रभूंच्या दर्शनाबरोबर महावीर प्रभूंच्या दोन्ही बाजूस असलेल्या श्री अजितनाथ व श्री विमलनाथ या तीर्थं-कराचे दर्शनही मनाची प्रसन्नता वाढवते पद्मासनातल्या सिद्ध तीर्थंकराच्या या पवित्र प्रतिमा मंदस्मित करीत भाविकाना केवळ अभयच देत नसतात, तर परम संतोषही देतात

वीर प्रभूचे दर्शन घेऊन परिक्रमेतल्या एकेका मंदिरातील तीर्थंकराच्या प्रतिमांचे किमान पक्षी एकेक मिनीट दर्शन घ्यायचे म्हटले तर हे धावते दर्शन घ्यायला एक तास अपुराच पडतो । येथील बावन्न जिनालयाचे वैशिष्ट्य असे की या प्रत्येक जिनालयांत तीन तीन प्रतिमा आहेत एक प्रतिमा या स्वतंत्र जिनालयातील मूळ नायकाची व दुसऱ्या दोन प्रतिमा अन्य दोन तीर्थंकरांच्या अर्थात एकेक ' देहरी 'तले हे एकेक जिनालय एकेक छोटे

मंदिरच आहे प्रत्येक मंदिर संगमरवरी असून संगमरवरावरचे नक्षीकाम रेखीव आणि कोरीव आहे परिक्रमेतल्या बावन्न 'देहऱ्या' पैकी पधरावी 'देहरी' शासनदेवतांची असून या 'देहरी'त प्रथम तीर्थंकर ऋषभदेव यांची रक्षकदेवता श्री चक्रेश्वरी देवी व या देवतांच्या जोडीला श्री ऋषीकेश देवी, श्री महालक्ष्मी आणि श्री महासरस्वती या देवताच्या संगमरवरी प्रतिमा आहेत परिक्रमेतली पचवीसावी 'देहरी' श्री पार्श्वनाथ भगवानांची असून बावन्न 'देहऱ्या'त ही सर्वांत मोठी 'देहरी' आहे मूळ नायक श्री महावीर स्वामी यांच्या बरोबर मागच्या बाजूलाच हे 'मंदिर' आहे पार्श्वनाथ भगवानाची ही प्राचीनकालीन मूर्ती पद्मासनस्थ असून पचवीसशे वर्षांनतरही ही प्रतिमा आपले दिव्यत्व प्रकट करते मूळ नायक महावीर प्रभूचे आसन सर्व मंदिरातील तीर्थंकरांच्या आसनापेक्षा उच्च आहे कुठल्याही जैन मंदिरात मूळ नायकाचे आसन इतर तीर्थंकरांच्या आसनापेक्षा थोडे उचावरच असते

बावन्न जिनालयांची परिक्रमा पूर्ण होताच पाऊल वीर प्रभूच्या समोरील मंडपात पडते हा मंडप मंदिराच्या पायऱ्यावर असून या मंडपातून भाविकांची दृष्टी वीर प्रभूच्या दिव्य दृष्टीला जाऊन भिडते. या मंदिरातील मूळनायकाचे पीठासन अशा खुबीने केले आहे की उचावरच्या या मंडपात भाविक मान उचावून उभा राहिला तरी त्याची नजर वीर प्रभूच्या दृष्टीच्या पातळीखालीच राहते वरच्या 'मजल्या'वरच्या या 'आराधना' मंडपात बसून वीर प्रभूची प्रतिमा मनोभावाने अंतःपटलावर उतरवून घेता येते व ती दीर्घ काळ तेथे तशीच ठेवता येते।

पूजामंडपात मोठी रांग लागलेली आहे पण त्या रांगेत 'उभे' कोणीच नाही सर्वजण शांतपणे बसलेले आहेत बसलेल्या भक्तांची ही रांग मूळ नायकाच्या पूजेसाठी लागलेली आहे प्रत्येकाच्या पुढ्यात एक छोटीशी ताटली त्या ताटलीत एक गंधाची वाटी, एक अगरबत्ती आणि चारदोन फुल त्यात एखाद दुसर गुलाबाच बहुतेकाच्या हातात 'नवकारवाळी आहे।

'संघ सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि, बुद्धं सरणं गच्छामि' हा जसा बौद्धांचा त्रिशरण मंत्र, तसा 'नवकार मंत्र' हा जैनांचा महाप्रभावी मंत्र आहे।.. संघ, धर्म आणि बुद्ध यांना शरण जाण्यास सांगणारा 'त्रिशरण मंत्र' आणि 'नवकार मंत्र' याची व्याप्ती भिन्न भिन्न आहे तशी 'धम्मा'ला 'सरण' जाण्याची ही 'श्रमण कल्पना फार पुरातन असून जैनांच्या 'मंगलचरणा'त

सा...५

ती बौद्धांच्या 'त्रिशरण' मन्त्रापूर्वीच समाविष्ट झालेली आहे। जैनांच्या 'मगलाचरणा'त या शरणागतीची व्याप्ती 'चत्तारि सरण पवज्जामि, अरिहता सरण पवज्जामि, सिद्धे सरणं पवज्जामि, साहू सरण पवज्जामि, केवली पण्णत्त धम्म सरण पवज्जामि।' एवढी भव्य आहे। .

'ॐ भू भुवः स्व तत्सवितुर्णरेण्य भर्गो देवस्य धीमहि धियो यो न प्रचोदयात्' हा जसा सूर्योपासक वैदिकांचा गायत्री मत्र, तसाच 'नमो अरिहताण, नमो सिद्धाण, नमो आयरियाणं, नमो उवज्झायाण, नमो लोए-सव्वसाहूण, एसो पच नमुक्कारो सव्व पावपणासणो मगलाणच सव्वेसि पढम हवई मगल' हा जैनांचा नवकार मंत्र। 'परब्रह्माचा आधार लाभलेल्या भूलोक, अतरिक्ष आणि स्वर्ग यांच्याही पेक्षा दूर असलेल्या पापनाश करणाऱ्या सूर्यदेवतेच्या तेजाचे आम्ही चिंतन करतो, जो आमच्या बुद्धीला प्रेरणा देवो' असा प्रभावी गायत्री मत्राचा अर्थ असून तेजोगुणाची पूजा सागणारा व त्यातून मगल इच्छिणारा आणि प्रेरणा घेणारा हा मत्र आहे 'अरिहंत भगवताना नमस्कार असो, सिद्ध भगवंतांना नमस्कार असो, आचार्य देवांना नमस्कार असो, उपाध्यायांना नमस्कार असो, जगातील सर्व साधूना नमस्कार असो, आणि हे पाच नमस्कार सर्व पापाचा नाश करणारे असून सर्व मगलामध्ये प्रथम (सर्वश्रेष्ठ) मगल आहेत,' असा नवकार मत्राचा अर्थ आहे गायत्री ही देवी आहे हे सपूर्ण सत्य नसूनही काही लोक गायत्री इजला सावित्रीदेवी, सवितादेवी म्हणतात या गायत्री मत्राची देवता सूर्य आहे सूर्यापाशी अनेक प्रभावशाली शक्ती आहेत, त्यापैकी सविता नामक जी शक्ती आहे तिला गायत्री म्हणून सबोधतात सविता या शक्तीतही अनेक शक्तींचा समावेश आहे म्हणून गायत्री हे एक शक्तिपीठ आहे गायत्री मत्रात तेजोगुणाची पूजा अभिप्रेत असूनही प्रत्यक्षात मात्र रूपधारी देवतेची आराधना होते गायत्री मत्र अशा विशिष्ट विविक्षित शक्तिदेवतेचा पूजामत्र आहे। सविता ही सृष्टी उत्पन्न करणारी देवता असे वैदिक मानतात या उलट, सृष्टीची निर्मिती कुणा देवदेवतेने केलेली नसून ती स्वयनिर्मित व स्वयचलित आहे अशी जैन धारणा आहे गायत्री मत्र ही या व्यक्त देवतेची आराधना, तर या उलट नवकार मंत्र व्यक्त रूपाची पूजा करीत नाही सिद्धापासून साधूपर्यंत केलेले नमस्कार हे त्यांच्या ठायी असणाऱ्या गुणांना नमस्कार आहेत म्हणून नवकारमत्र गुणाची पूजा करतो। नवकारमत्रातील अरिहतापासून साधूपर्यतचे पाच नमस्कार विशिष्ट विविक्षित अशा पचपरमेष्ठींना नसून, हे पाच नमस्कार जगातील सर्वकष गुणाना, पावित्र्याला आणि मागल्याला आहेत या मत्राचा भर सिद्ध, अरिहत,

आचार्य, उपाध्याय व साधू याचेवर नसून नमस्काराच्या मागल्यावर आहे। म्हणून हे सर्व पाच नमस्कार सर्व पापांचे विनाशी असून सर्व मगलांमध्ये सर्वश्रेष्ठ मगल आहेत असा त्यांचा महिमा आहे। नवकार मत्रात सद्गुण, पावित्र्य आणि मागल्य याचे मनन, चिंतन व वदन यावाटे आचरणाचे आश्वासन आहे! त्रिशरण मत्राची व्याप्ती 'बुद्धा'पर्यंत आहे नवकार मत्रात ती 'तीर्थंकरा'पर्यंत नाही विशिष्ट तीर्थंकरांचा यात समावेश नसून या नवकार महामत्रातील अरिहत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय व साधू रूपातीत, स्वरूपातीत, कालातीत, मानातीत, देशातीत, प्रदेशातीत आणि त्याचप्रमाणे धर्मातीत असून सर्व जगातील, भूत–वर्तमान–भविष्य अशी तिन्ही कालातील व सर्व सप्रदायातील सर्वच परमेष्ठींचे चितन या नवकार मत्रात आहे नवकार मत्रात पहिला नमस्कार जो अरिहताला सांगितला आहे तो केवळ जैन अर्हतांना नाही जैनाच्या 'ऋषि भाषिय' सूत्रात विशद केलेल्या अरियायन, हरिगिरी, नारद, वायू, द्वैपायन आदी पचेचाळीस अन्य धर्मीय अर्हतांचाही यात समावेश होतो। म्हणून व्याप्तीच्या मोजमापाने इतर सर्व मत्रांच्या तुलनेत हा 'नवकार मत्र' असीम आहे, अमर्याद आहे, अगाध आहे। हा नवकार मत्र विश्वप्रेमाचे प्रतीक असल्याने तो आपपर भावातीत व स्थलातीत आहे म्हणूनच सर्वार्थींनी हा नवकार मत्र केवळ जैनांचाच नसून अवघ्या प्राणिमात्रांचा महामत्र आहे अशी जैनांची श्रद्धा व धारणा आहे। पचप्राण, पचेंद्रिये, पच महाभूतातर्गत पचरग यानी युक्त अशा विनाशी शरीरापासून अविनाशी आत्म्याचे विमोचन करण्याचे महासामर्थ्य या महामत्रात आहे। म्हणून या नवकार मत्रावर जैनाची अढळ निष्ठा असते। पच परमेष्ठींना नमस्कार व सर्व पापांचा नाश करणाऱ्या नमस्काराचे मागल्य यावर त्यांची दृढ श्रद्धा असते। नवकार मत्रातून ज्ञान, दर्शन आणि चारित्र्य या रत्नत्रयीचा प्रभाव पडतो अशी गुणग्राही प्रशस्ती या नवकार मत्रात असल्याने सर्वश्रेष्ठ अशा महन्मागल्याची प्राप्ती होते ज्ञानातून, दर्शनातून आणि चारित्र्यातून उत्पत्ती, स्थिती आणि लय या अवस्थांमधील जीवनाची परिक्रमा पूर्ण होऊन स्थिर होते शरीरस्थ असख्य शत्रूचा हतक तो अरिहत पूर्ण पुरुष असतो प्रकृतीवर विजय मिळवणारी कर्मक्षयी पूर्णावस्था व त्या पलीकडील, जन्म-मरणाचा फेरा सपुष्टात आणणारी, सिद्धावस्था या सिद्धमत्राने प्राप्त होते। थोडक्यात तीर्थंकर म्हणजे अरिहत हे पूर्णत्वाला पोचलेले मानवी देहधारी जीवन असते, तर सिद्ध ही, त्याही पलीकडची, विदेही अवस्था असते। साधू, उपाध्याय, आचार्य या एकापुढील एक अशा चढत्या पायऱ्या गाठून मानव ही अवस्था प्राप्त करून घेऊ शकतो। ही अवस्था केवळ जैनच नव्हे तर कोणीही मानव

परिश्रमाने, तपाचरणाने प्राप्त करू शकतो। महामानव होण्याचे दिव्यद्वार कोणासही उघडता यावे अशी शक्ती या महामंत्रात आहे।... परमेष्ठींच्या चिंतनात स्वत्वाचा विसर पाडण्याचे सामर्थ्य आहे। ..हिलाच जैन 'कौसग्ग' म्हणजे 'कायोत्सर्ग' अवस्था व हिंदू 'समाधी' अवस्था मानतात! अशी विमुक्त अवस्था हिंदू गायत्री मंत्राने, जैन नवकार मंत्राने व बौद्ध त्रिशरण मंत्राने प्राप्त करू इच्छितात! गायत्री मंत्र जर सर्व अरूप तेजो गुणाच्या आराधनेसाठी असेल आणि त्रिशरण मंत्रातील बुद्ध म्हणजे प्रत्येक प्रबुद्ध अशा विस्तीर्ण अर्थाने असेल तर या दोन्ही मंत्राची व्याप्ती व्यापक मानावी लागेल। नवकार मंत्राची मर्यादा मात्र याही पलीकडील असीमता ओलांडणारी आहे। शांती, तुष्टी, पुष्टी या वाटे सम्यक् दृष्टी देणारा हा सर्वंकष, सर्वमंगल, सर्वप्रथम महामंत्र आहे। जैनांच्या आगम ग्रंथात प्रथम सूत्र 'श्री पंचमंगल' म्हणजेच नवकार किंवा नमोकार अथवा नमस्कार मंत्र आहे। .

'नमस्कारसमो मंत्र शत्रुंजयसमो गिरि'। वीतरागसमो देवो न भूतो न भविष्यति ॥' या स्तोत्राने नवकार मंत्राचा महिमा विशद केला असून या मंत्रासारखा दुसरा प्रभावी मंत्र नाही सर्व गिरीमध्ये जसा शत्रुंजयगिरी, सर्व दैवतांत जसा वीतराग प्रभू म्हणजे अरिहंत भगवान तसाच सर्व मंत्रात हा नवकार मंत्र। . या नवकार मंत्राचा महिमा अनेकांनी श्रद्धेने कथन केलेला आहे

'समरो मंत्र भलो नवकार, ए छे चौद पूर्वनो सार। एना महिमानो नहि पार, एनो अर्थ अनंत अपार ॥... सुखमां समरो, दुःखमां समरो, समरो दिवस ने रात। जीवतां समरो, मरतां समरो, समरो सौ सगाथ ॥.. जोगी समरे, भोगी समरे, समरे राजा रंक। देवो समरे, दानव समरे, समरे सौ निःशंक ॥.. अडसठ अक्षर एना जाणो, अडसठ तीरथ सार। आठ संपदा ए पण मोटु, अडसिद्धि दातार ॥... नवपद एना नवनिधि आपे, भवभवना दुःख कापे, वीर वचनने हृदये स्थापे। परमोतप पद आपे ॥. नवकार मंत्राचा महिमा कसा अपरंपार आहे व त्याचे स्मरण कसे वांछित, अष्ठसिद्धी फलदातार आहे याची या शब्दकळावरून कल्पना यावी।

'नवकार वाळी' घेऊन बसलेले जैन श्रावक एकेक नवकार मंत्र म्हणून नवकारवाळीतला एकेक मणी उजव्या हाताच्या तर्जनीवरील सूत्रमालिकेतून उजव्या हाताच्या अंगठ्यानेच क्रमशः खाली ओढतो श्राविकांच्या रांगेतील श्राविकाही असाच नवकार मंत्र जपते या 'नवकारवाळी'त एकशे आठ मणी असतात. 'एकशे आठ' हा अंक जैनांना शुभ वाटतो एकशे आठ नवकार म्हणून एक जपमाला पुरी होते काही काही भाविक अशा

'नवकारवाळ्या' दिवसाकाठी अनेकदा जपतात वार्धक्यात ही 'नवकार-वाळी' वृद्धाना विरंगुळा असून ती त्याना सजीवक वाटत असते ! हिंदूच्या जपमाळेवर राम, कृष्ण आदी देवाचे नामस्मरण करतात मुसलमानांच्या माळेला 'ससती' म्हणत असून या 'ससती'चे प्रत्येकी तेहतीस मण्याचे तीन हिस्से असतात एकेका हिश्शावर 'सुभान अल्ला', 'अल् हम-दुलइ अल्ला' व 'अल्ला हो अकबर' असे एकेक तेहतीस वेळा म्हणून नव्याण्णव मण्याची ही ससती पुरी केली जाते ! तिबेटी बौद्ध अशा प्रार्थना माळेवर 'ओम् मणी पद्मे हु' हा औलुकेतेश्वर पद्मपाणी बुद्धाचा प्रार्थना-मत्र म्हणतात शिखाच्या जपमाळेला 'सिमरना' म्हणत असून या माळेवर 'सत्य नाम वही गुरू' हा मत्र म्हटला जातो जैन, हिंदू, बौद्ध, शिख, मुसलमान या धर्मांच्या लोकांप्रमाणेच शुचिर्भुत होऊन मन:शातीसाठी आणि मनाच्या एकाग्रतेसाठी दिवसाकाठी एकदा वा अनेकदा कॅथॉलिक ख्रिश्चन धर्मीयही अशा तऱ्हेच्या जपमाला वापरतात व अशा जपमाळेवर ते आकाशातल्या बापाला आळवतात ! रोमन कॅथॉलिकाच्या जपमाळेला 'रोझरी' म्हणतात अशाच्या मोठ्या रोझरीत एकशे पासष्ट तर छोट्या रोझरीत पचावन्न मणी असतात ! परमेष्ठीच्या नामस्मरणासाठी ही साऱ्याची धडपड ! गुरू नानकानी 'सुमिरन करले मेरे मना तेरी, बीती उमर हरी नाम बिना' असा इषारा दिला तो यासाठीच ! 'देह नयन बिना, रैन चद्र बिना, मदिर दीप बिना .तैसे पुरुष हरीनाम बिना' असे नानकजीनी कळवळून सागितले, तेच नाम स्मरणाचे माहात्म्य सर्वच सतानी गायिलेले आहे ! .मन स्थिर करण्यासाठी 'नवकार' मत्र एक प्रभावी साधन आहे ! पण मनाने किंवा ओठानी नवकारमत्र म्हणावयाचा आणि चित्ताने किंवा इद्रियांनी ससारी गोष्टींचा वेध घ्यायचा ही आराधनेत सर्वत्र सापडणारी विसगती नवकार मत्राच्या गणणेतही आढळते ! . .अशा वेळी सारेच व्यर्थ ! नवकार मत्र भार नसून आभार, बधन नसून उत्तेजन, 'कार' नसून सत्कार मानला तरच सार्थक ! तरच ऋद्धी आणि सिद्धी ! .. नाहीतर केवळ प्रसिद्धी !

पूजेसाठी रागेत उभे राहून बाचाबाची करीत रेटारेटी करण्यापेक्षा रागेत शातपणे 'कौसग्ग' घेऊन बसण्याची व नवकार 'गणण्या'ची ही पद्धत केव्हाही चागली ! पुरुष पूजार्थींची राग एकीकडे, तर स्त्री पूजार्थींची राग दुसरीकडे सगळे कसे धीरगभीर आणि शात ! हे दृश्य पाहून तुम्ही हरकून जाता ! . .

मूळ नायकाची पूजा सर्वप्रथम कोणी करावयाची यासाठीही नियम ठरलेले असतात त्यासाठी 'बोली' होते, जिला 'चढावा' म्हणतात जो

अधिक बोली बोलेल म्हणजे 'चढ' बोली बोलेल त्याचा प्रथम मान 'चढाव' घेणाराने प्रथम पूजा केल्यानंतरच इतरांनी रांगेने पूजेसाठी पुढे सरकायचे मोठ्या तीर्थस्थानी पूजेसाठी अशी भीड असते शंखेश्वर पार्श्वनाथाच्या मंदिरातही पूजेची अशी रांग लागल्याचे तुम्ही पाहिले असावे !

हे चढाव फक्त पूजेसाठीच होतात असे नाही 'प्रक्षाल' किंवा 'पखाळ' म्हणजेच 'अभिषेका'चा चढाव होतो पूजेच्या आधी 'प्रक्षाल' होतो पूजेच्या चढावातही प्रकार असतात चंदनपूजा म्हणजे केशरपूजा किंवा गंधपूजा मग फूल पूजा तशीच धूपपूजा या सर्व पूजाप्रकाराचे वेगवेगळे चढाव होतात चढाव घेणाराला प्रथम मान देण्याने वाद होत नाहीत चढावाची प्रथा पूर्वापार आहे अशी प्रथा नसती तर कोणी प्रथम 'पक्षाल' करायचा, पूजा प्रथम कोणी करावयाची यासाठी झगडे व वेळप्रसंगी हाणामाऱ्याही झाल्या असत्या आरतीसाठीही चढाव होतात चढाव बहुतेक ठिकाणी 'मणा'वर होतात मण हे पूर्वीचे परिमाण होते 'घी' म्हणजे तूप हे माध्यम होते । या चढावाचे जे मूल्य होईल ते तुपाच्या रूपाने दिले जात होते नाणी आल्यावर ही किंमत नाण्यात देण्याची पद्धती रूढ झाली पण चढाव मणात पुकारण्याची पूर्वापार पद्धत आजही तशीच मणा'त राहिली आहे । पूर्वीचा मण कुठे कुठे तेरा शेरांचा होता तर कुठे कुठे चाळीस शेराचा होता 'मणा'चा म्हणजे 'मण घी'चा दर सव्वा रुपयापासून पाच रुपयांपर्यंत स्थानपरत्वे होता सव्वा रुपया ते पाच रुपये मण 'घी'चा भाव म्हणजे झाले काय । केवढी ही स्वस्ताई आता पाणी या दराने मिळत नाही । पूर्वीचा तेरा शेरी किंवा चाळीस शेरी मण गेला, त्या जागी आता शंभर किलोंचा 'क्विंटल आला । घी'चा प्रत्यक्षातला पूर्वीचा भाव गेला आणि 'घी'ही गेली तिच्या जागी डालडासारखे वनस्पती तूप आले । चढाव मात्र अद्याप अनेक ठिकाणी मणावर बोलले जाताहेत 'घी'च्या माध्यमातूनच । आता 'श्वेत क्रांती पुनश्च येऊ घातली आहे तरीही 'घी' पाण्यासारखी वाहील का हा प्रश्न शिल्लकच राहील ।

अशा चढावातून जे उत्पन्न येते ते 'साधारण खात्या'चे उत्पन्न मानले जाते या उत्पन्नातून पूजाअर्चा वगैरे दैनंदिन धार्मिक विधीसाठी होणारा खर्च भागवला जातो मंदिराजवळील उपाश्रये अशा उत्पन्नातून बांधली जातात 'साधारण खात्या'च्या उत्पन्नाव्यतिरिक्त जे उत्पन्न येते, ज्यात गुप्त भांडारातील धनाचाही समावेश होतो, ते 'देवद्रव्य' मानले जाते देवद्रव्यातून मंदिराचे बांधकाम, जीर्णोद्धार अशी कामे होतात देवद्रव्य उभे केले नाही किंवा जमवलेले देवद्रव्य इतर कामासाठी वापरले तर मंदिराची

दुर्दशा होईल, नवी मंदिरे निर्माण होणार नाहीत, जुन्या मंदिराची डागडुजी होणार नाही, उलट ती कोसळून जमीनदोस्त होतील यासाठी देवद्रव्याच्या उभारणीवर अधिक भर दिला जातो साधारण खात्यात जमा झालेला पैसा देवद्रव्यात व देवद्रव्यातला पैसा साधारण खात्यात वापरू नये असा पूर्वापार दंडक आहे व या तत्त्वाला धर्मशास्त्रात आधार आहे असे धर्माचार्य प्रतिपादतात नव्या पिढीला हे बंधन मान्य होत नाही धर्मनिष्ठ सनातन विचारसरणी सोडत नाहीत नव्या जुन्या विचाराचा सर्वत्रच संघर्ष चालतो. प्रत्येकजण आपापली बाजू प्रभावीपणे व अट्टाहासाने मांडतो ऐकणाऱ्या त्रयस्थाला दोन्हीही बाजू पटाव्यात असा जोश दोन्हीही विचारधारात असतो विचाराचा हा संघर्ष सनातन आहे तो पुढेही तसाच होत राहणार आहे ज्यासाठी संघर्ष होतो ते शाश्वत नसले तरी आदिपासून अंतापर्यंत प्रवास करणाऱ्या संघर्षाचे अस्तित्व मात्र शाश्वत आहे ! .

पूजार्थी रांगेत बसले असतानाच भद्रेश्वरचा वयस्क पुजारी ' चढाव ' पुकारीत आहे त्याचा आवाज पहाडी आहे भाविकांच्या मनाची पकड घेण्याचं सामर्थ्य या खड्या आवाजात आहे तद्वतच भक्ताना अंतर्मुख करायला लावणार लाघवी माधुर्यही या आवाजात आहे तुमच्यांपैकी कोणी तरी एकाने या पुजाऱ्याचं नाव विचारलं आहे

" हिरजीभाई. " प्राप्त व अंगिकृत कर्तव्याचा विसर पडू न देता तो सांगतो व बोलीचा धागा पकडून पुकारतो, " मूळनायकनी चंदनपूजानु घी एकसो ग्यारा मण चंदनपूजानु घी एकसो ग्यारा मण . अहीं मणनु भाव अढी रुपाया छे. घणु सस्तु भाव . अकबर बादशहाने अने कुमारपाल-राजाने वखतनु भाव. . बोलो भाई. . एकसो ग्यारा मण .. भले भाई भले.. बसो एकावन्न मण. "

एकशे अकरा मणावरून बोली एकदम दोनशे एकावन्न मणावर चढल्याचे ऐकून तुम्ही आश्चर्यचकित झाला आहात कोणी बोली वाढविली म्हणून तुम्ही चौफेर नजर फिरवून शोध घेत आहात पण बोली चढवणारा कोण याचा तुम्हाला बोध होत नाही बोली फुगवणारा कोणी अनामिक असावा !

हिरजीभाई बोलतच राहतो, " बोलो पुण्यशाली बोलो भाग्यशाली. भद्रेसरना मूळ नायक चरम तीर्थंकर महावीर भगवंतनी चंदन पूजानो लाभ लेजो भाई. बैराओंमी साभळो ! शुभ अवसर फरी नहीं आवशे ! नाणा मळे, टाणा न मळे ! मननी बात मनमां न रही जाय. . चंदनपूजानु घी बसो एकोहत्तर मण. बोलो भाई बोलो भाग्यशाली चंदनपूजानु घी मण त्रणसो एक ! "

बोली वाढते कोण वाढवतो, अद्याप तुमच्या लक्षात येत नाही तुम्हास वाटत, हा पुजारी मोठा धूर्त दिसतो । तो स्वत:च बोली वाढवीत नसेल ना अशी शका तुमच्या मनाला क्षणभर स्पर्शून जाते उत्पन्न वाढावे म्हणून हिरजीभाई ही चाल खेळीत असावा असाही तुमचा समज होतो असे होण्याची शक्यता असू शकते पण कुणातरी 'भाग्यशाळ्या'ला चढवण्यासाठी अशा वेळी पुजाऱ्याच्या पाठीशी कोणी एखादा 'बलशाली' असावा लागतो । बोली अगावर आली तर ती स्वीकारून तिची पूर्तता करण्याचे सामर्थ्य अशा 'पाठबळा'पाशी असायला हव । भद्रेश्वरच्या 'वसही तीर्था'चे व्यवस्थापन 'शेठ वर्धमान कल्याणजी पेढी भद्रेश्वर' याच्याकडे आहे हिरजीभाई या पेढीचा इमानदार सेवक दिसतो हिरजीभाईने साठी गाठली असावी अनुभवान आणि वयान डोक्यावरचे सगळेच केस पिकलेले आहेत याच्यासारख्या अनुभवी नोकराला कधीकधी पेढीचेही प्रोत्साहन असू शकते रागरग व भक्ताचा नूर पाहून बोली वाढवण्याचे स्वातत्र्य अशा स्वामिभक्ताना असते. अशी बोली कधी फसली तर पेढी ती कोणा एका विश्वस्ताच्या किंवा श्रद्धाळू श्रेष्ठीच्या नावावर पूर्वनियोजनाप्रमाणे लिहू शकते बोली अगलट येण्याचा प्रसग फारसा ओढवत नसतो

हिरजीभाईच्या आवाजात जशी रग आहे तशीच ती त्याच्या अगयष्टीतही आहे याही वयात तो गाभाऱ्यापासून प्रवेशद्वारापर्यंत अणि प्रवेशद्वारापासून गाभाऱ्यापर्यंत एकसारखा धावतो आहे, एखाद्या तगड्या तरुणासारखा । तुमच्यापैकी आणि इतर अनेकांपैकी काहीजण मदिराच्या पिछाडीला असावेत या कल्पनेने हिरजीभाई बोली पुकारतच व खाद्यावरचे उपरणे सावरीत बाहेरही फेरफटका मारतो मदिराच्या पिछाडीला कोणी दोघेतिघे चदनाचे तुकडे उगाळीत आहेत हिरजीभाईचे हे मदतनीस असावेत व हिरजीभाई याचा वरिष्ठ असावा याच्या अगावर पूजावस्त्रे आहेत खाली पिवळ्या नाहीतर केशरी रगाचे धोतर, वर अगावर तसल्याच पिवळ्या नाहीतर केशरी रगाचे उपरणे गळ्याभोवती रुमाल तो नाकातोंडावर अधातरी बांधून पूजा करायची असते भक्ताच्या श्वासाने भगवानाची 'अशाद्ना' म्हणजे 'अपवित्रता' होत असते यासाठी ही दक्षता धर्मभावनेने धर्मादेशाप्रमाणे घेतली जाते पूजेचा हा 'जोडा' मदिरातील काही भाविकांच्या अगावर आहे काही पुरुष भाविकांचा हा जोडा रेशमी वस्त्राचा असून त्याचा रग फिका पिवळा आहे काहींचा जोडा टेरीकॉट कपड्याचा व फिक्या लाल रगाचा नाहीतर फिक्या जांभळ्या रगाचा आहे स्त्रियांच्या अगावर स्वच्छ पातळे आहेत या पातळाचा रग बहुताशी पाढराच आहे.

याच्याही गळ्याभोवती रुमाल आहेत

तुमच्यापैकी काही जणांचं लक्ष 'बोली 'कडे नसावं मंदिरामागे मोठ्या दगडी पाटावर चंदन आणि केशर घासणाऱ्या एका पुजाऱ्याकडं तुमच्यापैकी कुणा एकाचं लक्ष जातं तो त्याला विचारतो, " तमे ब्राह्मण छ ?"

हिरजीभाई ब्राह्मण म्हणून हा पुजारीही ब्राह्मण असावा या समजुतीने हा प्रश्न करण्यात आला

" नही हु राजपूत छु. ' तो पुजारी उत्तर देतो प्रश्न विचारणाराला आश्चर्य वाटतं, राजपूत इसम जैन मंदिरात पुजारी ? आश्चर्याचा सुखद धक्का बसतो त्या आश्चर्यातूनच दुसरा प्रश्न विचारला जातो, " तमे राजपूत छ तो पण तमने जैनोनी पूजाविधी वधु आवी छे ? तमने पूजा-पाठ अने पूजामंत्रनी समझण पडे छे केम ?"

पाटावर पाण्याचा शिडकाव करून चंदन आणि केशर घोटणारा पुजारी होकारार्थी मान हलवीत असतो या संभाषणात हिरजीभाई भाग घेऊन म्हणतो, " एकलो मंत्र आवीने चालतु नथी साथे एना तंत्रनी खबर जोईये.. " चंदन घासणाऱ्या पुजाऱ्याला मंत्र येत होते पण तंत्र अवगत नव्हते त्यामुळेच हा असा केशर उगाळीत आहे असेच हिरजीभाईला त्या उद्गारावाटे सुचवावेसे वाटले असावे आपल्याला मंत्र म्हणता येतात आणि तंत्रही उमजते असेही हिरजीभाईला गर्वाने सुचवायचे असावे !

पूजा मंत्रतंत्रावर टिपणी करून हिरजीभाई वळतो व बोली पुकारतो, " भद्रेसरना स्वामी त्रैलोक्यना स्वामी महावीर स्वामी ! . . स्वामीनी पूजानु घी मण त्रणसो एकावन्न ! "

कर्तव्यकर्म करीत असताना जवळिकीने यात्रीच्या संभाषणात भाग घेणारा व जाताजाता सहजगत्या स्वत ची रिझवणूक करणारा हिरजीभाई तुम्हाला मोठा हुन्नरी वाटतो नटाच्या अंगी असणारे गुणही तुम्हाला त्याच्या ठिकाणी आढळतात असा हा हिरजीभाई काही वेळ तुमच्या कौतुकाचा विषय होतो तो मात्र आपल्या विषयात पहिल्यासारखाच रंगतो...

" बोली बोलीने घणा लाभ लेशो भाई . साभळो भाग्यशाली ! प्रभूनी पूजानु घी त्रणसो एकोहत्तर मण ! . त्रणसो एकोहत्तर मण त्रणसो एकोहत्तर मण एक वार ! त्रणसो एकोहत्तर मण बे वार ! .."

आता तीन वार होऊन ही बोली संपणार अशी तुमची खात्री पटते. पण " प्रभूनी घी मण चारसो एक... " ही खणखणीत गर्जना ऐकून तुम्ही चाट पडता ! बोली चढवणारा महाभाग कोण याचा अखेरपर्यंत तुम्हाला सुगावा लागत नाही बोली चढतच जाते हिरजीभाईला कंटाळा येत नाही पूजेसाठी

रांगेत मांडी घालून बसलेले ' नोकारवाळी ' गणून कटाळलेले असतात

अखेरी वेळेचे भान ठेवून हिरजीभाई पुकारतो, ' प्रभूनी पूजानु घी मण चारसो एकताळीस. चारसो एकतालीस मण एकवार.. चारसो एकतालीस मण बे वार.. चारसो एकतालीस मण त्रण वार ! बोलो बोलो भद्रेश्वर भगवानकी जय . महावीर स्वामी भगवान की जय "

अरे वा ! हा चढाव घेणारा भाग्यशाली कुणी ' अमदावादवाला ' असतो ! हिरजीभाईच्या पाठीशी असलेल्या कुणा ' बलशाली 'वर ' भाग्यशाली ' होण्याची पाळी आली नव्हती !. हे त्या ' पाठीराख्या 'चे भाग्य हिरजीभाईचेही भाग्य ! एकशे एक मणाहून हा चढाव चारशे एक्केचाळीस मणापर्यंत चढला होता हे भद्रेश्वराचे भाग्य !

तुमचे संघपती अशोकभाई शहा यांनीही ' फूल पूजे 'चा की दुसरा कोणता तरी चढाव अशाच रस्सीखचीतून घेतलेला असतो याचे तुम्हास समाधान वाटले ! .. आणि तसे वाटणे स्वाभाविक आहे ! स्वत्वाच प्रभुत्व अखेरी कोणालाही श्रेयस व प्रेयस वाटत असते !

तुम्हास नवल आणखी एका गोष्टीचे वाटले !...

तुम्ही ज्याच्याकडे टक लावून पाहत आहात तो ' बाल भगत ' कोण ? . अरे वा ! हा तर संघपती अशोकभाई शहाचा छोटा नातू किरण शहांचा छोटा मुलगा चिरागचा छोटा भाऊ वय पुरं दोन वर्षांचेही नाही ! पण ऐट पहा कशी महान भक्ताची ! लबाड पूजेचा ' जोडा ' घालून उभा आहे ! गुजराथी कासोट्याच रेशमी धोतर वर रेशमी झब्बा असा हा तयार जोडा गळ्यात रेशमी रुमाल हातात चिमुकली थाळी चिमुकल्या थाळीत गंधाची चिमुकलीच वाटी गुलाबाची चार-पाच फुलं मूरतप्रमाणे सूरत इवल्याशा ओठात हसू सगळं कसं निखळ प्राजळ ! नावही प्राजलच ! भद्रेश्वराची पहिली फूलपूजा हा चिमुकला भाविक सर्वांच्या आधी करणार ! तुम्ही त्याच्या मागून ! .

भावडाच्या शर्टाचं टोक धरून सर्वांसमवेत ' कू ' गाडीचा खेळ खेळणारा व सर्वांत शेवटचा डबा बनून सर्वांच्या मागून ओढला जाणारा हा प्राजल आज तुम्हा पूजार्यांच्या आगगाडीचे इंजिन होणार व तुम्हा सर्वांचे डबे त्याच्या मागून एकेक एकेक याप्रमाणे ओळीने जाणार ! आहे की नाही गम्मत ! चिमुरड्या प्राजलची ! तुमचीही ! केवळ तुमच्याच ओठात हसू फुटत आहे असे नव्हे ! जरा वीर प्रभूच्या प्रतिमेकडेही पहा ! भगवानश्रीची प्रतिमादेखील कशी गालातल्या गालात हसत आहे, इवल्याशा भक्ताला पाहून ! प्रांजळपणे ! देवाच्या रूपात बाळ आणि बाळाच्या रूपात देव

दिसतो म्हणतात तो हा असा !

वर्धमान ते महावीर - हा एक प्रवास ! अगणित प्रवासापैकी एक प्रवास, पण इतर असंख्य चाकोऱ्यांतल्या प्रवासाहून अगदीच वेगळा ! .तसा अल्पकाळाचाच, पण कल्पांतापर्यंत– नव्हे, त्यानतरही मार्ग दाखवणारा ! एका मध्यरात्री क्षत्रियकुंडच्या राजवाड्यातून सुरू झालेला आणि एका अवसेच्या मध्यरात्रीच पावापुरी येथे सपलेला !. एका जीवनज्योतीच्या हरपलेल्या तेजातून तिन्ही लोकांवर प्रकाशाचे साम्राज्य पसरवणारा ! एका उग्र तपस्वी जीवनाची इतिश्री करून तेजस्वी पर्वाची पहाट आणणारा ! . एका नव्या तेज:पुंज प्रात:काली नव्या पाडव्याच्या मुहूर्तावर नव्या तीर्थाची मुहूर्तमेढ रोवणारा प्रवास ! पूर्वसूरींच्या तेजाचा तेजस्वी वारसा येणाऱ्या असंख्य पिढ्यांच्या स्वाधीन करून हा तेजोराशींचा भव्य दिव्य प्रवास अमावास्येचा अंधार छेदून क्षितिजापलीकडील अवकाशात समाप्त झाला ! पूर्वसूरींच्याच सुरात सूर मिसळून, 'अगर आखरी यात्रा करनी है। तो वो यात्रा देशसे अदेशमे है।' असे म्हणणाऱ्या कवी बच्चनजींच्या गीतातला असा हा आशयगर्भ प्रवास ! दिगत उजळून टाकून दिशात होणारा ! 'सिद्धात होणारा ! यालाच 'निर्वाण' असं दुसर नाव आहे ! निर्वाण म्हणजे वाण नसलेले गमन ! रंगहीन, रूपहीन, अस्तित्वहीन अवस्थेकडे प्रयाण ! अखेरचे, सरशेवटचे प्रयाण ! जेथून पुन्हा कधीही परतायचे नाही अशा अलौकिक सिद्धाचलावरील सिद्धायतनाकडचे प्रयाण ! वीरा-यतनकडचे प्रयाण !.

माणस येतात आणि जातात ! जाताना ती त्यांच्या पाऊलखुणा उमटवून जातात ! काहींच्या पाऊलखुणा पुसट असतात मद झुळुकेसरशी त्या नाम-शेष होतात ! काहींच्या पाऊलखुणा ठसठशीत असतात ! सुसाट झंझा-वातातही त्या शाश्वत राहतात ! महामानवांच्या अशा दिगत अक्षत पाऊल-खुणांच्या पादुका होतात व जनमानसाच्या सिंहासनावर विराजमान होऊन त्या वर्षानुवर्षे भावल्या जातात या उपासनेला कोणी निष्ठा म्हणतात, कोणी श्रद्धा म्हणतात, कोणी भक्ती म्हणतात ! ही निष्ठा, श्रद्धा, भक्ती डोळस अथवा अंध कशीही असली तरी ती शक्ती, स्फूर्ती, स्थैर्य देते ! याच निष्ठेने, भक्तीने उपास्याचे अधिराज्य शिरोधार्य मानले जाऊन समर्पणाचे अर्घ्य दिले जाते ! यातूनच अद्वैताचे उद्बोधन होते ! मग भाविकाला देवाचे हसणे आणि बाळाचे हसणे समरूप वाटते ! देवाच्या रूपात बाळ आणि बाळाच्या रूपात देव असा एकरूप दिसू लागतो ! ईश्वर ईश्वर

म्हणतात तो दुसरा तिसरा कोणी नसून हाच असावा। सदा सर्वकाळ सर्वा ठायी सर्व रूपांत दिसणारा विशेषत: बाळरूपात भावणारा। उत्पत्ती, स्थिती, लय अशा अवस्थातून सजीव, निर्जीव तरीही चिरंजीव राहाणारा। भावविश्वात नसून असणारा, असून नसणारा, निर्गुण, निराकार, शून्याशी नाते सांगणारा, पूर्णत्वात पूर्णतया विरघळणारा .असीम थांब्यावरून कधीही न परतणारा। भक्ताच्या निष्ठेने, श्रद्धेने, भक्तीने सगुण साकार होणारा। .. भक्तिभावाने गालातल्या गालात गोड हसून खुलणारा, फुलणारा। स्वत: फुलून दुसऱ्याला फुलवणारा, हसवणारा। निर्गुण निराकार शून्यातही, सगुण साकार रूपातल्या परिपूर्ण तरीही सीमित स्वरूपातच अंगुठ्यापासून मस्तका-पर्यंतची नवअंगी सद्‌गुणपूजा पुनीत मानून, पूजकाला नखशिखांत अष्टांग मोहरून टाकणारा। स्वत: सगुण साकार भव्यदिव्य लौकिक गोचर रूपात गंधाचे तिलक अंगीकारीत अर्चकांना निर्गुण निराकार अशा अलौकिक निर्बंध 'कायोत्सर्ग' अवस्थेत नेऊन पोचवणारा। निर्ग्रंथ। असा हा बहुरंगी, बहुढंगी, बहुगुणी तरीही नि:शेष शून्य शून्यांक आणि तरीही परिसीमेचा परिपूर्ण पूर्णांकही असा हा बिंदुसिंधु। .

अरिहंत, सिद्ध, आचार्य उपाध्याय, साधू, दर्शन, ज्ञान, चारित्र्य आणि तप यांना जैन सिद्धांत शास्त्रात 'नवपद' म्हणतात या नवपदासाठी प्रभु बिंबाची 'नवांगी' पूजा होते नवांगी पूजा म्हणजे दोन चरणांचे दोन अंगुठे, दोन गुडघे, दोन स्कंध, भाल, वक्ष आणि नाभी म्हणजेच पद्मासनात नाभीजवळ जुळवलेले करतल अशा नऊ अंगाची चंदनकेशराचे तिलक लावून केलेली पूजा। कोणी कोणी ही पूजा अनेक भावांनी अनेक अंगीही करतात। नवांगी पूजन शास्त्रसंमत असूनही। .ज्ञान, दर्शन, चारित्र्य आणि तप यांच्या सम्यकत्वाने अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या व्रतांच्या परिपूर्तीसाठीही स्वामी बिंबाची नवांगी पूजा होत असते। मूर्तिपूजक असामान्य गुणांना मूर्त स्वरूप देत असल्याने अशा प्रतिकात्मक मूर्तीची पूजा अपार श्रद्धेने व प्रखर जाणिवेने पार पाडली की उपासक नवरंगात न्हाऊन निघतो। लौकिक अर्थाने महामानव म्हणजे 'देव माणसे' जगाला मार्ग-दर्शन व समाजाचे नियंत्रण करीत असली तरी अलौकिक अर्थाने 'देव जगन्नियंता आहे ही कल्पना जैन तत्त्वप्रणालीत बसत नसूनही या प्रतिकाच्या स्मरणासाठी ही पूजा होत असते।

गणित शास्त्रात शून्याला जी अतीव सूक्ष्मता आहे तीच जैन सिद्धांता-प्रमाणे 'देवा'ला आहे। देवाचे शरीर सूक्ष्म परिमाणूचे बनलले असल्याने ते अतिसूक्ष्म म्हणूनच अदृश्य असते। भाविक आपल्या श्रद्धेच्या सामर्थ्यावर

या सूक्ष्मतेला अशी विशालता बहाल करीत असतात व अदृश्य रूपाला अशा दृश्य रूपात पाहात असतात । शून्यात सागर पाहाण्याची हीही रीत असू शकते जी 'मंदिरमार्गी' या नावाने संबोधली जाते । मंदिरमार्गी 'सिद्धा'ला अशा 'तीर्थंकर', 'वीतराग' अथवा 'अर्हंत' रूपात पाहतात । यांच्या भावविश्वातला 'देव' हा असा असतो । 'देव', 'तीर्थंकर', 'सिद्ध' या स्थिती वेगळ्या असूनही पूर्णत्वाला पोचलेला आत्मा म्हणजेच परमेश्वर, या अतीव श्रद्धाळू भावनेने भाविक पद्मासनात अथवा कोसग्ग अवस्थेत ही रूपे एकरूप पाहातात । सिद्धपदाच्या प्राप्तीची क्षमता आणि समर्थता 'देवा' पेक्षा 'मानवा'त अधिक असूनही मानव 'देवा'पुढे असा नतमस्तक होतो तो तीर्थंकराला 'देव' मानण्याने । हाही एक भावच । अग्नी, वरुण, पवन आदी अगाध शक्तींना वैदिक देव मानतात, तर उद्धरित मानवांनाच जैन देवपण बहाल करतात । 'भाव तसा देव आणि भाव तेथे देव' असतो तो असा । भक्ताला हवा तसा । अरूप रूपात । ..'वन्दे, तद्गुण लब्ध्ये' या अपेक्षेने अरूप रूपाची अशी अपरूपाने पूजा होते । . निर्गुणाची गुणासाठी पूजा हा प्रकार थोडा अजब नाही का । अजब कसा । सद्-गुणातूनच त्याला हे निर्गुण रूप लाभल ना । ...म्हणून ही गुणपूजा । गुणपूजा करण्याने दुर्गुणी सद्गुणी होऊन त्याची गुणवत्ता गुणात्मकतेने गुणित होत राहते या अढळ श्रद्धेने अशी अरूप पूजा होत राहते ।

सृष्टीचा म्हणजे नियतीचा कोणी निर्माता अथवा नियता नसून ती स्वय-सिद्ध आहे ही तीर्थंकरांची तत्त्वधारा भगवान महावीरांचे शिष्य गोशालक यानी महावीराचे शिष्यत्व झुगारून वेगळी वाट धरली व 'आजीवक' विचारसरणीचा पुरस्कार केला या आजीवक मताप्रमाणे नियतीत सर्व काही नियत असून पूर्वी ठरल्याप्रमाणेच सर्व घडत राहते व तसेच घडत राहणार असते मनुष्य सुख-दुख भोगतो त्याला काही कारण नसते म्हणून ती टाळणे त्याला शक्य नसते मानवी प्रयत्नाने या नियत घटना बदलू शकत नाहीत हा आजीवकाचा 'नियतवाद' । .' 'होणारे न चुके होईल जरी ब्रह्मा तया आडवा' या उदासीन वृत्तीने व सुखासीन प्रवृत्तीने मनुष्य निष्क्रीय व दुर्बल बनतो । यासाठी डोळे उघडे ठेवून या नियत घटना केवळ पाहत राहणे महावीराना मान्य नव्हते म्हणून हा नियतवाद त्यांना अमान्य होता । मनुष्य प्रयत्नाने सर्व काही बदलू शकतो अशी त्यांची निष्ठा होती यासाठी आत्मोन्नती आणि आत्मोन्नतीसाठी कषायमुक्ती असे त्याचे प्रतिपादन होते कषायमुक्ती म्हणजे कर्मबंधातून किंवा कुकर्मातून मुक्ती । त्यांच्या अनुयायांनी या तपस्येसाठी आदर्शांच्या प्रतिमा निर्माण केल्या म्हणूनच अशा प्रतिरूपाची

। अशी अप्रूप पूजा होत राहते ..' तद् गुण लब्धे ' या अपेक्षेने । तुझ्या देहात तू कोण आहेस या शोधासाठी, मूर्तीची नव्हे तर मूर्तिमानाची म्हणजे गुणमानाची पूजा होत राहते ।

अशी पूजा प्रभूचे जन्मगाव क्षत्रियकुड अथवा निर्वाणस्थान पावापुरी इथे जाऊनच करायला हवी असे थोडेच आहे । तशी संधी मिळाली तर फारच छान । पण अगदी दुसऱ्या टोकावरच्या कच्छ भद्रेश्वर या तीर्थस्थानी ती तितक्याच प्रकर्षाने व प्रभावाने होऊ शकते .नवकार महामंत्रातील नवपद माहात्म्याच्या प्रभावी मथितार्थाने नवांगी पूजा करून मनाच्या इवल्याशा टिंबानही प्रभूबिंब मनोभावे सामावून घेता येते । नाहीतरी शून्यात विलीन झालेल्या प्रभूला जागा कुठे लागते । स्थानकवासी जैन, मूर्ती नसलेल्या 'स्थानका'त आराधना अशीच करतात !. विनाचंदन, विनाकेशर, विनाफूल, विनागंध ही पूजा सुवासित होते । चंदन, केशर, फूल, गंध आदींनी होणारी पूजा तर अधिक सुगंधित होत असते !.. द्रव्यपूजा आणि भावपूजा भिन्नभिन्न असल्या तरी अखेरी त्या पूजाच । अता हा सुगंध मनाच्या कुपीत भरून तुम्ही मंदिराबाहेर पडता ।

# सात

ज्ञानाची महती सर्वच धर्मांनी गायिलेली आहे जैन शासनात सम्यक् ज्ञान, सम्यक दर्शन, आणि सम्यक् चारित्र्य या तीन बहुमोल तत्त्वांना अधिक महत्त्व आहे ! सम्यक् ज्ञान, सम्यक् दर्शन आणि सम्यक चारित्र्य म्हणजेच मोक्षमार्ग ! जीनेश्वरप्रणित या तिन्हीही मोक्षदात्या रत्नांना ' रत्नत्रयी ' म्हणतात ! ही रत्नत्रयी कर्मावृत्त आत्म्याचे शुद्धस्वरूप अनावृत्त व प्रकाशित करून आत्म्याला मुक्तिधामाला पोचविते

सम्यक् ज्ञान म्हणजे तीर्थंकरप्रणित उपदेशावर व उपदेशपर धर्मावर मननपूर्वक व मनःपूर्वक श्रद्धा ठेवणे ! सम्यक् दर्शन म्हणजे तीर्थंकरांच्या उपदेशाचे अर्थात त्यांनी सांगितलेल्या ' धर्मा ' चे आकलन करून घेणे आणि सम्यक चारित्र्य म्हणजे या उपदेशपर धर्माचे व्रतपूर्वक आचरण करणे. म्हणूनच जैन शासन ज्ञान, दर्शन आणि चारित्र्य याच्या सम्यकत्वावर म्हणजे यथार्थतेवर अधिक भर देते ज्ञान म्हणजे श्रद्धा हा या तत्त्वप्रणालीचा पाया असून चारित्र्य तिचा कळस आहे ! ज्ञान आणि चारित्र्य ही दर्शन रथाची म्हणजेच धर्मरथाची दोन महत्त्वाची चाके आहेत आणि या दोन चाकावर धर्मरथ उभा राहत असतो व चालतो ! ..जैन दर्शन सम्यक् चारित्र्यावर अधिक भर देते शुद्धाचरणाने चारित्र्य सपन्न होत असते ! केवळ श्रद्धा ठेवली आणि ज्ञानप्राप्ती झाली की तपस्येचे साफल्य होते असे वैदिक मानतात साधनेची सागता ज्ञानसिद्धीत आहे असे ते समजतात या मनोधारणेतून आचरणात शिथिलता येते उलट, ज्ञानप्राप्ती झाल्यावरही आचारधर्म कटाक्षाने पाळला पाहिजे असे तीर्थंकर प्रतिपादतात

' रिलिजन.. लेट अस टॉक ऑफ इट लेस, प्रॅक्टीस मोर !' असे साधू वास्वानींनी अगदी अलीकडे जे सांगितल, ते महावीरादी तीर्थंकरांनी हजारो वर्षांपूर्वी सांगितलेल आहे ! पूर्वसूरींच्या विचाराची कावड पुढेही अनेक

साधुसंतांनी सातत्याने वाहून नेलेली आहे। तप हे चारित्र्यामध्ये अभिप्रेत असूनही जैन शासनाने रत्नत्रयीबरोबर तपालाही स्थान दिलेले आहे. कर्म-बंधाच्या मुक्ततेत खरीखुरी मुक्ती असल्याने चारित्र्य संवर्धनातून कर्मक्षय साधण्यासाठी आचारधर्माची महाव्रते साधूसाध्वींना व अणुव्रते श्रावक-श्रविकांना महत्त्वाची आहेत. तसेच सद्बुद्धी, सद्गती आणि सत्कुल प्राप्तीसाठी तपाचरण आवश्यक आहे असे जैन शासन प्रतिपादते. हे तपा-चरण म्हणजे कर्मठ क्रियाकांड नव्हे। केवळ कर्मकांड म्हणजे धर्मकांड नव्हे!

साधु-साध्वी, श्रावक-श्राविका यांच्या व्रतपालनातील प्रतवारी, कोणतीही गोष्ट परिपूर्ण असू शकत नाही, त्यामुळे ती सीमित असते, हे शास्त्रशुद्ध तत्त्व प्रतिपादते. अर्थातच यामुळे अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य या आचारपंचकालाही मर्यादा पडू शकतात। कर्मक्षय म्हणजे निष्क्रियता असा संकुचित अर्थ जैन सिद्धांताला संमत नाही. तसे असते तर 'मनुष्य जन्मसे नही कर्मसे महान बनता है' असे 'कर्मवादी' प्रतिपादन महा-वीरांनी केले नसते. तेव्हा कर्मबंधातून मुक्तता म्हणजे क्रियाशून्यता नव्हे तर कषायांच्या आस्रवांना प्रतिबंध. याप्रमाणे व्यापक कर्मसिद्धांत सांगणारे महावीरांसारखे तीर्थंकर लौकिक अर्थाने श्रेष्ठ कर्मयोगीच होते। म्हणून जैनांना 'निष्क्रिय' म्हणणे योग्य नव्हे। 'योगायोगाने महात्मा बुद्धांची आणि माझी भेट झाली तर ध्यानाऐवजी कृतीचा संदेश आपण लोकांना का दिला नाही असे मी त्यांना आवर्जून विचारीन' असे उद्गार गांधीजींनी महावीरांच्या बाबतीत काढले नाहीत ही गोष्ट या समर्थनास पुरेशी आहे। आचारधर्म हे कृतीचेच एक सुस्वरूप आहे। ध्यानसाधनेतून अंतिम ज्ञान-साधना नसून तपोसाधना सुद्धा दर्शन, ज्ञान आणि चारित्र्य या त्रिगुणात्मक रूपासाठी अखंड आवश्यक आहे। ब्रह्मा, विष्णु, महेश हे त्रिगुणात्मक रूप यात पाहता यावे। धम्म, बुद्ध, आणि संघ यांचीही रूपे यात 'समरूप' पाहता यावीत।

आचारधर्माच्या संकल्पनेतून अनेक ठिकाणी जिनालयाशेजारी ज्ञान-मंदिरे आणि पौषधशाला बांधल्या जातात. ज्ञानमंदिरात वंदनीय आचार्य गुरुदेवांच्या जीवनातले उद्बोधक प्रसंग भिंतीवर चित्रित केलेले असतात. त्यांची बोधवचनेही आतील भिंतीवर रेखलेली असतात. ज्ञानमंदिरांचा उपयोग धार्मिक शिक्षण देणाऱ्या पाठशालेसाठी व धार्मिक ग्रंथालयासाठीही करतात. काही काही ठिकाणी ज्ञानमंदिरे असूनही स्वतंत्र गुरुमंदिरेही असतात. शिखांच्या गुरुद्वाराची व गुरुद्वारात ग्रंथसाहेब ठेवण्याची कल्पना या ज्ञानमंदिराच्या कल्पनेतून स्फुरलेली असावी। . पौषधशाला व्रत-

पालनाची कद्रे असतात मदिराच्या परिसरात उपाश्रयेही असतात ही उपाश्रये ' चैत्यालये ' किंवा ' अपासरे ' याही नावानी ओळखली जातात विहार करणारे साधुसाध्वी या उपाश्रयात वास्तव्य करतात व त्या स्थानी त्यांची प्रवचनेही होतात !

श्री भद्रेश्वर मदिराच्या बाहेरच्या प्रागणात ' एक लाख तीस हजार जैनेतर प्रतिबोधक जगम युगप्रधान सद्‌गुरू श्री जिनदत्त सूरीश्वरजीं 'च ज्ञानमदिर असून बादशहा अकबराने पट्टराणी जोधाबाई हिच्या प्रेरणेने श्री जिनदत्त सूरीश्वरजीकडून प्रतिबोध घेतल्याचा इतिहास या गुरुमदिरात भिंतीवर चित्रित करण्यात आला आहे जिनदत्त सूरीश्वरजीप्रमाणेच आचार्य बुद्धिसागर, आचार्य हीरविजय सूरीश्वरजी याच्या प्रबोधनांचा अकबराच्या जीवनावर खोल ठसा उमटला होता एकदा बादशहा अकबराने आचार्य हीर विजयसेन सूरीश्वरजींना दिवाण-इ-खासमध्ये पाचारण केले असता आचार्यांनी तेथे अथरलेला गालिचा काढण्यास सांगितले. बादशहाने कारण विचारताच आचार्यांनी सांगितले की त्या गालिचाखाली जीव-जिवाणू असू शकतात व ते न दिसण्याने त्याची नकळत का होईना हत्या होऊ शकते ! आचार्यांच्या या प्रतिपादनावर बादशहा अकबराने गालिचा काढण्यासाठी हुकूम सोडला आणि आश्चर्य हे की, गालिच्याखाली छपून बसलेल्या एका सर्पाचे बादशहाला दर्शन घडले ! हे दर्शन लौकिक अर्थाने एका सर्पाचे होते पण अलौकिक अर्थाने ते अलौकिक दर्शन होते बादशहा अकबराच्या दिने-इलाही धर्माचे बीजारोपण त्यात होते !

जैन प्रबोधनाचा अकबर बादशहावर गहिरा परिणाम झाला होता म्हणून तर त्याने शत्रुजयसारख्या जैन तीर्थस्थानी हिंसेला बदी घातली होती व अशा फर्मानाचे ताम्रपट त्याने जैन सघाला बहाल केले होते. एवढेच नव्हे तर वर्षाकाठी सहा महिने त्याने मासाहार वर्ज्य केला होता जहांगीर बादशहाने सहिष्णुतेने सवलती देण्यात थोडेफार वडिलाचे अनुकरण केले होते शहाजहान बादशहा मात्र या बाबतीत थोडा ताठर होता पण त्याचा मुलगा म्हणजे औरगजेब बादशहाचा भाऊ दारा शिकाह, जो औरग-जेबाच्या दृष्टीने ' काफिर ' होता, तो स्वत ला ' वीतराग ' म्हणवून घेत होता अकबर बादशहाच्या वेळी पेरलेल्या सस्काराना उशिरा का होईना असे फळ लागले होते !

अकबरकालीन त्रिभुवन गिरीराज गुजरातनरेश कुमारपाल राजा, राज-पुतान्यातील अतीराज, सोमाजी, सिंहाजी आदी राठोड नरेश इत्यादी

सा. ६

जैनेतरानी आचार्य भगवत श्री जिनदत्त सूरीश्वरजींकडून जैन दीक्षा घेतल्याचे प्रसगही येथे चित्रित करण्यात आले आहेत याप्रमाणे एक लाख तीस हजार जैनेतरांना जैनी दीक्षा देण्याचा बहुमान श्री जिनदत्त सूरीश्वरजींना लाभला होता व त्यांच्या या अलौकिक कार्याचे स्मरण होऊन तसे अद्वितीय कार्य करण्यास इतरांना स्फुरण मिळावे या हेतूने हे गुरुमदिर या स्थानी त्याच्या भक्तगणानी उभारले आहे ।

येथील श्री वर्धमान कल्याणजी ट्रस्टचे श्री वर्धमान भोजनालय या आवारातच आहे तुमच्या भोजनाची व्यवस्था महेन्द्रभाईकडे असल्याने या भोजनशाळेत तुम्ही भोजन घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही तरीही तुम्हास माहीत असावे, या भोजनशालेत एका वेळच्या जेवणाचा दर सध्या साडेतीन रुपये असून दोन वेळचे जेवण ' सवलतीच्या दरा 'ने सहा रुपयांत दिले जाते ! तीर्थस्थानी यात्रार्थींना विनामूल्य जेवण देण्याची पूर्वापार प्रथा होती, ती आता बहुसख्य ठिकाणी इतिहासजमा झाली असून सर्वच गोष्टीत असा व्यवहार घुसला आहे हा काळाचा महिमा मानावा लागेल । या काळाच्या पावलानी चहापानाचे दुकान, पानाचे दोन ठेले, देना बँकेचे कार्यालय, दवाखाना अशा आजकालच्या गरजेच्या बाबी या आवारात अवतरल्या आहेत व त्या मदिराच्या प्राकारातील प्रवेशद्वाराजवळच ठाण माडून बसल्या आहेत ।

आता तुम्ही जेथे उभे आहात तो ' जगडशाना महेलना खंडेर ' आहे । ' धननी जेटलो त्याग तेटलो धर्म, जेटलो धननो सयोग एटलो अधर्म ' हा संदेश कृतीने देणाऱ्या जगडू शहाच्या महालाचे खिडार पाहून काही क्षण तुम्ही व्यथित होता । आयुष्यभर चदनाप्रमाणे झिजून या पुरुषोत्तमाने समाजाकडून जे जे मिळवले होते ते ते सर्व याने या ना त्या रूपाने समाजाला परत केले होते । या श्रेष्ठीला ही सपत्ती जशी स्वकीयाकडून मिळाली होती तरी परकीयांकडूनही मिळाली होती ही दौलत जशी त्याना स्वधर्मीयांकडून मिळाली होती तशी परधर्मीयाकडूनही मिळाली होती म्हणून या श्रेष्ठीने या सपन्नतेतून उदार मनाने मदिरे उभी केली होती आणि मशीदीही उभ्या केल्या होत्या याच उत्पन्नातून या दयाघनाने अन्नछत्रे चालविली होती हा हिंदू,हा मुसल्मान, हा श्रावक, हा भ्रांतक असा भेदाभेद न करता या मानवश्रेष्ठाने प्रदीर्घ काळाच्या दुष्काळात सर्वधर्मीयांचे लाख मोलाचे लाखो प्राण वाचवले होते अशा या नरश्रेष्ठाचा महाल त्याच्याच कर्मभूमीत अशा भग्नावस्थेत [illegible] हे [illegible] म्हणावे लागेल । कृतज्ञतेसाठी दाखवला जाणारा

हा निष्ठुर कृतघ्नपणाच मानावा लागेल ! कोटयावधी रुपये मंदिरासाठी खर्च करणाऱ्या जैन मंडळींना त्यांच्या स्फूर्तिदात्याची आठवण भरीव स्वरूपात राहावी असे वाटू नये ! या खंडित महालाचे जे काही दगड आता उरलेले दिसतात ते कालांतराने दशदिशांना विखुरतील आणि हा 'जगडूशाना महेलना खंडेर !' असे अभिमानाने सांगता येईल अशी कुठलीच नामोनिशाणी येणाऱ्या पिढ्यासाठी या स्थानी उरणार नाही ! तेजस्वी इतिहास घडवणाऱ्या इतिहासपुरुषाची ही तुटकी फुटकी 'खंडित' आठवणही कायमची बुजून जाईल !

या भूमीचे शासनदेव आता तीर्थंकर भगवान महावीर आहेत ज्यांची येथे नित्य महापूजा होते त्या भगवान महावीरांनी 'केवलज्ञाना'ची प्राप्ती झाल्यानंतर पूर्वेकडील मध्यम पावा नगरीत पहिल्याच 'समवसरणा'त प्रवचनद्वारा प्रतिपादले होते, 'देव माणसापेक्षा मोठा असू शकत नाही !. ज्या माणसाच्या जीवनात अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या व्रतांचे प्रामाणिकपणे पालन होते अशा माणसापुढे देवसुद्धा विनम्र होतो !' महावीरांचा हा संदेश कृतीत उतरवण्यासाठी महावीरांनी स्थापन केलेल्या चतुर्विध संघाने जगडू शहासारख्या महामानवापुढे जागरूकतेने नतमस्तक व्हावयास हवे होते, परंतु पूर्वेकडील हा प्रातःकालचा दिव्य प्रकाश दिगंतात पसरूनही, पश्चिमेकडील कच्छ भद्रावती अज्ञानाच्या अंधःकारातच राहावी ही एक प्रकारची निद्रावस्थाच समजावी लागेल ! ..

जगडू शहाच्या वाडयाचे हे खिंडार डागडुजी करून किंवा निदान आहे अशा स्थितीत सुरक्षित ठेवण्याचे उत्तरदायित्व दातृत्वाचा वारसा सांगणाऱ्या त्यांच्या उत्तराधिकाऱ्यावर आहे, त्यांच्या औदार्याचे गुणगान करणाऱ्या चतुर्विध संघावर आहे ! श्रावक धर्माचा हाही एक भाग आहे याची जाण कृतज्ञतेच्या जाणिवेतून निर्माण व्हावयास हवी ! नाही तर भयानक दुष्काळ जेव्हा जेव्हा येईल व त्याचे काळेकुट्ट सावट जेव्हा जेव्हा प्राणिमात्रावर पडेल तेव्हा तेव्हा अशा दुष्काळावर प्रचंड मात करणारा जगडू शहासारखा कोणी मातब्बर, जगडू शहाचा विसर पडल्याने, या पृथ्वीतलावर पुन्हा अवतरणार नाही !

श्री भद्रेश्वरव्यतिरिक्त इतरत्रही मंदिरे बांधणाऱ्या या जगडू शहाची चिरंतन स्मृती काळाने इतरत्र करून ठेवली आहे ही एका परीने समाधानाची बाब आहे ! द्वारका 'सुदामपुरी पोरबंदर या मार्गावर द्वारकेपासून पासष्ट किलोमीटर अंतरावर पश्चिम समुद्र किनाऱ्यालगतच्या गांधवी गावाजवळील कोयला टेकडीवर श्री हरसिद्धी जगदंबा माताजीचे मंदिर या

जगडूशहाने बाधले आहे या मदिरात माताजीच्या मूर्तीजवळच जगडू शहाची मूर्ती आहे श्री हरसिद्धी माताजीच्या मूर्तीबरोबरच याही मूर्तीची आजही तेथे पूजा होते ! जैनानी यातून खूपच बोध घेण्यासारखा आहे तरच भद्रेश्वर येथील 'जगडूशाना महेलना खडेर 'ची योग्य रीतीने रक्षा होईल ।

कच्छ म्हणजे कासोटा अर्थाने लगोट किंवा कच्छप म्हणजे कासव ..अशा लगोटासारख्या किंवा कासवासारख्या आकाराचा हा प्रदेश म्हणून याचे नाव कच्छ । ...

क्षत्रियाचे एकवीस वेळा शिरकाण करून परशुरामाने जिकलेला नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेश कश्यप ऋषीला दान केला होता हा मुनी या भूभागाचा प्रजापती झाला होता याच्याच नावावरून कच्छप व पुढे अपभ्रश होऊन कच्छ असे नामाभिधान या भूखडाला लाभले असण्याचीही शक्यता सभवते ! 'कच्छसि कच्छे, नदीजल परिवेष्टिते वृक्षादिमति प्रदेशे' या वचनाप्रमाणे नदीनाल्यांनी वेढलेला आणि झाडाझुडुपांनी झाकलेला कच्छ ! किंवा 'शियाळे सोरठ भलो, उनाळे गुजरात, चोमासे वागड भलो, कच्छडो बारे मास' या स्तुतीप्रमाणे हिवाळ्यात सोरठ देश, उन्हाळ्यात गुजरात, वर्षाकालात काठियावाड आणि बाराही महिने हवाहवासा वाटतो तो कच्छ ! पण असा कच्छ आता कच्छ राहिला नाही 'जलमय देश' हा अर्थ 'कच्छ' या नावातच राहिला असून वास्तवात 'कच्छ' 'विकच्छ' झालेला आहे ! 'धरतीकप अने वावाझोडुनो झटको वारवार' बसण्याने होत्याचे नव्हते बनून कच्छ, आता एका बाजूने 'रण' व दुसऱ्या बाजूने 'आखात' अशा 'अर्धवट' व विचित्र कोंडीत सापडला आहे ! भद्रेश्वरपासून अवघ्या तीन चार किलोमीटर अतरावर असलेला कच्छचा आखात किनारा पाहण्याची इच्छा कुणालाही होते ! दूरवरच्या कच्छमध्ये येऊन कच्छच्या उत्तरेकडील रण आणि दक्षिणेकडील आखात पाहायला हवे असे कुणालाही वाटणे साहजिकच आहे ! या ओढीनेच मोहरा आखाताकडे वळतो आखाताकडे जाणारा रस्ता तसा कच्चाच आहे जिकडे नजर टाकावी तिकडे, चौफेर विखुरलेली बाभळीची बने ! कुणा एका कवीने कच्छचे वर्णन अगदी मोजक्याच शब्दांत असे केलेले आहे

'बेर, बूरी ने बावरी । वरी कढाने ब्या कच्छ ।।'

बोर, थोर आणि बाभळ अशा काटेरी झाडोऱ्यानी झाकलेला प्रदेश असे कवीने केलेले कच्छचे वर्णन तुम्हास यथार्थच वाटेल ! कारण जिकडे तिकडे

असलीच काटेरी झाडे ! एरंडाची झाडेही अधून मधून या भागात दिसतात पण रस्त्याच्या दुतर्फा बाभळीच्याच रांगा ! पिवळ्या हिरवट लाबट शेंगानी प्रत्येक झाड लडबडलेले जागजागी जशी बाभळीची बने, तशीच बोरीची आणि थोराची ! थोर म्हणजे निवडुग या काटेरी बनात मोर आणि लाडोरीचा वावर पाहून कुणीही थक्क व्हावे ! रसिकतेला काटेरी रुक्षतेचे वावडे नसावे असेच वाटावे ! धरणीकंपानी उद्ध्वस्त केल्यानतर रमणीयतेने या प्रदेशाची साथ सोडली म्हणून मोर-लाडोरीनी या प्रदेशाची अशाही हीनदीन अवस्थेत साथ सोडली नाही, हे कोणीही यांचेपासून शिकावे ! अशाही काटेरी वनात 'ही बघ तुझ्या उन्हात, बाभुळबनात' हा 'ऊन-सावली'तला शिवणापाणीचा खेळ खेळीत लाडोर मोराला हुलकावण्या दाखवीत असावी असेच भासावे ! बाभळीची सावली ती काय ! पण अशा फाटक्या लक्तरलेल्या सावलीत रखरखीत उन्हाची झळ हसत खेळत सोसावी हेही यांच्यापासून शिकावे !

अशा वनवासातही मोर आपल्या धुंदीत आणि मस्तीत नाचत असतो. एकटा मोरच नाचत नाही तर त्याची मोरनीही 'मैं हू मोरनी मोरनी. . जगलकी मोरनी ! ..' असे मधुर पण मुग्ध कठाने गात गात त्याच्याभोवती पिंगा घालते !

'नग झुरूस मोरावाणी' हा कविकल्पनेतला मयूरविरह येथील मोराच्या वाट्याला येत नसतो, कारण त्याना अशाही 'रणवासा'त लाडोरीची सदासर्वकाळ सोबत लाभत असते ! मग झुरायच कुणासाठी आणि का ? सदाबहार मधुमासात मधुर सगत कोणीही करील, पण ती सदाकदाच्या शुष्कमासातही करायला हवी हाही धडा याच्याकडून शिकावा व तो कित्ता म्हणून मन पूत याच्याप्रमाणे गिरवावा ! 'सावन का रास्ता न देखो.. सावन जाने कब आयेगा. ' या प्रखर वस्तुस्थितीची जाणीव जणू यांच्या अंगवळणी पडली असावी ! म्हणूनच की काय, यांना ना खेद ना खत ! पूर्वीच्या 'आय सी एस 'च्या प्राथमिक मुलाखतीत एका उमेदवाराला 'तुम्ही ताशी किती मैल वेगाने चालता ?' असा सकृद्दर्शनी साधा पण तितकाच खोडसाळ प्रश्न विचारण्यात आला होता त्या इरसाल पण तडफ-दार तरुणाने बेधडकपणे सडेतोड उत्तर दिले होते, 'एकटा असेन तर ताशी दोन मैल ! सोबत सुदर तरुणी किंवा प्रिया असेल तर ताशी चार मैल !' मोर आणि मोरनी यांना हे बाभळीचे बन यासाठीच एकमेकांच्या सहवासात भावत असावे ! न जाणो, 'ये कितने अच्छे लगते है .. ये धरती .. ये

नदीया. . ये रयना . और तुम ! ' असे यांना म्हणायला सांगितले तर ' रयना 'ऐवजी ' रन ' हा शब्दप्रयोग रेटून नव्हे तर सुखासुखी करायला हे सकोचणार नाहीत ! प्रीतीच्या कैफात ' रयना और रन ' म्हणजेच ' मीलन आणि रण यांना सारखेच ! मीलन रणातले असले तरी बिघडले कुठे ! मीलन ते मीलनच ! ' रैना ' म्हणजे रात्र, रणातही याना प्रियच !

' ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी ' या उक्तीची आठवण होऊन बोरी-बाभळीच्या जोडीला येथे ' बूरी ' म्हणजे ' थोर ' किंवा ' निवडुंग 'ही असतो याची कुणालाही गम्मत वाटावी ! पण ही सगळी मडळी तशी ' गावची ' नसून ' गावकुसाबाहेर 'ची ! झाडाझुडपांतही हे दलित ! काटेरी प्रकृतीमुळे तसे विद्रोहीच ! ' सुबाभळ 'ही याही ' दलिता '-तली ' सुसस्कृत ' ' पांढरपेशी ' बाभळ की काय, या भलत्याच पण अफला-तून विचाराने अग उगाचच थरथरावे ! ही ' सुबाभळ ' तशी मुळात ' कुबाभळ ', पण अडीअडचणीच्या वेळी या बहिष्कृत कुबाभळीतले सद्‌गुण जसे माणसांना दिसले तशी ही ' कुबाभळ ' ' सुबाभळ ' झाली ! दलितांच्या उद्धारासारखाच हाही एक उद्धार ! प्रांगणातच नव्हे तर रणांगणात व रणातही तुम्हाला हे असे काव्य सुचावे ! या वनवाशांना पाहून ' वनवास हा सुखाचा ' या ऐवजी ' रणवासही सुखाचा ' असे वाटावे ! फ्लेमिंगो सारस, रोहित, कोयल, तीतर यांची साथ असो वा नसो, रणवासातही सुखा-समाधानान रहावं हे याही वनवाशापासून मनोमन शिकाव ! भले कुण्या कवीने, ' रानात पाखरांची नाही कुठे निशाणी, रोमांचल्या ऋतूनी जावे कुण्या ठिकाणी ' असे उद्विग्नतेने अथवा उदासीनतेने म्हटले असले तरी ! ' फ्लेमिंगो ' पक्षांनी या रणातली ओलवण आटत चालली म्हणून, या प्रदेशाशी असलेले प्रदीर्घ हितसबंध तोडून, या प्रदेशावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला असला तरी !

आखाताकडे जाणारा रस्ता निम्मा अर्धा सरल्यावर रस्त्यातच एका बाजूला बोराच्या बनात एक दर्गा दिसतो तर तिथेच दुसऱ्या बाजूला बाभळीच्या बनात शकराचं देऊळ ! कच्छमध्ये खाडीला ' नार ' म्हणतात ! ' भरती 'च्या वेळचा ' उच्छृखलपणा ' हिने ' नारी 'पासून उचलला असल्या-मुळे हिला ' नार ' म्हणत असावेत की काय न कळे ! खाडीलगतच्या मंदिरातला शकर ' नारेश्वर ' या नावाने ओळखला जातो हे नारेश्वराचे मंदिर विक्रम सवत ११९५ मध्ये गुजरातचा सोळकी राजा कुमारपाल याने बांधल्याचा बोध येथील पुजाऱ्याकडून होतो मंदिराबाहेरच्या शिलालेखावर कुमारपाल राजाचा व त्याच्या या कामगिरीचा उल्लेख असल्याचेही तो

आवर्जून सांगतो एवढेच नव्हे तर या परिसरातील भद्रा या सुंदरीशी लग्न केल्यानंतर कुमारपालराजाने जैन धर्माची दीक्षा घेतली होती हीही तुमच्या ज्ञानात भर घालणारी माहिती तुम्हास हा ' ज्ञानगिरी ' नावाचा लिंगायत पुजारी देतो। कुमारपाल राजाने अनेक सुंदरीशी लग्ने केली होती त्याच्या अनेक राण्यांपैकी ही भद्रासुंदरी एक राणी असू शकेल। शिवाय भद्रेश्वर येथील श्री जिनदत्त सूरीश्वरजींच्या गुरुमंदिरात कुमारपाल राजासह एक लाख तीस हजार जैनेतरांनी जैन दीक्षा घेतल्याचा जो उल्लेख आहे त्याच्याशी कुमारपाल राजाच्या जैन दीक्षेचा या पुजाऱ्याने दिलेला संदर्भ जुळतो। .. नारेश्वर मंदिराच्या जडण घडणीत जगडू शहाचा वाटा असल्याचा वृत्तांतही हा पुजारी सांगतो आणि हे ऐकून जगडू शहाच्या सर्वधर्मसमभाव वृत्तीचा इथे साक्षात्कार घडतो।

नारेश्वर मंदिराच्या देवडीवरून क्षणभर मागे वळून पाहिले की प्रचंड तटबंदीतील श्री भद्रेश्वराची श्वेत वास्तू एखाद्या स्वतंत्र बेटासारखी भासते पुढे नजर टाकली की मिठागरांनी माखलेला पांढराशुभ्र आखात किनारा नजरेस पडतो

किनारा जसजसा जवळ येतो तसतसा मासळीचा उग्र दर्प तुमच्या नाकात भरून तुम्हास गलबलल्यासारखे होते तशातच एक सडपातळ कृश उंचेली व्यक्ती टाचा न टेकवता पायांच्या चवड्यावर धावत धावत तुमच्याजवळ येते व हात जोडून तुम्हास म्हणते, " अचो प्येडामई–"

बहुधा तो कच्छी भाषेत ' या नमस्कार ' असे म्हणाला असावा असा तुम्ही सर्वजण त्याच्या हावभावावरून तर्क करता ओळख नसतानाही त्याने तुम्हास नमस्कार करावा याचे तुम्हास क्षणभर नवल वाटते तुम्ही त्याचे औत्सुक्याने क्षणभर निरीक्षण करता त्याच्या कमरेभोवती गुडघ्यापर्यंतच कळकट हिरव्या रंगाची चौकड्या चौकड्याची लुंगी असते, अंगावर मोठाल्या दोन खिशांची लाल रंगाची मळकट छाटणी असते, डोक्यावर काळ्या गोंड्याची लाल टोपी असते त्याने दाढी राखलेली नाही तर दाढीचे केस वाढलेले असतात लांबलचक वाढलेल्या केसावर टोपी घट्ट दाबून चोपून बसवलेली असते डोक्यावरचे व दाढीचेही काही केस पिकून पांढरे झाले असल्यामुळे त्याने पन्नाशी गाठली असावी असा तुम्ही अंदाज बांधत असतानाच तो तुम्हाला विचारतो, " कोरो खपेतो आके ?"

त्याची भाषा अनाकलनीय असल्याने तो काय विचारीत आहे हे तुम्हास समजत नाही तुम्ही दिग्मूढ होऊन त्याच्याकडे पाहतच राहता एवढ्या वेळात पंचविशी उलटलेल्या दोन स्त्रिया तुमच्याजवळ येतात एकीने राखी

रंगाचा खमीस घातला आहे खाली काळ्या रंगाची तंग तुमान डोक्यावर हिरव्या ओढणीचा पदर दुसरीने लांब बाह्यांची काळी चोळी घातली आहे त्या चोळीवर बिनबाह्यांचा तपकिरी रंगाचा लांबलचक झगा जो टिचभर गुडघ्याच्या खाली आणि वीतभर घोट्याच्या वर आहे तिने लाल छापील बांधणीचा उपयोग ओढणीसारखा करून छातीवर पदर घेतलेला आहे लाल बांधणी साडीची निळी भडक नक्षीदार किनार उठून दिसते

त्या दोघींपैकी एकजण तुम्हास सांगते, " नवा ताजा सारा मछल्यु अयीं ' तिच्या या बोलण्यातील ' मछली ' या एका शब्दाने सगळे संदर्भ आपोआप जुळले जातात आणि तुम्हांस उलगडा होतो कृश माणसाने तुम्हास ' कोरो खपेतो आंके ?' असा प्रश्न केला होता ' तुम्हास काय पाहिजे ?' असेच त्याने विचारले असावे असे तुम्ही समजता आणि दोघींपैकी एक स्त्री तुम्हाला ' नवीन ताजे मासे आले आहेत ' अशी माहिती देऊन चकित करते तुम्ही कच्छचे आखात पाहायला आलेले असता पण तुमच्या [illegible]

लावून तुमच्यावर अचानक न कळत विलक्षण आघात केला जातो काय बोलावं आणि काय बोलू नये अशा सभ्रमात तुम्ही पडले असतानाच दुसरी बाई म्हणते, " अयीं नार्यंर गामजा देखोता "

तुम्ही बाहेरगावचे दिसता असाच तिच्या म्हणण्याचा रोख असावा हे ओळखून तुम्ही म्हणता " हा हम लोग बाहर गावसे आये है लेकिन मछली खरीदनेके लिए नही "

त्यावर खमीस तुमानवाली बाई कृश माणसास सांगते, " मुसाबाबा, यी मछल्यु असांके वेकी घे अच्ये न अज साजी जो असाजा धनी अचीधो–" त्या माणसाशी खमीस तुमानवाली जे बोलली ते तुम्हास कळण्यासारखे नव्हते पण त्या माणसाचे नाव मुसाबाबा होते हे मात्र तुमच्या लक्षात येते. मुसाबाबाशी बोलणारी स्त्री आता तुम्हास म्हणते, " यीं मछली हम नही बेच सकते आज साजे हमारा मालीक आनेवाला है–"

तिचे बोलणे ऐकून तुम्ही जास्तच सर्द होता तुम्हास मासळी नको असते पण तुम्ही सगळे मासळी खरेदी करण्यासाठीच आलेले आहात असा तिच्या-

[illegible] " १२५ पकडण्याच्या पावत्यात

आता मुसाबाबा म्हणाला, " हुल्न व्यींडी हेकडी गाडी भरेने मछल्यु कोंके त वेकेलाये आवु चौकीदार ! .. आवु येडो कम कया न तो.. पज सत्त किलो मछल्यु खपद्युत दिंधो ! .. '

मुसाबाबाच्या बोलण्यातला एकही शब्द न समजल्याने तुम्ही म्हणता, " हम नही समझे–"

खमीस तुमानवाली जमेल तशा हिंदी भाषेत तुम्हाला समजावते, " दो दिन पिछे हरूनने मछलीकी गाडी किसीको बेच डाली मालीकको समझा इस लिऐ मुसाबाबा ऐसा काम कभी नही करते मालीकका चौकीदार है मुसाबाबा! फिरभी आपको पाच सात किलो मछली चाहिये तो ओ दे सकते ! " हा खुलासा ऐकून तुम्ही पुन्हा थक्क होता याच्यापैकीच हरून नावाचा कोणी फलाणा आदमी असावा त्याने ट्रकभर मासळी मालकाच्या अपरोक्ष कुणाला तरी विकली असावी मालकाच्या कानावर ही कागाळी गेली असावी त्यामुळेच ही मडळी भेदरलेली दिसतात तरीदेखील हा चौकीदार मुसाबाबा तुम्हास पाचसात किलो मासळी विकत द्यायला तयार आहे ! वा चौकीदार ! अशी ही माणस केवळ मालकालाच नव्हे तर देशालाही फसवीत नसावीत कशावरून ? येथून पाकिस्तानची हद्द तशी फारशी दूर नसल्याने व खाड्या अवैध हालचालीना सुरक्षित असल्याने दूर दूरच्या देशाशीही सधान बाधून मुसाबाबासारखी माणस तस्करी, हेरगिरी अशा देशद्रोही उचापती करीत नसावीत ना अशी भयकर शका तुमच्या मनाला सहज स्पर्श करून जाते ! समाजात 'अच्छे थोडेच असतात ! ' बाखिया 'च जास्त असतात !

तुमची नजर क्षणभर चौफेर भिरभिरते जागजागी मासळीचे ढीग लागले आहेत या ठेल्याची राखण करणे हे ज्याचे काम तो मुसाबाबा तुम्हाला मालकाच्या परस्पर पाचसात किलो मासळी विकत द्यायला उत्सुक आहे आहे की नाही कमाल ! हरूनने ट्रकभर मासे लपास करून कोणाला तरी विकले हा चौकीदार पाच सात किलो मासे असेच विकू इच्छितो बेइमानी छोटी आणि मोठी सारखीच ! विशेष म्हणजे, कुपणच शेत खायला लागले ! सगळीकडेच हा बोजवारा तर मग बिन भितीच्या चौकीवरच्या राखणदाराला रान मोकळेच सापडणार ! हा मोका तो असा तसा थोडाच दवडणार!

मुसाबाबा चौकीदार तुम्हास घाईघाईने सागतो, " भाव पज रुपीया किलो आँय " मुसाबाबाने सांगितले ते तुम्हास समजले असावे कच्छी भाषेत च ऐवजी ज, द ऐवजी ध यांचा विशेष वापर होतो नाकातून स्वर काढून अनुस्वारावर भर दिला जातो ही भाषा गुजरातभगिनी म्हणून गुजरातीप्रमाणे ' शौरसेनी ' या प्राकृत भाषेपासून उत्पन्न झाली असून ती गुजराती, सिंधी, पजाबी भाषाशी जवळीक दाखवते पश्चिम किनारपट्टीवरील भाषाच्या तोंडवळचात सारखेपणा आणि उच्चाराच्या डामडौलात ताळमेळ आढळतो ' नदाना पोर बायी बहुच मस्तखोर ही बा भ बोरकराची कोकणी कविता

उदाहरणादाखल पुरेशी आहे कोकणी गुजरातीशी किती जवळीक दाखवते हे या गीतावरून सहज लक्षात येते किनाऱ्या किनाऱ्याने वर्षानुवर्षे होणारे सुलभ दळणवळण या जवळकीला गांधर्वविवाहासारखे पोषकच ठरत आले आहे। प्रबलांचे दुर्बलावर होणारे आक्रमण यातूनही सातत्याने राक्षसी सोयरीक देखील होत आली आहे। 'ए धरती पजाब दी इसनु शीश नमाइये' किंवा 'ए प्यार दी कहानी सदिया पुरानी' अशी पजाबी गीते आठवून असेही काहीसे वाटावे। अर्धमागधी भाषा अपभ्रंश भाषा म्हणून प्राचीन काली ओळखली जात होती व ती सस्कृत आणि प्राकृत भाषामधला दुवा होती। हिंदी, पजाबी, गुजराती, कच्छी, सिंधी, मराठी, कोकणी या भाषाचा विकास या सस्कृत प्राकृत भाषांच्या जोडणीतूनच झाला असावा। सिंधीने एक हात पजाबीच्या खाद्यावर व दुसरा हात गुजरातीच्या खांद्यावर ठेवला आहे सर्वत्र भाषाच्या बाबतीत असे थोडेफार झाले आहे कच्छी यास अपवाद नाही' 'एका चित्राच मोल हजार शब्दांहून अधिक आहे' अशी चिनी म्हण आहे या म्हणीप्रमाणे चिन्यानी चित्रलिपी स्वीकारली पण काही भाषाना, विशेषत बोली भाषाना लिपीच नसते। लिपी नसलेल्या कच्छी भाषेविषयी या निमित्ताने तुम्ही यावेळपर्यंत एवढे ज्ञान विना आयास पैदा केलेले असते। . अशी थोडीशीच का होईना पण तोड ओळख झालेली असते।

खमीस तुमानवाली तुम्हास सागते, "झिगा, बुमला, मादली, सोनग्या, बिच्चू, सगा . कोईभी मछली लो भाव अलग अलग कम ज्यादा होते हुए भी पाच रुपीया किलो लगेगा आपके लिए "

' हमको नही चाहिए. " तुमच्यापैकी एक जण सागतो पाच रुपये किलो हा दर तुम्हाला महाग वाटला असावा, अशा समजुतीने मुसाबाबा म्हणतो, "पन आला करेने त्रे रुपीया भाव आँय.. "

पाच रुपये किलोचा माल तुम्हास तीन रुपये किलो दराने देण्यास मुसाबाबा तयार झाला आहे हे तुमच्या लक्षात येते, पण जी वस्तू तुम्हास खरेदी करायचीच नाही त्या वस्तूचा भाव मुसाबाबाने कितीही कमी केला तरी व्यर्थच होते' फुकटचाच माल फुकट द्यायला मुसाबाबा तयार झाला असता तरी उपयोग नव्हता।

तुमच्यापैकी आणखी एक जण थोडा घुश्शानेच म्हणातो, "हम जैन है, इसलिए हम मास मछली खाते नही"

दोघींपैकी झगेवाली बाई इतका वेळ काहीच बोलली नव्हती आत तिला स्फुरण चढले असावे ती म्हणाली, "परयै भद्रेसरती मारवाडी छोकरा

आव्यांवा वु पज किलो मछल्यु मुग्याथी घेने व्यां"

"ए सच है पाच छे लडके थे वोभी जैन थे परसो टेक्सी लेकर यहा आये और पाच किलो मछली खरीदकर गये—" खमीस तुभानवालीने दुजोरा दिला

कुणी तरी चपराक मारली असे तुम्हाला वाटले आजकाल श्रीमतांची मुले जैन असूनही वाटेल ते खावू लागली आहेत, वाटेल ते पिवू लागली आहेत ! एकीकडे देवदर्शन आणि दुसरीकडे गैरवर्तन ! जीवनातली ही विसगती तुम्हास चक्रावून टाकते ! बिन कष्टाच्या पैशाचा असा धूर निघत असतो याचीच तुम्हाला खत वाटते ! सर्वच जमातीत व सर्वच समाजात नवी पिढी अशी स्वत ला प्रज्ञावत मानते ! . तसा हा सिद्धात कालातीत आहे !

सोमदेव नावाचे एक विद्वान आचार्य होते त्यानी त्याच्या कालातल्या नव्या पिढीला आग्रहान सांगितल होत, " तुमच्यात हवे ते परिवर्तन होवो पण दोन गोष्टी तुम्ही कधीही सोडू नये एक निष्ठा आणि दुसरी म्हणजे भक्ष्याभक्ष्याचा विवेक '.. उज्जैनीचा भोजराजा याच्या कालातली जुनी गोष्ट कदाचित इथ आलेल्या राजस्तानी मुलांना माहीत नसावी म्हणून त्याच्या भक्ष्याभक्ष्याचा विवेक सुटला असावा

अगदी अलीकडच्या काळात विनोबाजी म्हणाले होते, " जैन शाकाहारी आहेत याच मला मुळीच आश्चर्य वाटत नाही मला याच आश्चर्य वाटत की जैन कुलातली मुल आता मद्य आणि मांस यात विशेष रस घेतात !" हीही गोष्ट यांच्या गावी नसावी ! .नसावी म्हणून तर अभक्ष खायला आणि अपेय पान करायला ती सिद्ध होतात.. सिद्धाला विसरून !.. तुम्हाला मात्र याच भान असाव ! म्हणून तर

आता तुमच्यापैकी दोघे चौघे उसळून म्हणतात, " हम आखात देखने आये है मछली को हम छू भी नही सकते ! ."

त्यावर ती तिन्ही तोंडे बद होतात मात्र तुमच्यापैकी अनेक तोंडे उघड-तात, माहिती मिळण्यासाठी ! तुम्ही प्रश्न केल्यामुळे, बद झालेली तोंडे, उत्तरे देण्यासाठी उघडली जातात !. तुम्हास कळते, रोज रात्री भरतीच्या वेळी सुमारे दहा टन मासे वहात येतात जाळी टाकून पकडलेल्या मासळीचे ठेले रचले जातात या ठेल्याचा धनी भद्रेश्वरपासून तीस पस्तीस किलोमीटर दूर असलेल्या आणि गांधीधामपासून जवळ असलेल्या अजार शहरात राहतो तो ही मासळी आपल्या ट्रकने जुनागढ जिल्ह्यातल्या वेरावळला पाठवतो तेथे ही मासळी साफ करून दहा रुपये किलो दराने विकतो वेरावळ येथे ही

मासळी हवाबद डब्यात भरली जाते व तेथून हे हवाबद डबे परदेशी रवाना होतात या व्यवसायापासून देशाला परकीय चलन भरपूर मिळते ! लोभा-पायी कोटयावधी जिवांची वासलत लागते, याची तुम्हांपैकी काही जणाना क्षिती वाटते ! .

किनाऱ्यालगत जी मिठागरे आहेत ती काही मुसलमानांच्या मालकीची तर बरीचशी आहेर पटेल, लोहाणा पटेल याच्या मालकीची आहेत मालाच्या दर्जाप्रमाणे मिठाचा भाव पाच पैसे किलो पासून दहा पैसे किलोपर्यंत असतो येथील मिठागरातील मीठ सुरत, बडोदा, अहमदाबाद शहराकडे तसेच पजाब, हरियाना या राज्याकडेही पाठवले जाते

आखाताच्या किनाऱ्यावरील ताबूस पांढऱ्या वाळूत बसावे असे तुमच्या-पैकी काही जणाना वाटते, पण मासळीचा उग्रट वास बसू देत नाही तेथे फार वेळ तुम्हास दम निघत नसल्याने तुम्ही माघारी वळता . मग तुमची नजर दूरवर श्री भद्रेश्वर मंदिराच्या शिखरापर्यंत जाऊन पोचते जगाला अहिंसेचा दिव्य संदेश देणारा चरम तीर्थंकर तुमच्या नजरेपुढे उभा राहतो त्याच्याच परिसरात रोज लाखो जिवांचे प्राणोत्क्रमण होत असते हा विचार तुम्हास बेचैन करतो.. जीवनातील ही विदारक विसगती तुमची मती कुंठित करून टाकते ! तुमच्या पायाखालची वाळू पावलागणिक सरकत असते ! तरीही विनाशाकडे पाठ फिरवून अविनाशाकडे सन्मुख जाण्याची ओढ तुम्हास लागत असते ! कारण 'ए मेरे दिल न किसी फूल पर पत्थर तू छाल । उम्र लग जाती है किसी को मनानेमे ।' या कवी नीरजच्या काव्य पक्तीतला, तुम्ही प्राण पणाने जतन करीत असलेला, मानवतेचा वारसा तसा फार सनातन आणि सस्कार फार पुरातन आहे ! ..

'असार आ ससार मां साचो एकज सार ।
प्रभुभक्तीनी भावना भाई ! एकज वेळोपार ।'.

'भावने' तले हे स्वर कानी पडताच भाविकाच्या भावना उचबळून येतात 'भावना' हे श्री भद्रेश्वर तीर्थावरील एक आकर्षण आहे या तीर्थ-स्थानी ज्या दिवशी यात्रेकरूची गर्दी होते त्या दिवशी 'भावने' साठी खास शमियाना उभारला जातो व अशा मडपात हजार पधराशे भाविकांच्या उपस्थितीत 'भावने' चा कार्यक्रम संपन्न होतो ! भाविकांचा शरणभाव जागृत करते ती 'भावना' म्हणजे भजनाचा कार्यक्रम भक्तीगीताची मैफल या तीर्थक्षेत्री रात्री आठला सुरू होते आणि ती दोन दोन, तीन तीन तास रगते या भावनेच्या जोडीला 'दाडीया रास' असेल तर रगतीला चागलीच

भरती येते भावनेचा सूत्रधार 'भोजक' उत्तम गायक असेल व त्याच्या साथीला उत्तम वादक असतील तर दांडिया घेऊन नाचणाऱ्याना विलक्षण चेव चढतो व ऐकणाऱ्यालाही गरबा रासक्रीडेत टिपऱ्या नाहीतर झाज घेऊन सहभागी होण्याची स्फूर्ती मिळते हा दांडिया रास नवा 'डिस्को' साज त्याला की चढणारा कैफ काही अगळाच असतो ! चौघडा आणि सनई हे जरी भारतीय वाद्य सगीताचे पारपारिक वैशिष्ठ्य असले तरी 'नगारू' आणि 'पीपडु' किंवा 'पिपूडी' म्हणजे पिप्पाणी व 'शरणाई' म्हणजे सनई याना झाजर ढोलक इतकेच कच्छमध्ये विशेष स्थान आहे भावनेपूर्वी या वाद्याची धून मदिराच्या परिसरात झरत असतानाच तुम्ही भावुकतने भावनेच्या मडपात दाखल होता व 'भावनेत' रस घेता !

श्री भद्रेश्वर येथील 'भावने'त अधिक रग भरतो तो हिरजीभाई पुजारी ! भावनेच्या कार्यक्रमात दुसऱ्या दिवशीचे 'चढाव' ही बोलले जातात अशाने दुसऱ्या दिवशी सकाळी चढाव बोलण्यात जो वेळ खर्च पडणार असतो तो वाचवला जातो दुसऱ्या दिवशी पूजेसाठी भक्ताना तिष्ठावे लागत नाही विशेष म्हणजे भावनेसाठी जमलेल्या अनेकाच्या मेळाव्यात एकाचे पाहून दुसऱ्याला उर्मी येते आणि उत्स्फूर्त चढाओढीमुळे चढाव्याचे उत्पन्नही वाढते हिरजी भाईसारखा उत्तेजक असेल तर चढाव उच्चाक गाठतात ! पैशासाठी जिवाचा आटापिटा करणाऱ्यानाच नव्हे तर हिरजीभाईसारख्या भाडोत्री माणसाला पाहून वाटावे, 'अर्थस्य पुरूषो दास' हे प्रतिपादणारे भीष्माचार्य आजही समाजात या नात्या रूपाने ठायी ठायी वावरताहेत ! शब्दाचे फुलोरे फुलवून अचूक फायदा उठवण्याचा चाणाक्षपणा फक्त काय तो हवा ! ...

भावनेच्या वेळी अगात कोट, गळ्याभोवती मफलर, डोक्यावर उच टोपी घातल्याने हिरजीभाईला चागलीच ऊब लागते भावनेतली गीते गाता गाता हा त्या उबेने नाचू लागतो आणि नाचता नाचता तो भाविकांनाही गरम करतो ! बोलीवर भरघोस दलाली मिळवण्याच्या पोट तिडकीने व हव्यासाने अडते बोली बोलतात तितक्याच ओढीने, तडफेने आणि उत्साहाने हिरजीभाई बोली पुकारता पुकारता भाविकांना चेतवीत असतो !

"बोली बोलीने लाभ लेजो ! चढता प्रमाण राखजो भाई ! नाणु मळे टाणु ना मळे ! मननो भाव मनमा न रही जावे ! बोलो पुण्यशाली ! बोलो भाग्यशाली ! बोली बोलीने लाभ लेजो भाग्यशाली !"

हिरजीभाईच्या तोंडून शब्दाचे असे अगार फुलू लागले की भाविकांच्या मनातले निखारेही फुलू लागतात.. मग श्रद्धेची जागा स्पर्धेने घेतली जाते ! 'सपत्ती मिळेल पण सधी मिळणार नाही' या आवाहनाने पुरीपुरती 'जाग'



प्राठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६०
दा. क्र. २७४२६०

येते ! अटीतटीची बोली अहमिहकेने पदरात पडली की काही ' पुण्यशाली ' च्या ' भाग्यशाली ' छात्या गर्वाने फुगतात !

सोमशर्मा ब्राह्मणाला अंगावरचे निम्मे अर्धे देवदूष्य वस्त्र दान करणाऱ्या आणि उरले सुरलेले काट्याकुट्यांनी हिरावून घेतले तरीही त्याची खत न बाळगणाऱ्या तीर्थंकर भगवान महावीरांनी अशा ईर्ष्यालु संपन्नतेची स्वप्ने पाहिली असतील का ?

' प्रभो, तारो गीत मने गाऊ छे । प्रेमनी अमृत पाऊ छे ' या भावपूर्ण आळवणीने ' भावने 'च्या वेळी हीही एक संवेदक भावना न कळत तुमच्या मनाला सहज स्पर्शून जाते, जी काही काळ तुमची झोप उडविते !

# आठ

सुथरी हे ठिकाण भूज या शहरापासून श्याऐंशी व गांधीग्रामपासून एकशे एकसष्ट किलोमीटर अंतरावर आहे कच्छ भद्रेश्वरहून तुम्ही सुथरीकडे निघाला आहात हा प्रवास सुमारे नव्वाशे किलोमीटरचा आहे सकाळची न्याहरी उरकून तुम्ही प्रयाणास सिद्ध झाला आहात थेट सुथरी गाठायला दोन तास लागतात दुपारच्या भोजनापूर्वी तुम्ही सुथरी सहज गाठू शकता, पण रस्त्यावरच्या गुंदाला, मुंद्रा, भुजपूर, मोटी खाखर, नानी खाखर, बिदडा, मांडवी जैनाश्रम, मांडवी, लायजा, डुमरा या गावांतील मंदिरे पाहून सायंकाळपर्यंत सुथरीला पोचावयाचे असा आराखडा आखून तुम्ही भद्रेश्वरहून प्रस्थान ठेवले आहे अर्थात दुपारचे जेवण पूर्वनियोजनाप्रमाणे 'जैन आश्रम' येथे घ्यावयाचे आहे !

एखाद्या तीर्थस्थानाला भेट दिल्यावर शक्य असल्यास त्या तीर्थक्षेत्राच्या परिसरातील 'पंचतीर्थी' ही पहावी असा पूर्वापार प्रघात आहे या उद्देशाने तुमचा प्रवास सुरू झालेला आहे 'मधु मीलन' मध्ये तुम्ही पाय ठेवीत असतानाच तुमच्यापैकी कोणी तरी रुक्मिणी कांतनला तामिळ भाषेत म्हणतो, "वणाक्कम" 'एक दूजे के लिए' हा चित्रपट तुमच्यापैकी बऱ्याच जणांनी पाहिला असल्यामुळे वणाक्कम' या शब्दाची ओळख अनेकांना झालेली आहे 'वणाक्कम' म्हणजे 'नमस्ते' !.

कांतन या तामिळ अभिवादनाचे गालातल्या गालात पण मनापासून हसून स्वागत करतो त्यावेळी कुणीतरी कांतनला विचारतो, "निरोप घेताना मराठी माणूस बरं आहे येतो किंवा गुजराती माणूस आवजो म्हणतो तमिळ भाषेत निरोप घ्यायचा झाला तर काय म्हणतात ?"

कांतन ताबडतोब सांगतो, "वरेन !"

त्यावर कुणीतरी मिस्किलपणे म्हणतो, "सोपं आहे अगदी ! तमिळ

भाषा तशी कठीण दिसत नाही !"

स्वभाषेचा अभिमान कुणाला असत नाही ? तमिळ भाषा सोपी आहे हे प्रतिपादन कातनला विशेष पटले नसावे म्हणून तो म्हणाला, "जगातील मूळ भाषा पाच आहेत संस्कृत, तमिळ, ग्रीक, हिब्रु आणि चिनी इतर उरलेल्या सर्व भाषा यापैकी कुठल्या ना कुठल्या एक अथवा अनेक भाषापासून तयार झालेल्या आहेत द्रविडीयन भाषा तमिळपासून निर्माण झाल्या आहेत लॅटिन ही संस्कृत आणि ग्रीक या भाषांच्या मिश्रणापासून उत्पन्न झाली आहे फारशी हिब्रुपासून तर उर्दू फारशीपासून ! .मूळ भाषा वाटतात इतक्या सोप्या नसतात !"

कातनचे भाषाविषयावरचे हे भाष्य ऐकून घेण्याखेरीज तुम्हास गत्यतर नसते तुमच्यापैकी अनेकांना हा विषय गहनगूढ म्हणून असह्य वाटतो तरीही तामिळ ही मूळ भाषा असल्याने ती सोपी नाही असेच कातनला आग्रहपूर्वक सांगायचे असते, एवढा निष्कर्ष तुम्ही त्याच्या विवेचनावरून काढता

संस्कृतप्रमाणेच पाली, अर्धमागधी या अती प्राचीन भाषा असल्या तरी भाषापडित संस्कृत, प्राकृत, मागधी, शौरसेनी, पैशाची आणि अपभ्रंश या सहा भाषा मूळच्या भारतीय भाषा मानतात या पासून विशेषत अपभ्रंश भाषेच्या प्रभावाने, अनेक भारतीय भाषा उत्पन्न झाल्या असे ह्यांचे मत आहे शिवाय, संस्कृत नव्हे ती प्राकृत हे सांगायला विद्वता हवीच कशाला ! काही गोष्टी वादातीत असतात !

"तुझे कातन तसेच स्वामीन'थन हीअशी नावे संस्कृत मधल्या ब्रह्मन, आत्मन आदी शब्दांशी नाते सांगत नाहीत का आणि 'हा प्रकार' याचे तामिळमध्ये 'इद प्रकार' असे जे भाषांतर होते ते 'इद प्रकार' या संस्कृत भाषांतराशी समांतर नाही का? षण्मुखम या शब्दाची कुळकथा काय? मग तामिळ आणि संस्कृतपैकी तशी मूळ आणि शुद्ध भाषा नेमकी कोणती ? मल्याळम भाषेत मुरलीला मुरली म्हणतात व तिला मधुर, मादक अशी विशेषणेही लागतात तेव्हा अशा शब्दांचे उगमस्थान तरी कोणते ? संस्कृत भाषेशी असा घरोबा करणाऱ्या द्राविड भाषा 'शरण' ऐवजी 'सरण' यासारखे शब्द प्रयोग करून अर्धमागधी अथवा पाली अशासारख्या प्राकृत भाषेशीही कशा लगट करतात ?" असं खूप काही कातनला विचारावस तुम्हाला वाटल पण अशी मनमोकळी चर्चा करण्याइतकी अद्याप घसट झाली नव्हती तामिळच्या बाबतीत तुम्ही अनभिज्ञ म्हणून तुमच्या शका मार्गी न लागता त्या तुमच्या मनात तशाच राहिल्या! यावेळपर्यंत मधुमीलन मात्र मार्गी लागलेली असते !

जैन शास्त्राप्रमाणे ससारी जिवाचे चार प्रकार मानले आहेत पहिल्या 'तिर्यंच' प्रकारात 'त्रस' आणि 'स्थावर' असे दोन पोटप्रकार असून 'त्रस तिर्यंचा'ल पृथ्वीकाय, जलकाय, अग्निकाय, वायूकाय व वनस्पतिकाय असे पाच पोटभेद आहेत चांदी, सोने अशा खनिज वस्तू पृथ्वीकाय त्रस तिर्यंच प्रकारात येतात या वस्तूतील अणुरेणूचे चलनवलन, ते अदृश्य असले तरी, सतत चालू असते असे जैन सिद्धांत धर्माने हजारो वर्षांपूर्वी प्रतिपादिले आहे व अलीकडे पदार्थ विज्ञान शास्त्रानेही हे सप्रयोग सिद्ध करून प्रमाण मानले आहे ! तिर्यंचाचा दुसरा पोटप्रकार 'स्थावर' यामध्ये बेंद्रिय, तेंद्रिय, चतुरिंद्रिय व पचेंद्रिय असे चार पोट भेद असून हत्ती, घोडा, चिमणी हे पशूपक्षी व मासा 'पचेंद्रिय स्थावर तिर्यंच' प्रकारात येतात ससारी जिवाचा दुसरा प्रकार 'नारकी' या प्रकारातील जिवांना यातना भोगाव्या लागतात तिसरा प्रकार 'देव' हे देव वैदिकांच्या 'देव' कल्पनेहून वेगळे ! वैदिक देवाला निर्गुण निराकार मानतात तर देवाचे शरीर सूक्ष्म परिमाणूचे बनलेले असल्याने मानवी दृष्टीला ते अदृश्य असतात असे जैन समजतात शिल्प ग्रथात ईश्वराचे वसतिस्थान मानवदेह असल्याचे म्हटले आहे ईश्वर ही सकल्पना मनुष्यनिर्मित असावी असा याचा अन्वयार्थ व निष्कर्ष निघू शकतो ईश्वर निर्गुण निराकार म्हणजे अस्तित्वरहित ही वैदिक सकल्पना, तर देवाचे शरीर सूक्ष्म परिमाणूचे बनले असल्याने त्याना अस्तित्व असूनही ते अदृश्य असतात ही जैन सकल्पना, म्हणूनच या सकल्पनांच्या सीमा एकमेकीशी भिडल्या असूनही वेगवेगळ्या मानाव्या लागतात ! गणितातली शून्याची सकल्पना जैन सिद्धांताच्या देव कल्पनेशी सहीसही जुळते ! देव सकल्पनेतील सूक्ष्मता सामान्य माणसांच्या बुद्धीपलीकडची आहे हेच खरे ! म्हणूनच की काय मानवाना देवाचे आकर्षण असावे ! जैन सिद्धाताप्रमाणे देव सुखे उपभोगतात ' चौथा प्रकार 'मनुष्य' याला सुखाबरोबर दु:खेही भोगावी लागतात मनुष्यप्राणी देहधारी व विवेकी असल्याने धर्मोपदेश ऐकून धर्माचरण करू शकतो व तो कर्मबध तोडू शकतो ! यासाठीच मनुष्ययोनी ही देवयोनीपेक्षा श्रेष्ठ आहे अशी जैन सिद्धाताची धारणा आहे ! आत्मोद्धारासाठी देवालाही मनुष्यजन्मच घ्यावा लागतो असे या धर्माचे प्रतिपादन आहे! जैन सिद्धातातले देव हे कोणी निर्माते, नियते किंवा अवतार नसतात ! वैदिक धारणेप्रमाणे ते पूर्णतया निर्गुण-निराकारही नसतात ' हे सगळे जीव उर्ध्वगतिशील असतात जन्म-मरणाचे चक्र थांबवण्याची यांच्यात क्षमता असते म्हणून कर्मबधाच्या प्रवृत्तीप्रमाणे म्हणजे सौम्यता,

सा.. ७

उग्रता याप्रमाणे आत्म्याचे उत्सर्पण, अवसर्पण अर्थात आरोहण, अवरोहण चालू असते वैदिक विचारसरणी उद्धरित आत्म्याचे वारवार 'अवतरण' मानते पण जैन प्रणालीप्रमाणे एकदा आत्म्याचे 'उद्धरण' झाले की मग त्याचे 'अवतरण' नसते. उद्धरणासाठी आत्म्याला वारवार पुनर्जन्म घ्यावा लागतो एकदा उद्धारण झाले की पुनर्जन्म म्हणजेच पुनरागमन नसते 'तथा कथित अवतरण'ही नसतेच 'सभवामि युगे युगे' ही वैदिक सकल्पना यासाठीच जैन दर्शनात बसत नाही जैन शास्त्राप्रमाणे प्रत्येक आत्मा स्वतत्र असल्याने 'अमक्याने अमका अवतार' घेतला हा विचार या चौकटीत यासाठी बसत नाही। उद्धरणाच्या म्हणजे मुक्तीच्या अतिम अवस्थेपर्यंत आत्म्याचे परिभ्रमण मात्र चालू राहते। महावीराचा आत्मा सत्तावीस 'भवा'तून फिरला होता व नतर 'सिद्ध'पदाला पोचला होता असे जैन दर्शन सांगते याचा अर्थ इतक्या साऱ्या जीवनक्रमातून गेलेला व अखेरी मुक्त झालेला आत्मा पुनरागमन करीत नाही वैदिक धारणेप्रमाणे राम आणि कृष्ण जरी उच्च पदाला पोचून देवरूप पावले असले तरी त्याचे पुन्हा अवतरण सभवते महायान बौद्धही बुद्धाच्या अनेक पुनरावतरणाची सकल्पना मानतात आत्म्याच्या अतिम गतीची ही जैन विचारधारा तशी सपूर्ण स्वतत्र व असामान्य अशीच आहे। ही विचारधारा अवतारवादाविरुद्ध असून ती उत्तारवाद या नावाने ओळखली जाते। 'यदा यदाही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। धर्म सस्थापनार्थाय सभवामि युगे युगे ॥' अशा जगतोद्धाराच्या कामासाठी रामकृष्णांना पुनश्च अवतार घ्यावा लागेल। तीर्थंकराना मात्र परतायचे नसते। आत्मोद्धाराने जगतोद्धार होत असतो अशी त्यांची धारणा असते। सुधारणा घरातून व्हावी म्हणतात। अस्थिरता जेथून निर्माण होते तो बिंदूच नियत्रित केला तर सिंधू स्थिर होईल असा त्या मागचा दृढभाव असतो। व्यक्तीसुधारणेतच समाजसुधारणा त्यांना अभिप्रेत असते।

आत्म्याची मलीनता व मूढता कमी करून मनुष्य परमेश्वर होऊ शकतो अशी जैन दर्शनाची धारणा आहे हे परमेश्वर पद म्हणजे सिद्धपद याचा अर्थ तो कोणी कर्तुमकर्तु शक्ती होतो असा मात्र होत नाही विश्वाची निर्मिती परमेश्वराने केली असे वैदिक मानतात तर विश्वाची निर्मिती अशा कोणी अगाध शक्तीने अथवा परमेश्वराने केली ही कल्पना जैन दर्शनाच्या चौकटीत बसत नाही। विश्वाची निर्मिती नैसर्गिक असून या विश्वाचे सचलनही नैसर्गिक आहे, त्याचे नियत्रणही नैसर्गिकच आहे असा जैन दर्शनाचा सिद्धात आहे। म्हणून विश्वाच्या उद्धारासाठी कोणी ना कोणी कधी ना कधी तरी अवतार घेतो हे जैन दर्शनाला मान्य नाही उन्नती अथवा

उद्धरण व्यक्तिगत असते अशी जैन दर्शनाची भूमिका आहे

तिर्यंच, मनुष्य, देव आणि नारकी असे 'संसारी जिवा'चे जे चार प्रकार आहेत त्यांपैकी 'तिर्यंच' योनीतील सामान्य अश्वाचाही उद्धार करण्यासाठी अहोरात्र दीर्घ विहार करणारे तीर्थंकर संभवनाथ यांचे एक छोटेसे मंदिर गुंदाला गावाचे आकर्षण आहे भद्रेश्वरच्या पंचतीर्थीतील हे गाव कच्छच्या मुन्द्रा तहसीलमध्ये असून येथील बरीच 'महाजन' मंडळी मुंबई येथे व्यापार-उदीमात गुंतलेली आहेत 'श्री गुंदाला मुंबई महाजन संचलित' अनेक संस्था या गावात असून येथील आरामगृह, कन्याशाळा आदींचा त्यात समावेश आहे.

गुजरात शासनाच्या मार्ग परिवहन महामंडळाचे एक छोटेसे बसस्थानक या गावात असून या बस स्थानकावर 'श्री भारमल सारंग बस स्टँड, गुंदाला असा नामनिर्देश आहे 'श्री भारमल सारग' हे कोणी 'श्रेष्ठी' या गावचेच असावेत ते जैन असावेत की कोण याची विचारपूस करायला तुम्हाला अवसर मिळत नाही ते जैन असतील तर त्याचा हा उपक्रम स्तुत्यच मानावा लागेल। कोषातून बाहेर पडून जैन समाजाने आता व्यापक विचारसरणीने विस्तृत प्रमाणावर अशी सार्वजनिक कामे हाती घ्यावयास हवीत तरच या धनिक वर्गाबद्दल सर्वत्र आदराची भावना राहील नाहीतर केवळ मंदिराच्या उभारणीत रस घेणाऱ्या या अल्पसंख्याक समाजाबद्दल द्वेषभावनाच फैलावेल या समाजाने आता अंतर्मुख होऊन सर्वजनाभिमुख झाले पाहिजे यातच या समाजाचे हित आहे. 'विग्रहाच्या मुळाशी परिग्रह आणि आग्रहाच्या मुळाशी अशांती' ही जैन विचारधारा केवळ बासना-तल्या पोथीपुराणात राहून कसे चालेल। दानवीरांकडून दान घेऊन त्या देणगीतून बस स्थानकासारखी वास्तू गुंदाला गावात गावच्या वेशीलगत उभी राहिली आहे हे विशेष म्हणावे लागेल। या भागात इतरत्रही अशा वास्तू दृष्टोत्पत्तीस पडतात दात्याच्या देणग्यांतून सार्वजनिक वास्तू अनेक ठिकाणी उभ्या राहतात, पण गावात बसस्थानकासारखी वास्तू दात्याच्या देणगीतून उभी करण्याची ही अशी योजना आणि कल्पना कुणालाही अभिनव वाटावी अशीच आहे। आता महाराष्ट्रात व इतरत्र कुठे कुठे काही सेवाभावी संस्था असे सार्वजनिक उपक्रम हाती घेत आहेत गुजरातने हा पायंडा पाडला असे कोणी म्हटलं तर ती अतिशयोक्ती वाटू नये। गुजराती माणूस लोभी म्हणून मशहूर, तसाच दानशूर म्हणूनही मशहूर। अर्थात त्याचे हे दातृत्व नावलौकिकाच्या लोभापोटीही असू शकते। 'चढावात, चढाई तो याचसाठी करीत असावा। गुजराती जैनांना तर हा कैफ अधिकच चढतो।

कच्छ जिल्ह्यातल मुन्द्रा हे तहसीलच गाव, भद्रेश्वरपासून तीस किलोमीटर अंतराच्या आतबाहेर गावाच्या वेशीवरचा उच 'हस टॉवर' तुमचं स्वागत करतो टॉवरवरच्या घड्याळात सकाळचे साडेदहा वाजून गेलेले असतात सूर्य हळूहळू वर चढत असतो. या गावात तीन जैन मंदिरे आहेत ती तुम्हास पहायची असतात

'मधु मीलन' बस गावच्या वेशीत शिरलेली पाहून एक चाळीशी उलटलेली व्यक्ती तुमच्याकडे धापा टाकीत येते पायजमा आणि लांब बाह्यांचा शर्ट. एवढाच पोशाख पण तोही जागजागी फाटलेला, लक्तरलेला गालावरची दाढी वाढवलेली नव्हती पण बरीच वाढलेली होती दाढीचे व डोक्यावरचेही सर्व केस अवेळी पिकून पांढरे झालेले... चेहरा टरबूजासारखा गोल चेहऱ्याच्या मानाने डोळे बारीक डोळ्यांची निस्तेज बुबुळ डोळ्यांच्या शिंपली खोबण्यात खोल बुडालेली शरीर थोड स्थूल, थोड बुटक पाय अनवाणी पाहता क्षणी हा कुणी वेडा अथवा भिकारी असावा असा तुमचा समज होतो पण त्याच्या अरुंद कपाळावरचा केशरी गंधाचा टिळा पाहून तुम्ही चरकता त्याच्या कपाळावरच्या गंधाचा केशरी टिळा हा कोणी मुंद्रा गावचाच जैन श्रावक असावा याची खात्री पटवतो व सर्वप्रथम त्याच्याबद्दल झालेला तुमचा समज अर्थातच खोटा ठरतो. !

तो तुमच्या जवळ येऊन तुम्हास सांगतो की, तो तुमचा जातभाई आहे ! गावात येणाऱ्या श्रावक-श्राविकांना तो गावातील मंदिरे दाखवतो कुणी काही द्यावे अशी अर्थातच त्याची अपेक्षा असावी तेव्हा देतील ते स्वीकारून मिळेल तेवढ्यावर तो गुजराण करतो तुम्ही न विचारताच एवढी सगळी माहिती तो तुम्हास गुजरातीमधून घडाघडा सांगतो जिवाचे कान करून तुम्ही ऐकता त्याच्या गुजरातीवर कच्छी भाषेचा पगडा असल्याने त्याची गुजराती भाषा तुम्हांस सहजासहजी नीटशी चटकन समजत नाही तरीसुद्धा तुम्ही आशय समजून घेता आणि काही क्षण तुम्ही सुन्न होता ! धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धेने लक्षावधी रुपये खर्च करणाऱ्या जैन समाजात मुन्द्रासारख्या तालुक्याच्या गावी, एका जैन श्रावकावर चरितार्थासाठी परक्या लोकांच्या पुढे हात पसरण्याची पाळी यावी ही गोष्ट श्रीमंतीचा तोरा मिरवणाऱ्या जैन समाजाला लांच्छनास्पद आहे ! म्हणूनच या गोष्टीचा तुमच्यापैकी काही जणांना खेद वाटतो रोजच्या 'दाळ रोटली'साठी श्रावकाला एका व्यापारी गावात लाचार व्हावे लागते याचे वैषम्यही वाटते. पण या विमनस्कतेत अल्पसे का होईना समाधानही असते श्री शंखेश्वर पार्श्वनाथ या तीर्थक्षेत्री तुमच्या पाठीशी गाधीलमाशीसारखी लागलेली

आठदहा वर्षांची ' गज्जी ' आणि हा आता तुमच्या पाठी लागलेला ' गुर्जर श्रावक ' यात तसे खूप अंतर आहे असे तुम्हाला वाटते ! .. हा दळभद्री श्रावक वाटाड्याची कामगिरी बजावून उदरनिर्वाह करतो ही गोष्ट थोडासा का होईना दिलासा देणारी आहे त्याचे मार्गदर्शन आवर्जून मागण्याची इच्छा याच भावनेतून निर्माण होते तुमच्यापासून काहीतरी फलप्राप्ती होणार असा भरवसा वाटताच त्याच्या दीनदुबळ्या मुद्रेवर हास्याच्या छटा कशा उमटतात हे पाहताना होणार समाधान आणखी वेगळच असत ! ... ' इन्हें दया नही, काम और सम्मान चाहिये ' याचीच जणू ती पावती असते ! हा मुन्द्रावाला श्रावक तुम्हास माहिती सांगतो त्यावेळी तो आपला डावा हात वारवार नाचवतो गुजराती माणसाची ही सर्रास नसली तरी सर्वसाधारण सवय किंवा खोड असावी ! विशेषत: स्त्रियात अधिक प्रमाणावर.

त्याच्याकडूनच तुम्हास समजत की मुन्द्रा गावात ' अचलगच्छा 'च ' श्री शीतलनाथ जैन देरासर ' आहे, ' तपगच्छा 'च ' श्री चिंतामणी पार्श्वनाथ मंदिर ' आहे आणि ' खडतरगच्छा 'च ' श्री महावीर स्वामी देहरासर ' आहे

चातुर्वर्ण्यव्यवस्था श्रमण संस्कृतीला मान्य नाही. चातुर्वर्ण्यव्यवस्था मानवतेची विटंबना करते असे सर्वच जैन तीर्थंकरांनी आग्रहपूर्वक प्रतिपादलेले आहे त्यांनी समाजाची धारणा जन्मावर न करता आचारधर्मावर केली. साधू, साध्वी, श्रावक, श्राविका असा चतुर्विध संघ तीर्थंकरांनी पुरस्कारला महात्मा बुद्धानेही ' कण्हदीपायन जातका 'त भिक्षू, भिक्षुणी, उपासक, उपासिका अशी ' चार परीची परिषद ' म्हणजेच चार प्रकारात समाजाचे वर्गीकरण प्रतिपादले आहे श्रमण संस्कृतीने या विचारसरणीच्या प्रभावावर वैदिक संस्कृतीची पोछेहाट केली होती. श्रमण शासनांना व या शासनांच्या शास्त्यांना या पलीकडचे वर्गीकरण अभिप्रेत नव्हते व संमतही नव्हते परंतु, दुर्दैवाने या संप्रदायांनाही कालांतराने फाटे फुटत गेले ! .. ' आगम ' जैनधर्म ग्रंथात उपलब्ध पंचेचाळीस ग्रंथाचा समावेश असून यांतील कोणते ग्रंथ ग्राह्य मानावयाचे, कोणते अग्राह्य समजावयाचे, वस्त्र ल्यावयाचे की नाही, मूर्तिपूजा करायची की नाही अशा आचार-विचारातून या फाटाफुटी झाल्या ! ...अचलगच्छ, तपगच्छ, खडतरगच्छ हे असेच फाटे !

इसवी सनाच्या पहिल्या शतकात म्हणजे चरम तीर्थंकर भगवान महावीर यांच्यानंतर सहाशे वर्षांनी जैनात श्वेतांबर व दिगंबर असे पंथ निर्माण झाले ' मंगल भगवान अर्हत, मंगल भगवान जिन । मंगल प्रथमाचार्य,

मगल ऋषभेश्वर ' हा जैनाचा मगल मत्र  श्वेतांबर व दिगंबर या दोन्ही जैन सप्रदायात ' मगलाचरण ' या ' मगल मत्रा 'स महत्त्व असून कुठल्याही कार्याचा शुभारभ ' मगलाचरणा ' ने करतात !

' ओम् नमो अरिहंताण, ओम् नमो सिद्धाणं, ओम् नमो आयरियाण, ओम नमो उवज्झायाणं, ओम नमो लोए सव्वसाहूण. एसो पच नमुक्कारो, सव्व पावप्पणासणो, मगलाण च सव्वेंसि, पढम हवई मगलम् ।' याही नवकार मत्रान ' मगलाचरण ' मागलिक सुरू करून पुढ म्हणतात, ' चत्तारि मगल, अरिहता मगल, सिद्धा मगल, साहू मगल, केवली पण्णत्तो धम्मो मगलम् ।' अरिहत, सिद्ध, साधू व केवलींनी सागितलेला धर्म हे चार मगल आहेत पुढ अशी सांगता करतात, ' मगल भगवान वीरो, मंगल गौतम प्रभु, मगल स्थूलीभद्राद्या, जैन धर्मास्तु मगलम् । मगल भगवान वीरो, मगल गौतम गणि, मंगल कुदकुदाद्या, जैन धमोस्तु मगलम् । सर्व मगल मागल्य सर्व कल्याण कारणम्, प्रधानं सर्व धर्मानां, जैन जयति शासनम् ।. .ओम् शाति शांति शाति: ।'

एवढ अस उदात्त आणि समावेशक ' मगलाचरण ' सर्व जैनानी केवळ तोंडाने म्हणून का शांती लाभते ? .कट्टर दिगबर जैन या मगलाचरणातील स्थूलीभद्राचा सदर्भ असलेल्या पक्ती वगळतात तर श्वेतांबर कुदकुदाचार्यांच्या ! श्वेतांबर मगलाचरणात तीर्थंकर महावीर, त्यांचे प्रथम शिष्य गौतम, कल्पसूत्रादी आगम ग्रथाचे प्रसारक आचार्य स्थूलीभद्र व जैन दर्शन यांचे स्मरण मागल्यासाठी करतात तर दिगंबर जैन या मत्रात आचार्य स्थूलीभद्र यांच्याऐवजी कुदकुदाचार्य यांना स्थान देतात ! तसे कुंदकुंदाचार्य, भद्रबाहू आणि स्थूलीभद्र या गुरुशिष्यांच्या कालामधलेच एक आचार्य ! याच्या वाटा का वेगवेगळ्या होत्या ?...

' गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वर. । गुरु साक्षात् परब्रह्म, तस्मै श्री गुरवेनम ।' हा वैदिकाचा गुरुमत्र ! . भाव तोच ! भाषा वेगळी ! शब्द वेगळे ! हे भाषिक शब्द जसे माणसामाणसांना जोडतात, तसेच ते माणसामाणसात फारकतीही करतात ! एकमेकांचे हाडवैरी होण्याइतकी !

जैनातील हे श्वेतांबर आणि दिगंबर मूर्तिपूजेच्या बाबतीत एक, पण विधीत मात्र भिन्न ! तपशीलात मतभेद ! बरे, ही श्वेतांबर आणि दिगबर अशी जैनातील फाटाफूट एवढ्यावर तरी थाबावी ! ..पण छे ! ...श्वेतांबरात पुन्हा मूर्तिपूजक, स्थानकवासी, तेरापथी असे सप्रदाय निर्माण झाले स्थानकवासी, तेरा पथी हे सप्रदाय मूर्तिपूजा न मानणारे ! .बौद्धातील महायान पथाने बुद्धाला देवरूप बहाल केले तर हीनयान पंथाने बुद्धाला

मानवरूपातच ठेवले. महायान व हीनयान या नावावरूनच बुद्धाचे असामान्यत्व व सामान्यत्व प्रतीत व्हावे। बौद्धधर्मीयांची ही जी विचारधारा तीच जैनातील मूर्तिपूजक आणि स्थानकवासी यांची जैन मूर्तिपूजक श्वेतांबरात पुन्हा पंथ निर्माण झाले 'दशा' आणि 'विशा' ही विभागणी कोण कोणत्या भागाचा, गावाचा या प्रादेशिक भिन्नतेवरून झाली यात पुन्हा 'दशा ओसवाल', 'दशा पोरवाल', 'दशा श्रीमाळी', तसेच 'विशा ओसवाल', 'विशा पोरवाल', 'विशा श्रीमाळी' अशी विभागणी यातही पुन्हा आचारधर्मावरून विभागणी श्वेतांबर मूर्तिपूजकात 'तपगच्छ', 'अचलगच्छ', 'खडतरगच्छ', 'पार्श्वगच्छ' किंवा 'पार्श्वचंद्रगच्छ', 'शंखेश्वरगच्छ' अशातही कोठे कोठे 'आठ कोटी' आणि 'छ कोटी' हे 'कोटी' पंथ अनुयायांच्या संख्येवर आधारलेले होते की त्यांच्या धनिकतेवर न कळे। 'आठ कोटी'तही परत 'मोटो पक्ष' आणि 'नानो पक्ष' हे भेदाभेद। जशी तऱ्हा श्वेतांबरात तशीच थोडीफार दिगंबरात आणि इतर दोन संप्रदायांतही। दिगंबरांचे पंचम, चतुर्थ, तेरापंथी, बावीसपंथी असे थोडे तर श्वेतांबरांचे थोडे थोडके नाहीत तर चौऱ्याऐंशी...इतके पंथ आणि उपपंथ। ..

मूठभर लोकांचे असे पसाभर पंथ आणि एकेका पंथाचा त्राण चिमूटभर। तेरापंथ्यांनी स्थानकवास्यांकडून फारकत का घेतली तर तेरापंथ्यांना अनुकंपादान आणि दया या इतर जैनांप्रमाणे मान्य नव्हत्या प्राणिमात्रावर दया केली तर जगल्या-वाचलेल्या प्राणिमात्राकडून पुढेही पापे होण्याची शक्यता असते व अशा पापांचे उत्तरदायित्व वाचवणाऱ्यावर येते। .दिगंबरातही कांजीने 'सनातन दिगंबर धर्म' स्थापून सवता सुभा प्रस्थापित केला हे सनातन दिगंबर धर्मी प्रतिमा मानतात पण पूजाअर्चा-अभिषेक यास विरोध करतात। हे स्वत'ला 'निश्चितवादी' समजतात अशा या इतक्या फारकती।

व्यवहार्य वर्तनासाठी मगध देशाच्या राजकर्त्यांचा श्वेतांबरांना सर्वप्रथम पाठिंबा मिळाला दिगंबर श्वेतांबरांपेक्षा अधिक कडवे दिगंबरांचे सोवळे ओवळे अधिक कडक। कट्टर सनातनी दिगंबर दिगंबराच्याच घरचे पाणी पितात, त्यांच्या घरचेच अन्न खातात हेही पाणी सोवळ्यात आणलेले असले पाहिजे आणि अन्नही सोवळ्यातच शिजवलेले असले पाहिजे। अलीकडे काही घरांतच ही सनातन वृत्ती आढळते कालाबरोबर हेही आता बदलत आहे आता तर 'सुधारणे'च्या बाबतीत दिगंबर श्वेतांबराच्याही पुढे झेपावत आहेत। .. कोंडलेली वाफ जशी उफाळून स्फोटक होते व वाट सापडेल तिकडून पळ काढते तशीच परिस्थिती कडक बंधनातील लोकांची

होते कोडमारा असह्य होऊन हे लोक सनातन रूढीविरुद्ध बड करतात मछली खरेदी करणाऱ्या राजस्तानी तरुणांची धक्कादायक हकीगत तुम्ही भद्रेश्वरजवळच्या आखातावर ऐकलेली असते ही राजस्तानी मुले कोंडलेल्या वाफेप्रमाणे उसळून इतकी स्वैराचारी बनली ! दिगंबर जैनांची नवी पिढीही अशीच झपाट्याने जुने झटकून नवे अगीकारायला अगतिक झाली आहे ! श्वेताबरातही, ‘ दशा ’ पेक्षा ‘ विशा ’ या दृष्टीने थोडे ‘ मागास ’ आणि अधिक ‘ धर्मवेडे ’ !

- असे असूनही याना आपापल्या सप्रदायाचा केवढा जाज्वल्य अभिमान ! ‘ दिगबर सर्वांआधीचे !...भगवान महावीरानी देवदूष्य वस्त्राचा त्याग केला त्या वेळपासूनचे !...श्वेतांबर त्याच्यातून फुटून निघाले ! खडतर वाट तुडवणे जेव्हा जमेनासे झाले तेव्हा हे मखमली वाटेने निघाले ! ’ असे जेव्हा अभिनिवेषाने दिगबर श्रावक मागतो तेव्हा त्याला त्याच्या अगा-खाद्यावरील कपडालत्त्याचे भान उरत नाही, हे प्रखर सत्य असते !...अशा छिन्नविछिन्न समाजाने आमच्यात चातुर्वर्ण्य नाही हे कोणत्या तोंडाने सागावे ?

वैदिक सस्कृतीने चातुर्वर्ण्य व्यवस्था बौद्धिक कसावर ठरवून पुढे ही विभागणी जन्मजात ठरवली माणसाचे श्रेष्ठत्व अथवा कनिष्ठत्व या सस्कृतीने जन्मावरून व जन्मकुळावरून ‘ जन्मसिद्ध ’ मानले ! चातुर्वर्णीयांतही पुन्हा शब्दच्छलानी तात्त्विक पथभेद, कामधद्याच्या श्रेष्ठाश्रेष्ठतेने वर्णभेद तर प्रदेश भिन्नतेवरून मतभेद होत जाऊन बरीच चिरफाड झाली आणि जातीपंथांची छकले छकले पडली ! अशा रीतीने वैदिक हिंदूही या चिरफाडीत मागे नाहीत !

श्रमण सस्कृतीने ही चातुर्वर्ण्यव्यवस्था नाकारूनही, ‘ मनुष्य जन्माने मोठा होत नसतो तर स्वकर्माने मोठा होत असतो ’ हा महावीरांचा सदेश जैनानी दुर्लक्षिला ! आचारविचारांच्या भिन्नतेवर का होईना महावीराच्या पाईकानी वेगवेगळ्या वाटानी दाही दिशांना पागावे हे दुर्दैवच मानावे लागेल ! महावीरांच्या समभाव शिकवणुकीचे व सम्यक दृष्टी देणाऱ्या अनेकांतवाद विचारप्रणालीचे हेच का फलित समजावे ? ‘ मूठभर ’ समाजाला ‘ शासना ’चा आणि ‘ शासनदेवा ’चा हा अमोल ठेवा, आहे असा जतन करता येऊ नये ? ही ‘ जात ’ जाऊ नये असा का नियतीचा सकेत असावा ?. काळाचा का हा शाप असावा ?

मुद्राच्या वेशीजवळ ‘ मधुमीलन ’ उभी राहिलेली असते .. दर्शनासाठी तुमची पदयात्रा सुरू होते. ‘ श्री शीतलनाथ जैन देरासर ’ वेशीपासून थोडे दूरच असते. तुमच्यापैकी काहीजणाना ही सकाळची पायपीट सुखावह

वाटते, तर काहींना सूर्य खूपच वर चढल्याची जाणीव होऊन ती त्रासाची वाटते शेवटी तुम्ही ' वाटाड्या 'सोबत एका वाड्याजवळ येऊन थाबता

त्या वाड्यात श्री शीतलनाथ भगवानाचे मंदिर आहे असे जेव्हा वाटाड्या तुम्हांस सागतो तेव्हा तुम्हास वाटते की असले कसले हे मंदिर ! हे पाहण्यासाठी का आपण एवढा ' ताप ' घेतला ? बंदिस्त वाड्यातील मंदिर कसे असेल याची बाहेरून मुळीच कल्पना येत नाही, पण वाड्यात प्रवेश करताच मंदिराची कोरणी तुमची दृष्टी खेचून घेते मुद्रामधले हे ' श्री शीतलनाथ जैन देरासर ' शिंपल्यात झाकलेल्या मोत्यासारखे आहे !

कच्छ जिल्ह्यात भूज आणि भुजपूर अशी वेगवेगळी दोन गावे आहेत. भूज हे तहसीलचं ठाण तर भूजपूर हे छोटस गाव आहे. भूजपूर या गावाकडे जाताना रस्त्याकडेच्या रानावनात गायीम्हशींचे आणि शेळ्यामेंढ्याचे कळप दिसतात गायी आणि म्हशी एकत्र चरताना आढळतात गायीम्हशीच्या कळपात गायीची सख्या अधिक असते या गायी काठेवाडी, म्हणजे महाराष्ट्रातल्या गावरान गायींपेक्षा वेगळ्या असतात. एकेका कळपात दीड-दोनशे जनावरे असावीत ! शेळ्यामेंढ्याचे कळपही असेच मोठाले रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या उटाच्या गाड्याही कितीतरी भेटतात गाड्यांना रबरी टायरची चाके असल्याने रस्त्यावर खडखड आवाज होत नाही धावपट्टीच्या लाकडी चाकापेक्षा ही चाके अर्थातच खुजी व गाड्या ओढणारे उट बैलांच्यापेक्षा उच, त्यामुळे तरफेप्रमाणे भासणाऱ्या या गाड्याची बघणारांना मौज वाटते ढांगुळा उट कधीकधी धीमा तर कधीकधी धापा टाकत चालतो. कधी तो दौडतो चाकाची आणि रस्त्याची कुरबूर होत नसल्याने गाड्यांची गती तेज व्हायला मदतच होते अशी ही गम्मत पाहत आणि रस्त्याने दिसणाऱ्या या सगळ्या गोष्टी मागे टाकीत ' मधुमीलन ' भूजपूरमध्ये प्रवेश करते

या गावातल जैन मंदिर भव्य आहे येथील मूळ नायक महावीर स्वामी असून ते ' मुछाला ' या विशेषनामाने येथे ओळखले जातात ' मुछाला महावीर हे नाव ऐकताच राजस्थानातल्या पाली जिल्ह्यातील राणकपूर-जवळच्या ' मुछाला महावीर ' या तीर्थक्षेत्राच स्मरण होण अगदीच स्वाभाविक असत तीर्थंकरांच्या प्रतिमा केशरहित, गोऱ्यागोमट्या, घोटीव, नितळ स्वरूपात सर्वत्र दिसतात भक्त आपल्या तीर्थंकर भगवानाना अशाच रूपात नेहमी पाहत असतात पण काही काही ' श्रद्धाळू ' भक्तांना हाच आपला आराध्यदेव ' मिशीवाला ' दिसावा हे नवलच नाही तर काय ! म्हणूनच

की काय हे भाबडे भक्त आपल्या लाडक्या देवाला 'मुछाला महावीर' या नावाने भक्तिभावाने संबोधीत असावेत! अशा स्वरूपात देवाला पाहायला मिळावे यासाठीदेखील भाग्य लागत असावे मी देवाला अमूक एक रूपात पाहीनच असे कोणी मिशीवर ताव देऊन म्हटले तर तो देव तशा रूपात थोडाच भेटतो! देवाला हव्या त्या रूपात पाहण्याचा भाव भक्ताच्या ठायी असायला हवा, तरच तो त्याला त्याच्या अंत:चक्षूनीच नव्हे तर चर्म-चक्षूनीही 'मनोमन' हवा तसा दिसू शकतो!

'मुछाला महावीर'चे दर्शनार्थी पाहून त्रिलोक, गोविंद, नारायण, वसंत आदी नावाची मुले त्यांना घेरतात त्यात एखाद दुसरी लता नाहीतर मृणालदेखील असते बुशशर्ट व पॅंट घातलेली ही मुले कोणा भिकाऱ्याची नसून ही बिनदिक्कतपणे व नि:संकोचपणे प्रवाशांपुढे हात पसरतात भिक्षा मागण्याची यांना लाजच वाटत नाही तशी अगदीच दळभद्रयांची ही मुले नसावीत मुलामुलींनी भीक मागण्याची इकडे वहिवाटच आहे की काय न कळे! यांचे आईबाप किंवा पालक यांना अशा गोष्टीपासून परावृत्त तरी करीत नसावेत किंवा त्यांच्या अपरोक्ष मुलेमुली भीक मागत असावीत गावातील भव्य मंदिराच्या पार्श्वभूमीवर हा प्रकार मनाला चुटपुट लावतो कुणी एखादे नाणे कुणा एका मुलाच्या हातावर ठेवले व ते चुकून खाली पडले की त्या नाण्यावर तुटून पडण्यासाठी मुलांची जी झुंबड उडते ती मोठी अनुकंपनीय वाटते गावातले रस्ते फुपाटयाचे की ज्यात कच्छच्या वैशिष्टया-प्रमाणे वाळूचे प्रमाण अधिक असते, अशा रस्त्यावरची धूळ उसळून उठत नाही ही कृपाच म्हणायची नाहीतर मुलांची ही झोंबाझोंबी पाहत असताना हातरुमालांनी नाके दाबून धरण्याची पाळी आली असती!

मंदिराजवळ जाताच बाहेरील भिंतीवरची 'धननी सदुपयोग. .वस्तुपाल तेजपाल' ही अक्षरे लक्ष वेधून घेतात आठशे वर्षांपूर्वी वस्तुपाल, तेजपाल हे बंधुद्वय गुजरातचा राजा वीरधवल याचे मंत्री होते कार्यक्षम व व्यवहार-कुशल अशा या मंत्रिद्वयाने राजा वीरधवल याची कोसळती राजसत्ता सावरून धरून गुजरातची प्रतिष्ठा वाढविली होती या बंधुद्वयाने गिरनार, शत्रुंजय, आबू या पहाडांवर अजरामर शिल्पकलेचा साक्षात्कार घडवणारी प्रेक्षणीय मंदिरे उभारून पैशाचा सदुपयोग केला होता अशी जैनाची मनो-धारणा व श्रद्धाही आहे! श्रीशंखेश्वर पार्श्वनाथ, श्रीभद्रेश्वर येथील मंदिरां-चाही जीर्णोद्धार या बंधुवर्यांनी केला होता पैशाचा सदुपयोग मंदिरे उभारून करावा हाच ह्यांचा संदेश मंदिराच्या भिंतीवरील अक्षरे देतात मंदिरांची उभारणी ही त्या काळात सत्प्रवृत्ती आणि सर्वमान्य कृती मानली जात

होती मंदिर हे सत्कृत्याचे प्रतीक मानले जात होते !

मुछाला महावीराच्या मंदिराखालील भुयारात केशरियालाल आदिनाथ भगवान याचे मंदिर असून श्री चिंतामणी पार्श्वनाथाचे स्वतंत्र मंदिर बाजूलाच आहे

एकीकडे निर्जल, निष्पर्ण प्रदेश आणि लगेच दुसरीकडे हिरवागार परिसर, असा निसर्गाचा अचानक कायापालट कुणालाही चकित करून टाकतो निसर्गाची ही मायावी जादू कच्छमध्ये भुजपूर गावानंतर आणि 'मोटी खाखर' गावालगत पहावयास मिळते महाराष्ट्रात मोठ्या गावाला 'बुद्रुक' व लहान गावाला 'खुर्द' अशी उपपदे लावण्याचा प्रघात आहे गुजरातमध्ये मोठ्या गावाला 'मोटा' किंवा 'मोटी' व छोट्या गावाला 'नाना' किंवा 'नानी' ही विशेषणे लावण्याची रीत आहे 'खाखर' नावाची दोन गावे जवळ जवळ आहेत एक आहे 'मोटी खाखर तर दुसरी आहे 'नानी खाखर' ! ...

'खाखर' या नावावरून येथील वातावरण, या शब्दात शेकलेला सुकलेला, वाळलेला असा जो गर्भितार्थ आहे त्यानुसार, रुक्ष असावे, येथील भूभाग उजाड असावा असा समज होतो पण 'मोटी खाखर' जवळ येत असतानाच निसर्गातली टवटवी जाणवू लागते 'मोटी खाखर'कडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस बाभळीची आणि अधून मधून लिंबाची झाडे असली तरी गाव जवळ येताच शेतांच्या बांधांवर चिंचेची झाडे दिसू लागतात गावालगत चिंचेची बने लांबलचक दूरवर पसरली आहेत त्यामुळे चिंचेच्या झाडांनी गाव वेढले आहे असे वाटते वडाची डेरेदार झाडेही कुठे-कुठे दृष्टीस पडतात या वृक्षराईमुळे गावाचा हिरवेपणा नजरेत भरतो एकेकाळी नद्यानाल्यांनी वेढलेला कच्छ भूप्रदेश आज भौगोलिक स्थित्यंतरे होऊन रणात रूपांतरित झाला असला तरी आखाताच्या सानिध्यात जाग-जागी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या व कच्छच्या दक्षिण किनारपट्टीलगत आखाताला जाऊन मिळणाऱ्या भुखी, रुक्मावती, खारोद, वेंगडी, साई, चोक, ककावटी, नैरा, नाग अशा अनेक नद्यांचे अस्तित्व आजही टिकून आहे. अर्थातच अशा नद्यांलगतचा टापू 'मोटी खाखर प्रमाणे हिरवा दिसत असावा !

'मोटी खाखर' गावात शिरताच पंचायतभवन सर्वप्रथम दृष्टीस पडते. या पंचायत भवनाला कुणा एका दानवीर श्रेष्ठीचे नाव दिलेले आहे गावातील जैन मंदिर प्रथम तीर्थंकर श्री आदिनाथ भगवानांचे असून साडे-

तीनशे ते चारशे वर्षांपूर्वी बांधलेले हे मंदिर पक्क्या दणकट बांधणीचे आहे मंदिर देखणे असून त्यास बाहेरून दिलेला चंदेरी रुपेरी रंग मंदिराच्या देखणेपणात भरच घालतो मंदिरालगतच ज्ञानमंदिर आहे

'मोटी खाखर' पासून दिसू लागलेली झाडी 'नानी खाखर' पर्यंत दिसते या गावालगतची जमीन मऊ आणि सुपीक असल्याने 'नानी खाखर' जवळची वृक्षराजी 'मोटी खाखर' जवळच्या झाडीपेक्षा दाट आहे नानी खाखरजवळ चिंचेच्या ऐवजी नारळीची आणि आंब्याची झाडे दिसतात नारळीच्या बागा व आमराया हे नानी खाखरचे विशेष आकर्षण आहे. 'नानी' असून ही 'नकटी' नाही तर 'छकटी' मात्र खास आहे !

नानी खाकरमध्ये मूळनायक श्री चिंतामणी पार्श्वनाथ भगवान यांचे मंदिर असून या मंदिराची बांधणी इतर मंदिरापेक्षा वेगळी आहे हे मंदिर राजप्रासादाच्या थाटाचे असून त्याला तीन प्रवेशद्वारे आहेत या तिन्ही प्रवेशद्वारावर अर्धगोलाकार कमानी आणि या तिन्ही कमानींवर तीन घुमटाकृती छत्र्या आहेत

मुन्द्रा तहसीलची हद्द ओलांडून मांडवी तहसीलच्या हद्दीत प्रवेश केला की बिदडा गावाचे नाव कानावर येते काही काही गावांची नावे मोठी गमतीदार असतात कुठं काही गावांची नावं सार्थ वाटतात, तर कुठं काही गावांची नावं निरर्थक वाटतात. गावात नसते ते नावात असते, नावात नसते ते गावात असते ! 'नावात काही नसते' हे जसे खरे तसेच 'नावात सारे काही असते' हेही खरे !

डोळ्यावर पट्टी बांधून कुणाला या गावी अचानक आणून सोडले आणि त्याच्या डोळ्यावरची पट्टी दूर करून हे गाव कोणत्या जिल्ह्यातलं आहे असं त्याला स्थूलमानानं विचारलं तर स्थलमान पाहून कोणीही चुकून माकून सुद्धा 'कच्छ' जिल्ह्याचं नाव सांगणार नाही ! कच्छेचे नाव घेतले की डोळ्यापुढे तत्क्षणी रण उभे राहते ! . फक्त रणच ! . . रणरणते रणच ! उत्तरेकडचे सिंधसीमेलगतचे 'मोटु रण' तर पूर्वेकडील बनासकांठा, मेहसाणा, सुरेंद्रनगर आणि राजकोट या जिल्ह्यांच्या सरहद्दीलगतचे 'नानु रण' ! ... कासवाच्या पाठीसारखे खरखरीत कच्छचे रण त्याचे नाव तोडून निघणे अशक्य ! रण ते रण ! रेगिस्तान ते रेगिस्तान ! याची आठवण येथे अशक्य ! येथे 'वनवासा'ची आठवण करून देणारा 'रणवास' जाणवणार नाही ! .. वास्तविक गुजराती भाषेत 'रणवास'चा अर्थ 'राणीवास' किंवा 'अंतःपूर' असा आहे पण कच्छसारख्या रणात कसला राणीवास

आणि कसले अंतःपूर ! केवळ वनवासच ! छे ! अशा या वाळवंटातही पडणाऱ्या छावणीत सुलतान रझियाने 'राणीवास' उभा केला होता ! तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करणारा हबशी सरदार जमालउद्दीन याकूतवर तिनही अशा 'राणीवासा'त त्याच्या अंतापर्यंत चांदण्याची बरसात केली होती ! तिच्या अमीरातीतला अल्तूनियाही तिच्या प्यारसाठी तिच्यावरून पंचप्राणांची निरांजन ओवाळीत होता आणि या राणीवासात त्यालाही इज्जत होती ! याकूत आणि अल्तूनिया यांच्या वियोगाने रझिया जास्तच खच्ची झाली होती! आपला सारा कबीला 'रणा'त मागे ठेवून रझियाने 'रणा'-तच अखेरचा 'सांस' घेतला व 'रणवासी राणीवास' कायमचा 'वनवासी' झाला ! एका रसील्या पण उदात्त 'मुहब्बती'च्या 'पैरा'च्या 'निशानीया' या रणात जागजागी उमटल्या होत्या, ज्या इतिहासाने आजही जतन करून ठेवल्या आहेत ! या इतिहासाची 'याद' होऊन रणातही 'राणीवास' अधून मधून दिसायला लागतो तो असा ! जेसल तोरलच्या प्रीतीचा मळाही कच्छच्या रणात असाच मोहरला होता ! म्हणूनच यांच्या 'यादगारी'चा, असा हा इथला प्रदेश म्हणजे 'राणीवास' किंवा 'राणीवसा' म्हणायला हरकत नसावी !

दोनशे वर्षांपूर्वी कच्छवर महाराजा गोडजी याची सत्ता होती कच्छसाठी जिवाचे रान करणारा हा राजा कच्छच्या संरक्षणासाठी डोळ्यात तेल घालून जागृत होता भारताच्या सरहद्दीवरील प्रदेशाला त्या काळात पर-चक्राचा धोका होताच, पण अंतर्गत दुष्टाव्याची टांगती तलवारही राजे-रजवाड्याच्या डोक्यावर सतत परजून राहत होती साडेसातशे वर्षांपूर्वी भद्रेश्वरवर थरकापरच्या पीठदेवाने स्वारी केली होती यानंतर अशा अंतर्गत लढाया काही थोड्या झाल्या नव्हत्या. मोठ्याची राज्ये छोटी होत होती, नष्ट होत होती, तर छोट्याची राज्ये विस्तारून मोठी होत होती केवळ स्वतःच्या राज्याच्या सीमा विस्तारित करून मानमरातब मिळवण्याच्या अभिलाषेपोटी अनेक छोटे-मोठे राजे लढाया खेळत होते व आपल्या अघोरी महत्त्वाकांक्षेची पूर्ती करवून घेऊन धन्य होत होते ! 'रणकंदन' म्हणजे अशा राजांना 'मनोरंजन' वाटत होते ! खेळ राजाचा होत होता, प्रजा मात्र रंक होत होती ! वारंवारच्या आक्रमणाने हैराण आणि वैराण झालेली अशी ही त्रस्त 'रण' भूमी ! तशात निसर्गही हात धुऊन या भूमीच्या पाठीशी लागलेला ! समुद्रावर वादळ झाले की लाटाच्या भिंती अस्माना-कडे झेपावतात दऱ्याखोऱ्यात वादळवारा घुसला की तो तांडव घालू लागतो व गिरीशिखरांनाही थरथरून टाकतो ! या रणातही वावदळ आली की

वाळूचे तटच्या तट क्षणार्धात उभे राहतात आपले रौद्र अजस्त्र रूप दाखवून ते जमीनदोस्त होतात महा पर्जन्याने जमीन धुतली जावी त्याप्रमाणे प्रचंड झंझावाताने इकडच्या वाळूचे लोट तिकडे वाहून जातात पर्जन्याने होणारी ' धूप ' इथल्या सपाट रणाच्या वाट्याला येत नसली तरी उष्णतेची धूप याच्या मागे हात धुऊन लागते सोसाट्याच्या वाऱ्याने अशा करामती केल्या–नतर धरणीच्या पोटातल्या सुप्त शक्तींना माणसांनी तरी सावरावे । पण राजेच जिथे ताळतंत्र सोडत होते तिथे प्रजा दे माय धरणी ठाय होत होती प्रत्यक्ष भगवानालाही त्राही भगवान व्हावे लागत होते । असे हे खूप खूप भोगलेले रण । एकेकाचे कर्म म्हणतात तसे या ' रणा 'चेही प्रारब्धच । ..

दोनशे वर्षांपूर्वी या कच्छवर सिंधचा राजा गुलामशहा कलोरा याने स्वारी केली होती या लढाईत कच्छचा राजा गोडजी याला पराभव पत्करून सिंधच्या गुलामशहाशी नाइलाजाने तह करावा लागला होता तहाच्या अटींचे राजा गोडजीने पालन न केल्याने गुलामशहा कलोरा पुन्हा कच्छवर चाल करून आला होता मध्यतरी जेवढा अवधी मिळाला होता तेवढ्या वेळात राजा गोडजीने कच्छची तटबदी करता येईल तेवढी मजबूत केली होती अर्थातच याचा परिणाम म्हणून सिंधच्या गुलामशहाला माघार खावी लागली होती मात्र कच्छच्या लखपत तालुक्यातून परतताना त्याने सिंधू नदीला मोठा भराव घालून तिचा प्रवाह बदलून टाकला होता याची परिणती कच्छच्या हानीत होऊन कच्छचे रण झाले होते । कच्छची जल-दायिनी कच्छपासून दूर गेल्याने कच्छ निस्तेज झाले होते । एवढ्यावर कच्छची दुर्गती थाबली नव्हती, तर भूकंपानेही कच्छला अनेक तडाखे देऊन हैराण वैराण केले होते ।

अशा रखरखीत शुष्क नापीक कच्छच्या रणामध्ये ' बागायती ' हिरवे गाव असेल असे हे कोणालाही सागून खरे वाटणार नाही । मग प्रत्यक्ष पाहिल्यावर तर स्वत च्या डोळ्यावर पाहणाराचा काही क्षण विश्वासच बसणार नाही । गावाबाहेर रस्त्याच्या कडेला बाभळीची झाडी, पण गावालगत मात्र रस्त्याच्या कडेला वडाची झाडे जिकडे पहावे तिकडे नारळीच्या नाही तर केळीच्या बागा कलमी आंब्याच्या रायाही जागोजागी आहेत गव्हाची हिरवीगार शेती पाहून ठिकठिकाणी हिरवे रेशमी गालिचे अंथरले आहेत असाच पाहणाऱ्यांना गोड भास होतो शेतांच्या बाधाबाधावर आंब्याची नाही तर लिंबाची झाडे कुठे कुठे जाभळाचीही भर मध्यान्ही हवेत गारवा जाणवतो याचे कारण सभोवतालचा हा असा हिरवागार परिसर ।

मांडवी येथून दहा-बारा किलोमीटरवर आहे अर्थात इथ जवळपास कुठ

मांडवी नदी असावी व माडवीच्या खोऱ्यातल हे गाव असाव असा कुणीही सहज तर्क करावा पण हे मांडवीच खोर नसत, तर रुक्मावतीच खोर असत ! गोव्यात माडवी नदी आहे इथ कुठ ती दिसत नाही इथ दहा-बारा किलोमीटर अंतरावर फक्त माडवी गाव आहे कच्छ-माडवी भागातील लोक ' मांडवी ' मुबईत आहेत ' मांडवी ' म्हणजे ' बाजारपेठ ' असा जरी मांडवी या शब्दाचा मूळ अर्थ असला तरी मसजीद बदर रेल्वे स्टेशनच्या परिसरात व्यापारधदा करणाऱ्या या लोकांमुळे मुबईतील या परिसराला माडवी नाव पडलेल आहे कुठला प्रभाव कुठे पडतो पाहा !

बिदडा गावात श्री आदिनाथ भगवानांच, भव्य मदिर आहे

मुख्य मदिरावर श्री चद्रप्रभ भगवानांचे मदिर असून वरच्या मजल्या-वरच्या या मदिराच्या चारीही भिंतीवर अनेक तीर्थांचे रगीत पट आहेत तसेच सप्रतिराजा, श्रेष्ठी शालीभद्र, पुणिया श्रावक, साध्वी चदनबाला, आचार्य स्थूलीभद्र, दानवीर जगडूशा आदी महामानवाच्या जीवनातले उद्-बोधक प्रसंग चित्रांकित केलेले आहेत हे ऐतिहासिक प्रसंग दर्शकांना शक्ती व स्फूर्ती देत आहेत, येणाऱ्या अनेक पिढ्यांनाही देत राहतील !

## नऊ

माडवीच्या अलीकडील दोन किलोमीटर अतरावरचे, 'जबो जेट' विमानाच्या आकाराचे, नावीन्यपूर्ण बसस्थानक कोण्या एका नव्या वसाहतीची जाणीव करून देते बसस्थानकावरील 'श्री मेघजी सोजपल जैन आश्रम' हा नाम फलक, हे बसस्थानक 'जैन आश्रम या नव्या वसाहतीचे आहे याची कल्पना द्यायला पुरेसा असतो या जैनाश्रमाची प्रेरणा मुनी श्री शुभविजयजी महाराजसाहेब यांनी दिल्याची अतिरिक्त माहितीही याच मार्ग-फलकावरील नामनिर्देशावरून मिळते सदरचे बसस्थानक विक्रम सवत २००४ मध्ये बाधल्याची नोंदही याच नामफलकावर आढळते म्हणजे ही वसाहत साधारणत भारतीय स्वातत्र्याच्या उदयकालाबरोबर अस्तित्वात आल्याचा बोध होतो बसस्थानकावर सवत्सराचा उल्लेख नसता तर ही वसाहत अगदी अलीकडील काळातील म्हणजे दहाबारा वर्षांच्या आत-बाहेरील असावी असाच कोणीही अदाज बांधला असता. माडवी शहरापासून अलिप्त अशा मोकळ्या प्रशात वातावरणात 'जैन आश्रम'च्या वास्तुशिल्पाची व कलात्मक अशा बसस्थानकाची आखणी आणि उभारणी करणारे मोठे कल्पक असावेत याचा प्रथमदर्शनीच प्रत्यय घडतो अद्याप अतरगात शिरावयाचे असते ।

जैनाश्रमाच्या आवारात शिरताच सर्वप्रथम लक्ष जाते ते आवाराच्या मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या मदिराकडे । हे मदिर जैनांचे सोळावे तीर्थंकर श्री शांतिनाथ भगवानांचे असते दोन बैल, दोन खडे द्वारपाल आणि नतर दोन हत्तींची भव्य कमान अशा थाटामाटातून मदिर प्रवेश होतो मुख्य मदिराच्या मागील अगास श्री चद्रप्रभूचे मदिर असून या मदिराच्या चारी कोपऱ्यावर मदिरापासून थोड्याच अतरावर श्री वासुपूज्य, श्री कुथुनाथ, श्री धर्मनाथ व श्री पार्श्वनाथ तीर्थंकराची छोटी छोटी मदिरे आहेत

श्री शांतिनाथ भगवानाच्या छायेत वसलेल्या जैनाश्रमात निरव शातता आहे ! येथे वास्तव्य करणाऱ्या वृद्धाच्या 'उजाड वैराण' जीवनात इथले श्री शातिनाथ आदी भगवान शांती आणि शीतलता देतात ! वृद्धाना येथील वाचनालयातही थोडाफार विरगुळा मिळतो ! अनेकांच्या अतरीचा डोब येथील निरव वातावरणाने शमतो ! ..

अशा शात निवांत वातावरणात महेन्द्रभाई तुमच्या भोजनाचा प्रबध करीपर्यंत तुम्ही स्नानादी क्रियाकर्मे उरकावीत शिरापुरीचा बेत असल्याने थोडा वेळ लागेल आश्रमवासियासाठीही चार घास द्यायचे असतात थोडा अधिक वेळ लागण्याचाही सभव आहे तोवर तुम्ही येथील आश्रमही पाहून घ्यावा ! दुपारी चार वाजता मात्र पुढील प्रयाणासाठी सिद्ध रहावे ! . .

केवळ निराधार वृद्धाचीच समस्या आजच्या समाजापुढे नसून आधार असलेल्या वृद्ध स्त्रीपुरुषानाही आजकालचे धकाधकीचे जीवन असह्य झालेले आहे प्रत्येक व्यक्ती मर्त्य असल्याने मरण स्वाभाविकच व्यक्तिनिरपेक्ष असते, पण एकेका मरणाचे उदात्तपण अथवा भेकडपण हे व्यक्तिसापेक्ष असते हा सर्वसाधारण निकष असला तरी सामान्यपणे मरण ही कल्पना भयावह व असह्य मानली जाते अशी वस्तुस्थिती असूनही अपरिहार्य अशा असहायतेतूनच 'इच्छा मरण'ची कल्पना पुढे आली व ती आता दिवसें-दिवस अधिकच प्रभावी होत चालली आहे 'इच्छा मरण' तशी 'आत्म-हत्या' किंवा 'खुदखुशी' या नाण्याची दुसरी बाजू आहे ! जीवनाला कटाळून वृद्धानी आत्मघात करावा का हा यक्षप्रश्न आहे काही वृद्ध 'अनशन' अथवा 'प्रायोपवेशन' करून जीवनाची इतिश्री करून घेतात धर्मसमत हा 'निर्वाण' प्रकार असला तरी 'इच्छा मरणा'चीच ही पुण्यशील नावे आहेत ! अनशन अथवा प्रायोपवेशन या मार्गाने येणारे मरण इजेक्शनच्या 'मर्सी किलिंग'सारखे तडकफडक नसून मदमद विझणाऱ्या दीपज्योतीसारखे असते मृत्यू ही एका जीवनाची सायकाळ असली तरी दुसऱ्या एका नव्या जीवनाची ती पहाट असते या कल्पनेने निर्वाणाची भव्यता व उदात्तता अशा मरणाला लाभते पण झटक्यासरशी मारणारे 'इजेक्शन' घेऊन पाश्चात्याप्रमाणे तडकाफडकी 'मर्सी किलिग'चे मरण पत्करणे ही कल्पनाच मनाचा थरकाप उडवणारी आहे ! समाजात वृद्ध व्यक्तीविरुद्ध उमटणाऱ्या अनादर वृत्तीच्या पडसादामुळे अशा वृद्धाना जो मनस्ताप होतो त्याची दाहकताच अशा इच्छामरणाच्या कल्पनेमागे अधिकतर असते प्रखर सूडाचा हा सोज्वल प्रकार मानावा लागेल किंवा अगतिकतेची व असहाय-

सा . ८

तेची ही केविलवाणी धडपड व शरणागती तरी समजावी लागेल ! तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ यांनी इच्छामरणाला 'मारमांतिक सल्लेखना' म्हणजेच 'संथारा' असे संबोधले असून हा मरण प्रकार धर्मसमत मानला आहे. विनोबाजी भावे यांनी याच 'प्रायोपवेशना'च्या मार्गाचा अवलब केला होता, कारण ही गाधीप्रणित विचारधारा होती व विनोबाजी गांधीजींचे शिष्योत्तम होते मूर्तिपूजक श्वेतांबर व दिगबर जैनांना 'अनशन' किंवा 'संथारा' समत नसून स्थानकवासी जैन हा प्रयोग आनदाने म्हणा किंवा निरुपायाने म्हणा वृद्धापकाळी करतात तेव्हा 'जरा' व्याधीवर 'वृद्धाश्रम' हा उत्कृष्ट तोडगा म्हणावा लागेल !

येथील वृद्धाश्रम जैनांपुरता मर्यादित आहे तसा तो सर्व जातीधर्मासाठी असता तर छानच झाले असते परतु आचारभिन्नता, विचारभिन्नता आदी अनेक गोष्टी कधी कधी अशा योजनेच्या सफलतेत अडसर बनतात येथील वृद्धाश्रम जैनापुरता मर्यादित आहे हेही काही कमी नाही ! तुम्ही येथील काही वासियाचे मनोगत समजून घेतले की या विधानातील सत्यता पटण्यास कसलीच हरकत नसावी !

केशवजी धनजी व्होरा हा अठ्ठावन्न वर्षांचा इसम दोन वर्षे या आश्रमात आहे त्याची साठी उलटली नसताही तो या आश्रमात आला कसा याचे कुणालाही नवलच वाटावे या गृहस्थाला एक मुलगा आहे पण मुलाचे उत्पन्न इतके तोकडे आहे की त्याच्या छोट्याशा ससारालाही ते पुरेसे पडत नाही म्हणून 'बोज' ठरलेला हा केशवजीभाई येथील वृद्धाश्रमात आलेला आहे साठी उलटलेले अनेक जण येथे आहेत चार चार मिळवते मुलगे असूनही काही सनाथ अनाथ होऊन येथे आले आलेले आहेत बापाने कष्ट उपसून ज्याना लहानाचे मोठे केले अशा कर्त्या मुलाना आळीपाळीने तीन तीन महिने बापाला सांभाळण्याची इच्छा नसते म्हणून अशा निराधार म्हाताऱ्याला येथे यावे लागते ! सून दुस्वास करते म्हणून कोणी विधवा माय गोगलगाय बनून येथे आलेली आहे ! ..

वेळ जावा म्हणून यथाशक्ती काही ना काही काम करावे असा येथील संकेत आहे म्हणूनच 'इन लोगोंको यहा भीक नही, तो काम और साथ साथ सन्मानभी मिलता है !' केशवजीभाई कधी कधी येथे 'चौकीवाल्या'चे काम दिवसा अथवा रात्री पाळीप्रमाणे करतो, तर कधी कधी तो येथील बागबगीच्यात माळ्याचे कामही करतो ज्याच्या त्याच्या वकुबाप्रमाणे कोणी भोजनगृहात वाढप्याचे काम करतो तर कोणी मुदपाकखान्यात स्वयपाककामात मदत करतो स्त्रियाना 'रसोई' करावी लागते या कामासाठी येथील आश्रमवासीयाना 'चार पैसे' मेहनताना दिला जातो या

पैशातून कुणी फळफळावळ आणून खावीत तर कुणी विडीकाडी आणून धूम्रपानाचा षौक पुरवावा हा ज्याच्या त्याच्या मर्जीचा सवता सुभा, ज्याचा त्याचा मनसुबा। येथील आश्रमासीयांच्या खाण्यापिण्याचा, औषधपाण्याचा खर्च आश्रमामार्फत केला जातो दाते देतात त्यावर हे भागते

एखाद्या आश्रमवासीयाला आपल्या कुटुबीयात काही दिवस जाऊन राहण्याची इच्छा झाली किंवा त्याला तशी सधी त्याच्या कुटुबीयांच्या इच्छेने मिळाली तर त्याला आश्रमातून 'सुट्टी' मिळते 'सुट्टी' सपली की त्याने आश्रमात परतावे। एखाद्या 'करुण' जिवाला नियती कायमची सुट्टी देते असे कुणाचे इथे मरण झाले तर मरणाची आणि दहनाची व्यवस्था आश्रमाकडून होते येथील 'कुटुबा'तला एखादा माणूस कमी होतो, कधी कधी त्या आधी किंवा त्यानतर नवा जीव त्या कुटुबात दाखल होतो।

श्री मेघजी सोजपाल या दिवंगत कच्छी श्रेष्ठीचे ऋण या दृष्टीने दिगंत आहे। येथील आवारातील त्यांचा श्वेत अर्धपुतळा हे जरी त्यांचे स्मारक असले तरी हा 'जैन आश्रम' खऱ्या अर्थाने त्यांचे जिते जागते स्मारक आहे। काळाकडे पाठ फिरवून केवळ रूढधर्मच सांगणारे जैन मुनी मदिरेच बाधण्यासाठी समाजास प्रवृत्त करतात अशाही काळात मुनीश्री शुभविजयजी यांच्या प्रेरणेने उभी राहिलेली 'जैन आश्रमा'ची सर्व सुखसोयींनी सपन्न अशी ही नूतन वसाहत त्यांच्या नव्या सम्यक् दृष्टीचे महान प्रतीक आहे। जैनांचे सौराष्ट्रातील महातीर्थ 'शत्रुजय' पालिताना येथेही 'गिरिविहार' वृद्धाश्रम उभा राहिला असून हा साधू, साध्वी, श्रावक, श्राविका अशा चतुर्विध सघासाठी आयोजिलेला आहे। ही कल्पना अधिक नावीन्यपूर्ण आहे।...

अशा धर्तीचे आश्रम अनेक ठिकाणी निर्माण व्हावयास हवेत ही 'कळिकाळा'ची गरज आहे 'जेट' आणि 'रॉकेट'च्या युगात ही आवश्यक अशी बाब आहे 'जबोजेट'च्या आकाराचे येथील बसस्थानक हे अशा कालाचे सृजनात्मक रूप आहे। 'जेट'च्या गतीपुढे अगतिक झालेल्या येथील वृद्धाची नजर कधी कधी अतराळाचा वेध घेत असावी व अनताशी अनेकदा समरस झालेली ती दृष्टी शून्यपणे का होईना कुठे ना कुठे तरी भाव विश्वात अभावितपणे काही ना काही तरी शोधत राहत असावी। त्याचे त्यानाही समजत नसावे। तुम्हाला मात्र हे उमजावे।

'अचलगच्छ' सप्रदायाचे शिरोमणी श्री गुणसागर सूरीश्वरजी महाराज यांचा प्रभाव तुम्हांस या भागात ऐकावयास मिळतो माडवीपासून तीन-चार किलोमीटर अतरावर तळवाना आणि कोडाय या गावाच्या मध्यावर 'बहात्तर जिनालया'चे नवे तीर्थ उभे राहत आहे श्री गुणसागर महाराजांनी

वयाची बहात्तर वर्षे पूर्ण केली आहेत याची आठवण म्हणून हे तीर्थ साकार होत आहे कोणतेही स्थान कसे फुलत बहरत जाते हे पाहण्यात वेगळीच खुमारी असते पण सर्वांची आवड सारखी थोडीच असते ! 'मधुमीलन' मांडवी शहराच्या उद्दिष्टाने धावू लागल्याने अर्थातच काही काही इच्छुकांची निराशा होते ! . वृद्धांचा 'जैनाश्रम' पाहून राजी झाल्याने ही नाराजी गौण ठरते ! ..

मांडवी या शब्दाला 'बाजार' हा जसा एक अर्थ आहे तसाच 'घरा-पुढचा बैठकीचा उचवटा' म्हणजेच 'पडवी' किंवा 'ओटी' असाही दुसरा अर्थ आहे सज्जा किंवा व्हरांडा असाही आणखी एक अर्थ या शब्दाला आहे मांडवी हा शब्द कसा आणि कोठून आला याचा सहजासहजी तुम्हास उल-गडा होत नाही पण पश्चिम समुद्र किनारपट्टीवरच्या कच्छमध्ये तसेच गोमांतकामध्येही हा शब्द विशेषनाम म्हणून अनुक्रमे गाव व नदी यांच्या परिचयासाठी अनेक वर्षांपासून वापरला जात आहे यावरून पश्चिम किनार-पट्टीवरील या दोन्ही भूप्रदेशांचा संबध दीर्घ कालापासून असावा हे अनुमान निघू शकते या दोन्ही भागाचा सांधा काही ना काही निमित्ताने येथील स्थानिक लोकाकडून आणि परकीयाकडून वारंवार जुळत असला पाहिजे असे दिसते ! मांडणी करणाऱ्या व्यापारी मंडळीमुळेच या गावाला 'मांडवी' हे बिरुदनाम लाभले असावे !

जुन्या ऐतिहासिक नोंदीवरून भारतवर्षाचा व्यापार विशेष करून पश्चिम आशिया, पूर्व आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक देशांशी चालत होता या व्यापाराच्या जोरावर अनेक भारतीय व्यापारी, ज्यात जैनाचा अधि-कांशाने भरणा होता ते, गर्भश्रीमंत झाले होते व ते 'महाजन' अथवा 'श्रेष्ठी' या बिरुदांनी गौरवले जात होते 'श्रेष्ठी'चे पुढे 'शेठश्री, व नंतर 'शेठ' असे भ्रष्ट रूप झाले होते अशा जैन व्यापाऱ्याच्या हातात आजही मांडवीचा व्यापार आहे असे भारतीय व्यापारी देश पर्यटन करीत होते तसेच परदेशी पर्यटकही भारतात येत होते हे 'फिरंगे' म्हणून ओळखले जात होते पूर्व कालात भृगु वंशीय 'भृगुकक्ष' या भरुच बंदरावाटे पर-देशाशी व्यापार करीत होते खाली कोकणपट्टीला 'कुकुण' वंशीय ! श्रीपाल राजाचाही असाच लौकिक होता कच्छ भद्रेश्वरचे श्रेष्ठी जगडूशा याचा इराणशी मोठा व्यापारी संबध होताच ! भारताचा परदेशाशी व्यापारच तेवढा मोठा नव्हता तर त्याची परदेशात पतही मोठी होती प्रो मॅक्समुल्लर यांनी आपल्या इंडिया व्हॉट इट कॅन टीच अस ' या पुस्तकात भारतीय

व्यापारी नीतिमत्ता इतर कोणत्याही देशापेक्षा वरच्या दर्जाची आहे असा निर्वाळा दिला आहे ! अलीकडील कालात भारतीय व्यापाऱ्यांना या दिगत कीर्तीचा विसर पडावा ही शोकांतिका आहे ! .

एकेकाळी मांडवी हे पश्चिम किनारपट्टीवरील महत्त्वाचे बंदर असावे याची साक्ष या शहरालगतची दर्याखाडी आजही देते कच्छला ललामभूत ठरलेल्या रुक्मावती नदीचे विस्तृत पात्र येथून दूर अंतरावर दर्याला मिळते व ही दर्याखाडी समृद्ध होते अशा या दूरवर पसरलेल्या दर्याखाडीच्या अर्ध-गोलाकार काठाला वसलेली बाजारपेठ व तिच्या प्रभावाने व आश्रयाने वाढलेली लोकवस्ती म्हणजेच मांडवी नगरी 'मांडवी' हा शब्द मराठीतल्या 'मांडणी' शब्दाची जवळीक सांगतो एका दुकानाला खेटून दुसरे दुकान अशा तऱ्हेने रांगेत मांडणी केल्यासारखी वसलेली उतारपेठ म्हणजेच मांडवी !

आता जरी रुक्मावतीवर भला मोठा 'विजयसागर डॅम' बांधला जात असली तरी, पूर्वी गावालगतच्या दर्याखाडीत भरपूर पाण्याचा साठा असावा काठावर जी अनेक जहाजे नांगरलेली दिसतात त्यावरून हा निष्कर्ष निघू शकतो आता तुमचे लक्ष जिकडे लागलेले आहे तेथे भले मोठे नवे लाकडी जहाज बांधण्याचे काम चालू आहे माल वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी ही जहाजे पूर्वी शिडावर चालत होती आता ती 'डिझेल इंजिन'वर चाल-तात अशा जहाजाला 'कारगो शिप' म्हणतात मालवाहू जहाजांतून इराक-इराणकडे लाकूड, मीठ, मासे वगैरे मालाची वाहतूक होते तिकडून सिमेंट, तेल वगैरे वस्तूंची आयात होते अशी जहाजे हाकणाराला 'टांडेल' किंवा 'मालम' म्हणतात 'मालम' हा शब्द उर्दू 'मालुम' शब्दावरून आला आहे 'मालम'ला जहाज हाकण्याचे जसे ज्ञान असते तसेच जहाजावरील मालाची 'माहिती' असल्याने त्यावर देखरेख करण्याचे कौशल्यही असते

प्रवासाला निघाल्यावर जहाज बुडण्याचा धोकाही असतो त्यामुळे अत्या-धुनिक 'पंपा'ची जहाजावर योजना केलेली असते जहाजात शिरलेले पाणी अशा पंपाच्या सहाय्याने बाहेर फेकले जाते चुकून कधी बिघाड होऊन इंजिन बंद पडले तर जुन्या काळाप्रमाणे शिडाचा वापर करून जहाज इप्सित स्थळी आणले जाते नव्याने बांधत असलेल्या जहाजावर जाऊन तुम्ही ही सर्व पाहणी करता तेथील कारागिरांना विचारल्यावर आजच्या जमान्यात अशा जहाज बांधणीसाठी आठ ते दहा लाख रुपये खर्च येतो हीही माहिती तुम्ही मिळवता 'कारगो शिप'चे बरेचसे मालक मुसलमान असून या धंद्याशी निगडीत असणाऱ्यात मुसलमानाचाच अधिक भरणा आहे त्यामुळे

या शहराची वस्ती बकाली आहे

जहाज बांधणीची कामे येथे सतत चालत असल्याने या शहरात ' सॉ मिल्स 'चा अधिक भरणा असल्याचे निदर्शनास येते ' सॉ मिल्स ' हे कच्छी माणसाचे व्यवसायवैशिष्ट्य असल्याने महाराष्ट्रात जागजागी लाकूड कापणीच्या ज्या गिरण्या आहेत त्या अधिकांशाने कच्छी लोकाच्या मालकीच्या आहेत स्वातंत्र्यपूर्व काळातले महाराष्ट्रातले व भारताच्या इतर भागातले बहुसख्य कच्छी मुसलमान फाळणीनतर पाकिस्तानात स्थलातरित झाले आहेत आता महाराष्ट्रातील व इतर अनेक ठिकाणच्या लाकूड कापणीच्या गिरण्या कच्छी ' लेवा पटेला 'च्या ताब्यात आहेत त्याच्या ' कडव्या ' क्षात्रवृत्तीला हा व्यवसाय शोभेल असाच आहे !

कच्छ किंवा गुजरातच्या इतर भागात जी पटेल मंडळी आहेत त्यात ' लेवा पटेल ' आणि ' कडवा पटेल अशा दोन शाखा आहेत हे पटेल स्वत ला इक्ष्वाकुकुलदीपक प्रभु रामचद्राचे वशज मानतात प्रभु रामचद्राच्या दोन पुत्रांपैकी एक लव तर दुसरा कुश लवाचे जे वशज ते लेवा पटेल आणि कुशाचे वशज ते कडवा पटेल ! लव शब्द अल्पांशाचा द्योतक असून लवचिकपणा, मृदूता, कोमलता या शब्दातून ध्वनित होते तर कश शब्दात कशदर्भाची तीक्ष्णता आणि कुसळाची ताठरता आहे या गुणविशेषाच्या सदर्भाने लेवा पटेल मृदु स्वभावाचे, लवचिक वृत्तीचे असावयास हवेत पण प्रत्यक्षात मात्र ते स्वतःला तसे मानीत नाहीत कडवा पटेल वृत्तीने कडवे असायला हवेत पण ते स्वत ला कडवे, ताठर अथवा तापट मानीत नाहीत विरोधाभास हा तर साऱ्या ससाराचा, विशेषत मानवी जीवनाचा स्थायीभाव आहे ! लेवा पटेल व कडवा पटेल याच्यापैकी लेवा पटेल स्वत ला कडवा पटेलापेक्षा अधिक मानी व टणक समजतात ! नावाशी विसगत असणाऱ्या याच्या मनोवृत्ती, इतिहासावरून या विधानाशी सुसगत वाटतात ! हे दोन्ही पटेल प्रभु रामचद्राचे वशज असल्याने मूळचे हे आयोध्येचेच अशी यांची धारणा असून अयोध्येहून हे राजपुताना वगैरे भागात कालमानाप्रमाणे स्थलातरित झाले होते मेवाड, बिकानेर भागातील राजपूत घराणी लवाच्या वशातील, त्यामुळे ही स्वाभिमानी कडवी घराणी मोगल सत्तेपुढे कधीही नमली नव्हती ! या उलट जयपूर, उदेपूर येथील राजपूत घराणी कुशाच्या वशातील म्हणून ही शरणार्थी बनून अकबर बादशहाच्या अकित झाली होती ! सरदार वल्लभभाई पटेल लेवा पटेलापैकी ! पोलादी पुरुष म्हणून गौरवले गेलेले हे व्यक्तित्व कोणापुढेही नमले नव्हते ! त्यांची कणखर बाण्याची पोलादी वृत्ती लेवा पटेलांचाच स्वभावधर्म सागत होती ! . . पुढे

कालांतराने या दोन्ही शाखांतली पटेल घराणी बऱ्हाणपूरमार्गे महाराष्ट्रात आल्याचे सांगतात महाराष्ट्रातले 'ब्राह्मणव कुळी मराठे' पाटील या बिरूदाने स्वतःला गौरवू लागले होते याची जातकुळी कदाचित लेवा पटेलाचीच असावी! .. मेवाडच्या राणा प्रतापचे वंशज मानण्यात हे धन्यता मानतात! तुमच्या प्रवासी संघातील जैन मंडळी पूर्वाश्रमीची राजपूत, म्हणून ओघाने इक्ष्वाकु क्षत्रिय कुलातील आहेत याचा तुम्हासही अभिमान वाटावयास हवा! .

कच्छमधल्या लेवा पटेलांची लाकूड कापणीची ही किमया काही महाराष्ट्रीयन त्यांच्यापासून शिकले आहेत व महाराष्ट्रातील 'पाटील' मंडळींनी स्वतःच्या मालकीच्या गिरण्या जागजागी चालू केल्या आहेत!... हे सुचिन्ह आहे! .

या मांडवी गावची काही 'सोनी' मंडळी पुण्यामुंबईसारख्या शहरात स्थलांतरित होऊन त्या शहरात ती सोन्याचांदीचा सराफीचा धंदा थाटून बसली आहेत 'सोनी' हे नाव महाराष्ट्रातील 'सोनार' या नावाशी साधर्म्य सांगत असले तरी 'सोनी'नी सुवर्णकारीच्या कारागिरीपुढचा पल्ला गाठलेला आहे कच्छच्या मांडवी आदी बऱ्याच गावची मंडळीही मुंबई, पुणे आदी शहरात अनेक व्यवसाय थाटून बसली आहेत या लोकांचा पिंडच व्यापारी, त्यामुळं ही कच्छी मंडळी जगाच्या पाठीवर सर्वत्र विखुरली आहेत या मंडळींनी एकेकाळी कराची शहर आणि बंदर व्यापून टाकलं होतं पण फाळणीनंतर यांना तेथून धरागंदा होऊन वाट सापडेल तिकडं उरी फुटेस्तोवर धावावे लागले होते निर्वासित मांडवीकरांसह अनेकांना पुन्हा जमेल तेथे नवे संसार मांडावे लागले होते! मांडणी आणि फेरमांडणी ही मांडवीकराच्या आणि इतर अनेकाच्या पाचवीलाच जणू पूजलेली होती!

मांडवी शहराची वेस मोठी असून शहराभोवती चौफेर भला भक्कम कोट आहे. कोटाची व कोटातील बुरूजांची भिंत अंदाजे वीस फूट म्हणजे सात मीटर उंचीची आहे या शहराला परचक्रापासून पूर्वापार धोका होता म्हणून हा कोट छातीचा कोट करून बुजुर्गांप्रमाणे या नगरीचे रक्षण करीत आला आहे कच्छचा चक्रवर्ती राजा पहिला महाराव खेंगारजी याने चारशे वर्षांपूर्वी कच्छमध्ये अनेक शहरे वसवली होती विक्रम संवत सोळाशे छत्तीसमध्ये त्याने मांडवी शहराच्या व बंदराच्या नवनिर्मितीसाठी मुहूर्तमेढ रोवली होती इथला हा तट त्याचीच दृश्य फलश्रुती आहे या तटाने आतापर्यंत अनेक हल्ले थोपवून धरले होते! 'तस्करी'चा हल्ला मात्र आज हा तट थोपवू शकतो का हा प्रश्न आहे!

मांडवीच्या किनारपट्टीला लागूनच श्री अजितनाथ भगवानाचे मंदिर आहे श्री अजितनाथ भगवान रुक्मावतीच्या काठावरील नगरीचे रक्षण करीत आहेत ! या मंदिराजवळच श्री महाकाली माताजीचे मंदिर असून तीही या नगरीची रक्षक देवता आहे आणखी काही जैन मंदिरे व हिंदू देवळे, त्याचप्रमाणे मशिदी असूनही, एकेकाळी संपन्न असलेल्या या नगरीच्या वाटचाला, आजकाल विपन्नावस्था आली आहे याची दुखरी जाणीव झाल्या-वाचून राहात नाही ! .

या तीव्र बोचणीने मांडवीतून बाहेर पडल्यावर मनाची ही विषण्णता जास्तच वाढते ! रस्त्याच्या कडेला बाभळीची झाडे समुद्रकिनारा जवळ असल्याने जागजागी नारळीच्या बागा . शेताच्या बांधावरची ही ताठर झाडे माना उंचावून ताठ उभी आहेत काही शेतांच्या बांधावर शेरीची झुडुपे अंग आकसून संकोचून बसली आहेत ही विसंगती एवढ्या-वरच थांबत नाही काही शेतीभाती ' उपजाऊ ', तीही रस्त्याच्या एका बाजूला हिरवी गर्द दिसते, तर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला सुकलेल्या खुरटचा ' बाजरा 'ची तुरळक भुरळक ताटाची ' उज्जड खेती ' किंवा बाभळीची बने ! एका बाजूची संपन्न शेतीवाडी सधन वर्गाची. तर तिथेच, दुसऱ्या बाजूची भकास राने भणंग वर्गाची ! ...या दोन जगातून फक्त रस्ता जातो एकाच परिसरात असा विलक्षण विरोधाभास दिसावा हे शहराबाहेरीलही दुर्दशेचे लक्षण नव्हे का ? शेती विकासाला भरपूर वाव असताना गुजरात शासन कमकुवत वर्गाला सहाय्य का करीत नाही या गूढ विचाराने अस्वस्थ होऊन काही वेळ तुम्ही विषण्ण होता व या विषण्णतेतच पुढील प्रवास चालू होतो! मधुमीलनच्या चाकांबरोबर एक विचार तुमच्या डोक्यात घरधरू लागतो !

चढाईच्या खुमखुमीने आणि लूटमारीच्या इराद्याने, ' पुराने ' हल्लेखोर मांडवीवर ' हमला 'करून आलेच तर मांडवीची ' हालांकि हालात ' पाहून वेशीत घुसण्यापूर्वीच ते दबकत ' पीछे ' हटतील आणि ' आये वैसे ही वापस ' जातील ! ... ' इज इत ओल्द मदवी ?' असा संभ्रम मनात निर्माण होताच पूर्वीचे फिरंगे कोणताही ' ॲंजॅक्शन ' न करताच येथून ' ॲत द सेम मोमेंत सदन अबाउत तर्न ' करतील ! .

दुपारच्या चहाची वेळ झालेली आहे मधुमीलन लायजा गावाच्या वेशी-जवळ थांबते रस्त्याकडेला एक छोटसं खोपट असून त्या खोपटात छोटस चहापाण्याच हॉटेल आहे महेंद्रभाई या हॉटेलातच तुमच्या चहाकॉफीची

व्यवस्था करणार आहेत तोवर तुम्ही गावातल ' श्री महावीर स्वामी देह-रासर ' पाहून घ्याव

स्वातंत्र्यपूर्व काळात हे गाव कुणा काठेवाडी राजपूत राजाच्या कबजात असाव गावच्या वेशीलगतची विस्तृत अश्वशाला याची साक्ष देते या अश्व-शालेच्या प्रवेशद्वारातूनच या गावात शिराव लागत मोठ्या विस्तृत वाड्यात शेसव्वाशे तबेली आहेत या तबेल्याना अर्थातच दार नाहीत आता ही तबेली ओस पडली आहेत राजेरजवाड्यांबरोबर त्याच होत ते सर्व काही गेल ! वाड्याच्या दर्शनी भिंतीतील मोठ्या दरवाज्यातून आत शिरल की ही उजाड तबेली दिसतात पिछाडीच्या भिंतीतील तशाच मोठ्या दरवाज्या-तून बाहेर पडल की गावातच प्रवेश होतो

येथील लोकाचा पेहेराव काठियावाडी धर्तीचा आहे स्त्रिया घोळदार घागरा नेसतात, लाब कोपरापर्यंतच्या बाह्याची चोळी घालतात व अगावर बांधणी साडी ओढणीप्रमाणे वापरतात या ' उपरणी 'चा पदर डोक्या-वरून घेऊन तो घागऱ्यात खोचलेला असतो पुरुष काठियावाडी पद्धतीने घट्ट दुहेरी काष्टा घालून धोतर नेसतात गुडघ्याखालचे पाय उघडेच राह-तात अगात बद गळपट्टीचा कमरेपर्यंत घट्ट बसणारा आणि घट्ट अस्तन्याचा चुणीदार अगरखा, डोक्यावर पीळाच पांढर काठेवाडी पागोट, पायात करकर वाजणारे काठेवाडी जोडे नाहीतर वहाणा

गावच्या वस्तीच्या मानान गावातल जैन मदिर मोठ आहे माडीवर श्री आदिनाथ भगवानाच चौमुखजी मदिर आहे माडीवर जायला मदिराच्या दोन्ही बाजूनी दोन स्वतत्र जिने आहेत येथील मदिराच वैशिष्ट्य हे की माडीवरच्या चौमुखजी भोवती ' समवसरणा 'च प्रतिरूप आहे तीर्थंकराच्या प्रवचन सभा विशिष्ट पद्धतीन भरवल्या जात होत्या श्रोते चक्राकार बसत होते अशा समवसरणाच्या प्रतिरूपात येथे चौमुखजी प्रतिमांची स्थापना केलेली आहे

तुमच्यापैकी काहीजणाना तहान लागलेली असते मदिरात पिण्याच्या पाण्याची सोय आहेच राजेरजवाड्यातील पाणी सपलेल असल तरी या गावच पाणी मात्र गोड आहे आतापर्यंत कच्छमधल्या इतर गावांत प्यायला मिळालेल्या पाण्यात खारटपणा होता आखातालगतच वसलेल्या गावातल पाणी खार असायचच ! इथ या गावात इतक छान पाणी पोटभर प्यायला मिळाल्यावर चहाकॉफी घ्यायची तुम्हाला इच्छाच उरत नाही !

लायजा गावानंतर येतं ते डुमरा गाव ! या गावात जैनांची थोडी थोडकी घरे नाहीत, तर तीनशे ते चारशे घरे आहेत. पण त्यांपैकी सव्वाशे-दीडशे घरच उघडी आहेत इतर सगळे येथून मुंबईला स्थलांतरित झाल्याने त्यांची घरे बंद आहेत. वर्षाकाठी एखादवेळी ही घरं उघडली जातात ज्यांची घर उघडी आहेत त्यांच्यापैकीही काहीजण उद्योगधंद्यासाठीच मुंबईत वास्तव्य करतात

कच्छी आणि गुजराती लोकांचं वैशिष्टय हे की व्यापार-धंद्यानिमित्त हे जगाच्या पाठीवर कुठेही जातील अगदी इंग्लंड-अमेरिकेतसुद्धा ! मुंबईत तर यांचाच भरणा अधिक आहे भरीस भर म्हणून आता मुंबईत आणि इतरत्र अनेक ठिकाणी फाळणीनंतर सिंधी आणि पंजाबीही आले आहेत आफ्रिके-तल्या बऱ्याच शहरात कच्छी आणि गुजराती यांनी चांगलाच जम बसवला आहे महाराष्ट्रानं हे शिकायला हवं पुस्तकी ज्ञान व या ज्ञानात पारंगत होऊन पदवी मिळवली की छानशी नोकरी मिळवायची एवढीच त्यांची महत्त्वाकांक्षा या सीमा आता विस्तारल्या पाहिजेत, क्षितिजे रुंदावली पाहिजेत गुजराती बनिये लोटा घेऊन आले आणि गबर झाले अशी निव्वळ हाकाटी करण्यापेक्षा या लोकांचं मराठी माणसानं अनुकरण करायला पाहिजे त्यानी व्यापारधंदा, कारखानदारी मोठ्या प्रमाणावर करायचं ठरवलं तर अनेक ठिकाणची दारं, अगदी गुजरातची देखील, त्यांच्यासाठी उघडी आहे[त] !

या गावात आठवे तीर्थंकर श्री चंद्रप्रभ भगवानाचं मंदिर आहे या मं[दि]राचंही वैशिष्टय आहे इथे प्रभूच्या प्रतिमेसमोरच श्री पुंडरीक स्वामी[ंची] संगमरवरी मूर्ती प्रभुसन्मुख असून ती छोटयाशा मंदिरात आहे श्री पुंड[री]क स्वामी हे प्रथम तीर्थंकर श्री आदिनाथ भगवान यांचे प्रथम गणधर [श्री] चंद्रप्रभ भगवानांच्या प्रथम गणधराचं नाव होतं श्री दिन्न स्वामी वास्त[वि]क श्री दिन्न स्वामीची प्रतिमा श्री चंद्रप्रभ भगवानापुढं असायला हवी हो[ती] पण काही काही गोष्टी अगम्य असतात हेच खरं !

कच्छमधल्या जैन मंदिराची विशेषता ही की ही मंदिर आतून-बाहे[रू]न निरनिराळ्या भडक रंगांनी रंगवलेली असतात गाभाऱ्यापुढील सभामं[ड]प रंगीत, गोलाकार घुमट रंगीत, खांब रंगीत, शिखरंही रंगीतच छोट्[य]ा छोट्या गावातली मंदिरही देखणी आणि अति भव्य असतात याचं दु[स]रं तिसरं कारण नसून, कच्छी जैनांची धर्मावरील श्रद्धा यास कारणीभूत आ[हे] हे लोक धंद्यात देवाची पाती ठेवतात ! कुणी होणाऱ्या नफ्यात रुपयात [ए]क पैसा पाती ठेवतो तर कुणी दोन पैसे ! अर्थातच या 'भागियो'च्या वाट्या[ला] जी 'ऊपज' येते ती अशा देवळांसाठी खर्च होते देव अशा धंद्यात अ[ने]क

अर्थानी ' स्लीपिंग पार्टनर ' असतो। अर्थातच धद्यातील बऱ्या-वाईट कर्माची फळे अशी देवाच्याही वाटणीला येतात। देव झोपलेला आहे अशी भक्ताची समजूत असावी। समाधान इतकेच की, या कामी खराखुरा जागा असतो तो देवाला भागीदार करून घेणाऱ्याचा भक्तिभाव। म्हणूनच की काय असख्य मदिरे उभारली जात असताना देव निमूटपणे सोसत असावा अगणित टाक्याचे अमाप घाव।

मोटी खाखर, नानी खाखर किंवा बिदडाप्रमाणे मांडवी, लायजा, डुमरा ही गाव ' हिरवी ' नाहीत हिरवटपणा अगदीच नसतो अस नाही, पण तो फक्त असतो गावालगत गावाबाहेर पडल की, पुन्हा पहिल्यासारखा तो बाभळीच्या ओसाड बनातून जाणारा सपाटीवरचा लांबच लांब रस्ता। जणू थेट क्षितिजापर्यंत पसरलेल्या माळावर कोणी तरी काळ्या रगाचे लांबलचक जाजम पायघडीसारखे अथरले आहे या जाजमाच्या दोन्ही अगांना, ठराविक अतरावर फुलझाडाच्या कुड्या ठेवाव्यात त्याप्रमाणे बाभळीची झुडप रोवली आहेत आणि अशा गोडव्यांच्या जाजमावरून ' मधु मीलन ' शाही इतमामाने दिमाखात निघाली आहे। .सुथरीला पोचण्यासाठी।

सुथरी गाव ज्या तालुक्यात आहे त्या तालुक्याचं नाव ' अबडासा '। अबडासा नावाच गाव कच्छमध्ये कुठे आहे याचा शोध घेण्यासाठी तुम्ही गुजरात राज्याचा नकाशा पुढे घेऊन बसलात तरी तुम्हाला हे गाव सापड-णार नाही जे अस्तित्वातच नाही ते सापडेलच कसे। पुणे जिल्ह्यात ' हवेली ' व ' मावळ ' तालुक्यात या नावाची गावे जशी नाहीत तशीच अवस्था अबडासाची। महाराष्ट्रात पूर्व आणि पश्चिम खानदेश या नावाचे दोन जिल्हे होते आता याच जिल्ह्याचे जळगाव आणि धुळे असे नामातर झालेले आहे या दोन्ही जिल्ह्यांत खानदेश नावाचे गाव नव्हते आणि आज मितीलाही नाही अगदी तीच गत ' अबडासा 'ची। तसे या गावाचे नाव गुलदस्तात आहे आणि नाहीही। ..

अबडासा तालुक्याचा इतिहास स्फूर्तिदायी आहे। अल्लाउद्दीन खिल-जीने जेव्हा सिंधवर स्वारी करून सिंध पादाक्रांत केला होता तेव्हा सिंधच्या समा वशातील समा, सुमरा आणि सोढा हे वीर पुरुष परिस्थितीपुढे असहाय होऊन कच्छमध्ये आसऱ्यास आले होते त्यांच्याबरोबर सुमारे सोळाशे सुमरी स्त्रियाही होत्या हे सर्व कच्छचा राजा जाम अबडा याचे आश्रित होते

अल्लाउद्दीन खिलजीला हे गुपित समजताच त्याने जाम अबडाकडे आश्रितांची मागणी केली होती निरपराध स्त्रियांना अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वाधीन करण्यापेक्षा त्याच्याशी टक्कर देता देता मरण आले तरी बेहेत्तर या जिवाच्या कराराने जाम अबडा खिलजीच्या सैन्याशी प्राणपणाने झुजला होता आणि प्राणाची बाजी लावलेल्या अबडाचा त्या लढतीत अत झाला होता त्याच्या या हौतात्म्यामुळेच त्या भागाला 'अबडासा' असे नाव पडले होते हा इतिहास अनेकाना अज्ञात, फारच थोड्याना ज्ञात ! म्हणून हे नाव गुलदस्तात आहे आणि नाहीही ! या अबडासा तालुक्याचे ठाणे पूर्वी जखौ बदर येथे होते आता ते नलिया गावी आहे जखौ सुथरीपासून सुमारे तीस किलोमीटर व सध्याचे अबडासा तालुक्याचे प्रमुख स्थान नलिया सुथरीपासून सुमारे पन्नास किलोमीटर अंतरावर आहे ! .

सुथरी गावात मधुमीलन शिरली तेव्हा रात्रीचे आठ वाजून गेलेले असतात तुमच्या 'उतान्या'साठी मधुमीलन जिथे थांबते तिथेच 'सुथरी सहकारी ग्राहक भाडार लिमिटेड' या सहकारी संस्थेचे 'पांजी दुकान' आहे अर्थातच मधुमीलनमधून खाली उतरताना 'पाजी दुकान'चा नामफलक तुमचे लक्ष वेधून घेतो व 'पाजी दुकान' या मोठ्या ठळक अक्षरावर तुमची नजर काही वेळ खिळून राहाते 'पाजी' शब्दाचा अर्थ काय असावा असा तुमचाच तुमच्या मनाशी चाळा सुरू होतो अर्थाचा लवकर उलगडा होत नाही म्हणून तुम्ही तिथेच कोणाकडे तरी हिंदीतून विचारणा करता व त्या इसमाकडून तुम्हास 'पाजी'चा अर्थ 'अपना' असल्याचे हिंदीतूनच कळते 'पाजी दुकान' म्हणजे 'आपले दुकान' हे सुथरीमधले सर्वांसाठी स्वस्त भावाचे राशन दुकान आहे हेही त्या गृहस्थाकडून तुम्हास समजते महाराष्ट्रातल्या काही शहरातली 'अपना भडार' नावाची दुकाने तुमच्या पाहाण्यात आलेली आहेत सुथरीमधले हे 'पाजी दुकान' तीच जातकुळी सागत असावे !

तुमच्या 'जथ्था'त चिराग आणि प्रांजल ही दोन बालके सर्वांत अगदी लहान असून चिरागला अद्याप पाचवे वर्ष लागायचे आहे, तर सर्वांत धाकटा प्रांजल थोड्याच दिवसांनी दुसरं वर्ष पूर्ण करणार आहे लहान मुलांना झोपेच्या वेळी दूध प्यायची सवय असते प्राजलसाठी दूध आणण्याकरिता त्याचे आजोबा, म्हणजे त्याच्या आईचे वडील, निघाले आहेत सायकाळच्या धारा निघून बराच वेळ झालेला आहे तरीही नवख्या सुथरीत कुठे ना कुठे तरी, एखादा अर्धा लीटर दूध, चौकशी केल्यानतर मिळेल असा विश्वास सुथरीत नव्याने आलेल्या या 'पाहुण्या'ना वाटत आहे ! ..इकडे कच्छमध्ये

उंटीणीचे नाहीतर शेळीचे दूध अधिक ! गाईम्हशीचे दूधही मिळते पण उंटीणीचे नाहीतर शेळीचे दूध विशेष करून ! हे दूध सवय असणारानाच पचू शकते ! 'पाहुण्यां 'ना हवे असते गाईचे अथवा म्हशीचे दूध !

एक बैलगाडी रस्त्याने खडखड आवाज करीत निघालेली आहे शेतावरून परतणारी ती बैलगाडी कुणा शेतकऱ्याची असावी ती जेथे थांबेल तेथेच चौकशी केली की दूध मिळेल हा ठोकताळा मनाशी योजून ते बैलगाडी-मागून निघालेले आहेत गाडी गावच्या वस्तीत शिरली, त्याचवेळी कुणाचे तरी घर उघडे दिसले पुढे जाण्याची आवश्यकता न वाटल्यामुळे 'पाहुणे' त्या घरापाशी थांबले ..गाडी पुढे निघून गेली

गाव तसं मोठं नसावं त्यामुळेच गावात लवकर सामसूम झाली असावी उघडच्या दाराच्या उंबऱ्याजवळ जाऊन 'पाहुण्यां 'नी दूध आहे का अशी हिंदीतून चौकशी केली कुणी तरी आल्याचा अदाज बांधून वीस-एकवीस वर्षांची बालिका दरवाज्याशी आली तिच्या वेषभूषेवरून ते घर कुणा मुसलमानाचे असावे याची कुणालाही कल्पना यावी दूध आहे का म्हणून पुन्हा हिंदीतून विचारणा झाली नवख्या माणसाला बघून बालिका क्षणभर बावरली मग तिने लाजत लाजतच कच्छी भाषेतून काही तरी सागितल बालिकेला हिंदी समजले असावे प्रश्नाचे उत्तर मात्र हिंदीतून देणे तिला जमले नसावे म्हणूनच तिने लाजून संकोचून कच्छी भाषेतूनच काही तरी उत्तर दिले असावे कोणतीही भाषा अथवा बोली सरावानेच बोलता येते. हिंदी बोलण्याचा बालिकेला सराव नसावा म्हणूनच ती कच्छीमधून बोलली असावी 'पाहुण्या 'ना कच्छी फारसे समजत नव्हते, बोलता तर मुळीच येत नव्हते त्यामुळे मोठी पचाईत झाली असावी बालिकेने दारातूनच 'माँ' अशी हाक मारली त्यासरशी एक वयस्क स्त्री दाराजवळ आली दाराशी आलेल्या परदेशी पाहुण्याला दूध हवे आहे हे समजल्यावर म्हातारीने बकरीची 'खीर' आहे असे कच्छीमधूनच सागितले बालिकेपुढे जी अडचण होती तीच म्हातारीपुढे फरक इतकाच की बालिका बोलायला शरमत होती. म्हातारी निर्भय होती गाईचे अथवा म्हशीचे दूध पाहुण्याला हवे असे समजल्यावर ती म्हणाली, 'असा घ्याँ मैंनी गौनी खीर नाय'

म्हातारीच्या त्या उत्तरावर गाईचे अथवा म्हशीचे दूध दुसरीकडे कुठे मिळेल अशी विचारणा ओघानेच झाली त्यावर म्हातारी म्हणाली, 'असांजे बाजूमे इबाजे घर आँय ओनघ्या मैंनी गौनी खीर मेल धो'

म्हातारीने इबाचे नाव सुचविले होते पण हा इबा कोण कुठे राहतो हे परदेशी पाहुण्याला कुठून माहिती असणार ? कुणी तरी इबाच घर दाखवाव

अशी विनती होताच म्हातारी मुलीकडे पाहत म्हणाली, 'ई मुजी धी लजेती,' म्हातारीचा मुलीकडे पाहाण्याचा रोख व मुलीचा आणि लज्जेचा असणारा सर्वसाधारण नैसर्गिक संबंध लक्षात घेऊन 'धी' म्हणजे 'मुलगी', तसेच 'माझी मुलगी लाजरी आहे' असे सरळ सरळ तर्कशुद्ध अर्थ काढले गेले 'आऊ खपदो वँ त इबाजे घर बताडीयाती' असे सांगून व डोक्यावरचा मागे घसरलेला दुपट्टा पुढे ओढून म्हातारी घराबाहेर पडली बहुधा ती स्वत च इबाचे घर दाखवायला निघाली असावी रस्त्याने चालता चालताच म्हातारीला उत्सुकतेन नाव विचारल गेलं. तिन 'जामा माँ' अस उत्तर दिलं

थोड चालून गेल्यावर म्हातारी एका वाड्यात शिरली हेच ते इबाच घर असाव वाड्यातल्या ओसरीवर तीन-चार पुरुष आणि दोघी-तिघी स्त्रिया गप्पा मारीत बसल्या आहेत जामा माँसमवेत कुणी तरी परदेशी मुसाफिर आल्याच पाहून त्याच बोलण एकाएकी थांबत व सर्वांच्या नजरा परदेशी पाहुण्याकडे वळतात जामा माँने येण्याचे प्रयोजन तिच्याच वयाच्या बाईला 'बच्ची माँ' असे संबोधून सांगितल्यावर 'बच्ची माँ' पाहुण्यांना म्हणाली, 'असाजे छोकरेला मैंजो खीर गरम करेलो आँय आँके खपेदो वँ त डीबो'

तेथे म्हशीचे गरम केलेले दूध मिळणार या आशेने पाहुण्यानी भांडे पुढे ठेवले बच्ची माँ जागेवरून उठली घरात जाऊन तिने दूध आणले व पाहुण्यांचे भांडे दुधाने काठोकाठ भरले दुधाचे पैसे देण्यासाठी पाहुण्यांनी पाच रुपयाची नोट बाहेर काढताच पुरुषांपैकी सर्वांत जो मोठा, तो म्हणाला, "दूधजा पैसा अस्यु घेन वो न आऊ खीरना पैसा न खपे"

हाच घरचा कर्ता पुरुष इबा असावा असा पाहुण्यानी अंदाज बांधला व दुधाचे पैसे घेण्याबद्दल आग्रह धरला त्यावर इबा म्हणाला, 'असाजा छोकरा ने आँजा छोकरा मडे एकडा। असाजा छोकरा कोरो ने आँजा छोकरा कोरो सरखाज' असे दोहरावून इबाने जवळच रांगणाऱ्या एका बाळाला मांडीवर घेतले व मायेने कुरवाळले 'तुमची मुले आणि आमची मुले सारखीच' हे इबाने जे सांगितले त्यास या कृतीने अधिकच उजाळा मिळाला पाहुण्यानी याही वक्तव्यातला मथितार्थ हावभावाने जाणला आणि क्षणभर ते दिङ्मूढ झाले कारण त्याच वेळी त्यांच्या डोळ्यांपुढे भूतकाळातला एक प्रसंग उभा राहिला

ज्या गावात त्यांनी अर्ध्याहून अधिक हयात घालविली होती, त्या गावासाठी त्यांनी खूप केल होत! काही अपरिहार्य कारणामुळ गाव सोडण्याची त्यांच्यावर पाळी आली होती काही काळ लोटल्यावर कुठल्यातरी निमित्तान त्याना गावी जावं लागल होतं ती वेळ अशीच रात्रीची होती बरोबर असेच

नातू होते त्याच्यासाठी दूध हव होत गडी माणसाला दूध मिळेल न मिळेल या सभ्रमात ते स्वत दूध आणायला गावात गेले होते ओळखीच्या ठिकाणी दूध मिळाल होत एकच लीटर दूध त्या दुधाचे पाच रुपये त्याच्याकडून मागितले गेले होते त्यांनीही ते दिले होते पैसे घेणाराने आढेवेढे घेण्याचा प्रश्नच उभा राहिला नव्हता देणारानेही ते मागता क्षणी मनापासून दिले होते पाणी मिसळलेल दूध का होईना अवेळी मिळाल होत यातच समाधान होत !

त्यावेळच्या समाधानापेक्षा आताच हे समाधान . सातारा आणि सुथरी याच्यामध्ये जेवढ अतर होत त्याहून कितीतरी अधिक अतर या दोन्ही समाधानात होत !

बच्ची मॉं जेव्हा "सकर वेजेने खीर तपायलो आँय" अस म्हणाली तेव्हा 'साखर टाकून तापवलेल्या त्या दुधात' जास्तच साखर पडल्यासारख पाहुण्यांना वाटल ! त्यानी बच्ची मॉंकडे कृतज्ञतेन पाहिल 'तुम्ही फार केलत' असच जणू त्यांना त्या दृष्टीवाटे सुचवायच असाव इबानं ती नजर ओळखली व तो म्हणाला, "आँई एतरे लमाथी आव्या अयों असाकें आँजी सेवा करे जो लाभ मेल्यो एनला करे असाकें आनद आय.. "

बोलण्यात केवढी मार्दवता केवढा जिव्हाळा केवढा ओलावा ! हे फारच झाल नाही तर काय ! दुरून आलात तुमची सेवा करण्याचा लाभ मिळाला यातच आनद झाला ! अस काही सांगून इबान बोलणच बद करून टाकल !

तस पाहिलं, तर यांच्याशी अर्थाअर्थी सबध काय ! पण हे सुथरी गाव ही जामा मॉं ही बच्ची मॉं हा इबा याच्याशी अल्पशा काळा-पुरता, क्षुल्लक निमित्ताने, सबध आला. .पण याच्याशी पूर्वजन्मीच काही-तरी नात असाव असा क्षणभर साक्षात्कार झाला! याच आपुलकीन त्या कुटुबाची विचारपूस झाली इबान मोकळेपणान सागितल, "आस्यू चार भा अयुँ ने भेगा रूता ! आस्यू मेढे खेतर खेडयुता ! "

थोडच समजल ! नव्हे, शब्दांपलीकडचा भावार्थही थोडा थोडका नाही तर पुरापुरता समजला ! कुठलीशी बैलगाडी गावाबाहेर निघाली मघाची तीच गाडी ही असावी ! आता शेताकडे परत निघाली असावी ! पण 'उतान्या'कडे परतताना आता वाटाड्या नको, की कुणाची सोबतही नको! आलेली वाट मळलेली भासत होती दीर्घ परिचयाची वाटत होती!

इथ चुकायला सुथरी हे पुण्या-मुबईसारख भुलभुलैय्या शहर थोडच आहे! मुबईतल्या त्या उच उच पण जवळजवळ एकसारख्या दिसणाऱ्या इमारती

मायावी रूपे धारण करून सराईतानासुद्धा चक्क चकवतात ! इथ 'कच्छी दशा ओसवाल जैन महाजनवाडा' किंवा 'कच्छी दशा ओसवाल जैनधर्मशाला' कुठ आहे अस आणि तेही आवश्यकता वाटल्यास एखाददुसऱ्या ठिकाणी विचारीत तुम्ही तुमच्या ठिकाणावर नेमके येऊन पोचाल त्यातूनही तुम्हास कोणीच भेटल नाही अथवा अशा छोट्याशा मामुली गावात विचारपूस करणं तुम्हास प्रशस्त वाटल नाही तर मघाशी कोड्यात टाकणार ते 'पांजी दुकान' तर कुठ गेलेल नाही ना ! मोठाले डोळे रोखून ते तुमचीच वाट पाहात जेथल्या तेथेच उभे आहे की ! ..

# दहा

सुथरी गाव 'सुथली' या नावानेही परिचित आहे. 'सुथली' या नावा-वरून या गावाचा तेजस्वी भूतकालच ध्वनित होतो सुथरी किंवा सुथली गाव सुस्थली वसले असावे असा कोणीही सरळसरळ तर्क लढवावा। 'सुवर्णस्थली' या पुरातन नामाचा अपभ्रंश होऊन 'सुथली' किंवा 'सोन-थरी' चा नामपालट होऊन 'सुथरी' असे लघु भ्रष्ट रूप झाले असावे ही अटकळही तर्कशुद्ध ठरावी! भलारा पीर, जो मूळचा सुथरीचा व वीरा आणि पाता हे दशा ओसवाल जैन बंधुद्वय भलारा पीर या नावाने मुस्लीम बांधवांकडून गौरवले जात होते, त्या भलारा पीराच्या स्तुतिपाठातील 'सुथरी सोनथरी जें जे पीरें बधी पार' या एका चरणाने या तर्काला पुष्टीच मिळते. येथील विद्यालयाच्या कोनशिलेवरचा 'सुवर्णस्थली' हा नामोल्लेखही या अनुमानाला दुजोराच देतो। काही काही गावाचा इतिहास काळाच्या असंख्य थराखाली दडपला जातो व गावांच्या भ्रमित भ्रांत नामांतरावरून अशा गावांना दिव्य भूतकाळ लाभला असावा असे निष्कर्ष काढून तेवढ्या-वरच समाधान मानावे लागते। कच्छचा चक्रवर्ती राजा पहिला महाराव बेंगारजी याने कच्छमधील छोटी छोटी राज्यशकले स्वतःच्या नियंत्रणाखाली आणून एकछत्री राज्य प्रस्थापित केले होते या भूज राज्यात त्याने भूज, अंजार, मांडवी यासारख्या शहरांची नव्याने मांडणी केली होती सुथरी त्यां-पैकीच एक या गावचा इतिहास मात्र काळाच्या गर्त छायेत अदृश्य झाला असावा असे असले तरी या गावाला फार जुना इतिहास असावा याची साक्ष गावातील खंडित वास्तू आजही पटवतात जुन्या ग्रंथांतील जैन व शैव यांच्यातील वादांचे संदर्भ या विधानास पाठिंबा देतात.

अगदी अलीकडील काळातील या गावच्या माध्यमिक विद्यालय, शेठ आर.

सा ..९

के खोना सार्वजनिक औषधालय अशा नूतन वास्तू सुथरीचे नवे स्वरूप स्पष्ट करतात कच्छ, काठेवाड, सौराष्ट्र, गुजरात या महा गुजरात प्रदेशाची महात्मा गांधीवरील व त्याच्या खादी चळवळीवरील असीम श्रद्धा येथील 'अबर चरखा केंद्रा'च्या रूपाने उभी आहे! या गावातील हुतात्म्याचे स्मारक माजी मुख्यमंत्री बलवंतराय मेहता याच्या खंबीर नेतृत्वाची व प्रदीर्घ देश-सेवेची आठवण करून देतेच, पण एकोणीसशे पासष्ट साली पाकिस्तान-बरोबर झालेल्या युद्धात ज्या कच्छी व इतर भारतीय वीरानी समर्पण केले अशा वीरांना हे स्मारक अभिमानाने मानवदनाही देते

सतराव्या शतकात सुथरी गावामध्ये मेघा शहा नावाचा एक श्रावक राहात होता जातीने तो दशा ओसवाल जैन असूनही पेशाने तो पाथरवट होता! म्हणूनच गावकरी त्याला 'उद्दीओ' या व्यावसायिक नावाने सबोधीत होते दिवसभर काबाडकष्ट करून दिवसाकाठी एका 'कोरी' ची त्याला कशीबशी प्राप्ती होत होती! तेवढ्या तुटपुज्या उत्पन्नात खर्चाची तोडमिळवणी होत नव्हती गुजराण करण्याकरता कर्ज काढण्याशिवाय तरणोपाय नसल्याने कर्जाचा बोजा वाढता वाढता शभर कोरीपर्यंत जाऊन पोचला होता महाजनांना शभर कोरींचे कर्ज क्षुल्लक वाटत असते पण मेघा शहाला कर्जाचे हे ओझे न पेलणारे होते धनकोचे तगादे होत होते ऋणको कर्जाची फेड करण्यास असमर्थ ठरत होता शेवटी एके दिवशी मानहानीला व जिवाला कंटाळून मेघाने गळयात धोंडा बाधून गावच्या एका विहिरीत उडी घेतली होती जीवनाची इतिश्री करण्याची तीव्र इच्छा असूनही तसे घडले नव्हते या घटनेमागे काहीतरी सकेत असावा अशी त्याची मनोधारणा झाली होती आणि त्याच रात्री त्याला एक स्वप्न पडले होते! . त्याने स्वप्नात पार्श्वनाथाची दिव्य मूर्ती पाहिली होती व या मूर्ती-मुळे त्याचा भाग्योदय झाल्याचे समाधानही त्याने स्वप्नात अनुभवले होते सकाळी उठल्यावर मेघा शहाने गावातल्या यतीला स्वप्नाचा वृत्तात सांगून स्वप्नात पाहिलेली पार्श्वनाथाची मूर्ती कुठे मिळेल असे त्याने श्रद्धेने यतीला विचारले होते यतीने त्याला दुसऱ्या दिवशी सविस्तर सांगेन असे आश्वासून परतवले होते त्याप्रमाणे मेघा शहा दुसऱ्या दिवशी यतीकडे गेल्यावर यतीने सांगितले होते की, "श्रीकरी नावाचे एक गाव आहे, ते छीकारी किंवा शिकारी या नावांनीही ओळखले जाते त्या गावचा देवराज पुजारी पार्श्वनाथाची मूर्ती विकणार आहे त्याला तू भेट तो त्या मूर्तीसाठी शभर 'कोरी' मागेल त्याप्रमाणे शभर 'कोरी' शिक्के देऊन तू ती मूर्ती आण!" ही मूर्ती

तुझ्या घरी आल्यावर तुझा उदयकाल होईल। यतीने असे भविष्य वर्तवले होते खरे पण मूर्तीच्या प्राप्तीसाठी शभर कोरी मोहरा आणायच्या कोठून ही समस्या मेघा शहापुढे उभी राहिली होती रोजचे उत्पन्न एक कोरी ती एक कोरी दैनंदिन खर्चाला पुरी पडत नसताना शभर कोरींची बचत केव्हा आणि कशी होणार तोवर शिकारीचा पुजारी मूर्ती विकण्यासाठी थाबेल का . अशा एकामागून एक याप्रमाणे अनेक विवंचना सतावू लागल्या होत्या या कामी योग्य ते सहाय्य व मार्गदर्शन करण्याबद्दल त्याने यतीला नम्रतेने विनवले होते यतीच्याच प्रशंसेने मेघा शहाला गावातल्या एका महाजनाकडून दोनशे कोरी कर्जाऊ मिळाल्या होत्या त्यातून मेघाने शभर कोरीचे कर्ज निवारले होते व उरलेल्या शभर कोरी घेऊन तो पूर्वेकडील शिकारी गावी आला होता त्याचवेळी शिकारीचा पुजारी बैलाच्या पाठीवरील गोणीत पार्श्वनाथाची मूर्ती लादून ती विकण्यासाठी परगावी निघाला होता मेघाने येण्याचे प्रयोजन सांगून पुजाऱ्याकडे मूर्तीची मागणी केली होती पुजाऱ्याने मूर्तीचे मोल शभर कोरी सांगितले होते यतीच्या भविष्यकथनाप्रमाणे एकामागून एक घटना अचूक घडत गेल्या होत्या आणि मेघा शहाने पूर्वसंकेताप्रमाणे पुजाऱ्याकडून पार्श्वनाथाची मूर्ती मिळविली होती घरी परतल्यावर त्याने ती शिधागृहात ठेवली होती, यापूर्वी जे शिधागृह नेहमी रिकामे राहत होते ते आता अन्नधान्याने भरू लागले होते पुढे ते इतके भरले की, त्यातून धान्य काढले तरी धान्यसाठ्यात तूट पडत नव्हती शिवाय गावच्या महाजनाकडून घेतलेले कर्ज फेडायला मेघाला मुळीच त्रास पडला नव्हता गावात त्याची पतही वाढली होती। मेघाच्या परिस्थितीत घडलेले हे स्थित्यंतर गावकऱ्यांना कौतुकास्पद वाटत होते ज्या मूर्तीमुळे मेघा शहाची अचानक उर्जितावस्था झाली होती त्याच मूर्तीमुळे गावाचीही भरभराट होईल या आशेने सुथरीचा श्रावक सघ विनम्रपणे मेघा शहाकडे आला होता मेघाने पार्श्वनाथाची मूर्ती सघाकडे सुपूर्त करावी अशी त्याला सघाच्या वतीने विनती करण्यात आली होती मेघाला ज्या महाजनाने दोनशे कोरी कर्जाऊ दिल्या होत्या तो महाजन सघपती होता त्यामुळे मेघाला त्याचा शब्द खाली पाडता येणे शक्य नव्हते. कृतज्ञतेच्या जाणिवेने की सघपतीच्या वजनामुळे त्याने ती मूर्ती सघाच्या स्वाधीन केली होती सकल संघाने ती उपाश्रयात विराजमान केली होती. सघाने मेघा शहाचे 'उद्दीओ' हे व्यावसायिक टोपण नाव बदलून 'उद्देशी-शहा' या नव्या नावाने त्यास बहुमानपूर्वक गौरवले होते।...

ही मूर्ती इच्छेविरुद्ध देण्याची शहावर पाळी आली होती म्हणूनच की काय

ती उपाश्रयातून अदृश्य होऊन पूर्ववत मेघा शहाच्या शिधागृहात ' पधारली ' होती । . सघाने त्याची विनवणी करून परत ती हस्तगत केली होती! .. असे अनेकदा घडले होते । ...या सदर्भात असेही घडले असल्याची शक्यता आहे मेघा शहाला मूर्तीचा लोभ वाटत असल्याने किंवा वार्धक्यामुळे *त्याच्या डोक्यावर परिणाम झाल्याने त्याने ती मूर्ती अनेकदा उपाश्रयामधून* परोक्ष उचलून आणली असावी व प्रत्येकवेळी सघाने त्याची मनधरणी करून, समजूत पटवून अथवा अन्य सोपस्कार करून ती परत मिळवली असावी । ..

उद्देशी नामक वाणियाने गावाबाहेर भेटलेल्या एका क्षुधापीडित वाटसरूला भाकरीचे गाठोडे दिले व त्याच्या अदलाबदलीत त्याने वाटसरूजवळचे गाठोडे घेतले घरी येऊन पाहतो तो उद्देशीला त्या गाठोड्यात पार्श्वनाथ प्रभूची मूर्ती आढळली । . येथील मूर्तीच्या सदर्भात अशीही कथा सांगितली जाते ।

या मूर्तीच्या प्रभावाविषयी अशाच दुसऱ्या काही अद्‌भुत दतकथा तुम्हास येथे ऐकावयास मिळतील

ही मूर्ती ' घृत कल्लोळ ' पार्श्वनाथाची । या नावातच अनेक तरंग आहेत, अनेक उमग आहेत! .. अद्‌भुततेचे.. अपूर्वाईचे . नवलाईचे .. चमत्कृतीचे!

मेघा शहाने सुथरी सघास मूर्ती प्रदान केली होती, त्यामुळे मूर्तीची प्रतिष्ठा मेघा शहाच्याच हस्ते व्हावी ही इच्छा सघाने कृतज्ञतेने त्याच्याजवळ बोलून दाखविली होती सघाचा मनोदय ऐकून मेघजी शहा थोडावेळ गोंधळला होता ।

पार्श्वनाथ भगवानाच्या आगमनाने त्याच्या घरात अन्नवृद्धी झाली होती त्यामुळे रोजची एका कोरीची पुजी गाठीशी बांधून त्याने सुथरीच्या महाराजाचे कर्ज परत केले होते । जादा द्रव्याची त्याने अभिलाषा धरली नव्हती संघाच्या विनतीप्रमाणे प्रतिष्ठा करावयाची तर 'नवकारशी' घालून ' सघभोजना' चा लाभ घ्यावयास हवा होता त्यासाठी धनधान्याची कमतरता भासण्याची फारशी शक्यता नव्हती तेवढे धान्य शिधागृहात साठलेले होते प्रश्न होता तुपाचा । .प्रतिष्ठा महोत्सवासाठी अनेकजण येणार होते त्याच्या भोजनासाठी पुरेसे तूप कसे आणि कोठून आणावयाचे हा प्रश्न क्षणार्धात निर्धन मेघा शहापुढे उभा राहिला होता पण सघापुढे स्वतःची असमर्थता व्यक्त करणे त्याला कमीपणाचे वाटत होते यासाठी त्याचक्षणी त्याने पार्श्वनाथ भगवानाला मनोमन आळविले होते, " मू वट्टे घी नायी माटे पेला करे कुई पर सक्ती देव । " याप्रमाणे पार्श्वनाथावर भरवसा

टाकून त्याने सघाच्या विनतीस होकार दिला होता । .

सुथरीमधल्या प्रतिष्ठा महोत्सवासाठी थोडे थोडके नाही तर अकरा हजाराहून अधिक भक्तजन गोळा झाले होते मेघा शहाने मडक्यात साठव-लेले तूप एवढ्या प्रचंड जनसमुदायाला पुरे पडणार नव्हते ते मडके पण पुरेपूर भरलेले नव्हते अर्धेमुर्धे भरलेले, अर्धेमुर्धे झाकलेले । पण "माझ्यापाशी पुरेसे तूप नाही, तेव्हा प्रभो माझ्यासाठी काही ना काही कर ।. मला शक्ती दे ।..." असे प्रार्थून त्याने सर्व भार पार्श्वनाथावर टाकला होता आणि आश्चर्य हे की, मेघा शहाने साठवलेले तूप सकल सघाच्या भोजनासाठी पुरे पडले होते एवढेच नव्हे तर त्याने प्रथम जेवढे तूप मड-क्यात भरले होते तेवढे जसेच्या तसे मडक्यात उरले होते । धनवान पार्श्वनाथाने निर्धन मेघाची लाज राखली होती ! 'उद्दीओ' चा उद्देश सफल झाला होता अर्थातच सकल संघाने 'उद्दीओ' चा 'उद्देशी शहा' म्हणून उल्लेख करून मान सन्मान केला होता । "घृतकल्लोळ पार्श्वनाथ भग-वान की जय ।" असे गर्जून सकलजनानी पार्श्वनाथ भगवानाचा जयजयकार केला होता सगळी सुथरी नगरीच नव्हे तर तिच्या भोवतालचा सारा परिसर जयघोषानी दुमदुमला होता ।...

प्रतिष्ठा महोत्सवासाठी श्रावक-श्राविकाचा लोंढा सुथरीकडे वाहत होता. जनसागराला एकसारखी भरती येत होती इतक्या लोकाना तूप पुरणार नाही याची धास्ती वाटत होती परतु पक्तीमागून पंक्ती उठल्या तरी तुपाचा तुटवडा पडला नव्हता सुरवातीला जेवढे तूप होते तेवढेच तूप शेवटी शिल्लक राहिले होते तुपाचा घडा जसा अर्धा भरलेला होता तसाच जसाच्या तसा अर्ध्यावर राहिला होता हा पार्श्वनाथ भगवानाचा प्रभाव मानून लोकानी प्रभूच्या उच्चासनाकडे दृष्टी वळवली होती पाहतात तर त्याना पीठावरच्या छत्राखाली प्रभूची प्रतिमा दिसली नव्हती या घटनेने स्तिमित आणि भयभीत झालेल्या लोकांनी घड्यात हात घालताच त्याच्या हाती एक प्रभावी प्रतिमा आली होती पार्श्वनाथाची ती अदृश्य प्रतिमा हीच होती हे उमजताच लोकानी 'घृतकल्लोळ पार्श्वनाथ भगवान की जय' असे हर्षभराने उद्गारून जल्लोष केला होता ।

काहीजण असेही सांगतात की येथील 'उदेशी' श्रावक कधी एकेकाळी प्रवासास निघाले असता त्याना वाटेत एक खेडुत भेटला होता या खेडुता-कडे पार्श्वनाथ भगवानाची ही प्रतिमा होती खेडुताने मागणी केले तेवढे धन देऊन उदेशी श्रावकानी ही मूर्ती सुथरीला आणली होती व ती त्यानी त्यांच्या घरातल्या धान्याच्या कोठीत ठेवली होती दुसऱ्या दिवशी उदेशी

श्रावकानी प्रभूच्या दर्शनासाठी दार उघडले असता त्यांना कोठी धन-धान्यानी भरलेली आढळून आली होती. उदेशी श्रावकानी ही वस्तुस्थिती यतींच्या कानावर घातली होती तेव्हा सुथरीत मदिर बांधून प्रतिमेची प्रतिष्ठा करण्याचा बोध यतीश्रींनी उदेशी श्रावकास दिला होता यतींच्या मार्गदर्शनाप्रमाणे उदेशी श्रावकांनी सुथरीत भव्य मदिर बाधले होते प्रतिष्ठा समारोहाच्या वेळी उदेशी श्रेष्ठीनी सकल सघास ' स्वामी वत्सल ' भोजन दिले होते तेव्हा एकाच भाडयातील तुपाचा वापर करताना असे आढळून आले होते की भांड्यातील तूप अनेकदा वापरूनही भाडे जसेच्या तसे भर-लेलेच राहिले होते हा आश्चर्यकारक प्रकार पाहून भाविक जनानी प्रभूला ' घृतकल्लोळ पार्श्वनाथ ' या नावाने उद्‌घोषून जयनादात प्रस्थापित केले होते ! ...

निरनिराळ्या आख्यायिकात कुठे कुठे थोडासा भेद असला तरी ' तुपा ' चा अद्‌भुत महिमा सर्वच कथाभागात अभेद्य आहे सतत भरून राहिलेली ' द्रौपदीची थाळी ' सुथरीत पुनश्च अनेकाच्या प्रत्ययास आली होती विक्रम सवत सतराशे एकवीसच्या सुमारास ही विस्मयजनक घटना घडली होती म्हणजे या अनुभवाला आताशी कुठे तीनशे वर्षे झालेली आहेत ! जनाबाईंची लुगडी धूणारा, सखूचे दळणकांडण करणारा, चोखोबाची खेटरे शिवणारा, सावताचा मळा फुलवणारा, गोराची मडकी घडवणारा विठोबा या पार्श्वनाथाच्याच जातीचा !.

अगदी अलीकडील नवलकथा दहाच वर्षांपूर्वी घडलेली आहे भगवान महावीराचा पचवीसावा निर्वाण शताब्दी महोत्सव ज्या सवत्सरात सपन्न झाला होता त्या वर्षातील हा चमत्कार आहे कच्छमध्ये लागोपाठ चार वर्षे दुष्काळ पडल्याने पाण्याची तीव्र टचाई गावोगावी भेडसावीत होती गावात पाण्याचा टिपूस नसताना व गावाबाहेरचा तलाव पूर्ण आटला अस-ताना सुथरीत भगवान महावीराची पचवीसावी निर्वाण शताब्दी कशी साजरी करावी असा पेच सुथरीच्या सघापुढे उभा राहिला होता त्याचवेळी येथील एका श्रावकास स्वप्न पडले होते गावाबाहेरच्या कोरड्या ठणठणीत तलावात नऊ फूट खड्डा खणल्यावर पाण्याचा प्रचड झरा लागेल असा त्याला स्वप्नात साक्षात्कार झाला होता त्याने सघास तसे सूचित केले होते व सघाने त्यानुसार खोदकाम केल्यानतर प्रचड पाणलोट वर उफाळून आला होता आता आजही या घटकेला ती ' बावडी ' निखळ निर्मळ पाण्याने तुडुब भर-लेली असून या विहीरीत तिन्ही काळात आठ फूट पाणी सतत असते ! कितीही उपसा झाला तरी पाणी कमी होत नाही ! ..

सुमारे पन्नास फूट लांब, पन्नास फूट रुंद, पन्नास फूट उंच अशी चांदीची भली मोठी शिला घेऊन आणि त्या शिलेवर उठावदार पण बारीक सारीक नक्षीदार कोरणी करून एक दृष्ट लागण्यासारखी सुंदर वास्तु तयार व्हावी. स्तंभ चांदीचे, पिछाडी सोडून इतर तीन बाजूंच्या तिन्ही प्रवेशद्वारांवरील तिन्ही अर्धगोलाकार कमानीवरचे तिन्ही गूढ मंडप चांदीचे, गूढ मंडपावरची तोरणे चांदीची, शृंगार चौक्या चांदीच्या, भोवतालच्या सर्व भिंती चांदीच्या, पायापासून शिखरापर्यंतचे सर्व काही चांदीचे...असा हा चांदीचा शिखरबंदी कोरीव प्रासाद हा सुथरीतला घृतकल्लोळ पार्श्वनाथाचा प्रासाद आहे। .जो देव विमानासारखा भासतो व 'सिद्धी सोपान लक्षण' या गुणसूचक नावाने ओळखला जातो सूथरीतला हा दुमजली जिनप्रासाद रुपेरी रंगाने इतका सुरेख मढवलेला आहे की पाहाणाराला तो 'चांदीनु महल' च वाटावा' या चांदीच्या महालातील गर्भगृहात पाढऱ्याशुभ्र संगमरवर मंहिरपीत येथील राजाधिराज घृतकल्लोळ पार्श्वनाथ विराजमान आहे। या मंहिरपाची कोतरणीही भव्य प्रासादाच्या दिमाखाला शोभेल अशीच आहे बाहेरील देवळ्यात रक्षकदेव धरणेंद्र देव व रक्षकदेवता पद्मावती यांच्या प्रतिमा आहेत हिंदू मंदिराच्या गाभाऱ्याबाहेर जसे जय आणि विजय द्वारपाल, तसेच जैन मंदिरात रक्षकदेव आणि रक्षकदेवता यांच्या प्रतिमा गाभाऱ्यालगत असतात

या गावात एकेकाळी जैन श्रावकांची दोनशेहून अधिक घरे होती व आज मितीला त्यातील सुमारे शंभर घरातच त्यांचा वावर होतो अशा गावात असे भव्य जिनालय असावे हे या गावचे भाग्यच मानायला हवे कच्छमधील बहुतेक जैन तीर्थस्थानी थोडाफार अशीच परिस्थिती आहे. कोठारा, भद्रेश्वर, जखौ, तेरा या सुथरीच्या परिसरातील पंचतीर्थीतही अशीच वस्तुस्थिती आणि वास्तुस्थिती असावी। गावाचे दर्शन होण्यापूर्वीच दूर अंतरावरून त्या गावातील उत्तुंग शिखराचे सर्वप्रथम दर्शन घडते आभाळाशी सलगी करणारे असे उत्तुंग भव्य जिनप्रासाद श्रावक-श्राविकांच्या अमूर्त पण अपार श्रद्धेची मूर्त स्वरूपे मानावी लागतील

अहिंसेच्या पायावर उभ्या राहिलेल्या जैन शासनात भूतदया म्हणजेच जीवदया हिला अनन्यसाधारण स्थान आहे देवद्रव्याप्रमाणे जीवदयेसाठीही द्रव्य मोठ्या प्रमाणावर जमवले जाते याचे हेच कारण या द्रव्यातून 'पांजरपोळ' सारख्या संस्था आजही ठिकठिकाणी चालतात सुथरीत असे एक पांजरपोळ असून तेथे चारशे जनावरांचे पालनपोषण होते एके काळी येथील पांजरपोळात बावीसशे जनावरे होती हे ऐकून कोणालाही नवल वाटावे

कत्तलखान्याकडे जाणारी मुकी निष्पाप निरपराध जनावरे हेड्यांच्या आणि कसायांच्या तावडीतून सोडवून त्यांना येथे जीवदान आणि जीवनदान दिले जाते ही येथील घृतकल्लोळ पार्श्वनाथाची प्रेरणा आणि दानशूरांची असीम कृपाच म्हणावी लागेल

'वृषभा 'चे लांच्छन असणारे श्री ऋषभदेव खरे पशुपाल होते अगदी या पहिल्या राजापासून ही परपरा होती पशुधन हे सर्वश्रेष्ठ धन ही त्या काळा-पासूनची धारणा होती ! अगदी अलीकडच्या काळात शिवाजी राजा तर 'गोप्रतिपालक ' म्हणून जगन्मान्यता पावला होता ! त्यानतरही परवा-परवापर्यंतच्या काळात पवनार येथे विनोबाजी भाव्यानी गोहत्या बदीसाठी असाच ध्यास घेतला होता, पण ज्या देशात सत ' पवनार ' येथे राहतात व राज्यकर्ते ' देवनार ' येथे वावरतात त्या देशात शिवरायाचा पुनरावतार होण्याची सुतराम शक्यता नसते ! मांसाहार हानीकारक व त्याज्य मानून शाकाहारी भोजनाकडे आकृष्ट होणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रातच त्याला अवतार घ्यावा लागेल ! श्री ऋषभदेवांसारख्या पूर्वसूरीच्या सदेशावर श्रद्धा ठेवून सुथरी येथे जीवदयेचे काम अद्यापही निष्ठेने चालू आहे हे त्यातले त्यात थोडे समाधान !

सत आणि सैतान यांच्यामधल अतर पवनार आणि देवनार यांच्यामधील अतराएवढ आहे हे अतर कमी करण्यासाठीच सुथरीसारख्या ठिकाणी चाल-लेल्या जीवदयेच्या कामाची कास धरायला हवी भले मग, ही ' कास ' आटली तरी मागे हटून चालणार नाही !

या सदर्भाने येथील शासनदेव घृतकल्लोळ पार्श्वनाथ राजाधिराज आहे ! कारण तो अशाचा रक्षणकर्ता आहे अशा भाग्यदेवाचा प्रासाद रुपेरी रगाने मढवण्याऐवजी सोनेरी रगाने माखला असता तर ' सुवर्णस्थली 'ला तो आहे यापेक्षा अधिक भूषणावह ठरला असता, हा विचार सुथरी सोडताना कोणा-कोणाच्या मनाला सहज स्पर्शून जातो !

सुथरीत श्रीखडपुरीच यथेच्छ भोजन झाल्याने तुमच्यापैकी काही जणाच्या डोळ्यांवर ' अक्काबाई ' अम्मल गाजवीत आहे ! तरीही भर दुपारी तुम्हांस पुढील प्रवासासाठी सिद्ध व्हाव लागत ' मधुमीलन 'मध्ये डुलकी घ्यायला मिळणार असल्यान ' मित आहारा 'च बधन लादून घेण्याची आवश्यकता वाटत नसते पण काही जणांनी ताटांमध्ये अन्नाची नासाडी केली हे कितपत योग्य झाले याचा विचार तुमच्यापैकी कोणीतरी एक गांभीर्याने करीत आहे !

तुमच्या प्रवासी मधात एक-दोन जण असे आहेत की ते ताटात अथवा वाटीतही काहीच सोडत नाहीत भूक असेल तेवढच ताटात आणि वाटीत वाढून घेतात आणि एकही शीत न सांडता अथवा शिल्लक ठेवता ते वाढून घेतलेल सर्व खाऊन संपवतात अशा माणसाचा असा नियमच असतो ताटात अथवा वाटीत काहीच शिल्लक ठेवायचे नाही, एवढेच नव्हे तर जेवण उरकल्यावर असे 'व्रतधारी' ताट, वाटी धुऊन खरकटे पाणीही पिऊन टाकतात। केळीच्या पानावर अथवा पत्रावळीवर जेवणारांना हे कितपत साधेल हा प्रश्नच आहे। तरीही ज्या देशात अन्नाचा तुटवडा असतो अशा देशात अशा व्रतधाऱ्यांची संख्या जेवढी अधिक वाढेल तेवढी ती राष्ट्रहितास उपकारकच ठरेल।

गवताची आणि अन्नधान्याची नासाडी करू नका हा तर शिवछत्रपतींचा मंत्र होता। शिवबाचे मावळे अन्नाचा शीत न सांडता, तळहातावर भाकर, कोरड्यास आणि कांदा घेऊन जेवत होते शिवाजी राजे स्वत 'एकभुक्त' म्हणजे दिवसातून एकदाच आहार घेणारे होते शिवरायाचे गुणगान करणारे काय करतात हे तपासून पहावे। ते शिवाजीची स्तुती करतात व स्वत: मात्र अन्नाची धूळधाण करतात। श्रीमंत असूनही या एकभुक्त राजाचा पराक्रम वेगळा आणि त्याच्या अनुयायांचा पराक्रम वेगळा !...

आज कित्येक घरी, एवढेच नव्हे तर सार्वजनिक भोजनगृहात आणि हॉटेलात, न आवडण्यामुळे, अन्नाची कितीतरी नासधूस होते। वाढून आलेल्या-तील, अगदी 'राईस प्लेट'सारख्या मर्यादित आहारातील देखील, निम्मेही संपवले जात नाही। अर्थात ताटवाटीत उरते ते मोरीत जाते। उरलेले जनावरांच्या तोंडातही न जाता असेच घडते ! ड्रेनेजच्या युगात गटारांची अशी भरती होते। 'अन्न हे परब्रह्म' असे दुर्गंधित कुंडाना जाऊन मिळावे यापरते नादानपण ते कोणते !

जैन शासनाला अशी नासाडी बिलकुल मान्य नाही अन्नाच्या या 'होमा'ला जैन शासनाचा विरोध आहे। भोजन उरकल्यावर पितळी, वाटी धुऊन प्यावी असा आदेश हा धर्म देतो भोजनास बसण्यापूर्वी मोकळे ताट आणि वाटी स्वत स्वच्छ करून घ्यावी व भूक असेल तेवढेच ताटात आणि वाटीत स्वीकारून घेतले तेवढे सर्व संपवावे हे व्रत तसे कठीण व गैर समजावयास नको अशाने खर्चात व अन्नधान्याच्या वापरात कपात होऊन बचतही होईल याला चिक्कूपणा, कवडीचुंबकपणा किंवा कृपणपणा म्हणणारे खुशाल म्हणोत। भोजनानंतर खरकटी ताटवाटी विसळून खरकटे पाणी

पिणे प्रशस्त वाटत नसेल तर ताटात अथवा वाटीत अन्नाचा एकही कण राहू न देणे हे व्रत घ्यायला कसलीच हरकत नसावी । हेही काही कमी नव्हे ।...जे भुकेपेक्षा अधिक आहार घेतात व अधाशीपणाने वाढून घेतलेले सपत नाही म्हणून नासाडी करून जे ताटावरून बिनदिक्कत उठतात अशांचे हे वर्तन स्पृहणीय नसले व समर्थनीय तर मुळीच नसले तरी अशा लोकांना कोपरापासून नमस्कार करावा असे तुमच्यापैकी एकाला का होईना वाटते हेही काही कमी नव्हे । चांगल्याची पूजा बाधणारे थोडेच असतात व असे हे थोडे असतात हेही काही कमी नव्हे । ..लोकसख्येच्या फुगवट्यात अन्नाचा एकेक कण मोलाचा आहे हा 'द्रौपदीच्या थाळी'चा सदेश विसरून कसे चालेल ।

जिकडे तमची दृष्टी अचानक आकर्षिली आहे

घाट आहे सुथरीपासून तेरा किलोमीटर अतरावर कोठारा गाव आहे अबडासा तालुक्यातील या गावाच्या वेशीलगतच प्रचड तलाव असून त्याच्या चौफेर पायऱ्या पायऱ्याचा भक्कम घाट आहे या बाधीव तळ्याच्या पुढेच सरदार वल्लभभाई पटेलाचा पुतळा आहे कच्छ, काठेवाड, सौराष्ट्र, गुजरात अशा महागुजरातमध्ये सरदाराना केवढा बहुमान होता याचे मूल्यमापन गुर्जर भूमीतील अनेक गावातल्या त्याच्या असख्य पुतळ्यांवरून थोडेफार होऊ शकते सरदारांवरची अमाप निष्ठा आणि अपार श्रद्धा अशी ठिक-ठिकाणी मूर्त झालेली आहे ।...

गावालगत तळे असावे असा पूर्वापार सकेत आहे पाण्याची अशी साठवण एरव्ही उपयोगी पडतेच, पण दुष्काळात ती अधिक उपयुक्त ठरते सुथरी-जवळ असेच एक आटलेले का होईना तळे होते चार वर्षांच्या प्रदीर्घ अना-वृष्टीमुळे हैराण झालेल्या ग्रामस्थांनी या कोरड्या तळ्यात खोदकाम केल्या-नतर पाण्याचा लोढा लागला होता हे तळे नसते तर तेथे खोदलेल्या विहिरीला पाणी लागले असते का हा प्रश्न आहे । श्रेष्ठ चितक आणि सशोधक सर विश्वेश्वरअय्या यांनी तर प्रत्येक गावालगत एखादे तरी तळे असावे असे आग्रहाने प्रतिपादले होते तळ्यात साठलेले पाणी जमिनीत झिरपून भोवतालची शेतीवाडी या झिरप्याने सकस आणि समृद्ध बनते, अडी-अडचणीच्या आणि दुर्भिक्षतेच्या काळात तळ्यात उरलेसुरलेले पाणी माणसाना आणि गुराढोरांना जीवन देते आजकालचे पाझर तलाव किंवा बधारे जुन्यापुराण्या तळ्याचे नवे अवतार आहेत

श्री वल्लभघाटाला लागूनच 'खादी केंद्र' आहे गांधीजीचे ग्रामोद्योगाचे स्वप्न गुजरातेतल्या गावोगावी साकार झालेले पाहून कोणालाही समाधान

वाटावे टकळीवर आणि चरख्यावर सूत कातून व ते हातमागावर विणून वस्त्रस्वावलबन होऊ शकते ही गाधीजींची मतप्रणाली यांत्रिकी युगात अनेकांना हास्यास्पद वाटते प्रचड यांत्रिकीकरणाने सगळ्या जगाचा चेहरामोहरा बदलून टाकलेला आहे प्रगतीची गरुडझेप क्षितिजाला छेदून अवघ्या अतराळाला कवेत घेऊ पाहत आहे एवढे सगळे होऊन मानव सुखासीन झाला असला तरी सुखी झाला आहे का हा खरा प्रश्न आहे या प्रश्नाचे उत्तर काळच काही काळानतर देणार आहे त्यावेळी काळाला आणि त्या काळातील विध्वसातून जगल्यावाचलेल्या मानवाला साबरमतीच्या सताची विचारसरणी स्वीकारण्यासाठी अनुकूल कौल द्यावा लागणार आहे । ..

श्री वल्लभ घाटातील शात जलाशयात ऐन दुपारच्या वेळीही वाऱ्याच्या छोट्या उष्ण झुळुकेसरशी एखाद दुसरी सौम्य लाट सथपणे लहरते आणि आली तशीच मद गतीने विहरून ती न कळत जलमय होते ।

तीर्थंकर भगवान शातिनाथ याचे कोठारातील मदिर कोठाराचे भूषण आहे 'तीर्थराज शत्रुजय 'वर 'केशवजी नायक टुक' ज्याच्या प्रेरणेने तयार झाली त्यांच्याच प्रेरणेने येथील देऊळवाडाही निर्माण झाला आहे गावाभोवती जसा प्रचड तट आहे तसाच या गगनचुबी मदिराच्या सभोवतालीही स्वतंत्र तट आहे हेही मदिर सुथरीप्रमाणे चंदेरी रंगाचे असून प्रवेशद्वार मात्र निरनिराळ्या रगांनी सजवले आहे

कोणीकडूनही क्षितिजापर्यंत नजर फिरवली तरी सगळीकडे वाळलेल्या गवताचा सागर क्षितिजापर्यंत जाऊन भिडलेला दिसतो अधूनमधून आढळणारा बाभळीच्या झाडाचा पुजका या सुकलेल्या गवताच्या सागरावर तरगणाऱ्या होडग्यासारखा भासतो अशा एकामागून एक याप्रमाणे अनेक भुड्या होडग्याचे दर्शन घडत राहते तुम्ही 'मधु मीलन 'मध्ये बसला नसून एखाद्या जहाजात बसला आहात असा गोड भास होतो आणि कोठारापासून जखौपर्यंतचा प्रवास या जहाजातूनच होत आहे असे तुम्हास वाटते कच्छसारख्या एकाच प्रदेशात निसर्ग जागोजागी केवळ भिन्नच नव्हे तर परस्परविरोधी रूपे धारण करतो याचे प्रवाशाना नवल वाटावे रूक्ष प्रदेशातला हा कोठारा ते जखौ असा अठरा किलोमीटरचा प्रवास कटाळवाणा असूनही थकवा येऊ देत नाही याचेच आश्चर्य वाटावे सगळीकडे पाणीच पाणी, भूप्रदेशाचे दर्शन लवकर घडू नये असा जलप्रवास जसा शीण आणणारा तसाच हाही प्रवास पण कोठारापासून जखौ बदर जवळच असल्याने ही रुक्षता जाचक वाटत नाही जखौ बदर बघायला मिळेल याचे समाधान काहीना वाटत असते

एके काळी जखौ बंदरातून मुंबई, कराची, बसरा, मस्कत आदी बंदरांकडे व आफ्रिकेतील देशांकडे व्यापारी निमित्ताने वाहतूक होत होती आता या बंदरावर प्रतिवर्षी एक लाख टन मिठाची पैदास होते येथील दीपस्तंभावरून विशाल सागराचे निरीक्षण करण्यात आगळे समाधान लाभते जखौला पोचल्यावर या सर्वांचे दर्शन होईल या आशेवर हा शुष्क प्रवास सुसह्य वाटतो।

'मधु मीलन' जखौला पोचते तेथे गेल्यावर जखौ गावापासून जखौ बंदर तेरा किलोमीटर अंतरावर आहे ही माहिती मिळते जखौ बंदर 'टूर प्लॅन' मध्ये नसल्याने काहींची निराशा होते बंदर पाहण्याच्या उद्देशाने तुम्ही जखौला आलेले नसता तुम्हाला पहावयाचा असतो या गावातील 'रत्नटुक'! . नव रत्नांचा वाडा! .. नऊ मंदिराचा देऊळवाडा! कोठारातील देऊळवाडा पाच मंदिराचा होता हा तर नऊ मंदिरांचा 'रत्न टुक'।

'तुम्ही 'रत्न टुक' पाहण्यासाठी आल्याची चाहूल लागताच तीन-चार जण तुम्हाला गराडा घालतात त्यात एक-दोन मुले असतात 'गरीबोंने दो इथियाँ आपा' असे म्हणत ते तुम्हास घेरतात आणि 'आम... आम .' म्हणत ते तुम्हाला गावाच्या गल्लीबोळातून पुढे पुढे नेत असतात तुम्हीही आंधळ्याप्रमाणे 'आम . आम 'चा वेध व बोध घेत बिनधास्त त्यांच्या मागोमाग जाता लाल दगडाच्या भक्कम भिंतीने वेढलेल्या एका वाडीजवळ वाटाडे तुम्हास थांबवतात हीच ती जखौची 'रत्न टुक' 'नव रत्नांची टुक'।

नऊ मंदिरांची ही वाडी मंदिराची बांधणीही लाल दगडाची एकूण सत्तावीस शिखरे अशी ही नऊ मंदिरांची आणि सत्तावीस शिखरांची ही वाडी जखौमधलं झाकलं माणिक आहे। वाडीतल मुख्य मंदिर श्री महावीर स्वामी भगवानाचं इतर मंदिरांत श्री सुविधिनाथ, श्री चंद्रप्रभ, श्री शांतिनाथ, श्री चौमुखजी आदिनाथ, श्री चिंतामणी पार्श्वनाथ, श्री गोडीजी पार्श्वनाथ, श्री मुनिसुव्रत भगवान व श्री महावीर स्वामींचे प्रथम गणधर श्री गौतम स्वामी। .अशा एकंदर नऊ मंदिरांपैकी तीन मंदिर श्री पार्श्वनाथ भगवानांची आहेत भारतातील एकंदर तीर्थक्षेत्रात अधिक मंदिर श्री पार्श्वनाथाची आहेत हे वैशिष्ट्य तुम्हास या ठिकाणीही प्रकर्षाने जाणवते

या वैशिष्ट्याचा विचार करीत तुम्ही 'रत्न टुक' मधून बाहेर पडता आणि आणखी एक वैशिष्ट्य तुम्हास सामोरे येते।

"आम...आम..." म्हणत ज्यांनी तुम्हास 'रत्न टुक' पर्यंत आणून

पोचवलेलं असत ते तिघे-चौघेही तुमची वाट पाहत बाहेरच थांबलेले असतात 'रत्न टुक' मध्ये प्रवेश करण्यापूर्वी तुम्ही सर्वांच्या हातांवर पैसे ठेवलेले असतात तरीही ते का थांबलेले असतात याचा लवकर बोध होत नसतो. 'आम...आम " म्हणत पुन्हा ते तुम्हाला आल्या वाटेने 'मधु मीलन' पाशी पोचवतात. या कामगिरीबद्दल आणखी काही 'उकळावे' असे त्यांना वाटत असावे ही शका साहजिकच तुमच्या मनाला शिवते पण तसे काहीच घडत नाही ! . . या 'परतीच्या प्रवासा'साठी ते तुम्हाला परत काहीही न मागता निघून जातात जाताना ते 'आवजो' असे म्हणून तुमचा निरोप घ्यायला विसरत नाहीत !

'रत्न टुक' जवळ पोचताच त्याच्या हातावर पैसे पडले होते त्याचक्षणी तुमची 'साथ' सोडून ते आपापल्या घरी जाऊ शकले असते अथवा इकडे तिकडे कुठे भटकून नव्या प्रवाशांचा माग घेऊ शकले असते पण परतताना गल्लीबोळांतला रस्ता तुम्हास सापडणार नाही या जाणिवेने ते तुमच्यासाठी 'रत्न टुक' च्या बाहेर ताटकळत उभे राहिले होते 'कार्यभाग उरकताच काखा वर करणारांची जातकुळी' त्याची नव्हती ही गोष्ट विशेषत्वाने तुम्हांस जाणवली ! ही जाणीवही काही कमी नव्हे ! हे दर्शनही कमी मोलाचे नव्हेच नव्हे ! . नऊ मंदिरातील नवरत्नाच्या धावत्या दर्शना-इतकेच हेही दर्शन मोलाचेच म्हणावे लागेल ! ..

अबडासा तालुक्याच नव केंद्र नलिया भूज रेल्वेस्टेशनपासून सत्याण्णव व जुन केंद्र जखौपासून तेरा किलोमीटर अतरावर आहे अर्थातच या गावा-पासून दर्या किनारा सव्वीस किलोमीटर दूर आहे शहराच्या वेशी बाहेरचे 'जन भवन सर्वप्रथम तुमचे स्वागत करते महाराष्ट्रात जसे प्रत्येक तालुक्याच्या गावी 'तालुका पचायत समिती'चे कार्यालय असते तसे गुजरात राज्यातही तालुक्याच्या गावी 'तालुका पचायत भवन' असते नलियाचे 'तालुका पचायत भवन' वेशीबाहेरच आहे वेशीलगतच तलाव आहे वेशीतून गावात प्रवेश करताच 'श्री नलिया जूथ ग्रामपचायत कचेरी' दृष्टीस पडते महाराष्ट्रात काही काही गावी जशी 'ग्रूप ग्रामपचायत' असते तशी ही 'जूथ ग्राम पचायत' ग्रूप पंचायत जशी एकाहून अधिक गावांसाठी, तशीच जूथ ग्रामपंचायत एकाहून अधिक गावासाठी असते 'ग्रूप' या इग्रजी शब्दाशी केवळ उच्चारापुरते साधर्म्य दाखवणारा 'जूथ' हा गुजराती शब्द 'टोळी' अथवा 'समूह' या अर्थी वापरला जातो या शब्दातून 'जथा' या शब्दाचा अर्थ अभिप्रेत होतो

काही काही लोकाना काही काही गोष्टीशी चाळा करण्याची सवय असते कुणाला कशाचा नाद तर कुणाला कशाचा कुणाला जागोजागीचे फलक अक्षरश· वाचण्याचे व्यसन असते अशांचे लक्ष वेशीजवळच्या एका दुकानावरील पाटीवर खिळते ' अनाज रशकसना वेपारी ' दुकानच्या माडणीवरून हे व्यापारी ' भुसार व किराणा मालाचे ' असावेत असा तर्क सहजगत्या लढवला जातो

याही गावातील मदिराकडे गल्लीबोळांतून जावे लागते हा गल्लीबोळांतला रस्ता अत्यत गलिच्छ असतो याची तुमच्यासारख्या पाहुण्याना किळस वाटते, खतही वाटते ! स्वच्छतेच्या बाबतीत जैन मदिराची विशेष ख्याती असते असे असूनही या मदिराकडे जाणारा रस्ता मात्र घाणेरडा असावा ही गोष्ट तुम्हास खटकल्यावाचून राहत नाही मनातल्या मनात खेद करीत तुम्ही मदिराजवळ येऊन पोचता

कच्छमधील बहुतेक गावात असतो त्याप्रमाणे याही गावात ' मदिरांचा परकोट आहे 'परकोटा'त चार मंदिरे असून मुख्य मंदिर श्री चद्रप्रभ तीर्थकरांचे आहे येथील नाविन्य हे की या चार मदिरापैकी एक मदिर ' अष्टापद ' पर्वताचे आहे या ' अष्टापद ' पर्वताच्या माथ्यावर चोवीस तीर्थकरांची चौमुखी प्रतिमा आहे चोवीस तीर्थंकरांची सामूहिक प्रतिमा ' चोविशी ' या नावाने ओळखली जाते अशा ' चोविशी ' ची ' चौमुखजी ' प्रतिमा येथील ' अष्टापद ' मदिरातील वैशिष्टच आहे !

अवसर्पिणी कालातील प्रथम तीर्थकर श्री ऋषभदेव भगवान याचे निर्वाण ज्या पर्वतावर झाले तो ' अष्टापद ' पर्वत ! हा अष्टपद कुठे आहे हे कुणीच सांगू शकत नाही हजारो वर्षांपासून पृथ्वीतलावर हजारो स्थित्यतरे होत आली त्यामुळे हजारो वर्षांपूर्वीच्या अष्टापद पर्वताचे अस्तित्व काळाने आच्छादून टाकले! मग कल्पनेतून स्फुरलेली अष्टापदाची प्रतिकृती अशी कुठे ना कुठे दृष्टोपत्तीस पडते नाही तरी राम, कृष्ण, बुद्ध, महावीर यांना आजकालच्या शिल्पकारांनी पाहिलेले असते थोडेच ! दतकथातून आणि पुराणकथांतून कालप्रवाहाबरोबर वाहत आलेली कथित, श्रवित आणि लिखित वर्णने शिल्पकारांच्या किंवा कलाकारांच्या प्रगाढ कल्पनांचे विषय बनतात व त्यांच्या प्रगल्भ प्रतिभेतून देवांच्या प्रतिमा साकार होतात अशी ही कल्पनाविलासातून प्रतिभाशक्तीने साकारलेली मूर्त रूपे देवांच्या मूर्ती आणि देवविशेषाच्या प्रतिकृती होऊन मानवजातीपुढे यथाकाल येत राहिल्या येथील ' अष्टापद ' ची प्रतिकृती अशापैकी एक ! अशा तऱ्हेची ' अष्टापद टुक ' इथल्याव्यतिरिक्त एकटचा शत्रुजय तीर्थस्थानीच पहावयास मिळते असे

येथील पुजारी अभिमानाने सांगतो। येथील अष्टापद मंदिरावरील शिखर एकोणीस शिखरामध्ये मूळ नायकाच्या मंदिरावरील शिखराप्रमाणे उंच आहे पूर्वी कच्छवरही म्लेंच्छांच्या वारंवार स्वाऱ्या होत होत्या अशा स्वाऱ्यांपासून मंदिरांचे रक्षण व्हावे म्हणून मंदिराभोवती सर्वत्र तट बांधले जात होते बाहेरील तटबंदीवरून इथल्या अंतरंगाचे खरेखुरे दर्शन घडत नव्हते आत पाऊल टाकल्यावर मात्र येथीलदेखील भव्यता जाणवते

पूर्वी कच्छवर येथील राजपूत महाराजा 'राओल' यांची अधिसत्ता होती व त्यांचे अनेक मांडलिक राजे कच्छच्या निरनिराळ्या परगण्यांत राज्य करीत होते महाराजा 'रावळ'चे स्वत:चे 'कोरी' नावाचे नाणे होते 'कोरी' म्हणजे त्या काळचा रुपया प्राचीन 'शुल्क किंवा 'निष्क' या मुद्रेसारखी 'कोरी' हीही एक मुद्रा। कलकत्त्याच्या बहादूरसिंग आर्ट गॅलरीत ही 'कोरी' नाणी पहावयास मिळतात ही माहिती तुम्हास येथील पुजाऱ्याकडूनच मिळते तुम्ही कलकत्त्यास पुढे जेव्हा जाल तेव्हा बहादूरसिंग आर्ट गॅलरीस अवश्य भेट द्या व आठवण ठेवून 'कोरी' 'सिक्का' पहा। तसा 'कोरी' हा काही हिंदुस्तानातला पहिला वहिला 'सिक्का' नाही। याही आधी इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात आपली लाडकी 'नुख्तर नेक अख्तर 'नूरचश्मी' रझिया बेटीच्या यादगारीसाठी गुलाम घराण्यातला दिल्लीचा सुलतान अल्तमश याने 'टाका' हा चांदीचा सिक्का तयार केला होता 'कलदार' रुपया आणि 'कोरी सिक्का' याचा हा अर्थातच पूर्वज। आता भारतात सध्या चलनात जो बदा सुरती रुपया फिरत आहे त्याला खेड्यातील शेतकरी आणि शेतमजूर व शहरातील कामगार आणि हेलमजूर सरळ सरळ 'डॉलर' म्हणतात। अमेरिकेचा 'डॉलर' भारतीय 'रुपया' पेक्षा दहा पटीने मौल्यवान असला तरीही। भारतीय रुपयाचे मूल्य एकसारखे घसरत असले तरी 'डॉलर' अशी प्रशस्ती याने अनेकांकडून मिळवून तो प्रतिष्ठा पटकावून बसला आहे। एकेकाचे नशीब फळते म्हणतात ते असे। कालांतराने हाही सुरती रुपया कोरी किंवा कलदार सिक्क्याप्रमाणे आणखी प्रतिष्ठा मिळवून कलकत्त्याच्या आर्ट गॅलरीत मानाचे स्थान पटकावील। बाकी, नाणे टंचाईच्या जमान्यात रुपया डॉलरसारखाच दुर्मिळ। तरी देखील रुपयाला 'डॉलर' म्हणून संबोधण्याची ही रीत अजबच म्हणावी लागेल। 'वचने किं दरिद्रता'। .

'कलदार रुपया' च्या जातीचा 'कोरी सिक्का' बहादूरसिंग गॅलरीत तुम्ही पहाल त्यावेळी तुम्हाला नलिया गावाची व या गावातल्या जैन मंदिरातील पुजाऱ्याची आवर्जून आठवण येईल। येथील मंदिरातील स्तंभावरील, घुमटा-

मधील सोनेरी वर्खकाम व काचकामही तुम्हास खचित आठवेल! सुथरीच्या 'उद्देशी' मेघा शहाने शभर 'कोरी' 'मुहर' देऊन धृतकल्लोळ पार्श्वनाथाची मूर्ती शिकारी गावच्या देवराज पुजाऱ्याकडून आणल्याची कथाही त्यावेळी तुम्हास निश्चित स्मरेल! आठवणी अशा एकमेकाशी जडलेल्या असतात आणि एकमेकात गुतलेल्याही असतात! . .

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६०
अ. क्र. २०३२४०
क्र. ७/९२/५४
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)

# अकरा

तुम्हास सूर्यास्तापूर्वी नारायण सरोवर गाठावयाचे आहे। नारायण सरोवराच्या काठावरील श्री कोटेश्वर महादेवाच्या टेकडीवरून मावळतीचा सूर्य पाहण्यात आगळी मजा असते असे ऐकिवात आल्याने नारायण सरोवराची अधिकच ओढ लागलेली असते तेरा येथील श्री जीरावाला पार्श्वनाथ भगवानाच्या मंदिरातील शिखराचे काम प्रेक्षणीय असते हाही लौकिक तुमच्या कानावर असतो तेव्हा 'तेरा' गावच्या मंदिराचे धावते दर्शन घेऊन नारायण सरोवर सूर्यास्तापूर्वी गाठावयाचे हा बहुमताने निर्णय झालेला असतो. तुमच्या जथ्यात काही वैष्णव मंडळी आहेत. 'जिनालये' पाहण्यास त्यांचा विरोध नव्हता 'शिवालय' पाहण्यासही त्यांचा विरोध नाही उलट श्री कोटेश्वर महादेवाचे देऊळ आवर्जून पहावे असा त्यांचा आग्रह आहे तुमच्या सघातील बहुतेक सर्वच जण समन्वयवादी आहेत सर्वधर्मसमभावाच्या जाणिवेने सर्वधर्मसहिष्णुता त्यांच्या वृत्तीत आहे। हे केवळ तीर्थाटन नसून आनंदपर्यटन असल्याने सर्व कसे मुक्त मुक्त आहे।...

अर्थात अशातही एखादा अपवाद असू शकतो तुमच्यापैकी एक सद्‌गृहस्थ थोडे चिडलेले दिसतात सुथरीहून इतर कुठेही न जाता सरळ नारायण सरोवराला जावे असे त्यांचे प्रतिपादन होते

नलियापासून 'तेरा' तेरा किलोमीटर अंतरावर आहे अर्ध्या तासाच्या आत तेथे सहज पोचता येईल। थोडचा दडपणाखाली थोडचा गडबडीने का होईना तेरा येथे जाण्याने सार्थक झाले असेच कोणालाही वाटावे.. श्री जीरावाला पार्श्वनाथाच्या नऊ शिखरांच्या मंदिरातील शिखरांची स्थापत्यकला आणि शिल्पकला वाखाणण्यासारखीच आहे।..

जैन मंदिरांचे वैशिष्टच म्हणजे त्यांची मांडणी आणि कोरणी।..रग

सा ..१०

मडप किंवा नृत्य मडप, त्यापुढे सभामडप, मग गर्भगृह रगमडपावर व सभामडपावर अर्धगोलाकार घुमट, गाभाऱ्यावर शिखर, ठिकठिकाणी विशाल स्तभ

मडपात उभे राहून स्तभावरील व घुमटावरील कोरीव नक्षीकाम पाहताना कित्येक ठिकाणी, वेळेचे भानही राहत नाही रगमडपावरील घुमटात नृत्यागनांची शिल्पे कोरलेली असतात तर सभामडपावरील घुमटात सोळा विद्यादेवींची अथवा भगवान नेमिनाथांच्या वराती प्रसगीची किंवा तत्सम भावनाप्रधान चित्रे रेखांकित केलेली असतात काही काही घुमटात तर निरनिराळ्या फुलांना, विशेष करून कमल फुलाना, मोहक रीतीने चितारून फुलवलेले असते आबू पहाडावरील 'विमल वसही' या जैन मदिरातील घुमटावरची कोरणी पाहणारांच्या जिवाना पिसे लावते रगमडपावरील व सभामडपावरील घुमट जितक्या कल्पकतेने कोरले वा चितारले जातात तेवढी कल्पकता गर्भगृहावरील शिखरांच्या अतर्भागात आढळत नाही उलट ही शिखरे आतून साधी असतात शिखरावरचे नक्षीकाम पाहावयाचे असले तें बाहेरूनच, कारण शिखरांचे निरीक्षण बाहेरूनच होत असते।

रगमडपाच्या अथवा सभामंडपाच्या घुमटातील कोरीव शिल्पसाज पाहून कोणीही भारावून जातो अशा भारावलेल्या अवस्थेत मानव प्रभुचरणापाशी येतो व त्याच्या रूपाशी एकरूप होऊन स्वत'ला विसरल्याचा अनुभव घेतो अशा शून्यावस्थेत त्याचे लक्ष प्रभूच्या छत्रावरील शिखराच्या अतरगाकडे जात नसते तर प्रभुबिबावर स्थिरावलेले असते या स्थिरतेतून त्याच्या अत'-पटलावर प्रभुबिबाचे प्रतिबिंब उमटत असते. यासाठी शिखरे अतरगात सजविण्याची आवश्यकता नसते बाहेरून मात्र शिखराचे दर्शन घेताना शिखरावरील सूक्ष्म नक्षीकाम खालून वरपावेतो पाहताना दृष्टी हळूहळू उन्नत होत जाते दृष्टीबरोबर मनाचे उर्ध्वगमन सुरू होते यासाठीच मदिरावरील शिखरे उच उच बाधली जातात

मदिर हे मानवाच्या श्रद्धेचे प्रतिकात्मक शिल्प असते, तर मदिराच्या गर्भगृहावरील शिखर हे त्याच्या उन्नत मनोभावाचे प्रतिकात्मक शिल्प असते गाभाऱ्यातील प्रतिमेच्या दर्शनाने मनाचे आवर्तन सुरू होते व गाभाऱ्यावरील उत्तुग शिखराच्या दर्शनाने हे आवर्तन परिक्रमेत अधिक गतिशील होऊन त्याचे उर्ध्वगमन सुरू होते. मनाचे हे उर्ध्वगमन अनतातील परमोच्च स्थानाचा वेध घेत राहते, परमशक्तीचा माग काढीत राहते। मदिरावरील गगनचुबी शिखरांच्या निर्मितीमागे ही धारणा असते।

राजा भोजच्या कालात धनपाल या श्रावक कवीने 'तिलकमजिरी या

काव्यग्रथात जैन मदिराचे शिल्प कसे असावे याचा आराखडा माडला आहे त्या नकाशाप्रमाणे प्रशस्त वातावरणातील उद्यानाच्या प्राकारात मदिर असावे, मदिराची वास्तू चोहो बाजूनी भितींना वेढलेला असावा या भितीत चार दिशांना चार महाद्वारे असावीत व या महाद्वारांवर गोपुरे असावीत गर्भगृहातील मुख्य प्रतिमा सगमवराची असावी व आजूबाजूस इतर तीर्थकराच्या प्रतिमा असाव्यात त्यापैकी काही संगमरवरी, काही स्फटिकाच्या, काही रत्नजडित, काही नीलमणी, काही चद्रमणी, काही मरकती म्हणजे हिरन्मणी असाव्यात प्रतिमेच्या पार्श्वभागी मखमली पडदा असावा मंदिराच्या शिखरावर ध्वज असावा मदिराच्या वास्तूत जागजागी गवाक्षे असावीत मदिरातील स्तभांवर बहुरगी रत्नजडित पट्टया असाव्यात गर्भगृहापुढे मुख, सभा, रग, गूढ, मेघनाद मडप असावेत मडपाच्या घुमटावर रेखाचित्रे असावीत प्रवेशद्वारावर तोरण असावे प्रवेशद्वाराच्या एका बाजूला यक्ष व दुसऱ्या बाजूला यक्षिणी अशा प्रतिमा असाव्यात. प्रवेशद्वाराजवळ सुवर्णशृखलेने टांगलेली वज्रघंटा असावी गर्भगृहात हरीण आणि सिंह यांच्या रेखाटनांनी सजवलेले सिंहासन असावे व सिंहासनावर शासनदेव तीर्थंकराची पद्मासनातील प्रतिमा ठेवावी । . ही कल्पना धनपालाच्या काव्यातच केवळ राहिला नसून ती ठिकठिकाणी साकार होऊन प्रत्यक्षात उतरली आहे । या शब्दशिल्पाला वास्तुशिल्पींनी ठायी ठायी जिवत केले आहे ।

मदिरांच्या अशा पारपरिक तरीही धारावाहिक बांधणीत सोमपुरा घराण्याचा सिंहाचा वाटा असून या कर्तव्यकर्मात तनमनाने खपणारे ‘ सलाट ’ आणि ‘ कडिये ’ आपल्या अफलातून कलेची बेमिसाल करामत अशा प्रतिकात्मक वास्तूच्या कणाकणातून मूर्त करतात हे ‘ पाथरवट ’ व ‘ गवडी ’ अशा कलाकृतीत केवळ धाम ढाळीत नसतात, तर ते आपला जीवही ओतीत असतात कच्छपासून राजस्तान तस दूर नसूनही कच्छमधील जैन मदिरांना राजस्तानी सोमपुरा घराण्याच्या कलात्मक हातांचा खास स्पर्श लाभलेला नसावा सौराष्ट्रान आणि भारताच्या इतरेतर भागानही या घराण्याच्या शिल्पनैपुण्याचा पुरेपूर लाभ घेतलेला आहे सोमपुरा कुलाची कुशलता कच्छमधील जैन व इतरही मदिरांच्या वाट्याला विशेषत आली नसावी तरीही तेरा येथील श्री जीरावाला पार्श्वनाथाच्या प्राकारातील नऊ शिखरे अद्वितीय कलात्मकतेचाच प्रत्यय घडवतात देहभान हरपायला लावणारी शिल्पे पाहिली की त्याच्या कल्पक शिल्पकारांवरून जीव ओवाळून टाकावा असे बघणाराला वाटावे ।

भले पधारो ! कुणी तरी तुमच 'सुस्वागतम' केल्याचा तुम्हास गोड भास होतो तुम्ही अवती भवती पाहता एखाद्या खाडीप्रमाणे दूरवर पसरलेले सरोवर तुमच्या दृष्टीस पडते या सरोवराच्या मध्यावरून एक हमरस्ता गेलेला असतो पश्चिमेकडे म्हणजे रस्त्याच्या डाव्या बाजूला दूरवर जलाशय पसरलेला असतो, तर पूर्वेकडील म्हणजे रस्त्याच्या उजव्या बाजूचा भाग कोरडा ठणठणीत पडलेला असतो याचाच अर्थ पश्चिमेकडे उतार असून पूर्वेकडील भूभाग उचवटयाचा असतो अर्थातच हा पूर्वेकडील भूप्रदेश एखाद्या वाळवटासारखा दिसतो

'भले पधारो' म्हणून तुमचे स्वागत कोणी केलेले असते हे तुमच्या लक्षात लवकर येत नाही सरोवराच्या मध्यातून लखपतकडे जाणारा हा रस्ता पायघडी अथरल्यासारखा वाटून या पायघडीवरून मधुमीलन रथातून तुमची स्वारी चाललेली असते हे अथांग पसरलेले नारायण सरोवरच तुमचे हार्दिक स्वागत करीत नसावे ना आणि त्याच्या वतीने कोणी तरी 'भले पधारो' म्हणून ललकारले नसावे ना असा गोड सभ्रम तुमच्या मनात निर्माण होतो

थोडयाच वेळात गाडी 'नारायण सरोवर' गावाच्या शिवेत शिरते पुन्हा 'भले पधारो'चा आवाज तुमच्या कानात घुमतो ी आवई नसते तर ती सत्य आरोळी असते तीस पस्तीस वर्षाचा एक तरुण तुमच्या गाडीजवळ येऊन हसतमुखाने तुमचे स्वागत करीत असतो हिप्पीप्रमाणे मानेपर्यंत वाढवलेले केसांचे झुलपे, दाढी मात्र घोटून घोटून केलेली डोळे घारेले निळ्या कळकट रगाची जिनची पँट, वर मळलेला पाढरा शर्ट, शर्टावर काळ्या रगाच जाकीट पायात प्लॅस्टिकच्या स्लीपर्स अशा अवतारात पुढे आलेला हा इसम कोणी 'गाइड' असावा असा तुम्ही तर्क करता तुम्ही गाडीतून खाली उतरल्यावर तुमचा हा तर्क खरा ठरतो कारण तो तुमच्या जवळ येऊन हिंदीत सांगतो, "मैं यहा का गाइड हू यहां देखनेलायक बहुतही है श्रीकोटेश्वर महादेवजीका मदिर, श्रीचपलेश्वर, श्रीआदिनारायण, श्रीगोवर्धन नागजी, चार सप्रदाय, मुरली मनोहरजी, श्रीत्रिविक्रमरायजीका मदिर, सनत् सनकादिक ऋषी आश्रम, रामेश्वरजी, शेष गुफाजी, लक्ष्मणजीकी गुफा, रामजीकी गुफा, शकरजीकी गुफा, माँ प्रभुजीनी बैठक, भावनगर सॉल्ट प्लँट .."

त्याच्या तोंडून ही लाबलचक यादी ऐकून क्षणभर कोणीही गोंधळून जावे व ऐकणाराला वाटावे, इतके सारे बघण्यासारखे येथे आहे ? इथे तर सगळीकडे दिसते ते सरोवर आणि दूर दिसते ते एक मदिर बहुधा हेच श्रीकोटेश्वर

महादेवाचे मदिर असावे बाकीच्या गोष्टी कुठे आहेत ? अधार पडण्यापूर्वी सगळे नाही तरी महत्त्वामहत्त्वाचे पाहून घ्यायला हवे तेव्हा गाइड करणेच ठीक !

सर्वानुमते हा विचार पक्का होतो हे सर्व दाखवण्यासाठी एकवीस रुपयाची ' बिदागी ' ठरते गाइडचे नाव असते प्रेमशकर ! श्रीकोटेश्वर महादेवाच्या परिसरात वाटाड्या म्हणून एक ' शकर 'च भेटावा या योगायोगाची क्षणभर तुम्हाला गमत वाटते ! पण हा ' प्रलयंकर ' शकर नसतो तर प्रेमशकर असतो ! पाहू या कशी काय वाट दाखवतो हा, असा विचार करीत तुम्ही तुमच्या मार्गदर्शकाच्या सांगण्याप्रमाणे मधुमीलनमधून सर्वप्रथम श्रीकोटेश्वर महादेवाच्या मदिराकडे जायला निघता तुम्हालाही तेथील टेकडीवरून सूर्यास्ताचा रमणीय देखावा पाहण्याची उत्सुकता लागलेली असते !

कथापुराणात अंतर्भुत असलेल्या चार पवित्र सरोवरात नारायण सरोवरचा समावेश आहे जितेंद्रिय महात्मा कर्दमऋषी यानी सरस्वतीच्या मुखाजवळ घोर तपश्चर्या केली होती त्यांच्या तपश्चर्येवर सतुष्ट होऊन चतुर्भुज नारायण प्रकट झाले होते व त्याच्या आनदाश्रूच्या बिंदूतून त्या ठिकाणी ' बिंदु 'सरोवर तयार झाले ! पुत्ररूपाने जन्म घेण्याचे अश्वासन देऊन कर्दम ऋषीच्या कुळात सांख्यशास्त्राच्या उपदेशासाठी नारायनाने कपिलमुनीचा अवतार घेतला असे माहात्म्य लाभलेले हे बिंदुसरोवर, जे हिंदू सरोवर नावानेही ओळखले जाते, ते गुजरातमध्ये पूर्वेला सिद्धपूर येथे आहे उत्तर भारतात हिमालयाच्या पर्वतराशीत भगवान शकरांचे जेथे वास्तव्य होते त्या कैलास पर्वतावरचे ' मानस 'सरोवर ! दक्षिण भारतात शबरीचा जेथे आश्रम होता त्या आश्रमाजवळचे ' पंपा ' सरोवर ! आचार्य पृथुराजांचा पुत्र प्रचेता आणि दक्ष प्रजापतीच्या पुत्रांनी जिथे तपश्चर्या केली ते ' नारायण 'सरोवर ! या चार सरोवरांव्यतिरिक्त पाचवे ' प्रेम 'सरोवर ! मथुरा वृंदावनच्या आसपास राधा आणि कृष्ण यांचे प्रथम मीलन जेथे झाले आणि त्यांच्या चार भावुक नयनांतून आनदाश्रू जेथे वाहिले तेथे ' प्रेम 'सरोवर तयार झाले !

नारायण सरोवर जितके पुरातन तितकेच पवित्र ! असेही सांगतात की, श्रीनारायणाच्या उजव्या पायाच्या अगठ्यातून धार लागून जिथे पवित्र सरोवर तयार झाले तेच हे नारायण सरोवर ! पश्चिमेकडचा दर्यासागर आणि हे नारायण सरोवर याचा या ठिकाणी सुरेख सगम झाला आहे ! सगमाचे ठिकाण हे दान, स्नान आदी विधींसाठी तीर्थक्षेत्र मानावयाचे ही वैदिक धारणा ! म्हणून नारायण सरोवर हे सर्व हिंदूचे तीर्थक्षेत्र मानले जाते शैव व वैष्णव या दोन्ही सप्रदायांच्या श्रद्धांचा येथे सगम झालेला आहे

ही गोष्ट तुम्हास प्रकर्षाने जाणवते ! सरोवराच्या एका काठावर श्रीकोटेश्वर महादेवाचे मंदिर तर दुसऱ्या काठावर श्रीत्रिविक्रमरायाचे मंदिर !

लंकापती रावणाने अमरपद मिळवण्यासाठी श्रीशंकरांची आराधना केली होती रावणाच्या घोर तपश्चर्येने श्रीशंकर प्रसन्न झाले होते व त्यांनी इच्छित वर मागण्याबद्दल रावणास सांगितले होते देव, दानव किंवा किन्नर यांच्या-पैकी कोणाच्याही हातून मरण येऊ नये असे अभयदान देण्याबद्दल त्याने श्रीशंकरास विनंती केली होती 'तथास्तु' असे अभिवचन देऊन श्रीशंकरांनी रावणास एक लिंग दिले होते व सांगितले होते, "मी तुला हे जे लिंग दिले आहे ते तू रस्त्यात कोठेही खाली न ठेवता स्वतःच्या हातांनी लंकेला घेऊन जा "

श्रीविष्णू भगवानांना ही बातमी समजताच श्रीब्रह्मा, श्रीविष्णू आदी देवादिकांनी गुप्तसभेत निर्णय घेतला होता की, श्रीब्रह्मांनी गाईचे रूप घेऊन हल्ली जेथे 'गयाकुंड' आहे त्या कुंडातील चिखलात रुतून बसावे श्रीविष्णूंनी ब्राह्मणाचे रूप घेऊन या गाईला विकावे पूर्वनियोजनाप्रमाणे पूर्तता झाली होती त्याचवेळी हातावर लिंग घेऊन रावण आकाशमार्गाने लंकेकडे निघाला होता जाता जाता त्याने 'गयाकुंड'जवळचे दृश्य पाहिले होते व तो स्वतःशी म्हणाला होता, 'कुंडाच्या चिखलात रुतलेली गाय संकटात दिसते आहे जवळ ब्राह्मण उभा राहूनही तो तिला वाचवू इच्छित नाही तेव्हा या गायीला संकटातून मुक्त करावयास हवे मृत्यूच्या दाढेत सापडलेली गाय पाहून ती वाचवली नाही, तर गोहत्येचे पाप लागेल !' असा विचार करून रावण खाली कुंडाजवळ उतरला होता चिखलात रुतलेली गाय सुटकेसाठी हंबरडा फोडीत होती तिच्या आर्त आक्रंदनाने व्यथित झालेला रावण देहभान हरपला होता. हातातले शिवलिंग एका टेकडीवर ठेवून गायीची मुक्तता करण्यासाठी तो सिद्ध झाला होता तो वळून पाहतो तर कुंडात गाय नव्हती व तो ब्राह्मणही जवळपास कोठेच दिसत नव्हता झाल्या प्रकाराने हतबुद्ध व कष्टी होऊन रावण टेकडीवरचे लिंग उचलण्यासाठी माघारी फिरला होता, तर त्याला आता एका शिवलिंगाच्या जागी कोटी शिवलिंग दिसू लागले होते श्रीशंकरांनी दिलेले शिवलिंग कोणते हे ओळखणे कठीण झाले होते ते शोधून काढण्यासाठी तो पुढे सरसावताच त्या असंख्य लिंगांतून "तू शर्त मोडली आहेस तेव्हा आता तू लिंगास हात लावू नकोस !" असे शब्द घुमू लागले होते कोटी लिंगांतून उमटलेली ती प्रखर वाणी ऐकून रावण भीतीने मागे सरकला होता तेवढ्यातच इतर सर्व लिंगे अदृश्य होऊन श्रीशंकरांनी दिलेले लिंग तेवढे त्या जागी शिल्लक उरले होते ! .कर्नाटकातल्या बदामी गावा-

जवळील नंदिकेश्वर गावी महाकूट मंदिरात श्रीशंकराची कोटिलिंगे आहेत महाकुटप्रमाणे येथे मात्र कोटिलिंगाचे अस्तित्व राहिले नाही उरलेल्या लिंगावर हात टेकवून रावणाने झालेल्या प्रमादाबद्दल क्षमायाचना केली होती हेच ते लिंग ज्या ठिकाणी आज नारायण सरोवराच्या काठावर श्रीकोटेश्वर महादेवाचे देऊळ उभे आहे।

रावणाच्या भूतदयेचे कौतुक व प्रशंसा करण्याऐवजी देवादिकांनी माया-जाल पसरून त्याची प्रतारणा केली होती ही घटना क्षणभर तुम्हाला अस्वस्थ केल्यावाचून राहत नाही रावणाच्या हिशेबावर अनेक अप्रिय गोष्टी नावे बाजूस असण्याची नोंद घेऊनही असे व्हावयास नको होते, असे तुम्हास वाटते एकट्या रावणाच्या बाबतीतच नव्हे तर कर्णाप्रमाणे इतर अनेक जणांशी अनेक प्रसंगी देवांनी ही कुटिल नीती अवलंबल्याचे पुराणकथांतून आढळते श्री शंकरांनी वर द्यावा आणि श्रीब्रह्मा, श्री विष्णू यांनी देवसभा बोलवावी व तो वर कसा निष्फळ ठरेल याची चर्चा करून त्यासाठी व्यूह रचावा। केवळ भक्ताची चेष्टा होत नव्हती तर श्री शंकराच्या निष्प्रभतेचे देवादिका-कडून प्रदर्शनच होत होते। यातूनच की काय, श्री शंकरांनी विनाशाचे तांडव सुरू केले असावे। साहजिकच यायोगे त्यांच्यातील विरोधाभासाचे प्रदर्शन होते। भक्तांनी मात्र देवांना श्रद्धेने एकत्र आणावे। कर्नाटकातील बदामी गावा-जवळ मलप्रभेच्या काठी विष्णु पुष्करिणी, चतुर्मुख ब्रह्मा व कोटिलिंगेश्वर यांचा मेळावा बिल्व व चंदन वृक्षांनी माखलेल्या ‘ महाकूट ’ पर्वतावर भक्तांनीच भरवला आहे। देव मात्र ‘ महाकुटेश्वर ’ येथील ही ‘ भावनात्मक एकात्मता ’ विसरतात आणि आपली विसंगत पण नियतविहित कर्तव्ये करीत राहतात।

श्री कोटेश्वर महादेवाच्या मंदिरातील लिंगावर रावणाच्या हाताचा उमटलेला ठसा प्रेमशंकर तुम्हास आवर्जून दाखवतो अल्लाउद्दीन खिलजीने या मंदिरावर हल्ला चढविल्याचा इतिहासही तो सांगतो अल्लाउद्दीन खिलजीने हे लिंग तोडण्यासाठी लिंगावर जे तीन घाव घातले होते ते निष्फळ ठरले होते या घावांनी पिंडीला जे खड्डे पडले होते ते पंचधातूच्या तीन खुंट्यांनी बुजवल्याचे आठवणीने सांगून त्या खुणाही प्रेमशंकर तुम्हास जातीने दाखवतो।

त्याचे हे कृत्य ‘ अगांतुकपणा ’चे वाटल्याने तेथील पुजाऱ्यास अर्थातच आवडत नाही ही आख्यायिका कथन करण्याचा ‘ जन्मसिद्ध हक्क ’ पुजाऱ्याचा होता प्रेमशंकरने त्याच्या अधिकारावर अनधिकृत आक्रमण केले होते हे त्याच्या रुष्टतेचे कारण होते म्हणूनच तो प्रेमशंकरवर ‘ पाळलेल्या

कुत्र्यासारखा ' पिसाळून गुरगुरला होता प्रेमशकरने त्याच्या ' भरलेल्या पोटा 'वर पाय ठेवला होता ! पुजाऱ्याची ही पोटतिडीक तुमच्यापैकी काही-जणांच्या लक्षात येते श्री कोटेश्वराच्या पिंडीजवळ काही ना काही ठेवावे असे तुम्हालाही वाटते जैनानी जैन तीर्थंकराचेच तेवढे दर्शन घ्यावे अशा कोत्या विचारसरणीचे तुमच्यापैकी बहुसख्य जैन नसल्याने त्याची मनोधारणा अशी होते या लोकांनी केलेल्या ' अर्घ्या 'मुळे पुजाऱ्याचे तळहात सुखावतात आणि या थडचा ओघाने त्याचा तळतळाटही ओसरतो ! एकेकाळी पाण्याने तुडुब भरलेला नारायण जलाशय आता कालांतराने ओसरला आहे तसा !

धरणीकपांचे असख्य हादरे बसून या नारायण सरोवरातील पाणी कमी झाले असावे ! ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ वादग्रस्त असते, तरीही सिंधू नदीचे उगमस्थान पूर्वी नारायण सरोवर होते असे सागतात धरणीकपामुळे हे उगमस्थान खडित झाल्याने सिंधूची कच्छपासून ताटातूट झाली होती ! दोनशे वर्षांपूर्वी कच्छवर सिंधचा राजा गुलामशहा याने हल्ला केला होता कच्छमधून परतताना त्याने लखपतजवळ भराव घालून सिंधूचा प्रवाह अडवला होता व त्याचा ओघ सिंधकडे वळवला होता नद्यांच्या पाण्यासाठी राज्याराज्यांत आजही तटे होतात व आडमुठेपणाने प्रवाह अडवले जातात अशातलाच हा जुना प्रकार होता हरितक्रांतीसाठीही आजकाल नद्या जाग-जागी अडवल्याने त्यांची पात्रे कोरडी ठणठणीत पडल्याचेही ठिकठिकाणी आढळते अशा नद्याच्या काठांवरची हरित सृष्टी दृष्टीआडच झालेली असते नद्यांच्या परिसरातली शीतलताही कोळपून हरपलेली असते नद्यानाल्यांचा झिरपा बाध घातल्याने थांबून आडाचे व विहिरीचे पाणीही राजापूरच्या गगेसारखे गडप होते हरितक्रांतीसाठी झालेली ही उत्क्रांती जागजागी कच्छचे रण निर्माण करीत आली आहे काळाचा हा अभिशाप की वरदान ही आजची एक क्लिष्ट समस्या बनली आहे !

सिंधूच्या ताटातुटीने व विरहाने व्यथित झाल्याने की काय नारायण सरोवर रोडावले असावे तरीही सध्या नारायण सरोवरात पाण्याची जी साठवण आहे ती, कोरडा भाग दुर्लक्षल्यास, दर्याची आठवण करून देते ! हे विस्तृत पाणवठा क्षेत्र सागराचे सोयरेपण सागते असेच कोणालाही वाटावे ! पुण्यातल्या मुळामुठेचा जलाशय झाकळून टाकणारी व जलहरण करणारी ' पानफुटी ' जलपर्णी नारायण सरोवराच्या पृष्ठभागावर तरगत असलेली दिसत नाही हेही यामागचे रहस्य असावे !

श्री कोटेश्वर महादेवाच्या टेकडीवरून सूर्यास्ताचा देखावा पाहण्यास

तुम्हास धन्यता वाटते महाबळेश्वर येथील ' बॉबे पॉइंट 'वरून ' सन सेट ' पाहताना नवीनता भावते तीच याही ठिकाणी भावल्यावाचून राहत नाही सूर्यास्ताची अनेक ठिकाणची अनेक वर्णने अनेक कवींनी आणि अनेक लेखकांनी आपल्या साहित्यातून केलेली आहेत अस्ताचलाकडील हा ' सुनहरी सिलसिला ' पाहून कुणाला यापैकी एखादी कल्पना आठवते तर कुणाला दुसरी ! अशा प्रसंगी प्रत्येक संवेदनशील मनाचे कंपन अनिवार्य ठरते !

नारायण सरोवरात स्नानासाठी उतरलेला सूर्यनारायण स्नान उरकून आपले सहस्रावधी कर पश्चिम क्षितिजालगतच्या किनाऱ्यावरून नारायण सरोवराच्या जलाशयावर दूरवर पसरतो व श्रीकोटेश्वर महादेवाला या सहस्रावधी करांनी कृतज्ञतापूर्वक अर्घ्य देतो असाच बघणाराला भास होतो ! हे ' दर्शन ' असंख्य रंगछटांनी त्याला पुलकित करीत असते !

कुणाकुणाला नारायण सरोवरात श्रीकोटेश्वर महादेवाच्या देवळापासून पश्चिमेच्या क्षितिजापर्यंत चिंचोळी होत जाणारी सुवर्णाची दीपमाळ दिसते व पश्चिमेकडील सूर्यबिंब या दीपमाळेवर ठेवलेल्या लालबुंद तेजस्वी गोलासारखे वाटते ! हेही दैदिप्यमान दर्शन कुणाकुणाला साक्षात्कारी वाटते !

चौदा वर्षांचा वनवास भोगण्यासाठी रामसीता अयोध्येहून नारायण सरोवराच्या काठावर आले होते काही दिवस त्यांचे वास्तव्य येथे होते ज्या गुहेत ते राहत होते त्या गुहेचे दर्शन प्रेमशंकरने तुम्हास घडवले. एका खांबावर उभ्या असलेल्या या रामगुंफेपासून लक्ष्मणाची गुंफा थोड्या अंतरावर आहे शंकर गुंफेत श्रीशंकराचे नारळाएवढे लिंग असून हीही गुंफा या परिसरात आहे

त्या घटनेला अडीचशे वर्षे होऊन गेली होती ! सूर्यास्त होऊन बराच वेळ झाला होता अंधार पडला होता अशी ती रात्र द्वारकेतील होती ! द्वारकाधीशाच्या मंदिरातली सांज आरती केव्हाच झाली होती सांज आरती झाल्यावर पुजाऱ्याने मंदिराची दारे नित्यनियमाप्रमाणे बंद केली होती

कच्छची महाराणी राजबा हिला द्वारकेला पोचायला थोडा वेळ झाला होता द्वारकाधीशाच्या दर्शनासाठी ती अधीर झाल्याने मंदिराचे दरवाजे बंद पाहून ती अस्वस्थ झाली होती मंदिराचे प्रवेशद्वार उघडण्याबद्दल तिने पुजाऱ्याकडे निरोप पाठवला होता पुजाऱ्याने तसे करण्यास नकार देऊन कळविले होते की सांज आरती झाल्यानंतर बंद होणारे मंदिर प्रातःकालपर्यंत

उघडले जात नाही त्यावर महाराणीने आपला सेवक पुजाऱ्याकडे पाठवून कळविले होते की, " कच्छची महाराणी द्वारकाधीशाचे दर्शन घ्यायला आलेली आहे तेव्हा आढेवेढे न घेता मंदिराचे द्वार उघडावे " कच्छच्या महाराणी-कडून असा संदेश घेऊन आलेल्या सेवकाबरोबरच पुजाऱ्याने उलट निरोप पाठवला की, " कच्छची महाराणी आली असली तरी दार उघडले जाणार नाही महाराणीने दुसरे मंदिर बांधावे की जे तिच्या लहरीप्रमाणे केव्हाही वाटेल तेव्हा तिला उघडता यावे ।" द्वारकाधीशाच्या पुजाऱ्याचे हे उर्मट उत्तर ऐकून कच्छची महाराणी राजबा केवळ अवमानित झाली नव्हती तर संतप्तही झाली होती। भगवान श्रीकृष्णाच्या राजकुलाची परपरा सागणाऱ्या कच्छच्या 'जाडेजा' घराण्याचा हा धडधडीत अपमान होता ।. भगवान श्रीकृष्णाचा वशज देवेंद्र याला चार पुत्र होते असमत, गजपत, नरपत व भूपत. असमतचे वशज शरीरयष्टीने बहुतेक जाडजूड होते म्हणूनच त्याच्या वशजाना 'जाडेजा' हे नाव पडले होते अशा कृष्णवशीय जाडेजा घराण्याचा एका सामान्य पुजाऱ्याने अवमान करावा ही घटना महाराणी राजबाच्या मनाला खूपच लागली होती । द्वारकेत अन्नपाणी ग्रहण न करता ती आपल्या लवाजम्यानिशी आल्या पावली माघारी फिरली होती ही दुखरी टोचणी घेऊन महाराणी राजबा कच्छला परतली होती या व्यथेतूनच तिने कच्छच्या पश्चिम सीमेलगत नारायण सरोवराच्या काठावर द्वारकेतल्यामदिरा-प्रमाणे एक मदिर उभे केले होते तेच हे श्री त्रिविक्रमराय मदिर हेच ते ठाकूरजी मदिर । द्वारकाधीशाचे मदिर काठेवाडच्या किनारपट्टीलगत तर श्री त्रिविक्रमराय मदिर कच्छच्या पश्चिम किनारपट्टीलागत । भेद इतकाच की द्वारकेतील मदिर द्वारकाधीश श्रीकृष्णाचे तर नारायण सरोवर येथील मदिर द्वारकाधीशाचे जेष्ठ बंधू श्री त्रिविक्रमराय याच श्री त्रिविक्रमराय म्हणजेच बलराम ।

द्वारकाधीश रणछोडरायांचे दर्शन घडले नव्हते म्हणून श्री त्रिविक्रम-रायाचे मंदिर नारायण सरोवर येथे बाधून महाराणी राजबाने द्वारका-धीशाच्या पुजाऱ्यावर कडी केली होती, एवढेच नव्हे तर तिने द्वारकाधीशा-वर वरचढपणा केला होता असेच कुणालाही वाटावे ! श्रीकृष्णाचे ज्येष्ठ बधू बलराम याचे मदिर झाले होते हे ठीकच झाले होते पराक्रमी माणसाच्या कुटुबातील इतर व्यक्तींना, मग त्या व्यक्ती ज्येष्ठ असल्या तरी, पराक्रमी माणसाच्या तुलनेत, गौणत्व येते व पराक्रमी माणसाचा डका पिटला जाऊन इतर व्यक्ती फिक्या पडतात हा सर्वसाधारण नियम आहे इथे श्रीकृष्णाच्या जेष्ठ बधूचे मंदिर महाराणी राजबाने उभारून ज्येष्ठत्वाला प्रतिष्ठा मिळवून

दिली असली तरी या कृतीतून महाराणी राजबाची श्रेष्ठतेसाठी झालेली धडपडच प्रकट होते कारण या मंदिरासाठी तिने स्वत:ची सुवर्णतुला केली होती व झालेल्या तोलातील सर्व सोने या मंदिराच्या बांधणीसाठी खर्च केले होते। तरीही सोन्याच्या द्वारकेतील द्वारकाधीशाचे जनमानसातले स्थान अढळ अग्रस्थानी राहिले होते। रणछोडरायाची ती जागा काही बलशाली त्रिविक्रमरायाना घेता आली नव्हती व महाराणीलाही ती जागा त्यांना मिळवून देता आली नव्हती! महाराणी राजबाची ही हार होती की जीत होती याचा विचार करीत नारायण सरोवर येथील किल्ल्याच्या भक्कम कोटातील मुख्य मंदिरातल्या श्री त्रिविक्रमरायाचे दर्शन घडते श्री त्रिविक्रम रायाच्या आठ महिरपी कमानीच्या दरवाजासमोरच श्री द्वारकाधीशाचा दरबार आहे द्वारकाधीशाच्या दरबारात पाच दालने, प्रत्येक दालनात एक याप्रमाणे एकूण पाच गाभारे या पाच गाभाऱ्यात श्री द्वारकाधीश श्रीकृष्ण, श्री लक्ष्मी, श्री कुवर कल्याणराय, श्री गोवर्धनराय, श्री आदिनारायण याच्या मूर्ती या सर्वांबरोबरच श्री भुवेश्वर महादेव, श्री हनुमानजी, श्री गरुडजी, श्री साक्षी गोपाल अशा सर्व देवादिकांचेही दर्शन घडते!

येथील सांज आरतीच्या वेळी उपस्थित राहण्याचे भाग्य तुम्हास लाभते मंदिरे बंद झाली असती तर महाराणी राजबासारखी तुमचीही अवस्था होऊन तुम्ही निराश झाला असता स्वत:ची सुवर्णतुला करण्याइतके सामर्थ्य तुमच्यापैकी कुणा एकाजवळ असते तर याचीही खत वाटण्याचे प्रयोजन उरले नसते। पण सायंकाळच्या चारीही आरत्या तुम्हास लाभल्याने तसे काहीच घडले नव्हते ही श्री त्रिविक्रमरायाची कृपाच समजायची।

नारायण सरोवर येथे रात्रीचे भोजन उरकून 'मातानो मढ' येथे मुक्कामास जावयाचे असते। 'चोहीयार'वाले सोडून इतरासाठी जेवणाचा बेत साधाच असतो दाळ-भाताचा! 'मातानो मढ' म्हणजे 'मातेचा मठ'! 'मातानो मढ' येथे 'श्री अशापुरी माँ प्रभुजीनी बैठक' असून ही आशापुरी मा एकेकाळी कच्छच्या जाडेजा राजपूत राजांच्या दरबाराची कुलस्वामिनी होती। आशापुरी माताजी त्यांचे आशास्थान होती त्यांची आशापूर्ती करणारी ही कुलदेवता त्यांची आराध्यदेवता होती। स्वत:चे 'कोरी' नावाचे चलनी नाणे काढणाऱ्या महाराजा राओलचे नाव नलिया येथे तुम्ही ऐकलेले असते आता या ठिकाणी जाडेजा या राजाचे नाव ऐकायला मिळते महाराष्ट्रात आलेली रावळ, जाडेजा या नावाची राजस्थानी कुटुंबे या वंशाच्या नावाची परंपरा आजही चालवतात अशी अनेक राजपूत

घराणी महाराष्ट्रात जशी आली आहेत तशीच भारताच्या इतर राज्यातही आणि भारताबाहेरही ती विखुरली आहेत! राजपुताच्या कुलदेवतेचे दर्शन ही एक पर्वणीच! ... तिकडे प्रस्थान करण्यापूर्वी भोजन!

श्री त्रिविक्रमराय किल्ल्याबाहेर, कोटासमोरच एक धर्मशाळा असून जैन धर्मशाळेच्या तुलनेत ही धर्मशाळा अगदीच निकृष्ट प्रतीची आहे येथील धर्मशाळेच्या भिंतीवर जागोजागी संत श्री कबीरदासजींचे दोहे लिहिले असून त्यांतील 'नहाए धोए क्या हुआ! जो मन की मैल न जाये। मीन सदा जलमे रहे। धोए बास न जाए ।।' हा दोहा तुमचे लक्ष आकर्षून घेतो नारायण सरोवर येथे तुम्ही दुपार टळल्यानंतर आला होता त्यामुळे येथील सरोवरात स्नान करण्याचे तुम्हास प्रयोजन व औचित्य वाटले नव्हते तुम्ही 'पवित्र स्नान' केले असते तर मात्र हा दोहा वाचून तुम्ही केवळ अंतर्मुख झाला नसता तर आपल्या शरीरास मत्स्यगंध तर येत नाही ना या शंकेने काही क्षण व्यस्त झाला असता! मानव हा जसा कपी अवतार आहे तसाच तो मत्स्यावतारही आहे या संशोधनामुळे तुमची शंका साहजिकच थोडी दाट झाली असती महाभारत घडवणाऱ्या मत्स्यगंधेचे आपण वंशज अथवा वारस तर नाही ना या संदेहाने ती आणखी गर्द झाली असती! ...

# बारा

नारायण सरोवराकडे पाठ फिरवून मधुमीलन 'मातानो मड'कडे निघालेली असते येताना क्षितिजापर्यंत पसरलेला निळा जलसागर दृष्टीस पसरलेला असतो आता परतताना क्षितिजापर्यंत दूसर तिसरं काहीच दिसत नाही, दिसतं ते फक्त ओसाड माळरान आतापर्यंतच्या प्रवासात तुम्हास डोंगरकडा, टेकड्या फारशा कुठे आढळल्या नव्हत्या. त्यामुळे सगळा प्रवास सपाटीवरचा होता चढ नाही, उतार नाही, खाच नाही, खळगा नाही पण आता दूरवर क्षितिजापाशी ठेंगणे डोंगरमाथे दिसू लागतात जणू क्षितिज-कडाना नागमोडी डोंगरकडांची झालर लावल्यासारखा भास होतो कच्छ-मध्ये टप्प्याटप्प्यावर होणारा नैसर्गिक बदल याही टप्प्यावर प्रकर्षाने जाणवतो पाऊसमान कमी असल्याने साहजिकच कमी पाण्यावर पोसली जाणारी तुरळक झाडे इकडे आढळतात अशा झाडांत अर्थातच बाभळीचाच भरणा अधिक असतो रस्त्याकडेने, शेतीवाडीच्या बाधाबाधांवर व इतरत्रही कुठे कुठे हेतूपूर्वक या झाडाची लागवड केली जाते. जमिनीची धूप थांबावी हा त्यामागचा हेतू असावा अनेक जागी ही झाडे निसर्गतःच उगवतात गरिबाची मुलेबाळे 'आपोआप' वाढावीत तशी हीही झाडे निरपेक्षपणे वाढत राहतात ! तरीही 'बच्चे कम हो पेड हजार !' याची कच्छला नितांत गरज आहे ! . सावलीसाठी, समृद्धीसाठी आणि सरपणासाठीही !

अधूनमधून शेतीचे तांबडे वाफे कुळवलेले आढळतात काही बागायती वाफे पाण्याखाली पाजले व पोसले असल्याने ते कुठेकुठे हिरवे दिसतात अशा वाफ्यांच्या बाधावर हिरवी झाडी रक्षकासारखी पहारा करीत उभी असते ! ...

'टाकीचे घाव सोसल्याखेरीज देवपण येत नाही' ही छन्नीचा शोध लागल्यानंतरची आणि तिचा वापर कसा करावयाचा याचा बोध झाल्या-

नतरची रूढ कल्पना ! त्यापूर्वी अनघड दगडानाही देवपण लाभत होते ! मानवाने प्राथमिक अवस्थेत, त्यांच्या ठायी कलागुणाचा उद्रेक आणि उन्मेष होण्यापूर्वी, निसर्गात सापडणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण स्वयरूप दगडाना देवता बनविले होते तो देवतांची अशा आदिम स्वरूपात सातत्याने दीर्घकाळ पूजा करीत होता येणाऱ्या कैक पिढ्या अशा देवता स्वरूपांना ' स्वयभू ' मानीत होत्या आजही कैक ठिकाणी हीच श्रद्धा अढळ राहिल्याचे आढळून येते पुढे शिल्पकलेच्या विकासाबरोबर व कल्पनाशक्तीच्या गरुडझेपेबरोबर देवताच्या मूर्ती घडवल्या जाऊन त्याचे अगोपाग घाटदार, डौलदार बनत गेले अशी ही उत्क्रात रूपे मानवाची श्रद्धास्थाने बनली या मूर्तीमधल्या देवपणाला थोडासुद्धा ढळ लागू नये, उलट त्याचा प्रभाव वृद्धिगत व्हावा म्हणूनच मानवाने अशा वास्तव रूपाना कल्पना विलासाने अद्‌भुततेचे लेणे बहाल केले याच सकल्पनातून या देवता चतुर्भुजा, अष्टभुजा आणि दशभुजाही झाल्या प्रतीकात्मक आदिम रूपातून वास्तव रूपात व कालांतराने अदभुत रूपात देवतांचा असा दीर्घ प्रवास झाला ! .. श्री आशापुरी माताजी कोणत्या रूपात असेल ? ती कशी दिसत असेल ? हसवाहिनी श्वेतवसना सरस्वतीसारखी सोज्वला की कमलासना ऐश्वर्यसपन्ना लक्ष्मीसारखी विलासप्रिया ? महाशक्तिशाली अष्टभुजा दुर्गेसारखी रौद्ररूपा की सिंहारूढा महानिश्चयी जगदबेसारखी तेजस्विता ? माताजीचे प्रत्यक्ष दर्शन घडण्यापूर्वीच काल्पनिक दर्शन घडत असतानाच, नारायण सरोवरापासून सुमारे पन्नास किलोमीटर अतरावर मध्यरात्रीपूर्वी ' मातानो मड ' हे स्थान येते व कल्पनेची मालिका तुटते !

आता तुम्ही वास्तवाला सामोरे जाता विश्रातिस्थान कसे असेल, नारायण सरोवर येथील धर्मशाळेपेक्षा येथील धर्मशाळा सरस असेल का या विचारानी अनेकांच्या मनात गर्दी केली पेटीसारखी बदिस्त धर्मशाळा पाहून तुम्हास गुदमरल्यासारखे वाटू लागले बाहेर अशी अवस्था तर आत पाऊल ठेवल्यावर काय दशा होईल याचा विचारसुद्धा असह्य वाटू लागला धर्मशाळेचे दार अनेकदा ठोठावूनही लवकर उघडले जात नाही तेथे असणाऱ्या व्यवस्थापकाचे नाव माहीत नसल्याने हाक तरी कोणत्या नावाने मारावी हाही प्रश्नच होता प्रश्नच प्रश्न .. प्रश्नाचा गुता वाढत असतानाच कोणीतरी दार उघडले

तीस-पस्तीस वर्षांचा एक तरुण डोळे चोळीत आला होता. त्याच्या डोळ्यावरची झापड अद्याप दूर झाली नव्हती झोपमोड झाल्याने कपाळावरच्या आठ्या आणि मुद्रेवरचा तिरस्कार कुणालाही जाणवावा

तशातही तुमच्यापैकी कोणी तरी एक जण आत शिरतो मागोमाग दोघे-चौघे घुसतात धर्मशाळेच्या व्हराड्यात पाच-सहा शेळ्या बांधलेल्या असतात त्या शेळ्यांनी लेंड्यांची बरसात करून सगळ्या व्हरांड्यात सडा घातलेला असतो प्रवाशाचा थवा पाहून तो तरुण आतील जाळ्यांना बांध-लेल्या शेळ्या एकेक याप्रमाणे सोडून नाराजीने बाहेर फरपटत आणतो व बाहेरच्या खुंट्यांना बांधतो हा येथील व्यवस्थापक असावा, राखणदारही असावा या धर्मशाळेतली ही कर्तुमकर्तुम शक्ती असावी याचा तुम्ही अदाज घेता

अर्धा तास पिच्छा पुरविल्यावर पधरा-वीस कळकटलेल्या गाद्या मिळतात त्यावर अथरण्यासाठी चादरा असतात त्याही घाण आणि फाटलेल्या याच चादरी पांघरण्यासाठी वापराव्यात असा तो सल्ला देतो, कारण पांघरण्या-साठी वेगळ्या चादरी नसतात उशादेखील तेलाने आणि मळाने माखून काळ्याकुट्ट झालेल्या बिनखोळीच्या, पोरक्या अशाही शय्येवर झापायची काही जणावर पाळी येते ज्यानी स्वत च अथरूण-पाघरूण बरोबर आणलेल असत त्यांच्यापुढे ही अडचण नसते सर्वच ठिकाणी अथरायला पांघरायला चागले मिळेल या खोट्या विश्वासावर आलेल्याच्या वाट्याला ही दुर्दशा आली त्याला कोणी काय करावे ! एक वेळ खायला चागले नाही मिळाले तरी चालेल, पण विश्रांतीसाठी स्वच्छ अथरूण-पांघरूण आणि तेही स्वत चे बरोबर असायला हवे ! अशा घाणेरड्या अथरुणावर डाराडूर झोपणारे काही महाभाग तुमच्यात आहेत, त्याना धन्यवादच द्यायला हवेत !

पुढचे दार बंद झाले की आत हवा यायला मार्ग नसतो दिवस थडीचे म्हणून उलघाल होणार नसते उन्हाळ्यात मात्र अशा जागी जीव गुदमर-लाच पाहिजे ! ‘ माता नो मड ’ येथील आशापुरीचे मदिर, साप्रदायिक मदिर ..कुणीही येणार, कसेही राहणार . सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थित वापरलीच पाहिजे असे दडक थोडेच पाळले पाहिजेत ही मनोधारणा या घाणेरड्या प्रवृत्तीने येथील गाद्या-उशा अजून अशाच मळकटणार, कळकट-णार ! श्री आशापुरी माताजी देवस्थानची विश्वस्त मडळी अशा बिछान्या-वर झोपल्याशिवाय व सयोजन बदलल्याशिवाय हे दुरुस्त होणे दुरापास्तच !

झोप लागते का पहा ! प्रयत्न करूनही निवात झोप लागलीच नाही तर उजाडेपर्यंत खुशाल विचार करीत पडावे ! प्रात काल झाल्यावर उरकाव-याच्या सर्व विधीतही आनदच मानावा ! ‘ नेचर्स कॉल ’साठी ‘ नेचर ’चाच आश्रय घ्यावा लागणार असे दिसते ! यातही आनदच ! आलीया भोगासी असावे सादर ! सयोजकाचे व सूत्रधारांचे नियोजन येथे सपशेल फसले !

चांगल्या गोष्टीला गालबोट लागायलाच हवे की काय न कळे ! ...

कच्छच्या छोटया-मोठया गावात बरीच गुजराती नियतकालिके येतात 'कच्छ मित्र' तर कच्छ-भूज येथून प्रकाशित होणारे जिल्हापत्र या व्यतिरिक्त इकडे मुबई समाचार, गुजरात समाचार, सौराष्ट्रभूमी, जयहिंद, जनसत्ता, जन्मभूमी, सदेश, फुलछाप ही मुबई, अहमदाबाद व इतर ठिकाणहून प्रसिद्ध होणारी दैनिकेही दिसतात पूर्वी 'फुलछाप' नावाचा साबणबार ऐकीवात होता, पण एका गुजराती दैनिकाचे नाव 'फुलछाप' असावे हे थोडे विचित्रच वाटते की नाही ! यातील कुठली ना कुठली 'छापु' कच्छमधल्या प्रमुख गावी दुकानातून आणि हॉटेलांतून आढळतात काही 'छापु' 'आठवडिक', काही पाक्षिक तर काही मासिक असतात इकडील बहुतेक 'छापु'वर इग्रजी तारखेबरोबरच मिती, मास व विक्रम संवत छापलेले असते

गुजरातेत 'विक्रम सवत्सरा'ला प्राधान्य आहे वास्तूच्या कोनशिलावर, इमारतींच्या माथ्यावर, मदिरातील प्रतिष्ठा लेखावर, दुकानाच्या फलकांवर, स्थापना आदी कालाची जी नोंद असते ती बहुधा 'विक्रम संवत'मध्येच असते गुजरातची प्रवृत्ती व्यापारी असल्याने व व्यापारी जमाखर्चात या विक्रम संवतचा सर्रास वापर होत असल्याने इतरही स्थानी हरेक बाबतीत हेच सवत्सर व्यावहारिक परपरेप्रमाणे उपयोगात आणले जाते !

भारतातील कालगणनेची परपरा तशी फार जुनी आहे 'कलिकाला'ची सुरुवात कौरव-पांडवाच्या भारतीय युद्धापासून म्हणजे इसवी सनपूर्व ३१३७ या वर्षी झाली असे म्हणतात, तर काहींच्या मते हा प्रारभ भारतीय युद्धाच्या समाप्तीनतर इसवीसन पूर्व ३१०१ या वर्षी झाला 'कलि' शब्दाच्या अर्थसदर्भाने पहिले मत सयुक्तिक वाटते तर पांडवाच्या विजयाच्या सदर्भाने दुसरे मतही ग्राह्य वाटते इक्ष्वाकु सूर्यकुलाची परपरा चालवणाऱ्या काश्मिरात हा कालखड 'लौकिकाब्द' नावाच्या शकाने गणला जातो ही कालगणना पांडवराज युधिष्ठिर याच्या स्वर्गारोहणापासून होत आली युधिष्ठिराचे निर्वाण सनपूर्व ३०७६ या वर्षी झाले भगवान महावीरांच्या निर्वाणापासून 'वीर सवत' सुरू झाले. भगवान महावीरांचे निर्वाण सनपूर्व ५२७ या वर्षी झाले दहा वर्षांपूर्वी भगवान महावीराचा पचवीसावा निर्वाण शताब्दी-महोत्सव साजरा झालेला आहे उज्जयनी नरेश हर्षवर्धन विक्रमादित्य याने सनपूर्व ४५७ व्या वर्षी चालू केलेली कालगणना 'हर्षशक' नावाने उजेडात आली नेपाळचा राजा अशुवर्मा याच्या आग्रहपूर्वक निमत्रणावरून उज्जय-

नीचा सम्राट विक्रमादित्य याने नेपाळला सदिच्छा भेट दिली होती चक्रवर्ती विक्रमादित्याचा बहुमान करण्यासाठी या सदिच्छा भेट दिनापासून 'विक्रम सवत 'ची सनपूर्व ५७ व्या वर्षांमध्ये कालगणना सुरू झाली इसाईंच्या इसवी सनाची सुरुवात येशू ख्रिस्ताच्या निर्वाणापासून झाली महाराष्ट्राचे प्राचीन नाव राष्ट्रकुट व या राष्ट्रकुटचे अधिपती सातवाहन। राष्ट्रकुटवर यादवकुलीन सातवाहनांची अधिसत्ता इसवीसन पूर्व २३५ ते इसवीसन २२५ पर्यंत म्हणजेच चारशे साठ वर्षे होती अशा प्रदीर्घकालीन सातवाहन राजवटीतल्या एका शालिवाहन राजाने सुरू केलेले 'शालिवाहन शक' याची गणना इसवी सन ७८ मध्ये सुरू झाली श्री छत्रपती शिवाजी महा-राजाच्या राज्याभिषेक दिनापासून सन १६७४ मध्ये 'शिव शक' चालू झाला स्वातंत्र्यप्राप्तीनतर स्वतंत्र सार्वभौम भारताने शालिवाहन शक कालगणना शासकीय कामकाजासाठी स्वीकारली असून ती तिथीतल्या थोड्या फार अतरभेदाने 'सौर शक' म्हणून वापरात आहे अशी ही शक परपरा असून ही 'शकारी' परपरा भारतात पाच हजार वर्षांपूर्वीपासून चालू झाल्याने तिचे, इतर कालगणनेच्या तुलनेत, अधिक प्राचीनत्व सिद्ध होते। .

बायबलच्या प्रतिपादनाप्रमाणे जगाची सुरुवात सनपूर्व चार हजार वर्षां-पूर्वीपासून म्हणजेच सहा हजार वर्षांपूर्वी झाली, तर जैन परंपरेप्रमाणे जगाचा प्रारभकाल हजारो वर्षांमागे जातो भूगर्भशास्त्रज्ञानी व पुरातत्त्व सशोधकानी अशीच मागे झेप घेतली आहे।... जैन सिद्धातधर्माची डूब किती गहरी होती हे यावरून सिद्ध होते।

दिवाळी पाडव्यापासून म्हणजेच बलिप्रतिपदेपासून सुरू झालेले तसेच आश्विन वद्य अमावास्येच्या मध्यरात्री भगवान महावीराचे निर्वाण झाले त्यानतरपासून सुरू झालेले 'सवत्सर' सर्वच व्यवहारासाठी गुजरातने स्वीकारले हे विक्रम सत्वसर व त्याहूनही जुने असलेले वीर सवत्सर अशी दोन्ही सवत्सरे गुजरातच्या श्रद्धाशी बरीच निगडीत आहेत वीर सवताशी असे 'दिवसमासा'चे नाते सागणारे 'विक्रम सवत' या दृष्टिकोनातून सातत्याने व श्रद्धेने गुजरा-तेत वापरात आहे 'लक्ष्म्या दुर्विनिता' या शब्दांनी सस्कृत कवीनी लक्ष्मीला चवचाल ठरवून तिची निर्भर्त्सना केली असली तरी या लक्ष्मीच्या कृपेनेच सामान्यातल्या सामान्याचाही ससार सुखावह होतो या कृतज्ञतेच्या जाणिवेने दिवाळीत लक्ष्मीपूजन करून गुजराती तिचा विशेष बहुमान कर-तात। दिवाळी पाडव्याला सुरू होणारे 'सवत' ही गुजरातची अस्मिता

सा ..११

आहे, तर गुढीपाडव्याला सुरू होणारे शक सवंत्सर ही महाराष्ट्राची अस्मिता आहे विक्रमादित्य तसा गुजरातला जवळचा, तर शालिवाहन महाराष्ट्राला। स्वकीयांनी स्वस्थानावर सुरू केलेली स्वत'ची अशी स्वतंत्र प्रथा अशा अस्मितेला सातत्याने फुलवीत राहते म्हणूनच वर्षानुवर्षे दिवाळीला जवळ जवळ सर्वच गुजराती घरात लक्ष्मीपूजन होत राहते व चैत्र पाडव्याला महाराष्ट्रात घरोघरी गुढी उभारली जाते।

गुजराती वृत्तपत्रातील आणखी एका 'खास आकर्षणा'ने तुम्हा सर्वांना चकित करून टाकले गुजरात शासनाच्या 'गुजरात लक्ष्मी' 'लोटरी' ची जाहिरात हे 'अजवाळवु' आकर्षण होते दिवाळीच्या या झगमगत्या सोडतीत सर्वांचीच 'जाहोजलाली' व्हावी असे सर्वप्रथम तुमच्यापैकी जतिनभाई या सद्‌गृहस्थाना वाटले

हे गृहस्थ मोठे मनमिळाऊ पन्नाशी गाठत आलेले त्यामुळे डोक्यावरचे केस पांढरे होऊ लागलेले शेंडे पाढरे, बुडखे काळे स्वारी उंच नाही, बुटकी नाही, पातळ नाही, स्थूल नाही. असे मध्यम अगलटीचे चालताना, बोलताना मान जाणून बुजून की सवयीने सतत किंचित पुढे झुकलेली बोलत असोत वा नसोत तरीही सतत हसणारे...पँट, बुशशर्ट आणि बाटाचे बूट वापरणारे हातात सतत 'पराग'चा पानमसाल्याचा डबा वागवणारे. हा सुगंधी मसाला वारवार खाण्यानेच की काय त्याचे बोलणे ऐकणारांना सुगंधित वाटत असावे या सद्‌गृहस्थानीच कुठल्याशा 'छापु'तली 'गुजरात लक्ष्मी लोटरी' ची जाहिरात तुम्हा सर्वांच्या निदर्शनास आणून दिली महाराष्ट्र शासनाच्या लॉटरीत दिवाळीचा 'बंपर ड्रा' घवघवीत दहा लाखाचा असतो या 'गुजरात लक्ष्मी' ची 'चेतवणी' त्याही पुढची। ही चाळीस लाख रुपये कुणा तरी अनामिक भाग्यवानाला द्यायला तयार असते मग अशी व्यक्ती गुजरातेतील असायला पाहिजे असे थोडेच आहे ही 'परोणो' ला सुद्धा विजयमाला घालू शकते तेव्हा तुमच्या जथ्यापैकी कोणी तरी एक 'पाहुणा' असा भाग्यवान असू शकेल असा जतिनभाईंचा होरा। गृहस्थ मसाला पान खाऊन आधीच रगलेले असतात त्यात 'चाळीस लाखा' चा मसाला आणखी जिभेला लागला 'एकशे वीस बाबा' तबाखू आणि 'पराग पान मसाला' याच्या सभतीला चाळीस लाखाचा मसाला आल्याने रगत अधिकच वाढली आणि रंगलेल्या तोंडातून एक भरघोस योजना तुम्हा सर्वांच्या पुढे विचारार्थ माडली गेली

प्रवासी टोळीतल्या प्रत्येकाने शभर शभर रुपये द्यावयाचे तीस जणाचे एकूण तीन हजार रुपये जमा होतील श्री आशापुरी माताजीचे दर्शन घेऊन

मोठ्या आशेने, परमभक्तीने माताजीचा आशीर्वाद मागायचा आणि थेट भूज शहर गाठावयाचे । बारापूर्वी भूज गाठता येण्यासारखे आहे दुपारी दोन वाजेपर्यन्त भोजनाचा बंदोबस्त तेथे होईल जतिनभाईंनी एखाद दुसरा जोडीदार बरोबर घेऊन लॉटरीची तिकीटे खरेदी करायला जावे बाकीच्यांनी शरहरात फेरफटका मारून काही खरेदी-बिरेदी करावयाची असेल ती उरकावी । तीन हजार रुपयांची तीनशे तिकीटे येतील । यांपैकी एखादे तरी तिकीट सहजच फळेल । चारच दिवसांत निकाल लागणार असल्याने लवकरात लवकर 'फेट' ठरेल । जामनगर, जुनागड इकड जायचच आहे तिथच 'छापु' त 'रिझल्ट' वाचायला मिळेल । चाळीस लाखाची लॉटरी लागेल । अर्थात ही 'प्रॉपर्टी' कुणा एकाची नसून सर्वांची, सामुदायिक मालकीची । चाळीस लाखातून टॅक्स वगैरे वजा जाता पधरा-वीस लाख सहज हाती येतील । असे नशीब उघडले तर येणाऱ्या पैशातून सर्वांनी अमेरिकेची 'टूर' करावयाची । आता 'कपनी'त आहेत तेवढेच लोक तेवढीच 'कपनी' । तीस जणच । कमी नाही किंवा जास्तही नाही ।

येणारे धन सर्वांच्या मालकीचे । गांधीजींच्या गुजरात भूमीतच त्यांना 'ट्रस्टीशिप' ची कल्पना स्फुरावी हे नवलच नव्हे का । येईल तो पैसा सर्वांच्या मालकीचा । उपभोग सर्वांनी घ्यायचा ! या पैशाचे विश्वस्त जतिनभाई समाजवादापेक्षा विश्वस्ताची ही कल्पना यावेळी तरी आकर्षक वाटते

पधरा-वीस लाख म्हणजे काही एवढी तेवढी मामुली रक्कम नाही तीस जणाना महिनाभर भटकून अमेरिका पाहता येईल अमेरिकाच काय घेऊन बसलात युरोपातही चक्कर मारता येईल आता होत आहे अशी ती सटर फटर आनद यात्रा असणार नाही। अख्या जगाचाही प्रवास घडू शकेल। 'स्टेटस.. कॉंटिनट द होल वर्ल्ड । ' 'मार्व्हलस ।

श्री आशापुरी 'माता नो मड' येथे ही कल्पना स्फुरावी यामागे काही विशेष प्रेरणाही असू शकेल का ? भराभर पैशाची पाकिट उचकटली 'ट्रस्टी' नव्हे, 'हीरो' भोवती गराडा पडला । 'शंभर रुपयात अमेरिका 'शभर रुपयात जागतिक सैर म्हणजे 'जोक'च नव्हे का ।

श्री आशापुरी माताजीच दर्शन आता सर्वांनाच मोलाच वाटू लागल । जेसल आणि तोरल याच्या प्रणयगाथेतील जाडेजा कुलपुरुष जेसल याच्या पराक्रमी जाडेजा घराण्याच्या आशा आकांक्षा पुरविणारी ही श्री आशापुरी राजमाता नावाप्रमाणे आशापुरी ठरावी अस सर्वांना मनोमन वाटत । आणि मदिराच्या वाटेवरच सर्वांनी 'एक दिला'ने मातेचा जयजयकार

केला आशा पूर्तीसाठी ! अपेक्षा पूर्तीसाठी ! इच्छा पूर्तीसाठी ! ...

'हे मनोराज्य ?' 'शेख महमदासारखे ? .छे ! शेख महमदाचं स्वप्न 'हाराभर बर्तन' आणि 'बेगम' पुरत मर्यादित होत !, 'शेख महमदाच्या काळात लॉटरी नव्हती, 'गुजरात लक्ष्मी' सारखी नव्हती आणि महाराष्ट्र लॉटरी सारखीही नव्हती!'... 'स्वप्न किंवा मनोराज्य कस ग्रेट असाव ! अमेरिकेच्या स्वप्नासारख ग्रेट !...' 'नॉट फेल्युअर बट लो एम इज क्राइम !'...' आणि माताजीच्या मनात असेल तर 'फेल्युअर'-चं नावच नको !' 'डॅम इट !' एका प्रक्रियेत अशा अनेक प्रतिक्रिया! आशा पुरी मातेच्या प्रेरणेने ही चाळीस लाखाची आशा पालवली म्हणून लालाजींची तबीयत जास्तच खूष ! तेरा गावाजवळ त्यानी केलेला त्यागा शिळापाका होऊन इतिहास जमा झाला होता ! आता चाळीस लाखाचा नवा इतिहास घडण्याची आशा होती ! ...आशापुरीच्या आशीर्वादाने ... म्हणून ही खुशी !

श्री आशापुरी माताजी! ...महाकाली मातेचच एक स्वरूप. गौरी सहस्र नामातलच एक नाव एकावन्न शक्तिपीठातल हे एक शक्तिपीठ! अर्थात अशा शक्तिशाली मातेच मदिर तसच भव्य आहे! उच शिखर, डेरेदार घुमट आठ महिरपी कमानींचा विशाल मडप गाभाऱ्याच प्रवेशद्वारही तसच विशाल चादीच्या नक्षीदार खाबामधल चादीच प्रवेशद्वार आतील मखरही चादीच असा हा चदेरी दरबार या रुपेरी दरबारात राजशाही झोकात विराजमान आहे श्री आशापुरी माता

तिच्या स्वरूपाबद्दल तुम्ही ज्या कल्पना केलेल्या असतात त्या अवास्तव ठरतात मूर्ती पारपारिक अर्थात 'स्वयभू' असावी याची जाण येते. मदिराच्या पिछाडीचा पहाड या समजुतीला पुष्टीच देतो तशी ही मूर्ती अगदीच काही आदिम स्वरूपातली नाही देवीचं आदिम स्वरूप म्हणे योनि-रूप होत !

अती प्राचीनकाली मानवान आदिदेवतेचं हे अस उघड नागड रूप कस कल्पिल असाव ?. .माणूस स्वत चा ज्या रूपात अवतरला व स्वत च जेव्हा नग्नावस्थेत फिरला वावरला तेव्हा त्याच्या आराध्य देवता त्याच्या-सारख्याच उघडया नागडया होत्या निसर्गात सापडणाऱ्या शिळेत व कातळात असे रूप आढळले की मानव भावुकतेने त्यात दिव्यत्व पाहात होता पाठीवर बिऱ्हाड घेऊन पोटापाण्यासाठी गावोगावी भटकती करणाऱ्या डवरी गोसावी, वडारी, कैकाडी या जातीजमाती आज इथे तर उद्या तिथे

अशा रीतीने वणवण फिरत राहतात आजही ' बिचवा'च्या पाठीवर अशी कितीतरी भटकी बिऱ्हाड आहेत, जी कुठल्या ना कुठल्यातरी माळावर उतरतात, रानाच्या असऱ्याला येतात किंवा झाडाच्या आडोशाला थांबतात. तिथलाच एखादा दगडधोंडा उचलून व त्याच्या अवतीभवती रंगीबेरंगी पताकांच्या काठ्या उभारून त्याला देवपण देतात अशा दगडधोंड्याना शेंदूर अथवा मांजा फासून या भाव देवाला मनोमन मढवतात आणि त्याच्या भरवशावर खडतर जीवन कठतात माणूस प्राथमिक अवस्थेत हेच करीत होता दगडात दिव्यत्व शोधून त्याला देवपण देत होता अस कुठ दिवट रूप दिसल की ते भावुकतेन उचलून छातीशी कवटाळीत होता मायेने आणि श्रद्धेने हळुवार हात फिरवून त्याला भावेल ते रूप देत होता अशावेळी सभ्यासभ्यतेचा वेगळी विचारही त्याच्या मनास शिवत नव्हता मानवाला भावलेली आणि श्रद्धेने हाकारलेली आदिमाता ही अशी विवस्त्र होती ! . आदिम रूपात ! .

पुढे कालगतीबरोबर प्रगती आली प्रगतीने मानवाला छन्नी दिली छन्नीच्या सहाय्याला हातोडाही आला छन्नी हातोड्यानी माणसाच्या करवीच अनघडतेला बडवून घडवून आणखी उघडे नागडे केले प्रगतीच्या पाठोपाठ असलेल्या संस्कृतीच्या उबदार कोषात गुरफटून घेतलेल्या माणसाला स्वत च्याच या उघड्या नागड्या कोरणीची आणि करणीची लाज वाटू लागली माणसा पाठोपाठच ही नग्नताही कोषात शिरली ही नग्नता वस्त्र ल्याली ! नव्हे सभ्यतेने नग्नतेला झूल घातली ! तरीही माणसाच्या मनात रुतून ठाण मांडून बसलेली नग्नता वस्त्रे लेऊनही वस्त्रहीनच राहिली, नागडीच राहिली ! याच हुरहुरीने माणूस देवतावर साज चढवू लागला. स्वत'चे खुजेपण लपवण्यासाठी शिखरांची उंची वाढवू लागला, स्वत'च संकुचित्व छपवण्यासाठी घुमटे विस्तारू लागला, स्वत ची दळभद्रिता झाकण्यासाठी देवताची दळे उभारू लागला, स्वत'चा दाम वाढवण्यासाठी देवताचा डौल वाढवू लागला !

श्री आशापुरी माताजीच्या दरबाराचा डौल चंदेरी आहे पण माताजीच रूप पुरातन आहे आदिम रूपासारखं नग्न नाही आणि नाविन्यान संपन्नही नाही स्वयंभू रूपाची परंपरा सांगणार हे रूप मनोरम आहे, विपन्नतेचा आणि विषण्णतेचा विसर पाडणार आहे ! दिव्यतेचा साक्षात्कार आणि प्रभावाचा चमत्कार घडवणाऱ्या आशापुरी मातेची मूर्ती लहानसहान नसून चांगली उंचीपुरी आहे श्री शंकराच्या सन्मुख जसा नंदी असतो तसा या देवीच्या समोर सिंह आहे. .माताजींची बैठक एखाद्या महाराणीला शोभेलशी

आणि प्रौढेला साजेलशी आहे उजवा पाय मुडपून उभा धरलेला तर डावा दुमडून मांडी घातलेला ही माता बहुभूजा नाही अथवा शस्त्रभुजाही नाही हिच्या दोन हाताचे अस्तित्व जाणवते ते तिच्या निशस्त्र अभय करामुळे देवताच्या शस्त्रधारी हाताच्या जोडीला वरदहस्त असावा, यात अभयाची शाश्वती कितपत असा सदेश दर्शनार्थीला पडावा। बुद्ध अथवा तीर्थंकर याच्या प्रतिमा निश्चित अभयदान देत असल्याने खुशाल निश्चित असावे असे उपासकाला वाटावे। आदिमातेचे हे शक्तिपीठ असूनही येथे भक्ताला सुरक्षितता वाटते ते आशापुरी माताजीच्या निरागस रूपामुळे व परिपूर्तीच्या नामवैशिष्टचामुळे। मनी धरलेली आस परिपूर्ण होईल याचाच जणू या सोज्वळ दर्शनातून भरवसा वाटत असावा।. कच्छच्या जाडेजा राजपूत राजघराण्यात यासाठीच श्रद्धेन कुलदेवतेवर सपूर्ण विश्वास ठेवला असावा।

पूर्वापार रूढीप्रमाण मातेला कुणीही काहीही मागाव ती देते या समजुतीन येथे येणाऱ्या सगळ्यानीच तिला मागतच राहाव देणारी एक, मागणारे मात्र अनेक कुणी काय मागाव, किती मागाव याला बधन नाही, मर्यादा नाही। कुणी मागावी सतती तर कुणी मागावी सपत्ती सातसात, आठआठ कधीकधी याहून जास्त मुलींचा भरणा असूनही एक 'मुलगा' हवाच असतो व त्यासाठी देवीची खणानारळाने ओटी भरली जाते, ओटीपोटी 'वशाचा दिवा' यावा म्हणून। कुलदीपकासाठी देवीपुढे मणमण तेल जाळले जाते। कुणाला मुलगे असतात, पण मुलगी नसते अशाना एखादी दिवटी हवी असते, हौसमौज म्हणून गौराई यावी वाटते' म्हणून या मागण्या। कुणाला गडगज सपत्ती हवी असते सुबत्तेन घर भरलेल असूनही आणखी सपन्नता हवी असते माता देते ही श्रद्धा, आशा पुरी करते ही निष्ठा गजींनी परस आणि कणगींनी ओसरी भरली असूनही देवीच्या प्रागणाचे उबरठे झिजवले जातात येणाऱ्या लक्ष्मीसाठी नवीन घर बांधायची तयारी असते। .कुणाकुणाला 'चाळीस लाख' हवे असतात। आनद यात्रेसाठी। जग प्रवासासाठी।

महाकालीला बळी लागतो म्हणतात। जुन्या जमान्यात नरबळी घेणारीला, आता नव्या जमान्यात पशूबळी चालतो.. सर्वच बाबीत प्रत खालावत चालली आहे हे देवीलाही ठाऊक असावे। दुधाची तहान ताकावर भागवावी लागते यात प्रासगिक शहाणपण असते हेही तिला समजत असावे। पण माता हे मागत नाही मुळी माणसच आग्रहपूर्वक, अगत्यशीलतेने, आवर्जून देत असतात। स्वत'च्या घरात एका जीवाच आगमन व्हाव यासाठी देवीच्या

दारात अनेक जीव चराचर कापले जातात स्वत:च जीवन फुलाव म्हणून दुसऱ्याच्या जिवाची इथे होळी होते! आशा पुरीला असे 'देकार' आजच्या काळात दिले जातात का याची तुम्ही अनाहूतपणे पण आस्थेने चौकशी करता नकारात्मक उत्तर मिळते मास आणि मद्य यापासून सर्वसामान्यत चार हात दूर राहणाऱ्या गुजराती प्रवृत्तीचा हा परिणाम असावा! यावर क्षणभर विश्वास बसत नसतो म्हणून पुन्हा उत्सुकतेने व आग्रहाने विचारणा होते त्यावर तेथील पुजारी छातीठोकपणे सांगतो, 'साची वात!' महाराष्ट्रातही देवीपुढे 'देकार' द्यायची प्रथा आजकाल बऱ्याच ठिकाणी बद झालेली आहे सुसस्कृतपणाच्या प्रदर्शनासाठी असे घडले असावे तसे नसते तर भोजनासाठी सर्रास आणि सर्वत्र होणारे हत्याकाड तसेच थाबले असते.

'या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण सस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम:॥' सप्तशतीतल्या या स्तोत्रातला आशय जाणवल्याने की 'बळी'-तील अमानुषतेचा साक्षात्कार झाल्याने अनेक ठिकाणी पशुहत्या थाबली असावी तरीही 'धर्मविधी' यथासाग पार पडत नसावा या दाहक बोचणीने की काय 'देकारा'चा विचार अद्यापही अनेक धर्मांधाच्या मनात घर करून राहिला आहे व या अस्वस्थतेनेच की काय आजकाल पशूची प्रतिकृती तयार करून 'पिष्ट पशू' बळी दिले जातात! हा अविचारी आचारधर्म प्रत्यक्ष पशुहत्या करण्याइतकाच घृणास्पद व अमानुष मानावा लागेल!

तुम्ही सुखावून माताजीच्या प्रफुल्ल मुखाकडे पाहता माताजीची जीभच तुम्हाला दिसत नसते, त्यामुळे तिच्या जिभेला रक्त लागण्याचा सभवच नसतो याची सुखद जाणीव होते! पुजाऱ्याची 'साचीवात' ऐकून, का न कळे, तुमची छाती फुगते! 'हे राम' म्हणून जगाचा 'रामराम' घेतलेल्या गाधीजींच्या गुजरातमध्ये थोडा का होईना 'राम' आहे व राष्ट्रपित्याची आठवण इतर राज्यांपेक्षा या राज्याने थोडीफार अधिक जोपासली आहे याचे समाधान वाटते महात्म्याच्या विविधागी विचारसरणीचे अकुर येथील भूदेवी अगोपागांनी फुलवीत राहील व कालांतराने का होईना सर्जनशील सृष्टी सुजलाम् सुफलाम् होईल या अपेक्षेने आशापुरी माताजीचे हे दर्शन तुम्हास आशादायी वाटते!

एकदरीत आशापुरी माताजीची पूजाअर्चा गोडधोड नैवेद्यांनी आणि फळाफुलांनी होत असावी यात भावफुलाचाही अतर्भाव असावा कुणाची फुल वसतऋतूतली असतील तर कुणाची ग्रीष्मातली, कुणाची वर्षाकालातली तर कुणाची हेमतातली, कुणाची शरदभानातली तर कुणाची शिशिरातली!

भूजच उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेऊन मधुमीलन आशापुरीहून निघते आणि हरिणीसारखी धावू लागते निसर्ग थोडा खूष असतो त्यामुळ मधुमीलन व तिच्या छत्राखालील माणसही खूष असतात रस्त्यावर लागणाऱ्या गावाच्या सगतीत निसर्ग चांगलाच रगलेला दिसतो सगतीत रगणे हा प्रकृतीचा धर्मच असतो ! काही काही जागी गव्हाचे वाफेच वाफे दृष्टीस पडतात एकाजवळ दुसरा याप्रमाणे एकाला एक खेटून बसलेले हिरवे हिरवे वाफे जणू हिरवे गालिचे किंवा हिरवे जाजम एकाला एक चिकटून अथरलेले असतात मध्येच एखादे तुरीच्या अथवा मोहरीच्या पिवळ्या तुऱ्याचे शेत एखाद्या हिरव्या गालिचावर मध्ये कुठेतरी पिवळ्या फुलांचा कशिदा काढल्याचा भास होतो एखाद्या पिवळ्या चौथऱ्याभोवती मोठाल्या आयताकृती, हिरव्या चौकोनी अथवा औरसचौरस लाद्या अथरल्याचाही भास होतो मनं जास्तच मोहरतात एका खिशात तीन हजार रुपये आलेले असतात, पण ह्या खिशाला चाळीस लाखाची ऊब जाणवते हा उबदार 'वाफारा' सर्वांना भावतो !

कालिया. त्याचा चाळीस लाखाची अर्थी अर्थी सबध नसतो हा तर महेंद्रभाईचा नोकर. तुम्हास वाढप करणारा पण चाळीस लाखाचा नजराणा पुढ वाढून ठेवला आहे असा त्यालाही भास होतो अत्तराची कुपी एकाजवळ असली तरी जवळपासच्या तिऱ्हाईताला तिच्यातला सुगध लाभतो ! मधुमीलनचा ड्रायव्हर नानजी यान या वेळपर्यंत 'हम बने तुम बने एक दूजे के लिए' ही 'रगिली कॅसेट' लावलेली असते. गाण्याचा सूर कालियाच्या रोमरोमात भिनतो म्हणूनच की काय त्याचा नूर पालटतो व तो गाडीच्या 'पॅसेज'मध्ये नाचायला लागतो ! 'डिस्को डान्स'.

अरे वा ! .डिस्को डान्स ! .अमेरिकेच्या टूरमध्ये हा असा हगामा व्हायलाच हवा ! ..त्याखेरीज मज्जा यायची नाही. .नाचायलाच हवे . त्यात लज्जा कशाला ..अशा विचारान गाण्याच्या सुराबरोबर पायाचे ठोके पडतात, ही पूर्व तयारीच ! कारण तेवढ्यातच तुमच्यापैकी एकजण सीटवरून उठून पॅसेजमध्ये सरसावतात ..भद्रेशभाईच ! . .गृहस्थ थोडे स्थूल असूनही त्यांना गाण्याच्या तालावर नाचावेसे वाटते कालियाला एक साथीदार मिळतो कोणतीही लागण एकदा सुरू झाली की ती फैलावू लागते ! आता कोणी एक उठतात पण ते एकटे स्वतत्रपणे नाचायला राजी नसावेत कुणीतरी साथीला हव असं त्याना वाटत असाव त्याची कुणी एक जीवनसाथी मोठी लाजरी लग्नाच्या वेळी नवऱ्या पाठोपाठ फेऱ्या घालणारी ही शर्मिली आता मात्र नवऱ्यासमवेत घुमायला सकोचते ! घुम सोंग घेऊन

अटून बसते ! दुसऱ्या कोणा एकाच्या डोक्यात एक कल्पना चमकते स्वारी आईलाच उठवते आईसाहेबानाही काय घडत आहे याची जाणही नसते मुलगा आईलाच घेऊन नाचू लागतो मग मधुमीलनमधले 'हाडा हात' म्हणजे 'साडा सात' बुजुर्ग वगळता प्रमिलाबेन शहा, पौर्णिमाबेन शहा, प्रवीणाबेन शहा "आ बध्धा परोणा बेहेनो' प्रेरणा मिळाल्याने या मौज-मजेत रस घेऊ लागतात सगीत कोणतेही असले तरी त्याची झिंग प्रभावी असते ! हे सगळेच स्वयस्फूर्तीने उठलेले असतात.. आपापले जोडीदार हेरून !...

आणि हा लब्बाड कोण ?...चारच वर्षांचा चिमुरडा चिराग ! . तोही कसा डुलू लागतो ! 'डिस्को डान्सर'देखील त्याच्यापुढे थिजून जायला हवी !

चाळीस लाखांचा कैफ असा चढलेला असतो ! कळत न कळत !... त्यात गीताचा कैफ मिसळतो !. . 'मेरे जीवन साथी प्यार किये जा. ', 'तेरे मेरे बीच मे कैसा है वे बधन अनजाना...', 'अपनी तो जैसे तैसे, थोडी ऐसे या वैसे कर जायगी, आप क्या होगा जनाबे अली. ', 'मेरे अगने मे तुम्हारा क्या काम है ' ही गाजलेली सिनेगीते एका पाठोपाठ एक याप्रमाणे वाजतात आणि हौशी मंडळी 'जोकर' बनून 'धूममचल' उडवितात ! तारतम्याची जाण असणारी माणसही अशावेळी थोडा वेळ चक्रावून भुलून जातात ! हा 'डिस्को'चाच प्रभाव असावा ! 'रुमझुम रुमझुम रमती मारी पतली कमर लचकाती' अस काहीस गात 'टुनटुन' नाचायला लागली, तर तीही 'सुदर' दिसावी ! अशा वेळी तिन 'मोबामा जमणु हाथनी आंगळी' घातली तर 'सरस अने सारू !'

काही काही गोष्टींची, नव्हे बऱ्याच गोष्टींची, नशा लवकर चढता चढत नाही, पण एकदा का ती 'चढली' तर मग लवकर उतरत नाही !. . 'रसिक'मडळी सगळ्याच गोष्टीत रस घेतात, आनद यात्रेत घेतातच, पण इतर सगळ्या यात्रांत मग ती कुणा एखाद्याची वरात असेल तर सराईतपणे खोलवर डूब घेतात ! मात्र भर रस्त्यावर बँडच्या ताफ्यात सुरांच्या ताला-वर 'डिस्को डान्स'चा धांगडा फार्स रसीला वाटण्याऐवजी घाणेरा व छछोरा वाटतो ! निर्भेळ 'ही आनदाची एक जात असली तरी निर्भेळ आनद हा प्रसगसापेक्ष, स्थलसापेक्ष तसाच व्यक्तिसापेक्षही असतो !. . 'दुनिया जले तो जले हम मस्तीमे गाये' ही मस्तवाल भूमिका अशा आन-दाला मान्य नसते अशा निर्भिडतेला तशा 'वेगडी भेसळी'चे वावडे असते !

रस्त्यावरच्या छोट्याशा खापर गावातला लहानशा टेकडीवरचा

नमाजगा ' तुमचे लक्ष वेधून घेतो 'मोटी खाखर', 'नानी खाखर' या गावांची नावे ऐकलेली असतात आता 'खापर' नाव ऐकायला मिळत 'गोपाळकाल्या'ची 'खपरी हंडी' फुटल्यासारखं वाटतं !.. गावातल्या कुठल्याशा भिंतीवर 'येवला विडी'ची जाहिरात झळकत असलेली दिसते तुमचे सघपती अशोकभाई शहा हे मूळचे येवल्याचे रहिवाशी त्याच या जाहिरातीकड लक्ष गेल की नाही हे कळायला मार्ग नाही त्यांना धूम्रपानाच व्यसन नसल्यान अर्थातच बावड ! पण 'धूम्रपान करणे प्रकृतीस हानी-कारक आहे' या 'स्टॅच्युटरी वॉर्निंग'च अनेकदा वाचन होऊनही, महा-राष्ट्रातल्या नाशिक जिल्ह्यातील येवला या त्याच्या जन्मगावच्या विडीचा धूर कच्छमधील खापरसारख्या सादीकोपऱ्यातल्या अनेक गावोगावी निघतो याचे त्यांना आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नसते ! आपल्या मातीतल्या वाईट गोष्टीही, माणूस त्या गोष्टीपासून दूर राहूनही, आपल्या म्हणून न कळत मानीत असतो ! हा केवळ मातीचाच गुण नसून माणसाचे मातीशी असणारे नातेच मुळी अतूट असते ! येवल्याची विडीच तेवढी महशूर नाही तर येवल्याची 'पैठणी साडी' तर जास्तच महशूर आहे ! 'येवला विडी'ची जाहिरात अशोकभाईंनी पाहिली असती तर त्यांना येवल्याच्या 'पैठणी साडी'चीही जरूर आठवण झाली असती ! येवल्याची ही पैठणी साडी आता बनारसी शालूची बरोबरी करू लागली आहे या विचाराने त्यांना अभिमान वाटला असता ! नाथाच्या पैठणचे कूळ आणि मूळ सांगणारी ही पैठणी साडी एकेकाळी येवलेकराना 'बोटभर विणावे आणि पोटभर खावे' इतकी वरदायिनी ठरली होती !

आजचा महाराष्ट्र म्हणजे पूर्वीचे राष्ट्रकूट राज्य ! ..कूट म्हणजे शिखर अथवा समूह या अर्थाने राष्ट्रकूट म्हणजे शिखर राष्ट्र किंवा राष्ट्रसमूह, म्हणून महाराष्ट्र ! .या राष्ट्रकूटच्या राजनगरीचा बहुमान ज्याना लाभला त्या वातापी, कंधार, देवगिरी, प्रतिष्ठान या नगरीपैकी प्रतिष्ठान ही एक राष्ट्रकूट साम्राज्यातील प्रतिष्ठित नगरी ! बावीसशे वर्षांपूर्वीचा इतिहास असलेली ही सातवाहन, वाकाटक, यादव आदी मरहट्टापैकी सातवाहनाची राजनगरी प्रतिष्ठान आजच्या पडत्या काळातही पैठणी साडी लेऊन पैठण नावाने वावरत आहे व स्पर्धेच्या काळातही 'बोटभर विणावे आणि पोटभर खावे' असे येवल्यासारख्या लहानधाकल्या नगरीला वडीलकीच्या नात्याने अद्यापी सांगत आहे ! देवगिरीचे नामांतर दौलताबाद आणि प्रतिष्ठानचे पैठण असे झाले असले तरी !...या साडीची कलाकुसर आणि किमया काय होती हे या उक्तीवरूनच उमजावे...आणि त्या जुन्या वैभवाची नुसती

आठवण होऊनही येवलेकरानी मोहरून जावे !

नरवत्राणा गावचा गुजरात शासनाचा एस टी बस डेपो पाहून हे गाव बऱ्यापैकी असावे असा कुणाचाही प्रथमदर्शनी समज व्हावा या भागातील शासकीय त्याचप्रमाणे खाजगी इमारतीना बहुतकरून पाढरा रग फासलेला असतो कच्छवरील व शेजारपाजारच्या मुस्लिम राजवटीचा हा परिपाक असावा बहुसख्य इमारती पांढऱ्या रगाच्या असल्या तरी काही इमारती पिवळ्या, नाहीतर फिक्या निळ्या रगाच्या आढळतात भडक रगाच्या बाधणी साड्यांचा वापर करणाऱ्या कच्छची वास्तूरगाची फिकी आवड प्रकर्षाने लक्ष वेधते काठेवाडी पांढऱ्या पोषाखाचा वापर करणाऱ्या पुरुष-वर्गाचा या आवडीनिवडीवर असर झालेला दिसतो

इकडील गावाजवळची 'एस् टी पिकअप शेडस्', माडवीजवळील जैनाश्रम येथील जबोजेट आकाराच्या पिक अप शेडचा अपवाद वगळल्यास, महाराष्ट्रातील एस् टी पिक अप शेडसूच्या तुलनेत डावी आहेत पुढ एका अशाच छोट्या पिक अप शेडवरच 'मोटा यक्ष' हे नाव वाचून ही 'यक्ष नगरी' इकडे कुठे अवतरली असा क्षणभर सभ्रम निर्माण होतो मेघाबरोबर प्राणप्रिय प्रेयसीला सदेश धाडणाऱ्या विरही यक्षाच्या वारसापैंकी 'मोठी पाती' इथली तर नसावी ? की उज्जयिनीचा कविकुलगुरू कालिदास कधी काळी फिरत फिरत या गावी आला असताना 'मोटा यक्ष' येथे त्याला मेघदूतातल्या यक्षाची योजकता सुचली असावी ?

वर्षाऋतूपूर्वी प्रियकर सुखरूप घरी परतावा असे प्रत्येक प्रियेला वाटत असते आणि प्रियकराच्या वाटेकडे ती डोळे लावून बसते अशा प्रिय सखीची स्मृती कुणाही विरही पुरुषाला साहजिकच विदग्ध करून टाकीत असते ! यक्ष याला अपवाद कसा असू शकेल ? देवयोनीचे तसेच पिशाच योनीचे गोत्र सागणारा हा विरही यक्ष नदनवनातला असू शकतो तसाच रणातलाही ! रणात तर हा उमाळा प्रकर्षाने दाटत असावा ! मेघा-च्छादित नभासारखा ! मेघाच्छादित नभाखाली तर अशा उमाळ्याला अधिक कढ येत असावा ! कविकुलगुरू कालिदासाने हा असा विरहाग्नीचा उद्रेक इथे या परिसरात अनुभवला तर नसावा ना ? विरही कविमनाला वन आणि रण दोन्हीही दाहकच ! .

मधुमीलन बरोबर अशा गोड गोड कल्पना धावत असतात ! हाही एक प्रकारचा कैफच की ! याच वेळी कॅसेटवर नेमके 'मेघा रे मेघा रे, मत परदेश जा रे आज तू प्रेम का सदेश बरसा रे !' हे गीत लागावे हा योगायोगच की ! . आजचा यक्ष 'मत परदेश जा' असे मेघाला सांगून

येथे ' बरसात ' करायला सांगतो हाही कैफ काही आगळाच की !

भूजच्या अलीकडे चार-पाच किलोमीटर अंतरावर ' सुखपर ' नावाचं गाव लागतं. गव्हाची हिरवीगार शेती. अधूनमधून तुरीची आणि मोहरीची पिवळ्या शेंड्यांची रानं. बांधाबांधावर नारळीची, नाहीतर चिंचेची अथवा आंब्याची झाडं. या गावाचं नाव या भागातील सुखासमाधानाची व कृषी-संपन्नतेची पावती देत असावं! सागरात गोड्या पाण्याची जशी वानवा तशीच रणात उपवनाची! तरीही सागरात कुठं कुठं एकाकी बेट असावं, तसंच रणातदेखील असं कुठं कुठं ' हिरवं बेट ' असावं याचीच कुणालाही मौज वाटावी! मात्र ही मौज बघायला अनेक डोळे हवेत, अंतश्चक्षूसुद्धा! इकडच्या ' फिरंगी ' ' काटेरी ' तशाच बिनकाट्याच्या ' गोडवी ' बाभळी पाहून थकलेल्या डोळ्यांना हे दर्शन आल्हाददायक वाटावे! शेत-कऱ्याच्या कुटुंबात जन्म घेतलेल्या बार्डोलीच्या सरदाराला केवळ आनंदच्या दुग्ध व्यवसायाने आणि तेथील सरदार वल्लभभाई पटेल विश्वविद्यालय या विद्यापीठाने अजरामर केले नाही, तर बडोद्याजवळच्या ' फर्टिलायझर नगर' मधील ' गुजरात स्टेट फर्टिलायझर्स कंपनी लिमिटेड ' या कृषी उद्योगानेही ' सरदार ' नावाच्या बहुपिकी खतांचे आणि रसायनांचे उत्पादन करून अक्षय केले आहे! जागोजागी प्रसिद्धी मिळालेल्या या उत्पादनाचे येथील ' हिरव्या बेटा 'ला वरदान असावे! ' लीली खेती फुलवू फालवू होय! '

अशात दृष्टी क्षणभर उंचवावी आभाळाकडे! क्षणात सभोवतालच्या क्षितिजाकडे! मग वाटावं, आकाशाचा ताव धरणी घेते! आकाशीचे आसू धरती पिते! धरणी आग आग होऊन तडफडू लागली की आकाश प्रेमाने वर्षाव करू लागते! आभाळानं दिलेलं सारं धरणीनं कणाकणात सामावून घ्यावं आणि मिळालेलं सर्व केवळ जतन करून ठेवावं, एवढंच नव्हे तर मायेनं तिनं सहस्र पटीनं वाढवावं! रंग रंगांत! सहस्र रंगांत! म्हणूनच की काय, एवढं उंच उंच आभाळ, पण जिकडं बघावं तिकडं ते दश दिशांना झुकलेलं आणि धरतीच्या चरणावर लोटांगण घालीत असलेलं! नव्हे नव्हे! धरतीच्या गळ्यात कृतज्ञतेनं पडत असलेलं! एकमेकांशी उतराई होऊन एकमेकांशी समर्पित होण्याचं हे दर्शन तर जास्तच आनंद-दायी वाटतं! येथील हिरवी धरती तर यक्षाची प्रिया नसावी ना? म्हणूनच की काय यक्ष मेघाला ' मत परदेश जा ' असे विनवून येथे ' प्रेम का संदेश बरसा रे ' असे कळवळून सांगत असावा!

# तेरा

एकेकाळी कच्छवर अधिसत्ता गाजवणाऱ्या जाडेजा घराण्याचं राजतख्त ज्या नगरीत होतं ते भूज जवळ जवळ येत असत तरीसुद्धा मधुमीलनमधल्या सिनेसंगीताच्या ' डब्या ' घुमत राहतात आणि त्याबरोबर हाडामासांचे काही पुतळेही डुलत असतात ' बोअर ' व्हायला लागल्यावर हा असला ' हंगामा' थोडा वेळ व्हायला काहींची हरकत नसते । असल नाचण तुमच्यापैकी कुणा एकदोघाना आवडल नसाव । जातीच्या सुंदरा जसे काहीही शोभते त्याप्रमाणे बालकानी केलेले चाळे बालकांनाच शोभून दिसतात पण हेच थोरांनी केले तर ते थेर समजले जातात । असल नाचण भारतीय परपरेला शोभणारं नसत असा त्याचा साहजिकच ग्रह झालेला असावा । कथ्थक, भरत नाटयम्, मणिपुरी अशा आखीवरेखीव परपरागत नृत्याशी हे नाचणं प्रामाणिक नाही, उलट भारतीय परपरेवर हे सरळसरळ विदेशी आक्रमण असून अशा अतिक्रमणाने रसहानी होते, या समजुतीपोटी त्याचा रोष असावा कोणतीही कला स्वयंसिद्ध व स्वयपूर्ण असू शकत नाही त्याचप्रमाणे ती पारंपरिक अवस्थेतही जशीच्या तशी राहू शकत नाही ती कळत वा न कळत सातत्याने उत्क्रांत होत असते मनुष्य प्राण्याची उत्पत्तीच जिथे उत्क्रांत अवस्थांतून झालेली आहे तिथे त्याने निर्मिलेली कला या उत्क्रांतीपासून अलिप्त कशी राहू शकेल ? यामुळेच तिच्या मूळ अथवा साचेबद्ध स्वरूपाबद्दल दुराग्रह धरणे प्रतिगामी ठरेल ' सुस्ती ' सराबी म्हणून तुमच्यापैकी काहींनी असा ' हंगामा सुरू केला । हरकत नाही । ' दुनिया जले तो जले, हम मस्तीमे गाये । . ' खुशाल गा । फक्त ही ' मस्ती ' ' सस्ती ' होऊ देऊ नका । . अगदीच ' चीप ' होऊ नका । मग कोण कपाळाला आठी घालेल । . . हितकर व सुखकर स्थित्यतर पुरोगामी प्रवृत्तीने स्वीकारले पाहिजे । कारण परपरेच्या मार्गक्रमणात अतिक्रमण गृहित व ग्राह्यही असते ।

मात्र अशा आक्रमणाने विकृती आदण करू नये, उलट सस्कृती सपन्न व्हावी अशी अपेक्षा अवश्य असावी ' परिवर्तनाचे हे सक्रमण खच्चीकरण न ठरता संस्करणच ठरावे ।

परपरा ही प्रवाहित असावी । परपरा जेव्हा सनातनत्वाच्या घळीत अडकते तेव्हा ती रुष्ट आणि प्रसगी दुष्टही होऊन रूढी ठरते अशा अडलेल्या रूढीमुळे डोह निर्माण होतो व असा सचय दूषित होतो यासाठी हा असा सचित डोहही पुनश्च प्रवाहित व्हावयास हवा कोणतीही परपरा अखड प्रवाहित असावयास हवी । परंपरेचा अर्थच अविच्छिन्न अनुक्रम असा आहे इत्यर्थ, परपरा सदा प्रवाही हवी ! परंपरेचे हे अविच्छिन्न क्रमण एकदा मान्य केले की असे अनेक मार्गस्थ प्रवाह एकमेकास येऊन मिळतात हेही मान्य करावयास हवे असे हे मीलन नैसर्गिक असल्याने अपरिहार्य ठरते म्हणूनच अशा सगमाचे स्वागत करावयास हवे मात्र अशा सयोगांतून प्रदूषण होऊ नये एवढीच दक्षता घ्यावयाची असते ही दक्षता घेण्याच काम सस्कृती करीत राहते ही दक्षता जेव्हा नाकारली अथवा दुर्लक्षली जाते तेव्हा विकृती जन्माला येते । ' सगम हे तीर्थस्थान ' मानणारी भारतीय सस्कृती अशा असख्य संगमाचे महातीर्थ आहे । सस्कृतीने उफाळत्या पाणलोटाला बाध घालण्याचे काम केले पाहिजे तसेच विशेष प्रसगी धरणाच्या झडपा उघडून या तुबलेल्या साठवणीला वाट करून दिली पाहिजे नाहीतर बधारा फुटून प्रलय होण्याचा धोका संभवतो । यासाठी सस्कृती ही सनातनत्व व आधुनिकत्व यांना सांधणारा दुवा अथवा बध असावयास हवी अतीत, वर्तमान व भविष्य अशा तिन्ही काळाची सांगड घालणारी ती साखळी असावयास हवी. हे असे घडते तेव्हाच परंपरा आदरणीय व अनुकरणीय ठरतात असे जेव्हा घडत नाही तेव्हा त्या जुनाट रूढी मानल्या जाऊन त्याना झुगारण्याची प्रवृत्ती फोफावत जाते तेव्हा परपरा ही सतत गतिशील असावयास हवी । जुन्या मूळ प्रवाहात नव्या प्रवाहाचे निर्मळ पाणी सामावले जाऊन हा असा स्वच्छ फोफावणारा प्रवाह पुढे पुढे जावयास हवा मूलभूत नीतिमूल्याची मूलधार सुरक्षित राहून या गंगोत्रीने विराटरूप अवश्य धारले पाहिजे असा फुगलेला प्रवाह प्रसगी महापुराप्रमाणे गढूळ होत असतो, नाही असे नाही, पण यथायोग्य वेळी गाळ बाजूला ढकलला जाऊन पुनश्च निर्मळ स्वच्छ प्रवाह मार्गी लागतो परपरेचा प्रवाह असा पुरोगामी असेल तर ही परपरा जीवनधारा ठरेल । ती जर ' कालबाह्य सनातनत्वाचा आग्रह ' धरून 'पुनरुज्जीवना'चा अव्हेर करील तर डोहात अडकून नव्हे तर जिथल्या तिथेच ती गडप होऊन नाश पावेल भूमिगत झालेली राजापूरची गगा जशी पुनर्वंत

उफाळून प्रवाहित झाली तशीच हीही व्हावयास हवी तरच अशी परंपरा वर्धिष्णु, वरदायिनी गंगामैय्या ठरेल।

बस अथवा लोकलमधल्या 'व्रात्य' धक्काधक्कीच्या जमान्यात पातिव्रत्याच्या पारंपरिक सोवळ्या कल्पना भोगळ आणि वेडगळ ठरतात। एकेकाळी काळ्याभोर केसाची नागीण पाठीवर झोकून देऊन नितंबांवर खुशाल स्वैर लहरू देणारी मानिनी आता अश्वपुच्छाचा डौल मानेवरच दिमाखाने वागवते, किंवा चोळीच्या बाह्या कोपरापर्यंतच नव्हे, तर मनगटाकडे झुक देणारी लज्जिता त्या हळूहळू आकसून घेऊन पूर्वीच्या कचकीच्या आठवणीने आता खांद्यापर्यंत छाटून टाकते। या व अशा कैक आकुंचनांनी संस्कृतीचा संकोच होतो हे मानणे कितपत योग्यायोग्य हे नव्या मोजमापानी तपासायला हवे। 'एष धर्म सनातन' हे अज्ञानमूलक सूत्र विज्ञानयुगात फोल आहे तसेच 'बलस्य मूल विज्ञानम्' हेही विज्ञान जगाचे एकांगी प्रतिपादन अतिरेकी आहे म्हणूनच सनातनत्वातल सम्यकत्व व अद्यतनातल अपरूपत्व मनमोकळेपणानं स्वीकारायला प्रत्यवाय असू नये।

अन्नाचा कण अथवा पाण्याचा थेंबही न घेता करावयाचे 'निर्जल' उपोषण ही जैनांची सनातन परंपरा आहे असे उपवासव्रत एकाहून अधिक दिवसही आचरले जाते मात्र उपवासाच्या वेळी तोंडसुद्धा धुवायचे नाही, या रूढीमुळे अनेक दिवसांच्या उपोषणात तोंडाला घाण सुटते अर्थातच उपासकाबद्दल व त्याने आचरलेल्या तपाबद्दल इतरांना आदराबरोबर तिरस्कारही वाटण्याचा धोका संभवतो। पोटात पाण्याचा घोटही न घेता मुखमार्जन साध्य होत असूनही उपोषणकालात दिवसेंदिवस तोंड न धुण्याची सनातन प्रथा दुर्गंधीचा डोहच निर्माण करते।

जैनांच्या 'उपध्यान तपा'त एक दिवस उपोषण व एक दिवस 'निवी' म्हणजे एका जागी बसून एका दिवसात एकदाच 'एकासन' आहार, याप्रमाणे आळीपाळीने लागोपाठ महिना महिना असे व्रताचरण करतात 'आयंबिल तपा'त तेल, तूप, पालेभाज्या, दूध, तिखट, साखर इ वस्तू वर्ज्य करून असा चवविरहित आळणी आहार घ्यायचा असतो 'मास तप' अथवा 'वर्षतप' यामध्ये एक दिवस उपवास व दुसऱ्या दिवशी 'एकासन' म्हणजेच एक वेळ आहार, याप्रमाणे लागोपाठ महिनाभर अथवा वर्षभर तपश्चर्या करावयाची असते अर्थात या सर्व 'पौषधोपवास व्रता'त आत्मचिंतनासाठी शांत स्थळी ध्यानसाधना करावयाची असते। अशा तपोसाधनेत जैन श्रावकश्राविकांनी स्नान करावयाचे नाही असा रूढ 'नियम' आहे अशाने केसात उवा व लिखा या कृमींचे साम्राज्य पसरते पुण्यसंचयाच्या आणि आत्म-

शातीच्या उद्देशाने केलेल्या अशा तपाचरणात आत्मशुद्धी हरपून डोके खाजवताना किती संचित कृमींची हत्या होत असावी याचा हिशेब एकट्या चित्रगुप्तानेच ठेवावा की काय ! तपस्व्यांनाही या गणिताचे भान असावयास हवे !

पुरातन कालात मोक्षप्राप्तीसाठी वैदिक धारणेप्रमाणे जे यज्ञ होत होते त्यात असंख्य पशू बळी दिले जात होते प्रचलित काळातही जे यज्ञ होतात त्याच्या होमकुंडात जीवनावश्यक वस्तूंची राख होतेच, पण अनेक दृश्यादृश्य कृमिकीटकांचेही त्यात निष्कारण भस्म होते ! ज्या काळात धनधान्याची केवळ सुबत्ताच नव्हती तर आवश्यकतेपेक्षा अनेक पटीने त्याचे उत्पादन होत होते त्या काळात यज्ञकुंडात दिलेल्या धनधान्याच्या आहुती, संचयाच्या जटिल समस्येमुळे, समर्थनीय ठरल्या असतीलही म्हणून ती सनातन परंपरा तशीच पुढे चालू ठेवणे सयुक्तिक ठरणार नाहीच, पण शहाणपणाचेही ठरणार नाही. अशा यज्ञाहुती सर्वस्वाचाच होम करतील !

आयुष्यभर एखाद्याला लाथा घालावयाच्या आणि त्याचा 'इंतकाल' झाला की, त्याचा 'मुर्दा' घासून पुसून 'साफ' करावयाचा मुड्द्याच्या नाका-तोंडात, कानांत, नखांत कोठेही 'गदगी' राहू नये याची 'खबरदारी' घ्यावयाची ! कशासाठी, तर 'अल्लादरबारी' 'कयामत'चा 'आखरी फैसला' 'मरहूम'साठी 'अच्छा' व्हावा यासाठी !

दक्षिण आफ्रिकेतला 'काळा आदमी' 'सॅटेलाइट'च्या प्रगत युगातही वैरी मानून, माणुसकीने जगण्याचे सर्वसामान्य हक्कही त्याला निर्दयपणे नाकारावयाचे मानवतेसाठी 'क्रॉस'वर चढलेल्या जीसस ख्राइस्तची मात्र आठवण ठेवून 'गिरिजा घरा'त दर रविवारी न चुकता 'आकाशातल्या बापा'ला आवाहन करावयाचे व कपाळावर आणि छातीच्या दोन्हीही उचवट्यावर छातीठोकपणे हस्तस्पर्श करून त्याची मनोभावे प्रार्थना करावयाची ! 'जीवन मीच आहे' म्हणणाऱ्या येशूच्या जीवितकार्याची त्याच्या अनुयायांनी केलेली ही क्रूर थट्टा ठरते !

हिंदू-मुसलमानातल वैमनस्य अग्राह्य व असह्य वाटून गुरू नानकांनी शीख धर्माची स्थापना केली या धर्मगुरूचा पवित्र 'ग्रंथसाहेब' परंपरेने जिथे ठेवतात त्याच गुरुद्वारातील ग्रंथसाहेबाच्या प्रभावक्षेत्रात 'स्वतंत्र खलिस्तान'च्या वेडाने झपाटले जाऊन हिंदु-मुसलमानाच्या कत्तलीचे कट 'धर्मयुद्धा'च्या 'भांगड्या' नावाखाली धर्मवेड्या अकालींनी शिजवावेत ! ..ग्रंथसाहेबाच्याच प्रभाव क्षेत्रात स्फोटक बॉंब ठेवावेत ! .उज्ज्वल परंपरेचा हा आदर की अनादर, परंपरेची ही पूजा की ईजा हे ज्याचे त्यांनीच ठरवावे !

शासनाने कृषिवलाकडून घ्यावयाचा शेतसारा व वणिकाकडून वसूल करावयाचा आयातनिर्यात मालावरचा कर ही दोन हजार वर्षांपूर्वी आर्य चाणक्याच्या 'कौटिलीय अर्थशास्त्रा'त विशद केलेली कर पद्धती परपरागत असून आजही ती थोड्याफार भिन्नतेने प्रचलित आहे व अर्थव्यवस्थेची ही पारपरिक कावड अशीच पुढेही वाहून नेली जाणार आहे।

जुन्याचे जतन आणि नव्याचे उद्दीपन याच्या अनुनयाने परपरेचे मार्गक्रमण व्हावयास हवे। असे सक्रमण सस्कृतीच्या प्रगतिकरणास उत्तेजक व उपकारक ठरते। .या बाबतीतला दृष्टिकोणही समभावी असावयास हवा आपल्या मुलांनी केलेली डिस्कोसारखी कोणतीही करामत प्रशसनीय व इतराच्या मुलांची निंदनीय वाटावयास नको इतरानी केले ते अगविक्षेप आणि आपल्यानी केलेले रम्य प्रक्षेप असे आपपर नसावे।

एक निष्कर्ष निर्विवाद व निरपवाद आहे। जगाच्या पाठीवरच्या सर्वच नव्याजुन्या सस्कृती मूलभूत नसून सकरित आहेत, प्रवाही परपरेने प्रभावित आहेत। जी कथा सस्कृतीची तीच भाषेची पण। कोणतीही भाषा प्रवाहित असूनही ती सकरित असते। त्यामुळे अतिक्रमणाची भाषा फोल ठरते 'तुझी' या अर्थी सिंधी 'तोरी' हिंदी 'तेरी', तर गुजराती 'तारी' ही शब्दयोजना काना, वेलांटी, उकार अशी 'स्वरां' ची कसरत करून एकेका भाषेचे दुसरीशी सूर आणि सोयरेपण कसे जुळते हेच सरळ सरळ सिद्ध करते। तेलगूचा परिणाम मराठीवर किती झाला आहे हे सांगण्याची आवश्यकताच नाही ज्ञानेश्वरीपूर्वीचे महानुभावी साहित्य यास साक्षीदार असून या विधानास ते पुष्टीच देते। तेलगूच्या प्रभावाने ज्ञानेश्वरीतले अनेक अकारात शब्द उकारात झाले आहेत व या प्रभावाने ही ज्ञानदेवी भाषा तेजस्वी झाली आहे। विठ्ठलु, प्रकाशु, गणेशु, निवासु, प्रतिपाळु, प्रबधु, सकळु, महाप्रसादु, आनदु आपपरु, धवळु, वेलु, अशा असख्य शब्दातला गोडवा नव्याने लाभायला आणखी एखादा ज्ञानदेवुच अवतारू हवा।...माझी भाषा, माझा प्रांत, माझी सस्कृती, माझा धर्म हा स्वाभिमानही मग वृथा आणि फोलच ठरतो। दुसरीची उसनवारी करणारी व तिसरीवर स्वतःची सावली पडणारी एखादी भाषा स्वत्वाचा व स्वतंत्रतेचा टेंभा कुठल्या तोंडाने मिरवू शकते? लिपीची कथाही अशीच। ठिकठिकाणच्या उत्खननात जे शिलालेख आणि ताम्रपट सापडले त्यांवरील रेखाटनाचा घाट चित्रलिपीच्या थाटाशी मिळताजुळता आहे यावरून कोणतीही लिपी स्वयसिद्ध असल्याचे सिद्ध होत नाही तर याही बाबतीत एकेकीने दुसरी–तिसरीची उधार-उसनवारी केल्याचे

सा १२

स्पष्ट निदर्शनास येते। पधरा भारतीय भाषा व तीनशे भारतीय बोली एवढेच नव्हे, तर जगाच्या पाठीवरील सर्वच भाषा व सर्वच बोली एकमेकीत इतक्या गुरफटलेल्या आहेत की कोण, कुणापासून, असे विश्लेषण करणे कुठल्याच भाषातज्ज्ञाला न जमण्यासारखे महाकठीण कर्म आहे। उभ्या-आडव्या धाग्यांनी विणलेल्या वस्त्रातील दोरे पृथक करण्याइतके ते काम सोपे खास नव्हे। जे भाषेच्या बाबतीत तेच प्रांत, सस्कृती आणि धर्म यांच्या बाबतीत। स्वाभिमानाची अशी वल्गना एक प्रकारची कोल्हेकुईच असते। तिला डरकाळी हे उदात्त पण फसवे नावे द्यायचे झाले इतकेच। सर्वच बाबतीत हे असे बेमिसाल मिश्रण होत राहते। मग सघर्ष मतामतांचा गलबला प्रतिष्ठेसाठी आणि अस्तित्वासाठी! पंचवीसशे वर्षांपूर्वी भगवान महावीरांनी अर्धमागधीचा व महात्मा बुद्धांनी पालीचा सर्वसामान्य जनासाठी सर्रास वापर करून सस्कृत पडितांच्या गर्विष्ठ विद्वत्तेला मोठ्या धैर्याने तोंड दिले तेव्हा चागलाच गदारोळ उठला होता। ज्ञानेश्वरांच्या वेळीही हेच। विसाव्या शतकात प्रस्थापिताविरूद्ध बड करून उठण्याचा टेंभा दलितांनी काय म्हणून मिरवावा? असे हे आक्रमण, अतिक्रमण सतत चालत राहणार आहे प्रतिकारही। त्याला कुठल्याही क्षेत्राचे वावडे नसते, नव्हे, यास क्षेत्रच अपुरे पडते। सध्याच्या वैज्ञानिक 'हायब्रीड' च्या जमान्यात हे अतिक्रमण केश आणि वेषभूषेच्या प्रातातीलही असू शकेल। अनेक क्षेत्रांतले असे संक्रमण 'सस्करण' असावे इतकेच कुणाही विचारवंताला वाटावे। इद्रधनूतल्या रगाचे एकमेकावर होणारे आक्रमण व या आक्रमक समिश्रणातून जाणवणार आकर्षण सर्वांनाच भावत असत। म्हणून हा सकर सगर नसून सयोग वाटावा। स्नेहमीलन वाटाव। इद्रधनूतल्या रगमीलनाप्रमाण। किती तरी गोष्टी न पेरता उगवतात, फुलतात, फळतात मग जागरूकतेने चांगले पेरले तर कितीक चांगल्या गोष्टी उगवतील, फुलतील, फळतील, । . रसाळ बीजापोटी फळे रसाळ गोमटी। सुमेरियन, बाबिलोनियन, यूनानी, मिस्र, ग्रीक, मेसोपोटेमियन, इजिप्सियन सस्कृतीपेक्षा भारतीय सस्कृतीचे व परपरेचे वेगळेपण यातच आहे म्हणूनच सातत्याने आणि सामजस्याने ती समयोचित सर्व सहृदयतेने व सौहार्दाने सामावून घेते। म्हणूनच भारतीय सस्कृती रगीबेरगी पुष्पगुच्छासारखी मनोहर वाटते!

दोन अधिक दोन मिळून चार होतात। पण आजच्या विज्ञानयुगात दोन अधिक दोन म्हणजे तीन किंवा पाच का होत नाहीत असे आडमुठेपणाने व बुद्धिचातुर्याने विचारले जाते! दोन अधिक दोन म्हणजे तीन असे समजून कोणी चारऐवजी तीन रुपये देऊ नयेत व घेताना दोन अधिक दोन म्हणजे

पाच असे मानून कोणी चारऐवजी पाच रुपये घेऊ नयेत! हिचेच नाव भारतीय संस्कृती, जिचे विराट स्वरूप विज्ञानालाही अद्याप उमजायचे आहे!

अनेक भटक्या जमाती जगभर पूर्वापार विखुरल्या आहेत प्रवासाच्या साधनामुळे आजकाल दळणवळणही वाढल आहे अशा दळणवळणातून सस्कृतीचे प्रवाह उलटसुलट वाहून एकमेकात बेमालूम मिसळत आहेत इद्र-धनूतल्या रगाप्रमाणे!. ही प्रक्रिया सनातन असून चिरतन आहे! इद्रधनू-तल्या दोन भिन्नरगाची सीमारेषा शोधून काढणे जितके कठीण तितकेच संस्कृतीचे व परपरांचे पृथक्करणही कठीणच ही गोष्ट एकदा स्वीकारली की सामजस्याच्या या भावनेतून व सहकाराच्या अशा सौहार्दातून मतामताचा गलबला आणि नव्याजुन्या पिढीतला अवाजवी सघर्ष सपुष्टात येईल! यातूनच अधिक फळाफुलाला येईल खरीखुरी एकात्मता! सारे विश्व एक कुटुब, 'हे विश्वचि माझे घर' या एक सघ भावनेतून 'विश्व कुटुबैक्यम्!'

भूजमधल्या 'शा लालचद थावर' जैन महाजनवाडी पुढे मधुमीलन उभी राहते तेव्हा सर्वप्रथम तुमचे लक्ष वेधून घेते 'छतडी!'

'छतडी' या शब्दाने 'छत्र' किवा 'छत' असा अर्थबोध होतो, पण जैनांची ही स्मशानभूमी आहे हे समजल्यावर मात्र काही क्षण तुम्ही सुन्न होता एखादी अत्ययात्रा पाहून कुणाचेही मन क्षणभर चरकावे तशी तुमची अवस्था होते मरण मग ते कसलेही असो, कुणाचेही असो माणसाला अस्वस्थ करते या जीवनात काही राम नाही याची उगाचच जाणीव करून देते मन भर-ळते, पण हे स्मशानवैराग्य क्षणभगुर ठरते

'छतडी' चे प्रवेशद्वार भव्य असते 'छतडी' वरचा डेरेदार घुमटही अति-भव्य आहे अशा या राजशाही थाटाच्या छतडीत माणसाच्या जीवनातला अतिम सस्कार पार पडतो हे बघणाराला दुसऱ्याचे मरण आणि सरण सुसह्य वाटत असावे! पण कधीकाळी आपल्यावरही या छतडीखाली असाच अग्नि-संस्कार होणार या जीवघेण्या बोचणीची तीव्र दाहकताही दिव्य छतडी पाहून अल्पांशानेही का होईना सौम्य होत असावी! शेवटसुद्धा सुखद व्हावा असंच कुणालाही वाटत असतं!

जैन महाजनवाडीत तुमच्या समुदायाची वर्णी लागायला थोडा वेळ लागतो चौकशी अती कारण कळत असत महाजनवाडीत कालच एक मगलकार्य पार पडलेल असत व लग्नकार्य उरकून 'जान' जायला निघालेली असते 'जान' म्हणजे 'वऱ्हाड'! 'जानोसा' मधील 'जान!' .नवपरिणीत वधूला घेऊन नवरदेव जानीतून अजाऱ्याला का कुठ जायला निघालेला असतो 'जान' घेऊन आलेल्या चार-पाच एस टी गाडया पुन्हा भरभरून वाटेला

लागणार असतात 'जान' वाटेला लागली की वाडीत तुमचा शिरकाव होणार असतो तोवर बाहेरच थावणं भाग आहे ।

आणि हे काय? ही मिरवणूक कसली? आणि कोणाची? 'त्या' अर्थानं ही मिरवणूक नसते तर ही 'अंत्ययात्रा' असते । कुणा एकाची अंत्ययात्रा! नित्य नव्याच हे मरण! जनन आणि मरण तस अद्यातन, सनातन आणि चिरंतन असूनही जनन जस नित्य नव तसच मरणही नित्य नव! प्रतिदिन किती तरी येतात आणि किती तरी जातात हे अस अखंड नि अव्याहत चालू आहे त्यामुळे कुठ ना कुठ अस नित्य दर्शन घडतच राहत । वारवार घडत राहणाऱ्या या दर्शनान काही क्षण गलबलल्यासारख होत पण खड्यान जलाशय ढवळावा आणि पुन्हा स्थिर व्हावा असं काहीस अंत्ययात्रेच्या दर्शनान घडत ।. 'जीव जन्माला येतो तेव्हाच त्याची मृत्यूकडे वाटचाल सुरू होते ।' असा 'भगवती' सूत्राने इषारा देऊनही अशी अवस्था होते ।

ही अंतिमयात्रा 'छतडी' कडेच येत असते कुणा एकाची काया छतडीखाली विसाव्याला येत असते कसला हा विसावा ।...भाजून, पोळून, जाळून चिमूटभर राख करणारा । जैनाच्या स्मशानभूमीकडे येणारी ही यात्रा कुणा जैनाचीच मयत झाली असल्याचे शाबीत करते कुणी तरी मेलेल असत ना ओळखीच, ना पाळखीच पण कोण मेल असाव हा विचार क्षण-भर तुमच्या बुद्धीला ताण देतो विचाराबरोबर डोळेही ताणले जातात कोण 'गेल' असाव याचा अंदाज घेण्यासाठी कुणी तरी म्हातारी मेली असावी.. विधवा म्हातारी । ऐंशी-पच्याऐंशी वर्षांची सहज असावी लाल अलवाणी लुगड्यात गुंडाळलेला तिचा मृत देह ती तुमची कुणीच नसते, पण सुटली बिचारी अस उगाचच तुम्हाला क्षणभर वाटत क्षणभर मन अंतर्मुख होत मृता-त्म्याला मनोमन श्रद्धांजली देण्यासाठी, आपल्यालाही एक दिवस असच जाव लागणार आहे याची जाणीव करून घेण्यासाठी, आपल म्हणून जे काही आहे ते ते सर्व जसच्या तस जेथल्या तेथ माग ठेवून एकाकीपणान असाच अखेरी जगाचा निरोप घ्यावा लागणार आहे याची आठवण करून देण्यासाठी।

ती प्रेतयात्रा छतडीत प्रवेश करते त्याच वेळी नवरदेवाची 'जान' महा-जनवाडीतून बाहेर पडते आता मात्र तुम्ही जास्तच विषण्ण होता दोन बाजूची दोन दृश्य पाहून, दोन बाजूच्या दोन यात्रा पाहून! एक 'जान' घेऊन आपल्या गावाला निघालेली असते तर दुसरी 'जान' ठेवून आपल्या 'गावा'ला निघालेली असते । एक असते शोभायात्रा— आनदान फुललेली! दुसरी असते महायात्रा— दुःखान होरपळलेली । एक 'सोबत' घेऊन निघालेली असते जीवन फुलवण्यासाठी, तर दुसरी 'सोबत' सोडून निघालेली असते

निर्माल्य जीवन जाळून टाकण्यासाठी ! एक यात्रा असते बेरजेची, तर दुसरी असते वजाबाकीची ! एकाच ठिकाणी ही परस्परभिन्न चित्र मधून फक्त एक रस्ता जातो दोन जगाना दुभगणारा ! दोन जगांचा छेद घेणारा ! जणू काही या दोन्ही देखाव्यांत, या दोन्ही जगांत सात समुद्राच अतर असत याची प्रकर्षान आठवण करून देणारा ! केवढी ही विसगती ! जिवाचा थरकाप उडवणारी ! मन गोठवून टाकणारी ! शरीर गलितगात्र करून टाकणारी ! या विसगतीच नावच जीवन ! मरणाचा वज्रलेप लेवूनही याच नाव जीवन ! खोटा मुखवटा चढवलेल जीवन ! सपणार असत तरीही जगावस वाटत अस हे जीवन ! जगण म्हणजेच अखेरी कणाकणान आणि क्षणाक्षणान झिजून मरण हे शाश्वत धगधगत सत्य सातत्यान जाळत असूनही गोठून थडावून जगावस वाटणार व सरशेवटी सगळच थडगार पाडणार जीवन ! मृत्यूला टाळण्यासाठी जिवाचा आटोकाट आटापिटा करूनही अखेरी जिवाचीच आहुती देणार जीवन ! फोल शान, वृथा अभिमान, फुसका बहुमान, छाकटा थाटमाट, ठिसूळ प्रतिष्ठा अशा एक ना अनेक झुली पांघरून जगावस वाटणार जीवन ! त्राण असून आणि नसूनही प्राण हरपणार जीवन ! हावरेपणान जगावस वाटणार, आधळेपणान जगावस वाटणार ! चांगल्या रीतीन, सुखासमाधानान, मानसन्मानान जगता आलं तर ठीकच . नाही तरी, कस जमेल तस वेडंवाकडं, तरीही जगावस वाटणार ! चिघडलेल असेल तर सांधून साधूनसुद्धा जगावस वाटणार ! ' छतडी 'कडे पाठ फिरवून ! . कोणा एका कवीने म्हटलेले आहे, ' चाहे हवन का हो, चाहे कफन का हो, दोनो का रग एक है । चाहे मकान मे हो, चाहे मसान मे हो, दीये का जग एक है । चाहे वो बागो मे हो, चाहे वो राहो मे हो, काटे का धर्म एक है । '

भूजच्या बाजारपेठा बद असल्याची बातमी हवेवर स्वार होऊन येते तुमच्यापैकी पुरुषमडळींना हायस वाटत ते सुटकेचे सुस्कारे टाकतात बायकामाणसांची मात्र घोर निराशा होते त्या नाराजीने उसासे टाकतात

कोल्हापूर जिल्ह्यातल हुपरी गाव चांदीच्या दागिन्यांच आगर मानल जात हरतऱ्हेचे चादीचे दागिने हुपरीला तयार होतात पैंजण, तोरड्या, हार, आंगठ्या, बिंदिया, पजे, जोडवी, मासोळी, कर्णवेल, बांगड्या, छल्ले, कर्णफुले एक ना दोन अनेक चीजा हुपरीचा हा जो नावलौकिक तोच कच्छ भूजचा ! त्यामुळे या शहरात चादीचे दागिने खरेदी करावेत अशी स्त्रियांना हाव ! प्रवासात इडा पिडा नको म्हणून घरून निघतानाच सोन्याचे

दागिने उतरवून त्या जागी पितळेचे नकली दागिने चढवून आलेल्या स्त्रियांना चादीच्या दागिन्याचे आकर्षण वाटावे व हे दागिने चढवायचा त्यांना अशाही परिस्थितील सोस असावा याचं पुरुषाना थोड वैषम्य वाटत !

इकडील सर्व गावाना ' कच्छ ' ही उपाधी लावण्याची सर्रास प्रथा आहे ! ज्याप्रमाणे कच्छ भद्रेश्वर, कच्छ माडवी त्याप्रमाणेच कच्छ भूज किंवा भूज-कच्छ ! स्वग्रामाचे कच्छशी अतूट नाते सागून स्वप्रदेशाचे सतत स्मरण ठेवण्याची ही विलक्षण आगळी रीत, अतिरेकी दुराभिमान टाळून, आदरणीय तशीच अनुकरणीय मानावी लागेल ! गावाच्या नावाची गफलत होण्याची धास्तीही अशाने उरत नाही !

कच्छ भूजमध्ये तऱ्हेतऱ्हेचे दागिने पाहण्यास स्त्रिया उत्सुक असतात त्याना खूप काही पाहावस वाटत, त्यातून काही थोडस घ्यावस वाटत

पण भूजचा बाजार बद असल्याची बातमी येऊन धडकलेली असते अर्थातच स्त्रियांची निराशा होते कुणी तरी मेलेल होत आता जिची प्रेत-यात्रा ' छतडी 'कडे आली होती तिच्यासाठीच का बाजारपेठा बद ठेवल्या होत्या ? ही बाई नेमकी आजच कशी मेली ? काल कशी गेली नाही ? हिन आपल मरण उद्यावर कसं ढकलल नाही ? ऐशी-पचाऐंशी वर्षांच्या दीर्घायुष्यात एक दिवस कमी काय आणि जास्त काय सारखाच ! आज तिन मरायला नको होत ! उगाचच वेडाच फेफर भरल्यासारखे विचार बायकांच्या डोक्यात घोंघावत होते ! आपल्या खिशाना चाट लागणार नाही या विचारान पुरुषमडळी हरकली होती कुणाच्या तरी मढ्यावर कुणाची तरी पोळी भाजली जात होती ! कशी गम्मत असते पहा जगात !

पण थोड्याच वेळात आणखी एक बातमी हवेवर स्वार होऊन मागोमाग आली बाजार बद राहणार होते, पण ते बद ठेवायचे नाहीत असा गावच्या ' महाजन मडळाने निर्णय घेतला होता जी बाई मेली होती ती कुणाची तरी कोण होती, अगदी सामान्य स्त्री होती कुणा एका सामान्य जैन श्रावकाची वृद्ध विधवा आई अशा वयस्क बाईसाठी दुकाने बद ठेवण्याची गरज महाजन मडळींना वाटली नव्हती ! आणखी एक जबरदस्त धक्का ! हीच बाई जर कुणा मोठ्याच्या घरची असती तर सगळे बाजार निर्विवाद बद राहिले असते मग ती कितीही म्हातारी असती तरी पण आता मेली होती ती म्हातारी कुणा फटिंगाच्या घरची होती कुणा भणगाची आई मेली होती ' किस झाडकी पत्ती ' गळून पडली होती ! समभावाची जाणीव करून देणार सामायिक व्रत जैन श्रावक-श्राविकांनी पाळाव अस जैनधर्म सागतो त्या धर्माचे पाईक असा माणसामाणसांत भेद करतात.

अज्ञानी मग जैन म्हणवून तरी का घ्याव ? ही अंत्ययात्रा कुणा एका म्हातारीची नव्हती तर एका उज्ज्वल विचारसरणीची होती !. सदा टवटवीत राहावयास हवीत अशा जिवंत विचारसरणीची पानं पालापाचोळा होऊन पडली होती ! तुम्हास आता असं वाटलं ! हो, तुम्हालाच असं वाटलं क्षणभर तुमचे तुम्ही शरमिंधे झाला दृष्टी क्षणभर अधोगतच नव्हे तर अधूही झाली ! तुम्ही खालमुंडी घातली असताना तुमच्या पायाच्या अंगठ्याने निर्हेतुकपणे जमीन टोकरली पण डांबरी रस्त्याचा टवका थोडाच निघणार असतो !

भूजच्या बाजारपेठा चालू आहेत असे समजताच स्त्रिया हरकल्या होत्या ही द्विदशवर्षीय बाला नाव.. श्वेता की असंच काहीस काही का असेना ! नावात काय आहे ! चांदीचे दागिने घ्यावेत असं तिला मनापासून वाटतं खिसेकापूच्या जमान्यात सोन्याच्या दागिन्यापेक्षा चांदीचेच दागिने हितावह वाटत असावेत विशेषत: तिला हव्या आहेत तोरड्या ! चांदीच्या तोरड्या ! सोन्याच्या तोरड्या घालण्याची रीत नाही म्हणून की चांदीच्याच तोरड्या आवडतात म्हणून तिला चांदीच्या तोरड्या घ्यायच्या आहेत ! एक चरण-भूषण की बेडी ? बेड्या घालून घ्यायला स्त्री-स्वातंत्र्य युगातली ही बालिका आतुर व्हावी ! तोरड्याच्या विचाराने हिची कळी कशी खुलली आहे ! पायी तोरड्या घालण्याच्या विचारानेच हिच्या हळव्या पायाच्या लाल चुटुक तळव्यांची लालिमा वाढलेली आहे, जी सर्व अंगभर विखरून गाला-पर्यंत उधळली आहे !

आता हिच्या अंगावर दागदागिन्याचा फारसा साज नाहीच गळ्यात फक्त एक छोटासा गोफ आहे बारीक सोनसाखळीचा गोफ ! मध्ये एक टपोऱ्या मोत्याचा तनमणी ! एवढा एकच अलंकार तिच्या अंगावर आहे हा दागिना बहुधा नकलीच असावा ! तरीही किती सुंदर दिसते ती !

आधीच ती सुंदर केसाचा बॉब कट. भुरक्या केसात मधोमध सरळ चिरेबंद भाग गोरीगोमटी मुद्रा केवड्याच्या पिवळ्या पाना-सारखी दोन्ही डोळे. मोठे नाहीत, लहान नाहीत पण कसे बोलके ! या डोळ्यांवरच्या दोन रेखीव धनुष्याकृती भुवया एकेक भुवई म्हणजे, महा-राणीला डौलाने वाहून नेणाऱ्या पालखीची कमानी दांडीच उंच तरतरीत नासिका जणू पिवळी चाफेकळीच लाल चुटुक ओठांची अर्धोन्मीलित शिंपली.. की दोन अधर म्हणजे दोन गुलाब पाकळ्या एकमेकावर अधर मिटत्या ठेवल्या आहेत, ज्यातून हास्याचा गुलकंद हळूहळू पाझरत आहे !

नव्हे नव्हे, अर्धवट खुललेल्या, अर्धवट मिटलेल्या, ओठाआड लपलेल्या पाढऱ्याशुभ्र कुदकळ्याचा मधच जणू झिरपत आहे ! हनुवटी कशी निमुळती ! अशा सुदर मुखड्याच्या ठेवणीला विलक्षण खुलावट देणारी देहाची रेखीव ठाशीव बांधणी देहलतेचे हे रेखीव रसरशीतपण सर्वप्रथम जाणवते ते उभारी प्यालेल्या वक्षस्थलाच्या गोलाईवर तेथून पुन्हा हे रेखीवपण कमरेत अतर्गोल होते व पुन्हा लगेच खालच्या उचवटयावर बहिर्गोल होत जाते ! दोन हात . दोन पखासारखे हातांच्या अगुळ्या कमलदलातील चिचोळ्या लाबट कळ्यासारख्या ही अशी सोनकेळ उभी असते खाली खाली निमुळत जाणाऱ्या दोन नितळ धोटीव बुध्यांवर ! कमलपत्रावर उभी जशी कमलिनी ! ..

अशी ही चालती बोलती सोनकळी खुलून दिसते गळ्यातल्या एकुलत्या एका सोनसाखळीने या सोनसाखळीतला एकच टपोऱ्या मोत्याचा तनमणी या उन्मनीला उत्फुल्ल करतो.. अगावर पाढरा ' जोडा ' .. पाढरी सुरवार, पाढरा खमीस आणि वर पांढरी ओढणी ही शुभ्रवसना .. श्वेता की काय नाव असत तिच नावात काही नसत कस ! काहींच्या नावातच सर्व काही असत ! .. चारुगात्री यौवनसुलभेच्या नावात खूप काही असत ! नाव देखील रूपाला साजेसच असाव लागत !

अशी ही सूरत सोन्या-चांदीच्या आणि माणिक-मोत्याच्या दागिन्यानी मढवली तर ? अस हे नैसर्गिक लावण्य दागदागिन्यानी झाकळण्यात काय स्वारस्य असत ? पण स्त्रियाना दागिन्याचा हव्यास असतो त्याला कुणी काय कराव ! त्याना वाटत, हिऱ्याची चमकी तरतरीत बाणेदार नाकाला झगमगून टाकते ! ही झळाळी कुणाच्या डोळ्याना खिळवून टाकते, तर ती कुणाच्या नाकाना झोबते ! हिऱ्याच्या कुड्या कानाच्या पाळ्यांना तजेली देतात अशी कुणाची समजूत ही तजेली कुणाला भावते तर कुणाला भोवळ आणते ! काहींच्या मते, गळ्यात घातलेले भाराभर हार सौंदर्याचा बहार वाढवतात हे हार पाहणाऱ्या कुणाला शृगार वाटतात तर कुणाला प्रहार ! बाकी दागिने हा एकेकीच्या आणि एकेकाच्याही आवडीनिवडीचा व मर्जीचाच विषय ! या कुणा श्वेताला पायातल्या तोरड्या घ्यायच्या आहेत ! तिच्या चरणकमलाना शोभून दिसतीलही ! या श्वेत कमलिनीच्या, नव्हे, हंसिनीच्या चरणाची शोभा वाढवतीलही ! . बाजारच जिथ बद नाही, तिथं कुणाला कुणाची बदी तरी कशासाठी ! तेव्हा अथरूण पाहून खुशाल पाय पसरू द्यावेत ! .. बाकी तुमच्या परवानगीला विचारलो कोण म्हणा ! ' नारी समता मचा 'चे दिवस आहेत हे ! बेड्या तोडायला निघालेल्या, स्वेच्छेने

बेड्या घालून घेत आहेत  घालून घेऊ देत ! समाधान इतकेच की या बेड्या पूर्वीसारख्या मणामणाच्या नाहीत !   काही ग्रॅमच्याच आहेत !   नाजुक पायासाठी हलक्याफुलक्या बेड्या !   साखळ्यांऐवजी तोरड्या ! . स्त्रीला पळून जाता येऊ नये या उद्देशाने  तिला जखडून  टाकण्यासाठी पूर्वी तिच्या पायात साखळ्या अडकवण्याची प्रथा होती  पारंपरिक  साखळ्या  गुलाम अभिसारिकेच्या प्रतीक होत्या ! पुढे अंकित अबलेने खंडितेचे रूप धारण करून गतिरोधक जोखडातून मुक्तता करून घेण्यासाठी धिटाईने व अस्मितेने  लढा दिला   अशा कलहांतरितेचे प्रतीक म्हणजे या तोरड्या !   .परंपरेला नवा अर्थ देणार हे असं नव प्रगत रूप !   स्वाधीनपतिकेच !   वासकसज्जिता प्रेषितभर्तृकेच !   विप्रलब्धा विरहोत्कंठितेच !

तरीही नव्या नव्या आभूषणात सजलेली ही  नवरूपा !   ' लीना हो लीना   दिल तूने  छीना ! ' या कळेने प्रियकरला घायाळ व्हायला लावणारी !   ' मैं हूँ प्रेमरोगी मेरी दवा तो करावो !   ओ जाओ जाओ जाओ   किसी वैद को बुलावो !   मेरे यार को बुलावो ! ..' असे तळमळून तडफडून सांगायला भाग  पाडणारी ! ..   मेरे  संग संग संग आया तेरी यादों का मेला ' अशी प्रामाणिक पावती द्यायला लावणारी !   स्त्री-स्वातंत्र्याच। जळजळीत घोष करणाऱ्या  ओठानीच ' तेरा साथ  है तो  मुझे क्या कमी है,' अशी मिठ्ठास पखरण  करणारी ! ... ' आज कलमें ढल गया दिन हुआ तमा   तू ही सो जा   सो गयी रंगभरी शाम   अशी आषूक माषूक अंगाई गाणारी !   काळाबरोबर शब्दकळा बदलल्या  तरीही अंग-कळा न बदललेली ! ..  दिलदारचा शिणवटा घालवणारी सोळा शिणगारा-तील नव नार !   ' तू मेरा मजनूं है  तुही मेरा रांझा ' असे  लैला आणि हीर यांच्या रूपात नव्याने म्हणणारी.. अतीव जवळीकेने ' तमने पारका मानू के मानू पोताना ' असे जाणून बुजून विचारणारी रसिली सजिली तनुजा! ' तूने दिल दिया दिया  दिया ओ साथी पिया, तूने दिल लिया  लिया लिया ओ साथी पिया '   असा ' लेन देन 'चा हल्लागुल्ला तरीही हसीना हंगामा करणारी नखरीली नटखट चिडिया !   म्हणून घालू दे पायी ' पैंजनियाँ '!

महाजनवाडीतलं तुमचं पहिलं पाऊल उद्वेगजनक ठरतं  आतील पटांगणा-वर गाद्यागिर्द्यांचे आणि रजयांचे ढीग  जागजागी अस्ताव्यस्त पसरलेले असतात  दुपारच्या भोजनापुरता तुमचा या महाजनवाडीशी संबंध येणार असतो त्यामुळे या ढिगातल्या गाद्या तुमच्या तैनातीला येणार नसतात किंवा इथल्या रजया तुम्हाला पांखर घालणार नसतात, ही एका परीने समाधानाचीच बाजू

असते अस्वच्छ भटारखाना पाहिला की अन्नावरची मर्जीच उडून जाते विश्रांतीच्या बाबतीतही अशीच परिस्थिती असते अशा गलिच्छ गाद्यागिर्द्या-वर सवेदनाशील मानवाला विश्रांती लाभणे दुरापास्तच मानसिक स्वास्थ्या-साठी व आत्मिक समाधानासाठी मदिरांची स्वच्छता जेवढी आवश्यक असते, तेवढीच स्वच्छता निवासस्थाने व तेथील प्रसाधनगृहात असावयास हवी अगदी खाजगी व्यक्तिगत घरात देखील अशी घरे सुखसोयींनी समृद्ध असायलाच हवीत असे थोडेच आहे जेवढे असेल व जे असेल त्याच्या मांड-णीत टापटीपपणा व नीटनेटकेपणा हवा इतकेच फाटका कपडा टाचून आणि स्वच्छ धुऊन वापरला तर ओंगळपणाचे प्रदर्शन होत नाही निवासाची सजा-वटही स्वच्छतेने बऱ्याच अशी खुलवता येते टेरीलीनचे महागडे कापड मुलाच्या कपड्यासाठी घेणे परवडत नसते म्हणून एक सुगरण हरकच्या स्वस्त कापडाचा सदरा मुलासाठी शिवते अशा शर्टावर ती रगीत दोऱ्यानी एक सुदर फूल विणते अर्थातच कुणाचही लक्ष त्या मुलाच्या शर्टाकडे व शर्टावरील फुलाकडे जाते ।

'माता नो मड' येथे जशी परिस्थिती होती तशीच थोडीफार इथेही महाजनवाडीत आढळते भट्टीच्या पाढऱ्या स्वच्छ अभ्रयांनी आणि खोळींनी येथील गाद्या-रजयांचा ओंगळपणा झाकला जात असेल नाही असे नाही पण अगावर स्वच्छ परीटघडीचे कपडे लेऊन व चेहऱ्यावर प्रसाधनाची पुटे थापून ठाकठीकपणे वावरावयाचे आणि अतरगात मात्र घाणेरडे विकृत विचार वाहू द्यावयाचे, अशातलाच हा प्रकार मानावा लागेल तरी देखील ही बहिर्गत स्वच्छता अपेक्षिली जावी 'माता नो मड' येथे हीही वाटचाला आली नव्हती ! केशर, धूप, फूल या साधनसामग्रीने मदिरात प्रभूची पूजा होऊ शकते, पण तेथील वातावरण स्वच्छ व शुद्ध असेल तर यायोगे अलरग उजळून अशा पूजा जास्तच प्रभावी व उत्तेजक ठरतात, विश्रातीगृहातही स्वच्छतेच्या माध्यमातून ही उत्तेजना मिळावयास हवी !

स्वच्छतेच्या सदर्भाने येथील ही महाजनवाडी जैन धर्मशाळांच्या लौकिकाला गालबोट लावते मदिराजवळची निवासस्थाने लग्नकार्यासारख्या क्रियाकर्मासाठी वापरली की त्यांची ही अशीच दुर्दशा व्हायचीच ! व्यव-स्थापनातला निष्काळजीपणा आणि येथे पाहुणे म्हणून येणारांचा उपरेपणा याही गोष्टी येथील दुर्दशेत भरच घालतात म्हणून अशा तऱ्हेच्या विसाव्या पेक्षा छतडीखालचा विसावा बरा असे एखाद्याला उद्वेगाने वाटले तर त्यात नवल ते कोणते !

कुणाचं लक्ष लॉटरीच्या तिकीटाकडे लागलेलं असतं तर कुणाचं चांदीच्या सराफ बाजाराकडं कोण एकजण भूजमधल्या 'बादशहा'ला भेटायला निघालेले असतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरदार पटेलांनी बहुतेक सर्वच संस्थाने भारतात विलीन करून टाकली होती व त्यानंतर सर्वच महाराजांची आणि बादशहाची रया संपुष्टात आली होती अशा परिस्थितीत भूजमध्ये एखादा बादशहा शिल्लक उरावा याचे तुम्हाला नवल वाटणे साहजिकच होते बाबुभाई दलसुखभाई शहा हे कोणा एकाचे भूजमधले मित्र अर्थात हे बा द शहा नावापुरतेच बादशहा ! एकेकाचे भाग्य नाही तर काय ! म्हणूनच विना आयास त्यांना असे बिरुद लाभते ! या बादशहांना मुलुखगिरी न करताच ही पादशाही मिळाली होती! बादशाहाला भेटण्यासाठी मुद्दाम येणे या सद्गृहस्थांना जमले असते का हा प्रश्नच आहे ! कामात काम साधून घ्यावे म्हणतात ते हे असे ! त्यात वावग ते काय ! कुणाचं काय तर कुणाचं काय ! अशा या भरगच्च कार्यक्रमात व घाईगर्दीत सर्वांनाच येथील जैन मंदिराची आठवण राहणे शक्य नव्हते देवाची आठवण सोईच्या वेळी होते, तसेच त्याला सोईप्रमाणे पद्धतशीर विसरता येते अडीअडचणीच्या वेळी मात्र त्याचा विसर पडून चालत नसते अशावेळी त्याचे एकसारखे स्मरणच होते !

कामाची मडळी आपापल्या कामगिरीवर निघून वाटेला लागलेली असतात काम नसलेली मडळी मात्र मंदिराची वाट धुंडाळीत निघालेली असतात कुणी निष्कामपणे तर कुणी मनातल्या मनात कसली ना कसली कामना धरून ! ही मडळी देवाचा शोध घेत घेत श्री सभवनाथ जैन देहरासरमध्ये दाखल होतात भूजच हे मंदिर कच्छमधल्या इतर जैन मंदिराप्रमाणेच द्विस्तरीय आहे मंदिरातील मूळ नायक श्री संभवनाथ भगवानांप्रमाणेच श्री विमलनाथ, श्री महावीरस्वामी, श्री पार्श्वनाथ या इतर तीर्थंकरांच्या मूर्ती हसऱ्या व अत्यंत देखण्या आहेत वरच्या मजल्यावरच्या घुमटीतील श्री आदिनाथ, श्री सुविधिनाथ व श्री कुंथुनाथ या तीर्थंकरांच्या मूर्तीही अशाच मोहविणाऱ्या आहेत खालच्या सभामंडपात पद्मासनात सहास्य बसून मूळनायक श्री संभवनाथ भगवान यांच्या हसऱ्या मूर्तीकडे टक लावून बसण्याचा कोणासही मोह व्हावा, मग तो श्रावक असो वा नसो संत चोखोबा देवाच्या अशाच रूपावर कमालीचा भाळला होता !

या मंदिराच्या प्राकारातील आणखी एक वैशिष्टच म्हणजे मागच्या कोपऱ्यातले श्री घंटाकर्ण महावीरांचे मंदिर श्री घंटाकर्ण महावीर हे नाव ऐकले की केवळ अनेक चमत्कृतीपूर्ण घटनांची मनातल्या मनात उजळणी होत नाही,

तर गुजरात राज्यातल्या मेहसाणा जिल्ह्यातील बीजापूर तहसीलमधले महुडी तीर्थक्षेत्र आठवते महुडी येथे श्री पद्प्रभ तीर्थंकरांचे अतिप्राचीन मंदिर असले तरी या गावाचे श्री घटाकर्ण महावीरांशी घनिष्ठ नाते जुळलेले आहे. महुडी या गावाचे जुने नाव खडायत होते व खडायत गावात कोटार्यक गावही समाविष्ट होते या गावचे अतिप्राचीन नाव 'मधुमती' होते साबरमती नदीच्या किनाऱ्यापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर हे गाव वसलेले असून येथील श्री घटाकर्ण महावीर अनेकांचे स्फूर्तिस्थान व श्रद्धास्थानही आहे बावन्न वीरांपैकी तिसावे वीर व गुणी देवात चौथे गुणवान देव अशी श्री घटाकर्ण महावीराची ख्याती आहे महुडी येथील श्री घटाकर्ण महावीर मंदिरात प्रतिवर्षी आश्विन वद्य चतुर्दशीला मोठा उत्सव साजरा होतो हा दिवस म्हणजे भगवान महावीराचा निर्वाणदिन श्री घटाकर्ण महावीराच्या चमत्कृती-पूर्ण घटना प्रत्यक्ष अनुभवायला मिळत असल्याने इतरत्र काही काही ठिकाणी जैन मंदिराच्या प्रागणात या प्रभावक देवाची प्रतिष्ठा श्रद्धेने केल्याचे दृष्टो-त्पत्तीस पडते। भूजमधल्या जैन मंदिराच्या प्रांगणातली श्री घटाकर्ण महा-वीराची संगमरवरी धनुष्यधारी प्रतिमा या दृष्टीने केवळ प्रेक्षणीय नसून पूजनीय आहे अशी अनेकांची श्रद्धा आहे पद्मासनस्थ व कायोत्सर्ग भावातील शस्त्रविरहित तीर्थंकरांची पूजा करणारे जैन, या लढवय्याच्या पविभ्यात उभ्या ठाकलेल्या, धनुर्धारी देवाचीही पूजा करतात हे एक गूढ आश्चर्य म्हणावे लागेल। मात्र ही पूजा केशरी गंधाने होते नसते, 'वासक्षेप' ने होते वासक्षेप म्हणजे चंदन आणि केशर याच्या मिश्रणाचे वस्त्रगाळ केलेले सुगंधित चूर्ण दरवर्षी आश्विन वद्य चतुर्दशीला या देवाचा 'प्रक्षाल होतो घटाकर्ण महावीराप्रमाणे अनेक मंदिरांत बावन्न वीरांपैकी 'श्री मणिभद्र' वीराचीही सुळकेवजा प्रतिमा आढळते। यक्ष-यक्षिणींच्या वा रक्षक देवदेवतांच्या प्रतिमा गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारालगत सर्वत्र असतातच। धरणेंद्र, गोमुख यक्ष, श्री पद्मावती माताजी, श्री चक्रेश्वरीदेवी यांचा या रक्षणकार्यात अंतर्भाव असतो। प्रत्येक तीर्थंकराचे रक्षकदेव व रक्षक देवता विविक्षित व विशिष्ट असतात श्री आदिनाथ ऋषभदेव यांचा रक्षक देव गोमुख यक्ष व रक्षक देवता चक्रे-श्वरी देवी पंपा आदी कन्नड कवींच्या मते श्री ऋषभदेवांच्या रक्षक देवाचे नाव वृषभ यक्ष सर्वच तीर्थंकरांच्या यक्ष आणि यक्षिणींचे ज्ञान तुम्हास असावे। त्यायोगे तुम्हास खचित गम्मत वाटेल व अधिक काही शिकल्याचे समाधानही लाभेल।

भूज नगरपालिकेच्या नव्या 'शाक मारकीटा'ची वास्तू पाहाण्यासारखी

आहे या नव्या शाक मारकेटचा दर्शनी भाग एखाद्या किल्ल्याच्या तटबंदी-सारखा असून दोन छोट्या बुरुजामधून भाजी मंडईत प्रवेश होतो भूजमध्ये सीमा सुरक्षा दलाच्या छावण्या असून भारतीय लष्कराच्या छावण्याही शहरा-बाहेर दूरवर पसरल्या आहेत भूज हे कच्छ जिल्ह्याच मुख्यकेंद्र असल्यान गुजरात राज्य मार्ग परिवहन महामंडळाच कार्यालयही भूजच आकर्षण आहे शहरालगतच्या विस्तीर्ण तलावाजवळचा सरदार वल्लभभाइ पटेलाचा अर्ध-पुतळा भारतीय स्वातंत्र्याचा उज्ज्वल रणसंग्राम स्वातंत्र्यप्रेमीच्या डोळ्या-पुढे उभा करतो व या महापुरुषापुढे विनम्र व्हावे असे त्याना वाटते भूजच हे स्वरूप तुमच्यापैकी किती जणानी पाहिल असेल कोण जाणे !

निरनिराळ्या वाटेने गेलेले निरनिराळ्या वाटेने परततलेले असतात निरनिराळ्या ठिकाणाहून परतलेल्यानी काय काय आणले असावे याची चौकशी करण्याचे प्रयोजनच नसते खरेदी केलेल्या वस्तू मोठ्या प्रौढीने दुसऱ्यांना दाखविल्या जातातच तुम्ही फक्त कान देऊन ऐकायला हवे !

या शहरात उत्तमोत्तम बांधणी साड्या व बाटिक प्रिंटच्या साड्या मिळत असूनही एकाही पुरस्त्रीने अशी एकही साडी खरेदी केलेली नसते, या घटनेने संबंधित भूजकरांना चुटपूट लागली असेल पाहण्यासाठी विस्कटलेल्या किती साड्यांच्या पुनर्वत घड्या घालण्याची पाळी त्यांच्यावर आली असेल त्याचे तेच जाणोत चांदीच्या दागिन्याच्या खरेदीतही साड्याच्या खरेदीसारखाच उजेड पडलेला दिसतो भूजचा गल्लीबोळातला बाजार कोणाला आकर्षू शकला नसावा ! श्वेता का कोण, तिला मात्र मनासारख्या तोरड्या मिळालेल्या दिसतात, कारण तोरड्या घालून ती हस्तिनीप्रमाणे पदन्यास करीत परतलेली असते ! तेरड्याचा रंग तीन दिवस, त्याप्रमाणेच या नव्या तोरड्याचा तोराही तीन दिवस टिकणार असतो !

तीन हजार रुपयांनी भरलेला खिसा रिता होऊन तो आता 'चाळीस लाखा'च्या ओझ्याने जड झालेला असतो ! हे 'अपेक्षित ओझे, घेऊन येणाऱ्यांना रिकाम्या पोटी पोट भरल्यासारखे वाटत असावे !

# चौदा

कुठे कच्छ कुठे सोरठ ! पण जेसलने मोठ्या मुष्किलीने हे अंतर कापले होते घेतलेली प्रतिज्ञा पाठीवर स्वार होऊन बसली होती मित्रांशी अटीतटीची पैज लावल्यामुळे त्याला सोरठ देशातील सासतिया ठाकूरांच्या घरातून तोरल घोडी आणि तलवार आणावयाची होती. चोरी चपाटी आणि खून-दरोडे यात निष्णात असलेल्या जेसलला ही चोरी फार महाग पडेल असा त्याच्या मित्रांचा दावा होता, तर कसलेही चौर्यकर्म असो, ते सहजगत्या करू ही जेसलची घमेंड होती ! मोठ्या जिद्दीने तो सासतियांच्या वाड्यापाशी येऊन ठेपला होता वेळ मध्यरात्रीची होती सासतियाच्या वाड्यातच घोड्याची पागा होती देवडीवरच्या कोतवालाचा डोळा चुकवून जेसल वाड्याच्या तटावरून वाड्यात घुसला होता तो सरळ पागेत शिरला वाड्याचा दरवाजा उघडून त्याला घोडी पळवून नेता आली असती एका वेळी घोडी आणि तलवार दोन्हीही नेता येणे शक्य नव्हते, त्यामुळे प्रथम घोडी पळवण्याचा विचार करून तो पागेत शिरला होता जेसलला वाटले होते तेवढे ते काम सोपे नव्हते सासतियांच्या वाड्यात मध्यरात्रीलाही दिवे जळत होते वाड्यात भजन रंगात आले होते माणसाची चाहूल लागून घोडी थोडी जरी फुरफुरली तरी तिचा आवाज ऐकून सासतियाच्या वाड्यात धावपळ सुरू होणार होती व चोरी उघडकीस येणार होती त्यापेक्षा भजन संपेपर्यंत स्वस्थ पागेत पडून राहावे व सामसूम होताच कार्यभाग उरकावा असा विचार करून जेसल पागेमध्ये अंधारात एका कोपऱ्याला स्वस्थ बसून राहिला होता

तरी देखील कोणी तरी पागेत घुसल्याचे घोडीला उमजले असावे म्हणून की काय ती मोठ्याने चेकळू लागली होती एवढेच नव्हे तर, दंगामस्ती करून तिने दावणीची खुटी उपटून टाकली होती घोडी आता उधळणार

या धास्तीने जेसलने घोडीचा लगाम घट्ट पकडून धरला आणि जसा होता तसाच श्वास रोखून बसून राहिला पण घोडी फारच अवखळ होती तिने पुन्हा किंचाळून आणि लाथा झाडून स्वतःची सुटका करून घेतली. तेवढ्यात देवडीवरचा कोतवाल धावून आला त्याने घोडीला आवरले. अवतीभवती चाचपडून एक दगड उचलला व उपटलेली खुटी होती त्या ठिकाणी पुन्हा ठोकली पण ही खुटी जमिनीत सरळ घुसली नव्हती खुटीच्या जागी जेसलचा हात होता कोतवालाने ठोकलेली खुटी जेसलचा तळहात पार करून जमिनीत घुसली होती हातात खुटी ठोकल्याने वेदना असह्य झाल्या होत्या, पण त्या निमूटपणे सहन करण्याखेरीज गत्यतर नव्हते ! तोंडातून थोडा जरी चीत्कार बाहेर पडला तर अनर्थ ओढवणार होता जेसलने यावेळपर्यंत अनेक चोऱ्या केल्या होत्या, अनेक दरोडे घातले होते, पण तो एकाही प्रकरणात सापडला नव्हता आता हा प्रकार उघडकीस आला तर नाचक्की होणार होती याची खत वाटत होती मित्रांची व मित्राशी लावलेल्या पैजेचीही तीव्र बोचणी होतीच सासतियाची तोरल घोडी आणि तलवार आणल्याखेरीज भादलीचे पाणी पिणार नाही अशी त्याने घोर प्रतिज्ञा केली होती वाटेल ते करून त्याला पैज जिंकायची होती तेव्हा भजन सपेपर्यंत स्वस्थ बसून राहण्या-खेरीज अन्य मार्ग उरला नव्हता कळा सोसल्याच पाहिजेत असा निर्धार करीत असतानाच त्याला योगी पुरुषाचे स्मरण झाले

जेसल कच्छमधल्या भादली गावापासून निघाल्यानतर मजल दरमजल करीत सोरठमधल्या गिरनार पर्वतापाशी आला होता दीर्घ प्रवासाने खूपच थकवा आला होता जुनागड आता दूर नव्हते तेथून सासतिया ठाकूराची गढीही जवळच होती पण हे उरलेले थोडे अतर तोडण्याएवढा त्राणही अगात राहिला नव्हता गलितगात्र झालेला जेसल गिरनारच्या पायथ्यालाच कोसळला होता एका योगी पुरुषाच्या पायाशीच तो कोलमडून पडला होता कधीही कुणापुढेही न वाकणारा जेसल एका साधूच्या पायाजवळ नतमस्तक होऊन पडला होता या अनपेक्षित घटनेने त्याचे त्यालाच आश्चर्य वाटले होते असहाय नजरेने त्याने क्षणभर योगी पुरुषाकडे पाहिले जेसलची ती हीनदीन अवस्था पाहून साधू त्याला म्हणाला होता, " तुझ्या क्रूर मुद्रेवरून तू कोणी दुष्ट असावास असे वाटते तरीही तू कोणी सामान्य घरचा नसून मोठ्या घरचा असावास अशी तुझी श्रात मुद्रा सांगते "

साधू सत्य तेच बोलला होता म्हणूनच की काय जेसलला त्याच्याबद्दल आदर वाटला होता त्याने मनमोकळेपणाने साधूला सर्व वृत्तांत सांगून विनवले होते, " मी ज्या कामगिरीवर निघालो आहे त्या कामी मी यशस्वी